# सद्विचार-चिंतनी..

डॉ. गजानन श्रीपत खैर

भाग १ ला

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3933

REFBK-0024793

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1 JUN 1986
4 JUN 1986
17 AUG 1986
1 AUG 1986
14 SEP 1986
- 4 FEB 1990

(क्रु. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ निबंध
३१३३
२४६९३
११।१।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३१३३
दा. क्र. २४६९३
निबंध
११।१।८६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# सदाचार-चिंतनी

## भाग १ ला

चिंतनिक

डॉ. गजानन श्रीपत खैर
एम्.ए. पीएच्.डी.

REFBK-0024793

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन पुणे ३०

मूल्य दहा रुपये फक्त

प्रकाशक

**प. भ. कुलकर्णी**

एम्. एस्सी./इंजि./एफ्.टेक्./लंडन.

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनाकरिता
१७८६ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© प्रकाशकाधीन

| | |
|---|---|
| प्रथमावृत्ती | २६ एप्रिल १९५९ |
| द्वितीयावृत्ती | २६ एप्रिल १९६२ |
| पुनर्मुद्रण १ ले | नोव्हेंबर १९६७ |
| पुनर्मुद्रण २ रे | मे १९७२ |
| पुनर्मुद्रण ३ रे | एप्रिल १९७८ |
| पुनर्मुद्रण ४ थे | ऑक्टोबर १९८२ (विजया दशमी) |

मुद्रक

**म. द. कश्यप** एम्. ए.

महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना
१७८६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

# प्रस्तावना

## चौथे पुनर्मुद्रण १९७२

वाचकांनीच या ग्रंथाचा प्रचार व प्रसार केला आहे याबद्दल त्यांचे आभार मानून हे चौथे पुनर्मुद्रण त्यांचे हाती देत आहो.

दि. १० मे, १९७२

व्यवस्थापक
पु. वि. गृह प्रकाशन, पुणे ३०.

## द्वितीयावृत्ती पुनर्मुद्रण १९६७

द्वितीय आवृत्तीचे पुनर्मुद्रण या ग्रंथाच्या लोकप्रियतेची साक्षच आहे. अनेक वाचक स्वतः वाचून आहेर, भेट इत्यादी रूपाने मित्रमंडळीत व नातेवाइकांत या ग्रंथाचा प्रसार करतात. या पुनर्मुद्रणात अनुक्रमणिकेची भर घालून डॉ. खैर यांचा अल्प-परिचय अद्ययावत् केला आहे.

नोव्हेंबर १९६७

व्यवस्थापक
अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.

## द्वितीयावृत्ती १९६२

अल्प अवकाशातच या पुस्तकाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करण्याचा योग आला हेच पुस्तकाच्या उपयुक्ततेचे आणि आवश्यकतेचे उत्कृष्ट गमक आहे.

प्रथमावृत्तीत 'समाचार' मासिकातील एप्रिल १९५९ पर्यंतचेच संपादकीय लेख अंतर्भूत होते. या आवृत्तीत जानेवारी १९६२ पर्यंतच्या संपादकीय लेखांची भर घालून ती अद्ययावत् केलेली आहे. त्याचप्रमाणे 'प्रसाद' मासिकात डॉ. अण्णासाहेब खैर यांचे जे लेख विचाररूपाने वेळोवेळी प्रसिद्ध झाले आहेत त्यांचाही अंतर्भाव यात करण्यात आलेला आहे.

सुधारून वाढविलेली ही दुसरी आवृत्ती वाचकांना सादर करताना आम्हांस अत्यंत आनंद होत आहे.

२६ एप्रिल १९६२

व्यवस्थापक
अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २.

## प्रथमावृत्ती १९५९

या पुस्तकातील विचार विद्यार्थी आणि गृहस्थाश्रमी अशा दोन्ही वाचकांना उपयुक्त, मार्गदर्शक, स्वानुभव-निदर्शक आणि चालनादायक वाटतील. कारण दोन्ही प्रकारच्या वाचकांकरिताच ते लिहिलेले आहेत.

पुणे अनाथ विद्यार्थी गृह व त्याचे महाराष्ट्र विद्यालय यांत शिकणारे विद्यार्थी आणि शिकून बाहेर पडून गृहस्थाश्रमात प्रविष्ट झालेले माजी विद्यार्थी अशा दोन्ही प्रकारच्या वाचकांकरिता हे विचार लिहिलेले आहेत. "समाचार" मासिकाचे संपादकीय म्हणून त्यांतील मोठे विचार लिहिले गेले व हस्तलिखित "विद्यार्थी" मासिक किंवा इतर साप्ताहिके यांतून छोटे विचार लिहिले गेले आहेत.

ज्या ज्या वेळी हे विचार प्रसिद्ध झाले त्या त्या वेळी किती तरी वाचकांनी सुचविले की, हे सर्व विचार एकत्र जमवून पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावेत. कित्येकांनी या विचारांची 'समाचार' मासिकातून कात्रणे कापून, ती एकत्र करून त्यांचा संग्रह तयार करून ठेवला आहे. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या षष्टयब्दिपूर्तीचे व अ. वि. गृहाच्या सुवर्ण-महोत्सवाचे निमित्त साधून आम्ही त्यांचे हे विचार संकलित स्वरूपात सादर करीत आहोत.

विचारांचे स्वरूप व उपयोग व्यापक असल्याने समाजातील सर्वच आबाल-तरुण-वृद्धांना त्यांचा उपयोग होईल. प्रतिदिवशी एक विचार वाचावा किंवा सवडीने आवडतील ते विचार वाचावेत. एक मिनिटभर वाचन करावे किंवा तीस मिनिटे करावे. मुलांनी, पालकांनी, शिक्षकांनी, प्रौढांनी सर्वांनी वाचावे आणि मनन करावे असे विचार या पुस्तकात आहेत.

चाणाक्ष वाचकांच्या हे लक्षात येईल की, हे विचार एखाद्या ग्रंथातून उचललेले नसून अनुभवाच्या व निरीक्षणाच्या मुशीतून ते बाहेर पडलेले आहेत. म्हणूनच वाचकांनाही ते त्यांच्या जीवनात हरप्रसंगी उपयोगी पडण्यासारखे आहेत; आचाराला उपयोगी पडण्यासारखे आहेत; म्हणून ग्रंथाचे नाव 'सदाचार-चिंतनी' असे ठेविले आहे. प्रत्येक विचारावर थोडा वेळ चिंतन झाले म्हणजे तो आपल्याच बुद्धिवैभवाचा एक भाग होतो.

याच विचारसंग्रहाला जोडून डॉ. अण्णासाहेब खैर यांचे एक परिचयात्मक चरित्र आम्ही मुद्दाम देत आहोत. माझे सहकारी श्री. वा. रा. शिदोरे यांनी हे चरित्र

आत्मीयतेने लिहून दिले आहे. हे विचार व चरित्र प्रसिद्ध करण्यास डॉ. खैर यांनी अनुमती दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. नैतिक विचार देणारा मनुष्य आचरणाने स्वतः काय आहे, हे देखील वाचकांना कळायला पाहिजे. विद्वत्तेकरिता तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहिणारे परंतु त्या तत्त्वज्ञानाचा स्पर्शही आपल्या जीवनाला करू न देणारे लेखक अनेक असतात. विचार-संपत्तीच्या दृष्टीने त्यांच्या ग्रंथांचे महत्त्व मोठे आहे. परंतु आचरणात तत्त्वे आणून ती तत्त्वे लेखनाच्या द्वारे प्रतिपादणारा विचारवंत असेल तर त्याच्या विचारांचा व आचारांचा असा दुहेरी परिणाम वाचकांवर होतो. विचार व्यवहार्य व आचरणीय आहेत अशी भावना वाचकांची होते. या भावनेने आम्ही डॉ. खैर यांचे अल्पचरित्र या संग्रहाला जोडले आहे.

बालपणी परिस्थितीच्या आपत्तीशी त्यांना झगडावे लागले. तरुणपणी निर्धनतेची आपत्ती त्यांनी आपण होऊन स्वीकारली आणि निर्धन विद्यार्थ्यांना विद्यादानाचे कार्य करीत असता व्यापक दृष्टीने प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणक्षेत्रात विविध प्रकारचे काम केले. हे काम करीत असता आपल्या एका संस्थेच्या हिताचीच संकुचित वृत्ती न ठेवता अथांग समाजाच्या व शिक्षणाच्या दृष्टीने प्रवास, निरीक्षण, विचार, चिंतन, लेखन, भाषण व शिक्षण-प्रयोग केले.

डॉ. खैर यांच्या चिंतनाला व विचाराला अशा प्रकारची पार्श्वभूमी आहे. वाचकांना हा संग्रह आवडेल असा विश्वास वाटतो.

**शं. दा. चितळे**
व्यवस्थापक, अ. वि. गृह. प्रकाशन, पुणे.

२६ एप्रिल १९५९

शिक्ष
पूर्
च

**पाचवे पुनर्मुद्रण :–**

पहिली आवृत्ती २६।४।५९ ला प्रसिद्ध झाल्यानंतर या ग्रंथाच्या १९६२, १९६७ व १९७२ साली ४ आवृत्या। पुर्नमुद्रणे निघून हे पाचवे मुद्रण आहे. १५।६।६८ साली दुसरा भाग निघाला त्याची १९७२ व १९७८ मध्ये पुनर्मुद्रणे झाली. तिसरा भाग ११।९।७२ रोजी निघून १९७८ मध्ये त्याचे पुनर्मुद्रण झाले. यावरून वाचकांनी किती मनःपूर्वक आश्रय या ग्रंथांना दिला आहे ते लक्षात येईल.

या ग्रंथांचे प्रकाशन संस्थेने आर्थिक फायद्याकरता केलेले नसून सदाचार, सद्विचार व सद्भावना यांच्या प्रसारार्थ केले आहे. त्यामुळे पुस्तकाच्या किंमती अगदी अल्प ठेवल्या आहेत. यातून फारसा नफा मिळत नसून क्वचित थोडा तोटाही येण्याचा संभव आहे.

आपण वाचकांनी ही पुस्तके वाचून त्यांचा यथाशक्य प्रसार करावा. आज भ्रष्टाचार व चारित्र्यलोप झाल्याची तक्रार लोक करतात. सर्वांचे मूळ विचारात, स्वभावात व मनात आहे. ते विचार, स्वभावाव मने पालटण्याचे काम या पुस्तकांच्या प्रसाराने करण्यात आपणही हातभार लावावा. हे एक समाजकार्य आहे.

**१२ मे १९७८** — **प. भ. कुलकर्णी**

पुणे वि. गृहाचा ६९ वा वाढदिवस — पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन

निबंध 3933 २४७९३ २२।७।८६

# डॉ. अण्णासाहेब खैर : अल्प परिचय

[ लेखक : श्री. वा. रा. शिदोरे ]

पुणे अनाथ विद्यार्थी गृहाचे माजी कार्याध्यक्ष व बृहन्महाराष्ट्राच्याही सीमा ओलांडून शिक्षणतज्ज्ञ या नात्याने सुप्रसिद्ध असलेले गुरु. डॉ. गजानन श्रीपत उपाख्य अण्णासाहेब खैर यांच्या वयाला दिनांक १५ जून १९७२ या दिवशी ७४ वर्षे पुरी होऊन त्यांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे.

## चरित्र-लेखनाचे प्रयोजन

गुरु. अण्णा स्वत: इतके प्रसिद्धिविन्मुख आहेत की, त्यांचे कोणी छोटे चरित्र लिहिण्याचे मनात आणले तरी त्यांना अप्रस्तुत वाटेल. परंतु ज्यांनी जन्मापासून जवळ जवळ आजतागायत दारिद्र्याशी व प्रकृतीशी सतत झगडा केला, आणि ज्या खडतर गरिबीतून स्वत: वर आले त्या गरिबीत खितपत पडलेल्या निर्धन बांधवांना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून ज्यांनी अहोरात्र चिंता वाहिली, त्या गुरु. अण्णांच्या चरित्राचे चिंतन सर्वांसच उद्‌बोधक ठरेल, यात मुळीच संशय नाही. गुरु. अण्णांचे विद्यार्थी साऱ्या बृहन्महाराष्ट्रात पसरले आहेत; तर व्यापक शैक्षणिक कार्यामुळे भारतात त्यांचे मित्र व चाहते आहेत. कित्येकांनी थोर, त्यागी, समाजसेवक व शिक्षणतज्ज्ञ या नात्याने त्यांची कीर्ती ऐकली आहे. या सर्वांनाच त्यांच्या षष्टयब्दि-पूर्ति-समारंभाच्या आणि पुणे अ. वि. गृहाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या चरित्राचा अल्प-परिचय करून दिला तर तो उचितच होईल, असे वाटून या छोटया चरित्राची योजना केली. 'सदाचार-चिंतनी'चे हे चौथे पुनर्मुद्रण होत आहे.

## जन्म व बालपण

गुरु. अण्णांचा जन्म दिनांक १५ जून १८९८ रोजी पुण्यातच झाला. त्यांचे पूर्ण नाव गजानन श्रीपत खैर हे होय. त्यांचे मूळ गाव वांगी. हे गाव सातारा जिल्ह्यात आहे. त्यांचा जन्म गणेश पेठेतील एका जुन्या वाड्यात –घोलप वाडा– आजोळी झाला.

निर्धन कुटुंबे अनेक असतात; पण मातापित्यांच्या प्रेमळ छत्राला मुकणारी मुले एका अर्थाने दुर्दैवीच म्हटली पाहिजेत. ते दु:ख गुरु. अण्णांच्या वाटयाला आले होते. त्यांचे वडील प्लेगने वारले तेव्हा गुरु. अण्णा जेमतेम सहा महिन्यांचे होते. वडील बहीण सुमारे ४ वर्षांची होती व भाऊ सुमारे दोन वर्षांचा असेल. गुरु. अण्णा

## अनाथ विद्यार्थी गृहात प्रवेश

गुरु. अण्णांचे शिक्षण होऊन ते या पदास पोचले, हे पाहाण्याचे भाग्य त्यांच्या आईला लाभले असते तर त्या मातेला किती धन्यता वाटली असती ! पण हे भाग्य जरी मिळू शकले नाही तरी स्वर्गस्थ होण्यापूर्वी तिने त्यांना अनाथ विद्यार्थी गृहाचे कुलगुरु दादासाहेब केतकर यांच्या स्वाधीन केले होते. त्यामुळे ती त्यांच्या भवितव्या-बद्दल निश्चित होती.

अनाथ विद्यार्थी गृहात गुरु. अण्णांचा १९१३ साली प्रवेश झाला. अनाथ विद्यार्थी गृहात प्रवेश ही घटना गुरु. अण्णांच्या जीवनात महत्त्वाचे स्थित्यंतर घडवून आणण्यास व त्यांच्या जीवनास निश्चित दिशा लावण्यास कारणीभूत झाली, असे म्हणावयास हरकत नाही. निर्धन परंतु हुशार विद्यार्थ्यांना समाजात काही तरी प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यास शिक्षणलाभ हेच एकमेव प्रभावी साधन असते. ज्ञान हीच गरिबाची संपत्ती असते. बुद्धी असून पैसा व शैक्षणिक सोयी उपलब्ध नाहीत, अशा कोंडीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देण्याचे ध्येय समोर ठेवून अनाथ विद्यार्थी गृह संस्था १९०९ साली स्थापन झाली होती. मधुकरी, वार वा कष्टाची कामे करून स्वावलंबनाने जगणारे व शिकणारे महत्त्वा-कांक्षी विद्यार्थी समाजात त्या काळी होते; परंतु समाजाच्या दातृत्वबुद्धीला आवाहन करून तिचा सदुपयोग करून घेण्यासाठी अशा धडपडणाऱ्या मुलांच्या पाठीशी भक्कम ध्येयवाद असलेली एखादी संस्था उभी असावयास हवी होती. ती भूमिका समाजात अनाथ विद्यार्थी गृह संस्थेने स्वीकारली होती.

गुरु. अण्णा अनाथ विद्यार्थी गृहात प्रविष्ट झाले तेव्हा ती संस्था बाल्यावस्थेत होती. कै. दादासाहेब केतकर व संस्थेतील विद्यार्थी मधुकरी मागून आणून जेवीत. संस्थेत दाखल झाल्यामुळे गुरु. अण्णांचे कष्ट कमी झाले असे नाही; परंतु आपल्या-प्रमाणेच अडचणी असलेले संस्थेतील इतर महत्त्वाकांक्षी कष्टाळू विद्यार्थी यांच्या सहवासात त्यांच्या महत्त्वाकांक्षा वाढीस लागल्या. शिक्षण तर करता आलेच; पण त्याबरोबरच आपल्या आयुष्याचे ध्येयही त्यांना संस्थेच्या वातावरणातच सापडले.

## ध्येय संकल्प

हायस्कूलची शेवटची दोन वर्षे आणि कॉलेज-शिक्षण अनाथ विद्यार्थी गृहाच्या मदतीने गुरु. अण्णांनी पूर्ण केले. आपल्या साध्याच्या आड येणाऱ्या अडचणींना यशस्वी रीतीने तोंड देण्यासाठी अचूक साधनांचा शोध व वापर करण्याची सवय त्यांच्या बुद्धीला लागली असल्याने वैयक्तिक व सामाजिक जीवनात सर्व अनुभवाचे

ते सूक्ष्म निरीक्षण करीत असत व त्यावर चिंतन करीत असत. याच कारणाने त्यांच्या जीवनावर कै. कुलगुरु दादांच्या ध्येयनिष्ठेचा आणि दृढनिश्चयाचा चांगलाच परिणाम झाला.

ज्या काळात संस्था स्थापन झाली तो १९०८–९ चा काल राजकारणाच्या धामधुमीचा होता. राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ ह्या लोकमान्यांच्या चतु:सूत्रीचाच एक भाग होता. तत्कालीन धकाधकीच्या राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास करीत असतानाच त्या झळीपासून दूर राहून राष्ट्रहितकारक शिक्षणाचा प्रयोग करण्याची आवश्यकता अनाथ विद्यार्थी गृहाचे चालक कै. कुलगुरु दादासाहेब केतकर यांनी ओळखली होती. दारिद्र्यामुळे व अस्थिर राजकीय वातावरणामुळे त्यांचे शिक्षण होऊ शकले नव्हते; परंतु लोकमान्य टिळकादी जहाल पुढाऱ्यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा पगडा त्यांच्या मनावर चांगलाच बसला होता. त्यामुळे स्वतंत्र बाणेदारी वृत्तीला पोषक अशा शिक्षणाचे एक राष्ट्रीय कार्य त्यांनी हाती घेतले होते. 'A social institution is a response to a social problem' यानुसार अनाथांच्या शिक्षणाचा प्रश्न हाती घेऊन त्यांनी एका सामाजिक समस्येला हात घातला होता. गुरु. अण्णांच्या संवेदनक्षम मनाला व कृतज्ञबुद्धीला कै. दादांची राष्ट्रीय वृत्ती, कडवी ध्येयनिष्ठा आणि अनाथांच्या शिक्षण-प्रश्नाबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा ओळखता आला आणि म्हणूनच त्यांनी त्या संस्थेचे कार्य पुढे चालू ठेवले.

कै. कुलगुरु दादासाहेब केतकर यांच्याप्रमाणेच डॉ. ना. भि. उर्फ नानासाहेब परुळेकर यांच्या सहवासाचाही गुरु. अण्णांच्या जीवनावर चांगलाच प्रभाव पडला. डॉ. परुळेकर 'सकाळ' वर्तमानपत्राचे कर्तृत्वशाली संपादक म्हणून मान्यता पावले आहेत. अशा व्यक्तीचा सहवास गुरु. अण्णांना तरुणपणी मित्र म्हणून लाभला, हे विशेष होय. डॉ. नानासाहेब परुळेकर व गुरु. अण्णा हे वर्गमित्र होते, त्यामुळे त्यांचे घनिष्ठ संबंध येत गेले. दारिद्र्यादी अडचणींना डॉ. नानासाहेब परुळेकर खंबीरपणे तोंड देत असत. आपल्या हातून काही तरी सामाजिक व राष्ट्रीय कार्य व्हावे, अशी तळमळ त्यांना त्या काळापासून लागली होती. समाजाच्या विकासासाठी काय काय केले पाहिजे, याबद्दल चर्चा ते व गुरु. अण्णा शिक्षण चालू असता अनेकवार करीत असत. बी. ए. पर्यंतचे विद्यार्थी व पुढे संस्थेमधील कार्यकर्ते या नात्याने दोघांचा संबंध संस्थेत जवळ जवळ एक तप आला. १९२६ साली डॉ. नानासाहेब परुळेकर अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी गेले. पुढच्या काळात गुरु. अण्णांनी शैक्षणिक कार्य हेच जीवन-ध्येय म्हणून निवडले व डॉ. परुळेकर वृत्तपत्र व्यवसायात शिरले. त्यांच्यासारख्या उद्योगी, महत्त्वाकांक्षी व कल्पक मित्राचा सहवास अ. वि. गृहात मिळाला, हा आपल्या आयुष्यातला एक बहुमोल सुयोग होता असे गुरु. अण्णा मानतात.

गुरु अण्णा अनाथ विद्यार्थी गृहात शिक्षणासाठी दाखल झाले हा संस्थेच्या

वाढीच्या दृष्टीने एक शुभ योगच होता, असे म्हटले पाहिजे. कारण ते अनाथ विद्यार्थी गृहात न राहता बाहेर राहूनच स्वकष्टाने शिकले असते तर कदाचित त्यांच्या जीवनाला वेगळेच वळण लागण्याचाही संभव होता. परंतु संस्थेत दैनंदिन जीवनात डोळ्यासमोर कै. दादासाहेब केतकर यांच्यासारखी त्यागी, सेवारत व निष्ठावंत व्यक्ती असल्याने त्यांना आपल्या जीविताचे साध्य याच संस्थेत शोधावेसे वाटले. शिक्षक, शाळेच्या इमारती व अन्य साधने ह्या बाह्य गोष्टींहून, भावी आयुष्यात राष्ट्रहितकारक ध्येयवाद पुरविण्यासाठी बहुमोल संस्कार मनावर करणारे मूलभूत शिक्षणाचे वातावरण अधिक महत्त्वाचे असते. हे सर्व अनाथ विद्यार्थी गृहाने गुरु. अण्णांच्या भोवती निर्माण केले. म्हणूनच १९२० मध्ये बी. ए. झाल्यावर ' आता तू काय करणार ?' या कै. दादांच्या प्रश्नाला त्यांनी मी संस्थेचेच कार्य पुढे चालविणार आहे ' असे उत्तर दिले. स्वतःचे दारिद्र्य व अनेकविध अडचणी यांतून गुरु. अण्णांनी व्यापक सामाजिक प्रश्न व त्यांची तीव्र धग ओळखली. म्हणूनच सामान्य माणसाप्रमाणे केवळ स्वतःचा छोटा संसार करीत न बसता त्यांनी संस्थेच्या कार्यास सर्वस्वी वाहून घेऊन अधिक उच्च प्रतीचा सामाजिक संसार करण्याचे व्रत अंगीकारले.

## महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना

ठराविक चाकोरीबद्ध शिक्षण देणाऱ्या शाळांकडून जनजागृतीचे कार्य होणे दुरापास्त हे जाणून प्रा. अण्णासाहेब विजापूरकर यांनी समर्थ विद्यालय, बाळूकाका कानिटकर यांनी स्वावलंबन राष्ट्रीय पाठशाळा व पुण्यातील काही पुढाऱ्यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ वगैरे संस्था स्थापिल्या. त्याप्रमाणे महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना कै. कुलगुरु दादासाहेब केतकर, सकाळचे संचालक डॉ. नानासाहेब परुळेकर व गुरु. डॉ. अण्णासाहेब खैर यांनी १९२१ साली केली. या तिघांनी जरी निर्धनांच्या मोफत शिक्षणासाठी ही शाळा स्थापन केली तरी तिचे संगोपन व संवर्धन करून तिला अखिल महाराष्ट्रामध्ये मानाचे स्थान प्राप्त करून देण्याचे महत्कार्य प्रामुख्याने गुरुः अण्णासाहेब खैर यांनीच केले. १९२० सालच्या असहकारितेच्या आंदोलनात सरकारमान्य शाळांवर बहिष्कार घालण्याचा एक कार्यक्रम होता. त्यातून या विद्यालयाचा जन्म झाला होता. विद्यालयाच्या वाढीचे व त्याला आजची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य किती कठिणतम होते, याची कल्पना स्वातंत्र्य-चळवळीचा थोडाफार अभ्यास असलेल्या वाचकास सहज करता येईल. अनाथ विद्यार्थी गृहाच्या सर्वांगीण कार्याशी गुरु. अण्णा सतत एकनिष्ठ राहिलेच; पण महाराष्ट्र विद्याल-याच्या विकासावर त्यांचे लक्ष अधिक प्रमाणात केंद्रित झाले होते. या अर्थाने ' महाराष्ट्र विद्यालय ' हे त्यांच्या राष्ट्रीय, सामाजिक व शैक्षणिक कार्याचे मूर्तिमत स्वरूप आहे, असे म्हणावे लागेल.

## परदेशीय उच्च शिक्षण

१९२० साली बी. ए. होऊन ते संस्थेचे आजन्म सेवक झाले. लगेच १९२१ मध्ये महाराष्ट्र विद्यालयाची स्थापना झाली तरी दैनिक जबाबदारीची कामे सांभाळून त्यांनी आपले उच्च शिक्षण चालूच ठेविले. १९२३ मध्ये ते दुसऱ्या वर्गात एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या काळात एम्. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण होणे विशेष कठिण मानले जात असे. परंतु यापेक्षा परदेशी जाऊन त्यांनी जे उच्च शिक्षण मिळविले त्यामुळे त्यांच्या कार्याला अधिकच तेज चढले.

स्वतंत्र देशात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नवनवे प्रयोग व संशोधन करून विकास करणे जितके सोपे जाते तितकेच ते परतंत्र देशात अवघड होऊन बसत असते. अनाथ विद्यार्थी गृहाच्या चालकांजवळ राष्ट्रीय वृत्तीला पोषक शिक्षण देण्याची तीव्र आकांक्षा होती आणि यासाठी प्रगत राष्ट्रांतील शिक्षण पद्धतींचे अवलोकन करून थोड्या तरी नवकल्पना आपल्या देशातील शिक्षण-पद्धतीत अंतर्भूत करणे आवश्यक आहे, हे त्यांना पटले होते. म्हणूनच गुरु. अण्णा परदेशी उच्च शिक्षणार्थ गेले. परदेशात जाऊन उच्च पदव्या संपादन केल्याने भारतातील त्यांच्या शैक्षणिक कार्याकडे लोकांचे लक्ष अधिक प्रमाणात आकर्षित झाले.

परदेशात उच्च शिक्षण घेण्याकरिता जाण्यापूर्वी हिंदुस्थानात शिक्षणक्षेत्रात सुमारे १२ वर्षे त्यांनी अनुभव घेतला होता ही गोष्ट ध्यानात ठेवण्याजोगी आहे. १२ वर्षांच्या अनुभवाने तौलनिक अभ्यास करण्याची कुवत त्यांच्या बुद्धीला साहजिकच प्राप्त झाली होती. १९३१ साली ते अमेरिकेस जाऊन कोलंबिया विद्यापीठात एम्. ए. व न्यूयार्क विद्यापीठात पीएच्. डी. झाले, आणि १९३३ त ते हिंदुस्थानात परत आले. हिंदुस्थानात परत येताना ते इंग्लंड, जर्मनी, रशिया, फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंन्ड इत्यादी देशांतील शिक्षणसंस्थाचे व पद्धतींचे निरीक्षण करून आले. अमेरिकेतील त्यांच्या शिक्षणाचा निम्मा खर्च संस्थेने केला व निम्मा त्यांनी तेथे स्वावलंबनाने, काटकसरीने व स्वकष्टाने भागविला .पुढे जागतिक शिक्षण परिषदेच्या निमित्ताने १९३७ साली त्यांनी जपानला जाऊन तेथील शिक्षणपद्धतीचेही निरीक्षण केले. परदेशातील शिक्षण-पद्धतीप्रमाणेच त्यांनी भारतातील पंजाब, संयुक्त प्रांत बंगाल, मध्य हिंदुस्थान, मुंबई इत्यादी प्रांतांतील शिक्षण-पद्धतींचा सखोल अभ्यास केला होता. त्यामुळेच पुढल्या काळात विविध प्रयोग व उपक्रम त्यांना करता आले.

## ग्रंथलेखन

गुरु. अण्णा परदेशी शिक्षणार्थ व समाज-शिक्षणार्थ गेले होते. परदेश-गमनाचा हेतू त्यांनी दृष्टिआड कधीच होऊ दिला नाही आणि प्रवासाची पाल्हाळिक

व चटकदार वर्णने करण्यासाठी व पाश्चिमात्यांच्या सर्वच कृतींचे गोडवे गाण्यासाठी त्यांनी आपली लेखणी झिजविली नाही. त्यांनी १९३५ मध्ये **'जगातील समाजक्रांती व हिंदुस्थान'** हा ग्रंथ लिहिला. त्याच्या प्रारंभी ते लिहितात— " समाज, त्याच्या मुळाशी असलेली विचारमालिका व या सर्वांचा पुढे आपल्या देशावर होणारा संभाव्य परिणाम हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. "

या ग्रंथाला गुरु. अण्णांचे विद्यार्थी-दशेपासूनचे स्नेही व सकाळचे संपादक डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी प्रस्तावना दिली आहे. त्यात ते म्हणतात—"युरोप-अमेरिकेतून हिंदुस्थानात आपण यंत्रे आणतो त्याचप्रमाणे तिकडील अनुभव आणला पाहिजे. हा अनुभव स्वतःच्या गरजा व विचार यांच्या मुशीत ओतून नंतर हिंदी संस्कृतीची पुनर्घटना केली पाहिजे, हा डॉ. खैर यांच्या ग्रंथातील मुख्य विचार आहे.... यापुढे परदेशातच काय पण स्वदेशातसुद्धा प्रवास करू इच्छिणाऱ्यांनी डॉ. खैर यांच्या पुस्तकांतील निरीक्षणाची पद्धत उचलावी."

'जगातील समाजक्रान्ती व हिंदुस्थान' या ग्रंथात अमेरिका, रशिया, जर्मनी, इंग्लंड व इटली या देशांच्या प्रचलित इतिहासाचा आढावा घेऊन आणि आजच्या समाजस्थितीचे व विचार-प्रवाहाचे चित्रण करून, भारताला त्यापासून काय नवे शिकता येईल ते सांगितले आहे.

जगातील प्रगत राष्ट्रांच्या शिक्षण-पद्धतींचा सूक्ष्म अभ्यास करून भारतीय शिक्षण-पद्धतीत जरूर त्या सुधारणा कशा आणता येतील, या प्रधान उद्देशानेच गुरु. अण्णांचे अवलोकन परदेशांत चालले होते. परंतु प्रत्येक देशाचा समाज, तेथील संस्था व लोकांची राजकीय मनोवृत्ती यांचे परीक्षण केल्यावाचून त्या त्या देशाच्या शिक्षण-पद्धतीचे वेगळेपण व मर्म कळत नाही. म्हणून प्रथम गुरु. अण्णांनी 'जगातील समाजक्रान्ती व हिंदुस्थान' हा ग्रंथ लिहिला व नंतर १९३७ मध्ये त्यांनी **'पाश्चिमात्य शिक्षण-पद्धती'** हा ग्रंथ लिहिला.

या ग्रंथास भारतीय कीर्तीचे थोर विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ बॅ. मुकुंदराव रामराव उपाख्य बाबासाहेब जयकर यांच्या प्रस्तावनेचे भाग्य त्यांना लाभले, हा तर विशेषच योग समजला पाहिजे. प्रस्तावनेत ते म्हणतात—" मोठ्या परिश्रमाने डॉ. खैरांनी उपयुक्त माहिती व आपला स्वतःचा अनुभव एकत्र करून तो पुस्तकरूपाने जनतेपुढे मांडला आहे. पुस्तक अतिशय उत्कृष्ट झाले आहे, व त्यांचे मननीय विचार स्वानुभवाच्या अमूल्य कोंदणात बसविले गेले असल्याने त्याची प्रभा फार वाढली आहे."

प्रस्तुत ग्रंथात गुरु. अण्णांनी अमेरिका, रशिया, इंग्लंड, जर्मनी, इटली, फ्रान्स, इ. देशांतील शिक्षण-पद्धतींची माहिती तपशीलवार पण त्यांतील वैशिष्ट्ये

ठळकपणे मांडून दिली आहे. या सर्व देशांत प्रवास करताना त्यांच्या मनात भारत देशाच्या शिक्षणाच्या प्रगतीचा विचार सातत्याने होता, असे हा ग्रंथ वाचताना पदोपदी प्रत्ययास येते.

१९३७ साली गुरु. अण्णांना जागतिक शिक्षण-परिषदेच्या निमित्ताने जपानला जाण्याची सुसंधी लाभली. जपानहून परतल्यावर १९३८ त त्यांनी **'जपानची जीवनक्रान्ती'** हा ग्रंथ लिहिला. जपान हे पूर्व आशियांतील एक चिवट व बलाढ्य राष्ट्र असल्याने त्याच्या शिक्षण-पद्धतीबद्दल त्यांच्या मनात बरीच जिज्ञासा होती आणि ती या परिषदेच्या निमित्ताने पूर्ण झाली. पूर्व-आशियातील सर्व प्रदेशां-वर श्वेत राष्ट्रांचे आक्रमण एकाच वेळी होऊन त्यास हिंदुस्थानादी राष्ट्रे बळी पडून गुलाम झाली व जपान मात्र स्वतंत्र राहिला, ही ऐतिहासिक घटना निश्चित-पणे विचार करण्याजोगी होती. ग्रंथ-प्रयोजनात गुरु. अण्णा लिहितात—"ग्रंथाचा साधन-विषय जपान असला तरी गर्भविषय हिंदुस्थान आहे. हिंदुस्थानच्या भावी धोरणाच्या दृष्टीने जपान काय आहे, त्याने सामर्थ्य कसे मिळविले, त्याचे भवितव्य काय होईल, आणि या सर्वांपासून स्वतःकरिता आपण काय अनुमाने काढावीत, हा या ग्रंथांचा मुख्य उद्देश आहे."

वर उल्लेखिलेल्या ग्रंथांतून गुरु. अण्णांच्या लेखनशैलीचे गुण उत्कृष्ट प्रकारे प्रकट होतात असे म्हटले पाहिजे. हे त्यांचे ग्रंथ इतके गाजले की, 'जगातील समाज-क्रान्ति व हिंदुस्थान' या ग्रंथांचे हिंदीत आणि 'पाश्चिमात्य शिक्षण-पद्धती' या ग्रंथाचे गुजराती भाषान्तर झाले. या ग्रंथाचे हिंदी भाषांतरही पूर्ण होऊन प्रकाशनार्थ तयार झालेले होते, पण प्रत्यक्ष छपाई झाली नाही. 'जपानची जीवनक्रान्ती' ह्या ग्रंथास यशोदाचिंतामणी ट्रस्टचे ३०० रु. चे पारितोषिक मिळाले. ही सर्व पुस्तके अत्यंत लोकप्रिय झाली व त्यांच्या सर्व प्रती विकल्या गेल्या.

## महाराष्ट्र विद्यालय वाढ व वैशिष्टये

गुरु. अण्णांनी आपल्या आयुष्याचे ध्येय केव्हाच ठरवून टाकले होते. त्यामुळे परदेशाहून एम. ए., पीएच्. डी. ह्या पदव्या मिळवून आल्यावर कोल्हापूर, बडोदा इ. ठिकाणच्या टीचर्स कॉलेजांमध्ये प्राध्यापकांच्या नोकरीसाठी आलेली निमंत्रणे त्यांनी आपणहून नाकारली व संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालयाच्या कार्यास वाहून घेतले.

सरकारमान्य शाळांचे केवळ अनुकरण न करता, आजच्या समाज-परिस्थितीच्या दृष्टीने जरूर अशा काही सुधारणा कराव्या, ही तळमळ महाराष्ट्र विद्यालयाच्या इतिहासात सतत दिसून येते.

पाच वर्षांत माध्यमिक शिक्षण, मातृभाषा हे माध्यम, क्रमिक पुस्तकांची निवड, आवश्यक शारीरिक शिक्षण, माध्यमिक शाळेत लष्करी शिक्षण, सकाळची शाळा, साधे फर्निचर, बौद्धिक शिक्षणाला औद्योगिक शिक्षणाची जोड, चित्रकला-संगीतकला इ. चे शिक्षण, आवश्यक त्या धार्मिक व नैतिक शिक्षणाचा बौद्धिक शिक्षणात अंतर्भाव, व्यवसाय व उच्च शिक्षणमार्गदर्शन, गरीब व हुशार विद्यार्थ्यांना गुणांच्या प्रमाणात मोफत शिक्षण, श्रमाचे व स्वावलंबनाचे शिक्षण, वर्गसभा, वर्ग-दैनंदिनी, विद्यालय-दैनंदिनी, सुट्टयांचा विधायक उपयोग, देखरेखीखाली व मार्ग-दर्शनाखाली गृहपाठ, रिकाम्या तासांच्या वेळी स्वाध्यायमालेतील पुस्तकांचा उपयोग, आत्मचरित्र व प्रबंध-लेखन, ग्रंथ-परीक्षण, वर्ग-साप्ताहिके, परीक्षा-सुधारणा विद्यार्थ्यांच्या प्रगतीची सुस्पष्ट कल्पना देणारी प्रासंगिकी वही, वैयक्तिक मार्गदर्शना-साठी कुलगुरु नेमण्याची पद्धती इ. गुरु. अण्णांच्या नेतृत्वाखाली केलेले यशस्वी प्रयोग व उपक्रम विद्यालयाच्या जिवंतपणाचे द्योतक आहेत. सतत नवनवीन उपक्रम चालू असतात. येथील अनेक उपक्रमांचे अनुकरण इतर शाळांनी केलेले आहे. १९३३ साली माजी शिक्षणमंत्री डॉ. र. पु. परांजपे यांनी या विद्यालयाचे कार्य पाहिल्यावर "I trust that the Education Department will carefully observe this Institute and try to introduce some of its ideas into the Educational System of this Presidency at least in suitable places," असे उद्गार काढले. यावरून हिंदी शिक्षणाला अल्पशी दिशा दाखविण्याचा विद्यालयाचा उद्देश सफल झाला, असे म्हणावयास हरकत नाही.

आज महाराष्ट्र विद्यालय नव्या इमारती, साधनांनी युक्त प्रयोगशाळा, मुद्रण व सुतारी वर्ग, खुले नाटयगृह व भव्य ग्रंथालय इत्यादी शाखांनी सुसज्ज असून विद्यालयात सुमारे ६०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्यापैकी ८०–८५ टक्के विद्यार्थी नादार आहेत.

आतापर्यंत विद्यालयाची संख्यात्मक व गुणात्मक अशी जी वाढ झाली तिचे श्रेय गुरु. अण्णांच्या बौद्धिक, मानसिक व शारीरिक तपश्चर्येलाच आहे, असे म्हटले पाहिजे. विद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी त्यांच्या मनात ज्या कल्पना होत्या त्या बऱ्याच अंशी तीन तपांच्या तपश्चर्येनंतर फळाला आल्या आहेत असे समजावयास हरकत नाही.

### व्यापक शैक्षणिक कार्य

युरोप-अमेरिकेतील सामाजिक व शैक्षणिक अभ्यास व पाहाणी करून आल्या-नंतर आपल्या निरीक्षणाचा व विचारांचा फायदा संस्थेव्यतिरिक्त सर्व समाजाला

मिळावा म्हणून १९३४ ते १९३७ या २–३ वर्षांत गुरु. अण्णांनी हिंदुस्थानात पाय ठेवल्यापासून अनेक ठिकाणी व्याख्याने दिली आणि अनेक वृत्तपत्र-मासिकांतून शैक्षणिक विषयावर लेख लिहिले. या कालावधीत त्यांनी जवळजवळ १०० लेख लिहिले असतील. पश्चिम महाराष्ट्रात, नागपूर, वऱ्हाड भागात व महाराष्ट्राबाहेरही अनेक मोठमोठ्या शहरी त्यांनी व्याख्याने दिली व मराठी व इंग्रजी वृत्तपत्र-मासिकांतून त्यांनी शिक्षणावर लेख लिहिले.

अनाथ विद्यार्थी गृह आणि महाराष्ट्र विद्यालय यांची कामे सांभाळून महाराष्ट्रातील आणि भारतातील शैक्षणिक क्षेत्रात विविध प्रकारचे काम गुरु. अण्णांनी केले व करीत आहेत. दिल्ली, ग्वाल्हेर, नागपूर, बनारस इत्यादी ठिकाणी भरलेल्या अखिल भारतीय शिक्षण-परिषदांत निबंध वाचून चर्चेत भाग घेतला आहे. मुंबई प्रांतात भरणाऱ्या माध्यमिक शिक्षकांच्या आणि मुख्याध्यापकांच्या वार्षिक परिषदांमधून महत्त्वाचे काम ते करीत आलेले आहेत. या संस्थांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद म्हणून किंवा अध्यक्ष–उपाध्यक्ष म्हणून त्यांनी कामे केली. मुंबई इलाखा प्राथमिक शिक्षण संघाचे ते तीन वर्षे अध्यक्ष होते. त्या काळातील या संघात ऐक्य निर्माण करून त्याला सुसंघटित स्वरूप त्यांनी दिले. मुंबई विद्या-पीठात ते १९४० व १९४५ अशा दोन्ही वेळी सभासद म्हणून निवडून आले आणि आठ वर्षे त्या विद्यापीठाच्या निरनिराळ्या शाखांतून त्यांनी कामे केली. १९४८ पासून १९६३ पर्यंत ते पुणे विद्यापीठात सभासद होते.

नवीन घटनेप्रमाणे विधिमंडळात शिक्षकांना प्रतिनिधित्व मिळाले तेव्हा १९५२ मध्ये लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये ते बहुमताने निवडून आले. १९५२ ते १९५८ अशी सहा वर्षे कौन्सिलमध्ये शैक्षणिक आणि इतर विषयांवर अभ्यासपूर्वक आणि विधायक अशी टीकात्मक भाषणे करून राज्य-कारभारविषयक अनेक सूचना त्यांनी कौन्सिलच्या कामकाजात केल्या. इंग्रजी भाषेतून चांगले भाषण करणारा एक वक्ता या दृष्टीने त्यांना मान होता. मुंबई प्रांतात माध्यमिक शिक्षण-विषयक कामे आणि संघटना आहेत त्यांपैकी बहुतेकांशी गुरु. डॉ. खैर यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध आलेला आहे. मग या संघटना लोकमताने निवडलेल्या असोत अथवा सरकारने नियुक्त केलेल्या असोत. व्यापक अनुभव, नि:पक्षपाती आणि विधायक दृष्टिकोन आणि विरोधी मतामतांतून तडजोडीची भूमिका शोधून काढ-ण्याची मनोवृत्ती या त्यांच्या गुणांमुळे सरकारी–बिनसरकारी अशा दोन्ही प्रकारच्या संघटनांना त्यांचा उपयोग होतो. बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व एस्. एस्. सी. बोर्ड या संस्थांचे ते अनेक वर्षे सभासद होते. इंटीग्रेशन कमिटी फॉर सेकंडरी एज्युकेशन (नव्या मुंबई राज्यातील शिक्षणाची एकसूत्रीकरण समिती) या कमिटीत सभासद या नात्याने त्यांनी महत्त्वाचे काम केले. 'राष्ट्रीय शिक्षक-पारितोषिका' चा

मान त्यांना राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते दिनांक २५-१-६० रोजी मिळाला आणि भारत सरकारकडून त्यांच्या व्यापक शैक्षणिक कार्याचा यथोचित गौरव झाला. हे त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वपूर्ण यश होय. 'फेडरेशन ऑफ् हेडमास्टर्स असोसिएशन्स' या संस्थेचे प्रारंभापासून ते आधारस्तंभ आहेत. 'एज्युकेशन कमिशन १९६६' च्या (कोठारी आयोगाच्या) टास्कफोर्सचे ते सभासद होते. पाठ्य पुस्तक मंडळाच्या संशोधन विभागाचे ते सन्मान्य सल्लागार आहेत.

शिक्षणातील केवळ कारभारविषयक आणि तांत्रिक बाजूवरच गुरु. अण्णांनी भर दिलेला नसून या क्षेत्रातील वैचारिक आणि ध्येयात्मक बाजूंवरही त्यांचे लक्ष आहे. प्राथमिक, माध्यमिक, आणि उच्च शिक्षणात तरुण पिढीच्या आणि शिक्षकांच्या विचारात परिवर्तन करण्याच्या दृष्टीने जी जी संधी आली ती त्यांनी घेतलेली आहे. व्यापक अर्थाने शिक्षकाची, गुरुजीची, आचार्याची, अध्यापकाची भूमिका ते कधीही विसरलेले नाहीत. त्यांनी लेखक, संपादक व व्याख्याते या नात्यांनी जी कामे केली त्यांकडे त्या भूमिकेतून पाहायला पाहिजे. सरकारी मराठी क्रमिक पुस्तक समितीचे ते १९४८ पासून अध्यक्ष होते. नवभारत वाचनमाला, स्वाध्यायमाला, प्रोग्रेस ऑफ एज्युकेशन इत्यादींचे ते संपादक आहेत. आपल्या विचारांच्या प्रसाराचे आणि व्यापक शिक्षणाचे साधन म्हणून त्यांनी आपल्या भूमिकेचा विचार केलेला आहे. आपल्या शिक्षणविषयक ज्ञानाचा व विचारांचा फायदा मास्टर ऑफ एज्युकेशन पदवीचा अभ्यास करणाऱ्या अध्यापकांना करून देण्याची संधी त्यांना मुंबई, पुणे आणि कर्नाटक अशा तिन्ही विद्यापीठांच्या मुंबई, पुणे व बेळगाव येथील टीचर्स कॉलेजांतून मिळाली. १९४७ पासून आजपर्यंत त्यांच्या वर्गात कम्पॅरेटिव्ह एज्युकेशन हा विषय शिकून बाहेर पडलेले अनेक अध्यापक सर्वत्र पसरलेले आहेत.

सारांश, गेली ३०–३५ वर्षे मुंबई राज्यातील बहुतेक शिक्षणक्षेत्रांशी त्यांचा सर्व प्रकाराने निगडित संबंध आलेला आहे. शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, लेखक, संपादक, वक्ता, सभासद, अध्यक्ष, संशोधन-मार्गदर्शक आणि समाज-सेवक अशा सर्व प्रकारच्या भूमिका ते पार पाडीत आहेत.

## पुणे अनाथ विद्यार्थी गृहाची सर्वांगीण वाढ

पुणे अनाथ विद्यार्थी गृह या संस्थेला गुरु. अण्णांनी आपले जीवन समर्पण केले असल्याने त्यांच्या शैक्षणिक कार्याचा परीघ कितीही वाढला तरी पुणे अनाथ विद्यार्थी गृह संस्था हे जे सर्व कार्याचे केंद्रस्थान त्याकडे किंचितही दुर्लक्ष त्यांनी होऊ दिले नाही. संस्थेविषयीची त्यांची निष्ठा फार मोलाची आहे. अनाथ विद्यार्थी गृहाच्या वाढीचे ध्येय समोर ठेवूनच त्यांनी बाहेरील व्यापक कार्य केले.

१९५० मध्ये कुलगुरु दादासाहेब केतकर कैलासवासी झाले. त्यांच्या पश्चात गुरु. अण्णा कार्याध्यक्ष झाले. संस्थेच्या रौप्य-महोत्सव-प्रसंगी कै. तात्यासाहेब

केळकर यांनी "हरळीला मुळ्या फुटलेल्या आहेत." हे काढलेले उद्गार पूर्णपणे सार्थ होते असे वाटते. १९५० नंतरच्या कालात संस्थेचा जो कायापालट झाला त्यामुळे "श्री. केतकर गेले; आता संस्थेचे कसे होणार ?" ही धास्ती काहींना पडली होती, ती पूर्णपणे नाहीशी झाली व संस्थेविषयी समाजाची आपुलकी काही प्रमाणात वाढलीच.

१९५० नंतर विद्याभवनात सुमारे १० लाखांच्या नव्या इमारती बांधण्यात आल्या; एवढेच नव्हे तर वसतिगृहातील विद्यार्थ्यांची पुणे-नाशिक येथील संख्या सध्या २५० च्या पुढे गेली आहे. महाराष्ट्र विद्यालयात सध्या ६०० पर्यंत विद्यार्थ्यांची मोफत सोय करण्यात आली आहे. औद्योगिक शिक्षण-शाखांना अधिक सुव्यवस्थित रूप आले आहे. संस्थेच्या प्रकाशनखात्याचे काम प्रगति-पथावर आहे. नाशिकच्या सॅनिटोरियमचा व्याप वाढल्याने ती स्वतंत्र संस्था केली आहे. 'समाचार' मासिकाच्या साधनाने माजी विद्यार्थी-संघटना बळकट करण्यात आली असून संस्थेत नव्या कार्यकर्त्यांची भर पडली आहे.

कै. दादांच्या पश्चातही संस्थेचे कार्य तितक्याच किंबहुना अधिक वेगाने प्रगती करीत असल्याचे वरील विवेचनावरून सहज स्पष्ट होण्यासारखे आहे. या कामी संस्थेच्या सर्वच कार्यकर्त्यांचे परिश्रम कारणीभूत झाले असले तरी त्या सर्वांना गुरु. अण्णांचे मार्गदर्शन व नेतृत्व लाभले, हे विसरून चालणार नाही.

## गुरु. अण्णांचे कौटुंबिक जीवन

पतीच्या जीवनाशी पूर्णपणे समरस होऊन त्याची सुखदुःखे आपली असे मानणारी समाधानी पत्नी नसेल तर कोणाचेच जीवन सुखी होणार नाही. विशेषतः सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या आयुष्यात तर अशा स्वभावाच्या सहचारिणीची जरुरी फार असते. या दृष्टीने गुरु. अण्णा सुदैवीच म्हटले पाहिजेत.

ती. सौ. यमुताईंचा स्वभाव अत्यंत मनमोकळा, प्रेमळ व आतिथ्यशील आहे आणि यामुळेच त्या संसार आनंदमय करू शकलेल्या आहेत. त्यांना आता एक मुलगा व ३ मुली असून सर्वजण गृहस्थाश्रमी झाले आहेत. सर्वांशी गुरु. अण्णा खेळीमेळीने वागत असल्याने कुटुंबात नेहमी एक प्रकारचा प्रसन्नपणा भरून राहिल्यासारखा वाटतो. पण याचा अर्थ गुरु. अण्णांच्या कौटुंबिक आयुष्यात संकटे व अडचणी आल्या नाहीत असा समज करून घेणे मात्र चुकीचे होईल. सर्वसामान्य गरीब कुटुंबाला ज्या आर्थिक अडचणी व विवंचना असतात त्या त्यांनाही आहेतच. त्याबरोबरच मुलांच्या मृत्यूचे दुःख त्यांना गृहस्थाश्रमाच्या प्रारंभीच्या काळात

भोगावे लागले. त्याचा पहिला व तिसरा दोन्ही मुलगे अगदी बालवयातच मृत्यू पावले तर दुसरा मुलगा अपस्माराच्या विकारामुळे १९५० सालापासून 'मेंटल हॉस्पिटल' मध्ये येरवड्यास होता. तो दुर्दैवाने २० नोव्हेंबर ६० ला कालवश झाला! अशी दु:खे त्यांनी स्थितप्रज्ञाच्या स्थिर बुद्धीने व सयमाने सोसली.

## अलीकडील ग्रंथलेखन व भावी योजना

युरोप, पूर्व आशिया व अमेरिकेतील समाज आणि शिक्षण पद्धती यांचे निरीक्षण करून आल्यावर १९३४ ते ३७ या कालखंडात गुरु. अण्णांनी जे ग्रंथलेखन केले, त्यात पुढे संस्थेच्या व बाहेरील जबाबदाऱ्या यांमुळे काही वर्षे खंड पडला होता. '**सदाचार चिंतनी**' ची प्रथमावृत्ती १९५९ त निघाल्यापासून ग्रंथलेखनाच्या कामास पुन्हा गती आली. सर्वसामान्य माणसास गीतेतील मुख्य विचार समजावे व ते आचरणात उतरवता यावे, अशा दृष्टीने '**गीतेतील मुख्य विचार**' या ग्रंथाची रचना १९६३ त झाली. सुमारे ४५ वर्षे गुरु. अण्णांनी शिक्षणाचे व समाजसेवेचे काम केले. शिष्य मित्र, सहकारी यांच्या प्रतिक्रियांचे संकल करणारा '**शिक्षण, शील व संस्कार**' हा ग्रंथ त्यांनी ऑक्टोबर ६६ त प्रसिद्ध केला. १९६७ त त्यांच्या ६९ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने लहान मुलांसाठी '**बालगडचा किल्ला आणि इतर कथा**' हे छोटेसे पुस्तक प्रसिद्ध झाले. १० ऑगस्ट १९६७ ला प्रसिद्ध झालेले '**मूळ गीतेचा शोध**' हे पुस्तक त्यांचा गीतेचा प्रदीर्घ व्यासंग आणि सूक्ष्म, चिकित्सक व संशोधक दृष्टी यांची साक्ष देईल. गीता-रचना आणि ती रचली गेली त्या काळातील सामाजिक व धार्मिक परिस्थिती यांवर नवा प्रकाश टाकण्यास हा ग्रंथ उपयुक्त ठरेल. संशोधनाचे दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा असल्याने भारतीय व परदेशी प्राच्यविद्या-अभ्यासकांच्या करता त्याचे Quest For The Original Gita हे रूपांतर मुंबईच्या सोमैय्या प्रकाशनाने प्रसिद्ध केले. १९६८ मध्ये '**सदाचार चिंतनी भाग २ रा**' प्रसिद्ध झाला. गीतेवरील नवीन संशोधनामुळे गीतेचा अर्थ सुलभ रीतीने लावता येतो हे दाखवण्याकरता १० जानेवारी १९७० रोजी '**गीताविकास--समतोल जीवनाचे दर्शन**' आणि '**मराठी गीता व विवरण**' ही दोन पुस्तके प्रसिद्ध केली. महाराष्ट्रात व बाहेर गीतेवर ५०/६० व्याख्याने देऊन आपल्या संशोधनामुळे गीतेचा अर्थ किती सहज लावता येतो हे समजावून सांगितले. महाराष्ट्रात व्याख्याने देऊन गीतेच्या अभ्यासाला चालना देण्याचे व गीतेवर प्रसिद्ध केलेल्या वाङ्मयाचा घराघरातून प्रसार करण्याचे त्यांचे कार्य चालू आहे.

## आदर्श त्याग रु. ५० हजार संचयदान

सप्टेंबर ६४ त नव्या इमारतींचे अनावरण नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या प्रसंगी गुरु. अण्णांनी १०,००० रु. ची देणगी संस्थेस

देऊन त्यागाचा व सेवेचा एक नवाच आदर्श सर्वांसमोर ठेवला. डॉ. खैर-कुल-विद्या-निधी स्थापन करण्याची सूचना त्यांनी या वेळी केली. पुढे शक्य होईल त्याप्रमाणे स्वतः हा निधी २५ हजारांचा करावा व हस्ते परहस्ते त्यात भर घालून तो ५० हजारांपर्यंत नेण्याची सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. त्याप्रमाणे संस्थेच्या हीरक महोत्सवाचे वेळी ४० हजाराची भर घालून ५०,००० च्या संचयदानाचा संकल्प त्यांनी पुरा केला. ५० वर्षांच्या सेवेनंतर आपल्या माजी विद्यार्थ्यांना आपल्या जागी स्थानापन्न करून ते सेवानिवृत्त झाले. नवीनच निर्माण केलेल्या 'अनुसंधान समितीचे' ते सभासद आहेत.

१९२० पासून आपले सर्व आयुष्य गुरु. अण्णांनी निर्धन विद्यार्थ्यांच्या शिक्षण-कार्यास दिले आहे आणि त्यांच्याबद्दल कृतज्ञ भाव असलेले शेकडो विद्यार्थी साऱ्या महाराष्ट्रात पसरलेले आहेत. संस्थेच्या वा सार्वजनिक व शैक्षणिक कार्याच्या निमित्ताने ते कोठेही गेले तरी माजी विद्यार्थी त्यांना भेटण्याकरिता आपली अनेक कामे दूर सारून आस्थेने येत असतात. असे विद्यार्थी विश्वासाने एखाद्या वडील बंधू-जवळ आपले हृद्गत सांगावे तसे मनमोकळेपणाने त्यांच्याशी बोलून त्यांचे मार्गदर्शन घेतात. गुरु. अण्णांनी विद्यार्थ्यांचे संपादलेले हे प्रेम व आपुलकीच त्यांची खरी संपत्ती आहे. तिचे मोल पैशांत करता येणे अशक्य आहे. समाजाला त्यांचा आधार असाच यापुढे मिळावा अशी इच्छा आहे.

१९६७ मध्ये 'मूळ गीतेचा शोध' हा संशोधन प्रबंध प्रसिद्ध झाल्यानंतर गीतेचा जो नवीन अर्थ लागला त्यावर सतत चिंतन, लेखन, प्रकाशन व प्रसार असा अण्णांचा एकमेव कार्यक्रम चालू आहे. त्यांनी महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जिल्ह्यांतील प्रमुख अशा १००।१२५ गावी व महाराष्ट्राबाहेर झाशी, भोपाळ, ग्वाल्हेर, उज्जैन, इंदूर, धारवाड, हुबळी, हैद्राबाद, पांडिचरी इ. ठिकाणी गीतेवर ४००/४५० व्याख्याने दिली व गीताविषयक वाङ्मयाचा प्रसार केला. यात सौ. ताईंनी त्यांना अप्रतिम सहकार्य दिले. वाचकांना व श्रोत्यांना संस्कृत गीता समजत नाही म्हणून त्यांनी आर्यावृत्त व इतर वृत्तात संपूर्ण मराठी अनुवाद करून "सर्वबोध पद्यगीता" प्रसिद्ध केली. ती अतीशय लोकप्रिय झाली. सदाचार चिंतनीचे ३ व ४ हे भाग प्रसिद्ध केले. अद्याप गीता-विषयक कार्य चालू आहे. गीतेच्या अभ्यासाला व प्रसाराला लागणारे सर्व साहित्य त्यांनी निर्माण केले आहे, व करीत आहेत. ते अनेक पिढ्यांना पुरेल.

आजवर तनमनधनाने गुरु. अण्णांनी शिक्षणाचे व समाजसेवेचे कार्य निर-लसतेने, निष्ठेने व अखंडपणे केले आहे. ते तसेच पुढे चालू राहावे, यासाठी ईश्वराने त्यांना उत्तम प्रकारचे आरोग्य द्यावे व शतायुषी करावे, अशी प्रार्थना करून ही अल्पशी सेवा वाचकांना रुचो अशी सदिच्छा व्यक्त करून हे चरित्र-लेखन संपवितो.

# अनुक्रम


डॉ. अण्णासाहेब खैर :
अल्प परिचय ७–२१
१. वैयक्तिक विकास १
२. तपश्चर्या १
३. ज्ञानाचा आनंद २
४. आत्महत्या की आत्मविकास ३
५. तिळगूळ घ्या, गोड बोला ४
६. निदान चिमूटभर माती ? ४
७. अखंड ज्ञानार्जन, ५
८. अनन्त हस्ते कमलावराने
देता किती घेशील दो कराने ? ६
९. आपल्या समाजाची नीती ७
१०. नवा धर्म–दैनंदिन पालन ७
११. आर्थिक विकास ८
१२. लोकशाहीचा आत्मा ९
१३. प्रार्थनेचे मनन १०
१४. लेखणी जिवंत ठेवा ११
१५. विकासणारी वलये ११
१६. कर्तबगारी जागृत करा १२
१७. चातुर्मास्यातील व्रते १३
१८. गणानां त्वा गणपतिं हवामहे १४
१९. शिक्षण, गुण आणि वशिला १५
२०. आपले संस्कार १६
२१. तुमची पंचवार्षिक योजना १७
२२. अनाथांचे शिक्षण हेच आपले ब्रीद १७
२३. प्रगतीच्या पायऱ्या १८
२४. जुना धर्म–नव विधर्म १९
२५. आर्थिक व्यवहारातील
दानत राखा २०
२६. आचारधर्माची क्रमिक पुस्तके २१
२७. दैनिक आत्मनिरीक्षणाचे तंत्र २१
२८. आंतरप्रांतीय स्नेहवर्धन २२
२९. आपल्या मुलीचे शिक्षण २३
३०. सत्कृत्याचे पारितोषिक २४
३१. अप्रसिद्ध कर्तबगारीचा गौरव २५
३२. बेकारीचा प्रतिकार २६
३३. हिंदीवर प्रभुत्व मिळवा २७
३४. सभ्याचारांचे संगोपन करा २८
३५. संस्थांची सावली २९
३६. वैयक्तिक उन्नतीचे मोजमाप २९
३७. जीवनातील खेदाचे प्रसंग ३०
३८. संशयातीत वर्तन ठेवा ३१
३९. सामुदायिक करमणूक ३२
४०. सर्वस्व-समर्पण की अंगचोरपणा ३३
४१. समाजवादाचे पथ्य :
कर्तव्यनिष्ठा ३४
४२. वसन्त-ऋतूची पूजा ३५
४३. माणसे जोडा, तोडू नका ३६
४४. वाढत्या वयाची लक्षणे ३७
४५. प्रमाद–पश्चात्ताप–प्रायश्चित्त ३७
४६. यदृच्छा की नियोजन ३८
४७. चारित्र्यविषयक वार्ता ३९
४८. महाराष्ट्राचे आत्मनिरीक्षण ४०
४९. अलौकिक विभूतिमत्व
आणि समाजविकास ४१
५०. व्यवहारज्ञान म्हणजे काय ? ४२
५१. स्वार्थाकरिता तरी नीट वागा ४३
५२. विघ्नसंतोषी लोकांवर वचक ४४

५३. तुमच्या आरोग्याचे रहस्य ४५
५४. तुमच्या मुलांचे शिक्षण ४६
५५. स्वतःच्या कामापुरताच संबंध ठेवणारी स्वार्थी माणसे ४७
५६. गुरुसंभावनेची नष्ट पण इष्ट परंपरा ४८
५७. वस्तु-व्यक्ती तत्त्व यांतील तारतम्य ४९
५८. माता-पिता हेच खरे गुरु, इतर केवळ प्रासंगिक ५०
५९. दहा पैशांत शंभर टक्के काम ५१
६०. लोकशाही व हुकूमशाही यांतील फरक ५२
६१. वाचन-चिंतन-लेखनाची दुर्मिळता ५२
६२. शेजारधर्म ५३
६३. नोकरवृत्ती आणि मालकवृत्ती ५४
६४. कथावाङ्‌मयात मला काय दिसते ? ५५
६५. वीरदेवो भव। हुतात्मा देवो भव ।। ५६
६६. प्रश्नाने ज्ञान वाढते ५६
६७. दिवाळीची सात्त्विक संस्कृती ५७
६८. लोकशाहीतील स्वातंत्र्य ५८
६९. विकारांवर नियंत्रण ५९
७०. चिंतनशील जीवन ६०
७१. विद्यार्थी, शिस्त आणि समाज ६१
७२. मोठी मने—लहान मने ६२
७३. गृहजीवनातील संस्कृती ६२
७४. आपापल्या मर्यादा ओळखण्यात सुख ६३
७५. आता नवा ध्येयवाद हवा ६४
७६. ज्ञानाचे कुरण ६५
७७. तुमच्या धंद्याचा प्रभातकाल ६६
७८. परप्रान्तांतील गुणांची आयात ६७
७९. उत्तेजन ६८
८०. उत्कृष्ट लेखन कोणते ६९
८१. उष्टया हाताने कावळा... ७०
८२. समाजकार्यात जिव्हाळा हवा ७०
८३. लहान दुःखाचा मोठा उपयोग ७१
८४. नवे पक्ष, नव्या जाती, नवे न्याय ! ७२
८५. अकल्याणाचा खजिना ७३
८६. स्वप्नभंगाचे धक्के ७४
८७. मराठी भाषेवर सक्रिय प्रेम दाखवा ७५
८८. तुमचा व्यवसाय हीच देशसेवा ७६
८९. आई ! आई ! ७७
९०. पोथी-लेखनाची प्रथा ७८
९१. सत्कार आणि तिरस्कार ७९
९२. त्यागाची गरज संपली काय ? ८०
९३. वात्सल्याचा अतिरेक ८१
९४. आपले सामाजिक अज्ञान ८२
९५. अयशस्वी जीवनापासून मार्गदर्शन ८२
९६. कालाय तस्मै नमः। ८३
९७. दुःखी चित्रपटांवर पैसा ! ८४
९८. दैव आणि पुरुषार्थ यांचा मेळ ८५
९९. मानसिक विश्रांती ८६
१००. तुमची किंमत ८७
१०१. तुम्हीही लेखक व्हाल ! ८७
१०२. शिक्षक व पक्षराजकारण ८८
१०३. माणसे मोठी—दृष्टी छोटी ! ८९
१०४. उलटणारे शत्रू ९०
१०५. नापासांचे सांत्वन ९०
१०६. कृतज्ञतेचा गहिवर ९१
१०७. निवडणुकीचे रहस्य ९२

१०८. माणसांतील फरक आणि त्यांची पारख ९३
१०९. सुशिक्षितांची दिनचर्या ९४
११०. सदाचाराचे अज्ञान ९५
१११. दोनच जाती—सज्जन आणि दुर्जन ९६
११२. शंभरातला एक ९६
११३. सामान्यजन आणि अभिरुची ९८
११४. आजचा हा काळ ९९
११५. औचित्यदृष्टीची दुर्मिळता १०१
११६. सनातन विचारांचा आधुनिक आचार १०२
११७. नोठें कलह गावात तरी आण नका ! १०३
११८. प्रौढ शिक्षणाची जुनी साधने १०४
११९. अणुयुगातील व्यक्ति-विकास १०५
१२०. क्षात्रतेजाचे संगोपन १०६
१२१. सरकारी नोकरीतच खरे धर्माचरण १०७
१२२. दुराचाराचे नियंत्रण १०८
१२३. जनतेची अभिरुची १०९
१२४. प्राणरक्षण का प्राणघात ? १११
१२५. संयुक्त झाला ! संपन्न करा ! ११३
१२६. निदर्शनाचे नवे मार्ग शोधा ! ११४
१२७. सांप्रदाय व समाज-संस्कृती ११६
१२८. निष्ठेची लहान क्षेत्रे ११७
१२९. सुशिक्षित गुन्हेगार ११८
१३०. अर्थव्यवहारातील न्याय व अन्याय १२०
१३१. तुमची सुखाची व्याख्या १२१
१३२. आचार-सूत्रे : संक्षिप्त विचारांचा संग्रह १२२

# सदाचार-चिंतनी

## १. वैयक्तिक विकास

**एकदा** एका सुविद्य संस्थानिकाकडे संस्थेच्या कामानिमित्त भेटावयास गेलो असता त्यांनी विचारले—"तुमच्या शाळेतून बाहेर पडणाऱ्या मुलांवर संस्थेचा असा कोणता छाप असतो? कोणत्या विशिष्ट साच्याचे शिक्षण तुम्ही देता?"

त्यावर मी उत्तर दिले की—"विशिष्ट साच्याचे शिक्षण देणे हे आमचे ध्येय नाही. प्रत्येक विद्यार्थ्याच्या ठिकाणी असलेल्या नैसर्गिक गुणांच्या विकासाला अनुकूल वातावरण निर्माण करणे हे संस्थेचे काम आहे. त्या वातावरणात प्रत्येकाने आपला बौद्धिक, मानसिक, शारीरिक व नैतिक विकास करून घ्यावा."

जी गोष्ट आपल्या संस्थेत तीच आपल्या घरोघरीही लागू आहे. घरात दोन चार लहान बालके असतात, त्यांपैकी प्रत्येकाच्या ठिकाणी काहीना काही उपजत देणगी सुप्तावस्थेत असते. पालकाने ती देणगी, तो गुण शोधून काढून तो वाढीला लावला पाहिजे. जी संधी आपल्याला मिळू शकली तीच आपल्या मुलांनाही आपण उपलब्ध करून दिली पाहिजे.

आश्रमातील राहणी व वातावरण हेच एक शिक्षण आहे. यातील चांगल्या गोष्टीचे वातावरण आपापल्या घरी निर्माण करून त्यात बालकांची वाढ होऊ द्या.

जे आपल्याला मिळाले त्याचा फायदा नवीन पिढीलाही देऊ या. त्यात देशाचा उत्कर्ष आहे.

[—डिसेंबर १९४९]

## २. तपश्चर्या

**पुराणांतील** गोष्टी वाचून तपश्चर्या म्हणजे काही अलौकिक गोष्ट आहे; ती आपल्यासारख्या सामान्य माणसांकरिता नाही अशी कल्पना होते. ती चूक आहे. तपश्चर्या प्रत्येक व्यक्तीकरिता आहे. ती करण्याकरिता हिमालयाच्या गुहेत

जाऊन बसावयास नको. ब्रह्मचर्याश्रमात किंवा गृहस्थाश्रमात रोजची कामे करीत असता तपश्चर्या चालू ठेवता येते.

श्रीमद्‌भगवद्‌गीतेत तपश्चर्या तीन प्रकारची सांगितली आहे — कायिक, वाङ्मयीन आणि मानसिक.

> देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं, शौचम्, आर्जवम् ।
> ब्रह्मचर्यम्, अहिंसा च शारीरम् तप उच्यते ।।

पूज्य व्यक्तीविषयी नम्रभाव, पावित्र्य, विनय, पवित्र आचरण हेच शारीरिक तप आहे. शरीरावर ताबा मिळविल्यानंतर, वाणीवर, जिभेवर ताबा मिळविला पाहिजे. म्हणून

> अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
> स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ।।

सत्य परंतु गोड आणि उद्वेग न आणणारे भाषण, वाचन, लेखन, मनन हीच वाङ्मयीन तपश्चर्या आहे. ही प्रत्येक क्षणी व रोज करावयाची असते. शरीर व वाणी यांवर संयम मिळविला म्हणजे मनावर ताबा मिळविणे सोपे जाईल.

> मनःप्रसादः सौम्यत्वं मौनम् आत्मविनिग्रहः ।
> भावसंशुद्धिः इति एतद् मानसं तप उच्यते ।।

प्रसन्नवृत्ती, सौम्यता, मितभाषण (किंवा मौन), मनोनिग्रह, पवित्र भावनांचे संगोपन हेच मानसिक तप आहे.

अशी तपे करणाऱ्या माणसाची सतत प्रगती होत राहते. या तपश्चर्येचा फायदा अध्यात्मिक व भौतिक अशा दोन्ही स्वरूपांत त्याला मिळतो. जगात ज्या सुखासाठी मानवाची धडपड चालली आहे ते सुख माणसाला सहज प्राप्त होते. म्हणून तपश्चर्या करा. शारीरिक, वाङ्मयीन व मानसिक तपश्चर्या करा.

[—जानेवारी १९५०]

## ३. ज्ञानाचा आनंद

**शिक्षण** आणि ज्ञान या दोन गोष्टी निरनिराळ्या आहेत. शिक्षण झालेला मनुष्य ज्ञानी असतोच असे नाही. ज्ञानी माणसाचे शिक्षण झाले असेलच असे नाही.

पण शिक्षण आणि ज्ञान परस्परांना पोषक होऊ शकतात. शिक्षण घेणाराने ज्ञानाची दृष्टी ठेवली तर त्याचे शिक्षण प्रभावी होईल. ज्ञानी माणसाने शिक्षण घेतले तर त्याचे ज्ञान अधिक व्यापक होईल.

शिक्षण फक्त शाळा-कॉलेजात होते. ज्ञानार्जन सदा सर्वत्र होऊ शकते. शिक्षणाचा उद्देश ज्ञानार्जन असावयास पाहिजे. पण सध्या तरी तो नष्ट झाला आहे. आजकालचे विद्यार्थी आणि पालक यांची दृष्टी फार व्यवहारी आहे. त्यांच्या मते शिक्षणाचे ध्येय 'सर्टिफिकेट' आणि 'डिग्री' मिळविणे हे आहे.

केवळ सर्टिफिकेटाच्या आकुंचित दृष्टीने शिकणारे विद्यार्थी परीक्षा झाल्या-बरोबर ज्ञानार्जनाला पूर्ण विराम देतात. ज्ञानाच्या जिज्ञासेने शिकणारे विद्यार्थी परीक्षा आणि सर्टिफिकेट प्राप्तीनंतरही ज्ञानार्जन चालू ठेवतात.

तुम्ही एखाद्या विषयाचा व्यासंग चालू ठेवला आहे काय? शाळेत असताना तुम्ही वाङ्मय, इतिहास, शास्त्र, गणित इ० विषय शिकलात, त्यांतील एखाद्या विषयाचा अभ्यास पुढे चालू ठेवा. त्यामुळे ज्ञानाचा आनंद मिळून बुद्धीचा सतत विकास होत राहील.

बुद्धी ही तलवार आहे. अनुपयोगाने तिला गंज चढू देऊ नका.

**[—एप्रिल १९५०]**

# ४. आत्महत्या की आत्मविकास

**परीक्षेचे** निकाल लागल्यापासून आत्महत्येच्या साथीला प्रारंभ झाला. एस्. एस्. सी. परीक्षा नापास झालेली मुले आत्महत्या करतात असे पाहून मराठी ४ थी नापास झालेल्या एका मुलाने आत्महत्या केली. हे आत्महत्येचे लोण दुर्दैवाने आश्रमाच्या वातावरणापर्यंतही आले. येथील भोमे नावाच्या एका मुलाने "परमेश्वरी जातो" असे लिहून ठेवून विहिरीत जीव दिला.

व्यक्तीच्या जीवनात तिच्या बालपणापासून अनेक बरेवाईट प्रसंग येत असतात. त्यांना तोंड देत देत मनाची कणखर वृत्ती बनत जाते. आशा-निराशा, यश-अपयश, मान-अपमान, स्तुति-निंदा, सुख-दुःख, पारितोषिक-शिक्षा, ही द्वंद्वे जीवनात पदोपदी येत असतात. ती सहन करण्यात आपण मानसिक व आत्मिक बल वाढवीत असतो.

आयुष्यातील प्रत्येक बऱ्यावाईट घटनेकडे आत्मविकासाच्या दृष्टीने पाहा. उत्कर्षाचा प्रसंग आला तर सौजन्य कायम ठेवण्याच्या दृष्टीने मनाला शिक्षण द्या. अपकर्षाचा प्रसंग आला तर तो निर्विकार मनाने सहन करण्याची सवय मनाला लावा.

प्रत्येक प्रसंगावर विचार करून मनाला असे वळण लावल्याने आत्मविकास होतो. आत्मविकासाच्या दृष्टीने जगाच्या प्रसंगाकडे पाहणारा मनुष्य आत्महत्या करणार नाही. प्रत्येक प्रसंगापासून बोध घेत घेत तो हळूहळू आत्मबल वाढवून

जगाला तोंड देतो. यालाच कर्मयोग म्हणतात. खरा कर्मयोगी कधीही आत्महत्या करणार नाही. [—ऑगस्ट १९५०]

## ५. तिळगूळ घ्या, गोड बोला

**रोजच्या** व्यवहारात इतर माणसांशी वागताना आपण त्या त्या वेळच्या विकाराप्रमाणे व विचाराप्रमाणे बोलतो. असे बोलताना आपण आपल्या भावनांचा व हुशारीचा मुख्यत: विचार करतो व त्यांचाच आपल्याला जास्त अभिमान वाटतो. पण या बोलण्याचा इतरांच्या मनावर काय परिणाम होतो त्याचा आपण क्वचितच विचार करतो. प्रत्येक वेळी असा विचार करावयाचा झाला तर आपल्या जिभेवर पुष्कळच संयम घालणे आवश्यक आहे.

भाषण कसे असावे? केवळ गोड असावे का? केवळ कठोर सत्यात्मक असावे का? गोड बोलायचे म्हणजे ढोंगीपणाने खोटे बोलायचे का? खरे बोलायचे म्हणजे कठोर व बोचक अशा भाषेतच बोलले पाहिजे का? की या दोन्हीच्या मधला काही मार्ग काढता येईल?

"अप्रियस्यापि पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभ:" असे संस्कृत भाषेत फार सुंदर सुभाषित आहे. भाषण इतरांना सुख देणारे असावेच; परंतु त्यांना पथ्यकर किंवा कल्याणकारक असे असावे. आपल्या भाषणाने इतरांचा मर्मभेद होऊ नये; परंतु मनातील आशय मात्र गोड भाषेमध्ये व्यक्त केला जावा.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्चते ।।

असा भगवद्गीतेत श्लोक आहे. त्याचाही असाच आशय आहे. सत्य, हितकारक, परंतु प्रिय आणि उद्वेग उत्पन्न न करणारे असे भाषण करणे ही एक वाणीची तपश्चर्याच आहे. ही प्रत्येक घटकेला, प्रत्येक दिवशी, प्रत्येक वर्षी, आयुष्यभर करावयाची असते. या तपश्चर्येची आठवण आपल्याला राहावी व इतरांना तिचे स्मरण व्हावे म्हणून मूर्त स्वरूपातील तीळ आणि गूळ एकमेकांना देऊन सांगतात की, "तिळगूळ घ्या, गोड बोला."

[—जानेवारी १९५१]

## ६. निदान चिमूटभर माती?

**गेल्या** महिन्यात यशवंत कवींच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित प्रबंधांचा प्रकाशन-समारंभ झाला. आपल्या भाषणात राजकवींनी एक सुरेख गोष्ट सांगितली.

एकदा रामदास स्वामी भिक्षेला निघाले. एका घरी गेले. "जयजय रघुवीर समर्थ " गर्जना केली. बाहेर कोणीच येईना. पुनः "जयजय रघुवीर समर्थ" जरा मोठ्या आवाजात म्हणाले. म्हातारी घरातून बाहेर आली. म्हणाली,—"बाबा घरात धान्याचा कण नाही. तुला काय देऊ? आल्या पावली परत जा." समर्थ म्हणाले, "बाई, अंगणातली चिमूटभर माती घेऊन माझ्या झोळीत टाक!" "माती? माती कशी घालू रे बाबा?" "माती चालेल. मातीचा प्रश्न नाही. तुझ्या हाताला दानाची सवय लागू दे. 'नाही नाही' असे म्हणून तीच सवय होईल. मग ऐश्वर्य आले तरी तू 'नाही' म्हणत राहशील. म्हणून म्हणतो, माती का असेना, पण झोळीत टाकावयाची सवय चालू राहू दे."

या गोष्टीचे सार प्रत्येक क्षेत्रात उपयोगी पडण्यासारखे आहे. प्रबंध लिहिताना सर्वांनाच स्वतःचे लिहिता येते असे नाही. त्यांनी लिहिण्याची सवय कायम राहण्याकरिता चांगल्या लेखनाची नक्कल केली तरी चालेल. तसेच मोठे दान देता येत नसले तरी ओंजळभर पाण्याने अर्घ्य देण्याची तरी सवय ठेवावी.

[—फेब्रुवारी १९५१]

## ७. अखंड ज्ञानार्जन

**बुद्धी** ही हत्यारासारखी आहे. त्याला वारंवार काम दिले तर ते प्रभावी राहते. उपयोग केला नाही तर ते गंजून जाते.

प्रत्यक्ष व्यवहारात मला असाच अनुभव येतो. विद्यार्थी-अवस्थेत अत्यंत कुशाग्र बुद्धीची मुले शाळेत चांगली चमकतात. पण एकदा नोकरीधंद्यात पडली की, त्यांच्या बुद्धीचे तेज पार लोपून गेले आहे असे वाटते. काही व्यवसायच असे आहेत की त्यात माणसाला फारशी स्वतंत्र बुद्धी वापरावी लागत नाही. त्यामुळे त्यांच्या बुद्धीचे तेज लुप्त होऊन जाते.

अशा प्रतिकूल परिस्थितीतही आपली बुद्धी जिवंत ठेवली तर मनुष्य जिवंत राहील. नाही तर त्याचे नुसते यंत्र होऊन जाईल.

बुद्धीचा उपयोग करण्याचे अनेक मार्ग आहेत. उदा. ज्या खात्यात काम चालू असेल त्याच्या परीक्षांना बसण्याकरिता वाचन करणे, नोकरीधंदा सांभाळून एखादा अभ्यासक्रम पार पडणे, इ. पत्रव्यवहारानेही काही परीक्षांची तयारी करता येते. पुणे विद्यापीठाच्या एक्स्टर्नल परीक्षा आहेत. अंमळनेरचे एक डॉक्टर धंदा सांभाळून बी. ए. ऑनर्स झाल्याचे मागे लिहिलेच आहे. आपले एक माजी विद्यार्थी बी. ए. झाल्यावर इंटर सायन्स घेऊन मेडिकलकडे गेले आणि पुढील वर्षी एम्. बी. बी. एस्. झाले!

हे झाले परीक्षेच्या दृष्टीने. परीक्षा संपल्यानंतरही एखाद्या विषयाचा अभ्यास आजन्म चालू ठेवा. मराठी वाङमयाचा इतिहास, भूगोल, संस्कृत, हिंदी विज्ञान इ० अनेक विषय अशा अभ्यासाला योग्य आहेत.

वीस-पंचवीस वर्षांनी तुमच्यातीलच अभ्यासू लोक अधिकारी व विद्वान होतील. बुद्धीचे कार्य चालू ठेवा. तिला विश्रांती नको.

[—मार्च १९५१]

## ८. अनन्त हस्ते कमलावराने देता किती घेशिल दो कराने ?

**परमेश्वर** लक्ष्मीपती प्रसन्न होऊन अनंत हातांनी देऊ लागल्यावर घेणारा घेईल तरी किती ? हा अनंत हातांचा परमेश्वर कोण ?

पुरुषसूक्तात समाजपुरुषाचे—म्हणजे परमेश्वराचेच—वर्णन काय आहे ? सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपाद । त्याला हजारो मुखे व हजारो हातपाय आहेत. असा परमेश्वर आकाशात, कैलासात किंवा वैकुंठात नसून प्रत्यक्ष पृथ्वीवर आहे. आपल्या भोवतालची हजारो मुखे, हजारो हातपाय धारण करणारा समाज—हाच जनतारूपी जनार्दन—लक्ष्मीपती परमेश्वर आहे.

आपल्या संस्थेला आज अनेक वर्षे याच जनताजनार्दनाचा आधार आहे. मिळालेला एकेक रुपया आणि मूठभर धान्य देणाऱ्या हजारो देणगीदारांच्या आधारावरच संस्थेने नवीन जागा घेतली, इमारती बांधल्या, अन्नदान केले, विद्यालय चालविले आणि गरिबांचे संसार मार्गाला लावले. हेच आपले लक्ष्मीपती.

"देता किती घेशिल दो कराने ?" अशीच संस्थेची स्थिती झाली आहे. लोकांना संस्थेची माहिती आहे. देण्याची इच्छा आहे; पण घेणारेच थोडे आहेत.

संस्थेच्या वतीने असे घेणारे स्वयंसेवक अधिक पाहिजेत. प्रासंगिक निमित्ताने हे स्वयंसेवक दल निर्माण करण्याचा प्रयत्न चालू असतो.

आपला प्रत्येक सभासद हा स्वयंसेवक झाल्यास संस्थेच्या वतीने मागणारी हजार मुखे मिळतील, व घेणारे हजार हात मिळतील आणि जनतेकडून 'अनंत' हस्ताने मिळणाऱ्या मदतीचा स्वीकार करून तिचा अखंड ओघ मातृसंस्थेकडे चालू राहील.

या हजार मुखांपैकी व हातांपैकी तुम्ही एक आहात. तुमच्या मुखाचा व हाताचा उपयोग संस्थेकरिता होऊ द्या; म्हणजे इतर ९९९ मुखांना व हातांनाही चालना मिळेल.

[—मे १९५१]

# ९. आपल्या समाजाची नीति

**रोज** सकाळी वर्तमानपत्रे उघडली म्हणजे काय वाचायला मिळते? अमक्या बँकेवर इतक्या लाखांचा दरोडा पडला. तमक्या गावी कुऱ्हाडीने खून झाला. मंत्र्याला अडवून सोन्याची बटणे लुबाडली. विद्यार्थ्यांनी प्रिन्सिपॉलचा खून केला. लहान मुलींना फूस लावून पळवून नेले. आर्थिक अडचणीमुळे कोणी जीविताला कंटाळून विहिरीत जीव दिला, इ, इ.

अशा वार्तांच्या आधारावर एक वर्तमानपत्र चालू शकेल, इतक्या त्या वाढत चालल्या आहेत. त्या वाचून रोज मनाला प्रश्न पडतो—आमच्या समाजाला काय झाले आहे? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक जण आपापल्यापरी देत असतो. तुमचे काय उत्तर आहे?

जीवनाचे चार पुरुषार्थ आहेत—धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. या चारींवर जीवनात सारखे लक्ष ठेवावे, असा पूर्वी समाजशासकांचा कटाक्ष होता. धर्म म्हणजे सामाजिक नीतिमत्ता, मोक्ष म्हणजे ईश्वराला जाणण्याचा मार्ग. धर्म आणि मोक्ष भिन्न आहेत. सध्या धर्म—म्हणजे सामाजिक हिताकरिता समाजाचे नीतिनियम पाळणे—हा मागे पडला आहे, आणि अर्थ व काम यांना तेजी आली आहे. द्रव्यसंचय करावा आणि वैयक्तिक सुखभोग यथेच्छ घ्यावा, अशी वृत्ती जगातच वाढली आहे. त्या प्रवाहात आपण सापडलो आहोत.

पाश्चात्य राष्ट्रांनी सिव्हिक्स्, डिमॉक्रसी, सोशॅलिझम्, अशा प्रकारची समाजहिताला महत्त्व देणारी तत्त्वज्ञाने निर्माण केली. त्यामुळे द्रव्यतृष्णा आणि भोगवाद यांच्यापेक्षा समाजहिताला प्राधान्य देण्याची प्रवृत्ती वाढली. आपल्याकडे अद्याप असा प्रयत्न बाल्यावस्थेत आहे.

धर्म म्हणजे समाजधर्म. वैयक्तिक सुखापेक्षा समाजाचे हित श्रेष्ठ—सामुदायिक कल्याणकरिता, लोककल्याणाकरिता व्यक्तीने स्वार्थत्याग केला पाहिजे हा धर्म. या कल्पनेचा प्रसार होईल तर समाजाची नैतिक पातळी वाढेल.

आपण प्रत्येकाने या विचारसरणीला धरून वर्तन ठेवावे आणि या कल्पनेचा प्रसार करावा.

[—जून १९५१]

# १०. नवा धर्म – दैनंदिन पालन

**आपल्या** भारतीय संस्कृतीमध्ये स्वार्थ आणि परमार्थ या दोहोंचा समन्वय केलेला आहे. व्यक्तीच्या आणि समाजाच्या जीवनात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष

असे चार पुरुषार्थ म्हणजे ध्येये आहेत. त्यांत अर्थ आणि काम ही व्यक्तीच्या सुखाकरिता आहेत; आणि धर्म व मोक्ष ही समाजाच्या हिताकरिता आहेत.

आज आपल्या समाजाला पूर्वीचे वैचारिक अधिष्ठान नाही व नवीन निर्माण झालेले नाही. त्यामुळे वैयक्तिक जीवन हे दिवसेंदिवस स्वार्थी, सुखलोलुप, आकुंचित दृष्टीचे, समाजहितविरोधी किंवा समाजहिताविषयी उदासीन, नैतिक नियमाविरुद्ध बेफिकीर—असे होत चालले आहे.

समाजात सुशिक्षित वर्ग अगदीच थोडा आहे, ते हे सुशिक्षित अशा प्रकारचे आहेत. मग सामान्य अशिक्षित लोकांनी कोणाचा आदर्श पुढे ठेवून वागावे हा प्रश्नच आहे.

आपल्याला शिक्षणामुळे समाजहिताची दृष्टी आली आहे, असे प्रत्येक व्यक्तीच्या आचरणात दिसणे जरूर आहे. किंबहुना सतत थोडे थोडे सामाजिक हिताचे काम करणे हा प्रत्येक सुशिक्षिताचा धर्मच आहे.

संसार, स्वार्थ व स्वहित कोणाला सुटले नाही. पण दिवसातून, आठवड्यातून, महिन्यातून, वर्षातून आपला काही वेळ, काही विचार, काही शक्ती, काही सेवा, काही द्रव्य समाजाकरिता देणे हा प्रत्येकाचा धर्म आहे.

हा धर्म रोज थोडा थोडा आचरला तरी कालान्तराने त्याचे स्वरूप मोठे होईल. स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् । तो आपल्याला अधःपातापासून वाचवील. न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति । समाजाचे कल्याण करणाराला दुर्गती नाही, दुखः नाही, पश्चाताप नाही.

पंचवीस-तीस वर्षांनी आपल्या जीवनाचा आढावा घेतला तर असे दिसावे की, समाजाकरिता, रोज थोड्या थोड्या केलेल्या कामाचा आता डोंगर झालेला आहे. आजच संकल्प करून कामाला लागा.

[—जुलै १९५१]

## ११. आत्मिक विकास

**प्रत्येक** युगात काही विशिष्ट शब्दांना महत्त्व प्राप्त होत असते. सध्याचे युग हे आर्थिक व भौतिक युग आहे. द्रव्य, फायदा, संचय, नफा, तोटा, दलाली, पगारवाढ, बोनस, भत्ता, रजा, भांडवल, भाकरीचा प्रश्न—अशा शब्दांचा वापर आपण दिवसभर व वर्षभर करीत असतो. आपली दृष्टी अधिक बहिर्मुख झालेली आहे. बाह्य जीवनात आपले विचार व प्रयत्न गुरफटलेले असतात.

आत्मिक आणि भौतिक अशा दोन्ही टोकांमधील मध्य आपण साधला पाहिजे. भौतिक प्रयत्नांनी समाजाचे शरीर जिवंत राहते. आत्मिक विचारांनी

समाजाची संस्कृती वाढत जाते. दोहोंच्या आधाराने समाज जगतो. एकांगी भर दिल्यास समाजाची अधोगती होते, असा इतिहासाचा अनुभव आहे.

वैयक्तिक जीवनात आपण आत्मिक विकासाला प्राधान्य दिले पाहिजे. काम, क्रोध, लोभ, मद आणि मत्सर या विकारांनी आपल्या जीवनातील आनंद नाहीसा होतो. भोवतालची माणसे दुरावतात. आपणही दुःखी होतो. या विकारांवर नियंत्रण ठेवण्याचा रोज काही तरी प्रयत्न आपण करतो का? विचार करा. त्याचप्रमाणे बुद्धिपुरःसर काही गुणांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करा. अभय, दान, आर्जव, अहिंसा, पुण्य, अक्रोध, त्याग, शांती, दया, मार्दव, क्षमा, धृती, अद्रोह---अशा गुणांचे संवर्धन हेतुपुरःसर होत असते. आपोआप होत नाही. यालाच आत्मिक विकास म्हणतात.

आत्मनिरीक्षण करून आपल्या ठिकाणी कोणत्या गुणांची वाढ करावयाची ते ठरवा; मग सकाळ-संध्याकाळ शांत ठिकाणी बसून त्या गुणांचे चिंतन करा. चिंतन ही पहिली अवस्था. आचरण ही दुसरी अवस्था. हीच सुशिक्षितांची संध्या.

असा सतत दैनंदिन प्रयत्न करणे हाच आत्मिक विकास. या दिशेने कधी विचार केला आहे का?

[--सप्टेंबर १९५१]

# १२. लोकशाहीचा आत्मा

**लोकशाही** राज्यपद्धती आपल्या देशाने स्वीकारली आहे. म्हणून लोकशाहीच्या आचारांचे व तत्त्वांचे शिक्षण आज जनतेला मिळणे जरुरीचे आहे.

आपल्यांतील सुशिक्षितांना ही लोकशाहीची तत्त्वे माहीत आहेत का? प्रत्येकाने स्वतःच्या मनाला प्रश्न विचारावा.

एकतंत्र हुकूमशाही, लहरी राजसत्ता आणि एका व्यक्तीचा अधिकार, यांच्याविरुद्ध बंड म्हणून लोकशाहीचा जन्म व विकास झाला.

प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र विचार करण्याचा व निर्भयपणे आपले मत देण्याचा अधिकार आहे. या तत्त्वाकरिता अनेकांनी प्राणपणाने झगडा केला.

अधिकारीवर्गाच्या व प्रचलित राज्यसत्तेच्या मतापेक्षा निराळे मत प्रतिपादण्याचा हक्क प्रत्येक नागरिकाला आहे.

अनेक मते आणि अनेक पक्ष हा तर लोकशाहीचा मुख्य भाग आहे. प्रत्येक मताला व पक्षाला त्याच्या लोकप्रियतेप्रमाणे राज्यकारभार हाकण्याची संधी लोकशाहीत मिळते.

आपल्यापेक्षा निराळ्या मतांना आणि पक्षांना बिचकण्याचे काही कारण नाही. एका घरात, एका वाड्यात, एका गावात, एका संस्थेत, सर्वत्र अनेक मतांची व पक्षांची माणसे असणारच. सभ्य मतभेद ठेवूनही त्यांना चांगले स्नेही राहता येईल. हीच लोकशाहीच्या मनोवृत्तीची खरी परीक्षा आहे.

आपण आता अधिक सहिष्णुता वाढविली पाहिजे. आपण प्रथम माणसे आहोत. माणसासारखे एकमेकांशी वागू या. मतभेद आणि पक्षभेद त्या त्या क्षेत्रा-पुरतेच मर्यादित ठेवू या. खाजगी व सामाजिक जीवनात त्यांचे विरजण पडायला नको.

[—ऑक्टोबर १९५१]

## १३. प्रार्थनेचे मनन

**आश्रमात** असताना आपण 'प्रार्थना' करीत होतो. आता विसरून गेलो, पण पाठांतर कायम असेल. एकदा मनाशी गुणगुणा, तिच्यातील अर्थावर मनन करा. काय वाटते? आजही प्रत्येक वाक्याला अर्थ आहे. किंबहुना आजच त्या विचारांची जरूरी आहे. विचाराप्रमाणे वागण्याची जरुरी आहे.

सदा सुसंगती घडावी. सुजनवाक्य सदा कानी पडावे. सज्जनांनी दाखविलेल्या मार्गांनी मनाने जावे. थोडक्यात म्हणजे आपल्या भोवतालचे मित्रांचे, विचारांचे आणि आचारांचे वातावरण चांगले असावे. शुद्ध, निर्मळ, पवित्र, सात्त्विक, उदात्त असावे.

मतीचा कलंक झडो. विषय सर्वथा नावडो. मनातील दुष्ट, तामसी विचार नाहीसे कर. केवळ सुखासक्त बनू नको. विषयवासनेवर नियंत्रण घाल. आपला समाज दिवसेंदिवस सुखलोलुप आणि भोगवादी बनत चालला आहे. विकासापेक्षा विलासाकडे झुकता कल आहे. म्हणून ही प्रार्थना.

न निश्चिय कधी ढळो. मनाशी केलेले संकल्प सिद्धीस नेण्याइतके आत्म-सामर्थ्य मला मिळो. दुरभिमान सारा गळो. खोटा अभिमान नाहीसा होवो. अधिकार, संपत्ती, पदव्या आणि कर्तबगारी यांच्याबद्दल गर्व न वाटो. विनयाने सद्‌गुण शोभतात. स्वतत्त्व हृदया कळो. आयुष्य कशाकरिता आहे? संसार आणि सुख यापलीकडेही मला कर्तव्ये आहेत. ऋणे आहेत. जीवनध्येयाविषयी वारंवार विचार होवो. असे अमोल विचार सुसंगतीत होते. अजून आहेत. बालपणी प्रार्थना सक्तीने केली. आता स्वेच्छेने करा. विचारांना रोज उजाळा द्या. फायदा होईल. शांती मिळेल.

[—नोव्हेंबर १९५१]

# १४. लेखणी जिवंत ठेवा

**शाळेतून** बाहेर पडल्यानंतर केवळ हौसेकरिता म्हणून काही लेखन तुम्ही केले आहे काय ? प्रसिद्धीकरिता नव्हे, तर आपली लेखनकला जिवंत ठेवावी म्हणून कधी लेखणी चालविली आहे का ? काही लिहावे असे कधी कधी वाटते, का त्याचा काही विचारच मनात येत नाही ?

लिहावयाची इच्छा होणे हे जिवंत बुद्धीचे एक लक्षण आहे. विचार केल्याशिवाय लिहिता येत नाही. विचार सुचतात म्हणून लिहिणे अपरिहार्य होते किंवा लिहावयाचे आहे म्हणून विचार करणे जरूरच असते. म्हणून लेखन व विचार यांचा अन्योन्य जवळचा संबंध आहे. विचार करणाराची बुद्धी सदैव जिवंत राहते. बुद्धी जिवंत आहे तोपर्यंत आयुष्यात आनंद आहे.

शाळेत असताना तुम्ही निबंध लिहावयाला शिकलात. वरच्या वर्गात असताना तुम्ही लिहिलेली आत्मचरित्रे आणि प्रबंध अद्याप ग्रंथालयात आहेत. हस्तलिखित मासिके तुम्ही लिहिली आहेत. या सर्वांचा जीवनात उपयोग करावा असा उद्देश होता. तो कितपत साध्य करणार आहात ?

लेखन म्हणजे काही ललित विषयावरचेच पाहिजे असे नाही. ज्या क्षेत्रात तुम्ही काम करीत असाल त्यासंबंधी लिहा. तुमच्या मित्रमंडळात एखादे हस्तलिखित मासिक किंवा पाक्षिक काढा. खाजगी लिखाणाला चांगले स्वरूप येऊ लागले की, ते छापील मासिकात दिसू द्या. नंतर ग्रंथस्वरूपात दिसू द्या.

आपल्या संस्थेचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत लेखक व विचारप्रवर्तक व्हावेत, अशी त्यांची पूर्वतयारी आहे. पाया घातला आहे. वरची बांधणी करणे तुमच्या हाती आहे. जुन्या पिढीतले काही माजी विद्यार्थी नामवंत लेखक व संपादक झालेले आहेत. डॉ. परुळेकर, श्री, अंबिके, श्री. मु. ल. जोशी. प्रा. संत, प्रा. चितळे, प्रा. सुखटणकर, श्री. झोळ, श्री. सेवलेकर, डॉ. दाभाडे यांनी आपापल्या विषयांत लेखन करून चांगले स्थान मिळविले आहे. तुम्हालाही ते अशक्य नाही. आजच सुरुवात करा. लेखणी धावती व जिवंत ठेवा.

[ —डिसेंबर १९५१ ]

# १५. विकासणारी वलये

**शांत** असलेल्या पाण्याच्या पृष्ठभागावर एखादा खडा टाकला म्हणजे काय होते ? एक लहान वलय उत्पन्न होते. मग ते वाढते, दूर जाते, दूर दूर जाते, आणि शेवटी अथांग पृष्ठभागाला व्यापून टाकते.

आपण राहतो तो समाज जलपृष्ठासारखा आहे. आपले त्यातील जीवन हे पाण्यात पडणाऱ्या लहान खड्याप्रमाणे आहे. आपले कार्य हे विकास पावणाऱ्या लाटांप्रमाणे आहे. कार्यक्षेत्राचा विकास होणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे. आपले कार्यक्षेत्र हळूहळू सरोवरातील लाटांच्या वलयांप्रमाणे समाजात विकसित होत राहो.

शिक्षण संपले, नोकरी लागली, लग्न झाले, मुलेबाळे मांडीवर खेळू लागली, ऑफिसमधल्या मित्रांचा अड्डा पडू लागला, म्हणजे संसार आणि नोकरी यांपलीकडे काही जग आहे याचे भानच राहत नाही.

संसारात पडलेल्या मच्छींद्रनाथाचे असेच झाले होते. आपले जीवन व्यापक कार्याकरिता आहे. याची जाणीव तो विसरून गेला. म्हणून त्याला त्याच्या शिष्याने सावध केले. तो जागा झाला.

तुम्ही जागे व्हा. संसार करा, नोकरी करा; पण त्याचबरोबर समाजाला उपयोगी पडणाऱ्या एखाद्या कामाशी, एखाद्या संस्थेशी, संबंध जोडा. एकरूप व्हा. तन-मन-धन यांपैकी जे त्या कार्याला अधिकाधिक देण्यासारखे असेल ते द्या. असे सतत करा. अखंड करा. म्हणजे तीस वर्षांनी तुम्ही सिंहावलोकन केल्यावर आनंद होईल. तुम्ही सेवानिवृत्त होताना आपल्या सार्वजनिक सेवेचा ढीग पाहून, तिचे संकलित स्वरूप पाहून तुम्हाला आनंद वाटेल.

नाहीतर काय ? जन्मला. संसार केला. मेला. संपले तुमचे आत्मचरित्र ! एवढ्याकरिताच का तुमच्या गुरुजींनी जीवनाची तपश्चर्या केली ?

अद्याप जीवनाचा मोठा भाग तुमच्यापुढे आहे. संक्रांतीच्या मुहूर्तावर हे संक्रमण करा. लहान क्षेत्रातून मोठ्या क्षेत्रात, मोठ्या राशीत संक्रमण करा. उत्तरेकडे चला. पराक्रम करा. काळ तुमचा आहे.

[ —जानेवारी १९५२]

## १६. कर्तबगारी जागृत करा

**मनुष्य** केवळ अन्नावर जगत नाही. शरीराला अन्न लागते म्हणून तो पोटाकरिता धडपड करतो हे खरे; परंतु तो जगतो तो काही तरी ध्येयाकरिता जगतो. हे ध्येय त्याच्या कुवतीप्रमाणे लहानमोठे असेल. असे ध्येय नसलेल्या माणसाला आयुष्यात राम वाटत नाही. तो निराश होतो, उदासीन होतो, किंवा फारसा विचार करणारा नसला तर केवळ स्वार्थान्ध आणि सुखासक्त बनतो. पण शेवटी मानसिक असमाधानातच त्याचा शेवट होतो.

वैयक्तिक सुखसाधनापेक्षा काही तरी व्यापक कृती करावी, अशी मानवाची नैसर्गिक तळमळ असते. स्वार्थी ध्येयापेक्षा अशा व्यापक ध्येयाने प्रेरित झालेल्या माणसांच्या सुप्त शक्ती अधिक कार्यक्षम होतात. विचारांचा जोर, ध्येयाची शक्ती काही अलौलिक असते. जीवनात असा प्रभावी विचार किंवा उत्कट ध्येय असल्याशिवाय तुमची खरी कर्तबगारी बाहेर पडणार नाही. केवळ वैयक्तिक संसारात तुमचे खरे सामर्थ्य प्रकट होणार नाही. स्वार्थाची कल्पना नेहमी मागेच ओढील, निःस्वार्थी ध्येयाची कल्पना नेहमी तुम्हांला पुढेच ढकलील.

आज असे काही ध्येय आपल्या जीवनात आहे काय? तुमच्या जीवनाच्या अनुभवातूनच तुमचे ध्येय निर्माण होऊ शकेल. आज भोवताली पाहा आणि तुमच्या विद्यार्थिदशेची आठवण करा. हजारो बुद्धिमान विद्यार्थी शिक्षणाची संधी नाही म्हणून पिचून जात आहेत. अशांना ही संधी प्राप्त करून देणे हे एक महान ध्येय आहे. आपल्या सर्वांपुढे हे एक ध्येय असू द्या. त्याकरिता झगडा. अनेक मार्ग शोधून काढा. अनेक मार्गांनी त्यांना मदत करा. महाराष्ट्रातील गरीब विद्यार्थ्यांच्या बुद्धीला व कर्तबगारीला पूर्ण संधी देणे हे आपल्या जीवनातील एक महत्त्वाचे कार्य (मिशन) असू द्या. विचार करा आणि जीवनाच्या उत्साहात काय फरक पडतो ते पाहा.

[—मे १९५२]

## १७. चातुर्मास्यातील व्रते

**व्रत** म्हणजे स्वतःच्या इच्छेने केलेला संकल्प व त्याचे आचरण. व्यायाम केल्याने शरीराची शक्ती वाढते. मनाची शक्ती कशी वाढवावी हा प्रश्न पूर्वीच्या विचारवंतांपुढे होता. त्यांनी व्रतांची कल्पना काढली.

मानसिक सामर्थ्य मिळविण्याकरिता व्रतांचा उपयोग होतो. व्रतांच्या आचरणामुळे मनाची दुर्बलता, कमकुवतपणा नाहीसा होतो. मन सुदृढ होते. इच्छाशक्तीची वाढ होते. मनावर ताबा मिळविता येतो. मनाचा उपयोग स्वेच्छे-प्रमाणे करता येतो. आपण मनाचा गुलाम न राहता मन आपला सेवक बनते.

मन जिंकले त्याने जग जिंकले. जग जिंकून मन जिंकले नाही तर तो चक्रवर्ती असून भिकाऱ्यासारखाच आहे. शिकंदरने मोठा दिग्विजय केला; पण शेवटी सर्व वैभव सोडून जाताना ढसढसा रडला. राजा जनक भौतिक वैभवाचा राजा होता तसाच स्वतःच्या मनाचाही स्वामी होता. त्याने मन जिंकले होते.

व्रते फक्त आजीबाईंनी व म्हाताऱ्यांनीच करावीत असा एक चुकीचा समज आहे. जुन्या हाडात तसेच जुन्या मनात जे सामर्थ्य होते ते आजच्या तरुणांत नाही हे कबूल करावे लागेल. कारण काय?

चार महिनेच नव्हे, चार वर्षेच नव्हे, अखंड काल व्रताचे आचरण करा. तुमच्या मनाने चार-पांच आचरणाचे नियम निवडा. व्रताप्रमाणे त्यांचे आचरण करा. मनाचा पीळ वाढेल. आत्मविश्वास वाढेल. लोक तुम्हांला आदराने वागवतील. हळहळू मोठे व्हाल.

[—जुलै १९५२]

## १८. गणानां त्वा गणपतिं हवामहे।

**गण** म्हणजे समुदाय, लोक, जनता. त्याचा पती म्हणजे अध्यक्ष, नेता, पुढारी. त्याला आम्ही आवाहन करतो.

समुदाय आणि नेता हे शब्द, या कल्पना, व या व्यक्ती परस्परावलंबी आहेत. समाज म्हणजे समुदाय, गण, लोक; या समाजाला नेता असेल तर तो मार्गदर्शन करू शकेल. योग्य मार्गदर्शन नसेल तर समाज अधोगतीला जाईल.

ज्या समाजातून स्वयंभू नेते उत्पन्न होऊ शकतात त्यालाच जिवंत समाज म्हणता येईल. नेतृत्वाच्या अभावी समाजात अव्यवस्था, अन्याय, अनास्था, यांचे प्राबल्य माजते. ते सहन न होणारी अनेक माणसे असतात; पण ते सर्व मुके राहतात; बहिरे असतात; आंधळे होतात. अन्याय, अनीती, दुराचार, अव्यवस्था पाहून त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. तोंड असून वाचा फोडीत नाहीत. चित्रातील तीन माकडे पाहिलीत का? एकाने कान झाकले, दुसऱ्याने डोळे झाकले, तिसऱ्याने तोंड झाकले. अशा माकडासारखे लोक समाजात असतात. म्हणून गणपतीची, नेत्याची, लोकपुढाऱ्याची जरुरी असते.

गण-पती होण्याचा प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे. आपण ज्या समाजात, समूहात, गणात राहतो त्याला मार्गदर्शनाची जरुरी असते. नेत्याची गरज असते. त्या समाजात चाललेला अन्याय कोणीतरी ओरडून सांगायला पाहिजे असतो. अव्यवस्था माजविणारांना तसे करू नका, असे दरडावून सांगणारा पाहिजे असतो. दुराचारी लोकांना पायबंद घालणाराची जरुरी असते. ते जो मनुष्य समाजात करतो तोच गणपती. गणपतीने अन्याय, दुराचार, यांचा प्रतिकार करण्याकरिता नेतृत्व घेतले.

असे जिवंत गणपती, अनेक सजीव गणपती, असंख्य हाडामांसाचे गणपती आज प्रत्येक संस्थेत, समाजात, गावात, तालुक्यात, जिल्ह्यात, विभागात, प्रांतात, देशात, जगात पाहिजे आहेत. तरुण पिढीला किती मोठी संधी आहे!

[—ऑगस्ट १९५२]

# १९. शिक्षण, गुण आणि वशिला

**जीवनकलह** दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे. त्यावर व्यक्तीचे नियंत्रण नाही. येणाऱ्या काळात चांगल्या रीतीने तग धरून राहण्याकरिता आपण आपले सामर्थ्य वाढविले पाहिजे. नोकरी, धंदा, व्यापार इ. कोणत्याही क्षेत्रात काम करून चरितार्थ चालवावयाचा असला तरी प्रत्येक ठिकाणी तीव्र स्पर्धा आहे. या स्पर्धेत जो टिकेल तो जगेल.

या काळात प्रत्येकाला अधिकाधिक शिक्षणाची व शैक्षणिक लायकीची जरुरी आहे. किमान शिक्षण मॅट्रिक किंवा एस्. एस्. सी. इतके सर्वत्र लागतेच. पण या शिक्षणातही ज्याला अधिकाधिक शेकडेवारीने गुण पडले आहेत त्याला पसंती दिली जाते. काही खात्यांच्या खास परीक्षा होतात व त्यांत, इंग्लिश, हिंदी, गणित इ. विषयांची पुनः परीक्षा होऊन उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या अगदी वरच्या शेकडा दहा–वीस उमेदवारांना घेतले जाते. वरच्या नोकऱ्या असतात त्यांना पदवी-परीक्षेची लायकी लागते. त्यातही पहिला किंवा दुसरा वर्ग असलेले उमेदवार अधिक पसंत केले जातात. सारांश, शाळा-कॉलेजांतील शिक्षणात जो वरचा दर्जा मिळवितो त्याला पुढील जीवनाच्या स्पर्धेत चांगल्या रीतीने भाग घेण्याची संधी मिळते.

निव्वळ बौद्धिक शिक्षण ही लायकी पुरत नाही. तिच्याबरोबर इतर वैयक्तिक गुणांची जोड पाहिजे. माणसाचे व्यक्तिमत्त्व–पर्सनॅलिटी–चांगले पाहिजे. सशक्त बांधेसूद शरीर, तेजःपुंज डोळे, तरतरीत चेहरा आणि प्रमाणबद्ध हालचाली या गोष्टी पूर्व सवयीने मिळवाव्या लागतात. माणसाच्या अभ्यासाचे, विचारांचे, कृतीचे, आत्मविश्वासाचे प्रतिबिंब त्याच्या तोंडावर दिसते. उत्कृष्ट हस्ताक्षर, चित्रकला, संगीतकला, अनेक भाषांचे ज्ञान, व्यापक ज्ञान, टाईपरायटिंग, अनेक खेळ, संघटना, अनुभव, सार्वजनिक काम इ० विविध प्रकारचे गुण माणसाच्या ठिकाणी असले तर त्याच्या शिक्षणाचा उपयोग. नुसता पुस्तकी पंडित जगात कोणाला नको असतो. यः क्रियावान् स पंडितः ।

शिक्षण आणि गुण यांच्या जोडीला वशिलाही पाहिजे, हे कटू सत्य आहे. वशिला म्हणजे ओळख, परिचय, पूर्वसंबंध यांच्या आधारावर केलेली भलावणी. अपरिचित माणसापेक्षा परिचित मनुष्य कामाला पसंत करणे हा मनुष्यस्वभाव आहे. म्हणून अनेक व्यक्तींशी आपले संबंध वाढवावेत, ओळखी कराव्यात, स्नेह जोडावेत आणि सर्वत्र चांगले वागून आपल्याविषयी आस्था व आपलेपणा उत्पन्न करून ठेवावा. माणसे तोडणे सोपे असते. जोडायला कालावधी लागतो.

वरील तिन्ही गोष्टी प्रयत्नसाध्य आहेत. कामाला लागा.

[—ऑक्टोबर १९५२]

# २०. आपले संस्कार

**आश्रमातून** व विद्यालयातून बाहेर पडलेले माजी विद्यार्थी अथांग महाराष्ट्रभर विखुरलेले आहेत. प्रवासात मी जेथे जेथे जातो तेथे तेथे कोणीना कोणी दत्त म्हणून पुढे उभा राहतोच !

या सर्व माजी विद्यार्थ्यांमध्ये समान गुण काय आहेत याचा अनुभव माझ्या-सारख्याला जास्त येतो. कारण अनेकांशी संबंध येतो.

आपले माजी विद्यार्थी म्हणजे महाराष्ट्राची धडपडणारी मुले आहेत. ती कोठेही स्वस्थ बसलेली नाहीत. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा करण्याचा त्यांचा एकसारखा प्रयत्न चालला आहे.

संस्थेतून बाहेर पडल्यावरही बौद्धिक प्रगती व शिक्षण चालू ठेवण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. रात्रीचा दिवस करून व काबाडकष्ट करून ते या ना त्या उच्चतर परीक्षेची तयारी करीत असतात. समाजात वरचा दर्जा मिळवावा, अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्यात असते.

जगात त्यांचे अडत नाही. बेकार माजी विद्यार्थी फारच थोडे. कष्ट, अंग-मेहनत, दगदग व पडेल ते काम करण्याची त्यांची तयारी असते. त्यामुळे काही न काही व्यवसाय त्यांना मिळतोच. श्रम करणारे लोक सर्वांनाच हवे असतात.

कित्येकांच्या ठिकाणी संस्थेत मिळविलेले संघटन-चातुर्य अधिकच प्रमाणाने विकास पावले आहे. निर्भयता, भाषण-चातुर्य आणि लोकसंग्रह यांचा उपयोग त्यांना व्यवसायात फार होतो.

साधी राहणी, निर्व्यसनता आणि सात्त्विक सवयी हे गुण सर्वांच्या ठिकाणी दिसतात. इतकें असून हे लोक केवळ स्वार्थात व संसारात गुरफटलेले नाहीत. आपल्या भोवतालच्या समाजाची व देशाची सेवा अल्पस्वल्प रीतीने कशी करता येईल याची विवंचना ते करीत असतात.

आणि विशेष म्हणजे संस्थेबद्दल प्रेम, आदर, आपुलकी, अभिमान, निष्ठा आणि सक्रिय कृतज्ञता हे दुर्मिळ गुण त्यांच्यात दिसतात.

या गुणांमुळे व संस्कारांमुळे आपले माजी विद्यार्थी आपापल्या क्षेत्रात लोकप्रिय झालेले आहेत. इतर लोकच परस्पर त्यांची स्तुती करतात आणि संस्थेला धन्यवाद देतात.

हे आपले संस्कार आहेत. त्यांचा प्रसार सर्वत्र करा.

[—नोव्हेंबर १९५२]

# २१. तुमची पंचवार्षिक योजना

**भारत** सरकारने आपली पंचवार्षिक योजना आखली आहे. देशाचा आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उत्कर्ष निश्चित वेळापत्रकाप्रमाणे घडवून आणावा, हा तिचा उद्देश आहे.

ही योजना आखताना योजना-समितीने तुम्हांला किंवा मला काही विचारले नाही. आणि योजनेत आपल्याला असा काही कार्यक्रमही नेमून दिलेला नाही.

पंचवार्षिक योजना आखून वेळापत्रकानुसार प्रगती करण्याचा उपक्रम प्रथम सोव्हिएट रशियाने केला. काही वेळेला योजनेपेक्षाही अधिक उत्पन्न लोकांनी काढून दाखविले. कारण त्यांच्या पंचवार्षिक योजनेत प्रत्येक कामकरी, शेतकरी, शिक्षक व अधिकारी याला कार्यक्रम नेमून दिलेला असे.

आता आपल्याला सरकारने पंचवार्षिक कार्यक्रम नेमून दिलेला नाही म्हणून आपण स्वस्थ बसायचे का ? नाही. आपल्या मनाने आपण कार्यक्रम आखून कामाला लागू. पंचवार्षिक योजनेची मूलभूत तत्त्वे समजून घेतली तर आपला कार्यक्रम आपल्याला स्पष्ट दिसेल.

आज देशापुढील मुख्य प्रश्न दारिद्र्य नाहीसे करणे व संपत्ती वाढविणे हा आहे. संपत्ती कशाने वाढते याचा विचार करा. आपल्या कष्टानेच संपत्ती वाढते. अधिक कष्ट केले की धान्य उत्पन्न होते, घरे बांधली जातात, कापूस पिकतो, कापड तयार होते, वस्तू बनविल्या जातात, संपत्ती वाढते व राहणीचा दर्जा वाढतो.

अधिक वेळ काम, अधिक कष्ट, बुद्धी वापरून काम हा आपला पंचवार्षिक कार्यक्रम. जे जे काम आपण करतो ते ते देशाच्या हिताचे आहे अशा भावनेने करा. काम सरकारी असो, खाजगी असो, स्वतःचे असो, कष्टाचे असो किंवा बौद्धिक असो. तुमच्या कामाने देशाच्या संपत्तीत भर पडणार आहे. प्रामाणिकपणाने व आस्थेने काम न करता तुम्ही पगार घेतला तर देशाचा पैसा, वेळ व श्रम वाया गेले. तुम्ही काम न करता देशाला लुबाडले. माझ्या कामाने भारताची संपत्ती अल्पांशाने तरी वाढत आहे अशी भावना ठेवा, अशा बुद्धीने काम करा. तीच तुमची पंचवार्षिक योजना. [--डिसेंबर १९५२]

# २२. अनाथांचे शिक्षण हेच आपले ब्रीद

**वार्षिक** परीक्षा झाल्या. निकाल लागले. सुटी सुरू झाली. दीड महिन्याची सुटी हा हा म्हणता संपेल. जूनमध्ये शाळा सुरू होण्याच्या जाहिराती फडकतील,

ज्यांच्या घरी दोन वेळ जेवणाची सोय आणि हायस्कूलच्या मासिक फीची तरतूद आहे ते भराभर आपली नावे शाळेत घालतील. पुस्तके विकत घेतील, अभ्यासाला सुरुवात करतील.

वरील सोयी ज्यांना उपलब्ध नाहीत त्यांचे भवितव्य काय ? घरी मीठभाकरीची सोय नाही. ती सोय आहे तर फी देण्याची ऐपत नाही.

अशा अनेक अडचणींत असलेले हजारो विद्यार्थी गावोगावी पसरले आहेत. त्यांना मदत करणे हे आपले सर्वांचे व्रीद आहे. ज्या स्थितीतून आपण गेलो त्या स्थितीत असलेल्या गरीब मुलांना यथाशक्य साहाय्य केले पाहिजे.

हे सहाय्य द्रव्याचेच पाहिजे असे नाही. शारीरिक खटपट हेही एक मोठे साहाय्यच आहे. नियमात बसत असेल त्याला संस्थेकडे अर्ज करायला सांगा. शक्य असेल तर एखादा विद्यार्थी घरी ठेवा. मधुकरी मागून, वार लावून तो शिकेल. त्याला जागा व मार्गदर्शनाची मदत करा. वार लावायला मदत करा. शाळेत नादारी मिळवायला मदत करा. पुस्तके मिळवून द्यायची खटपट करा. जुने कपडे त्यांना मिळवून द्या. आश्रय, जागा, वार, मधुकरी, पुस्तके, फी, कपडे यांपैकी जे जे मिळवून देणे शक्य असेल ते ते देऊन गरीब मुलांना शिक्षणाला लावा, ते तुमचे नाव काढतील.

आपला प्रत्येक माजी विद्यार्थी म्हणजे अनाथ विद्यार्थी गृहाचे केंद्र आहे. अशा हजारो केंद्रांतून गरीब मुलांना सर्व प्रकारची मदत होऊ द्या.

[—एप्रिल १९५३]

## २३. प्रगतीच्या पायऱ्या

**अखिल** भारतीय स्वरूपाच्या चढाओढीत महाराष्ट्र मागे पडत चालला असे सर्वत्र ऐकू येते. तो आघाडीवर राहावा, याकरिता कोणी खटपट करीत आहे का ?

या बाबतीत प्रत्येकाने व्यक्तिशः स्वयंपूर्ण होण्याचा प्रयत्न करावा व इतरांना त्या बाबतीत प्रोत्साहन देत असावे.

हिंदी, इंग्रजी व मराठी या तिन्ही भाषांवर चांगले प्रभुत्व मिळवा. सफाईदार संभाषण व शैलीदार लेखन साध्य करण्याचा प्रयत्न करा. तुमचे व्यक्तिमत्त्व चटकन डोळ्यांत भरेल.

ज्या क्षेत्रात काम करता त्यातील उच्चतर, उच्चतम ज्ञान संपादन करा. त्या विषयावरील वाङ्मयाचा अभ्यास करा. वरच्या वरच्या परीक्षा होतील त्यांत उच्चांक मिळवा. प्रगतीच तुमच्याकडे धावून येईल.

अंगीकृत कार्य आपलेपणाने करा. नोकरवृत्ती सोडून स्वामीवृत्ती धारण करा. कामाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदला; म्हणजे तुमच्या कामातच बदल होईल. नोकरवृत्ती असणे म्हणजे हमाली. हे काम माझेच आहे, अशा भावनेने करणे हीच मालकवृत्ती. मालकाच्या खालोखाल तुम्हांला अधिकार मिळतील. अनुभव घ्या.

या विचारांचे मनन करा, कृती करा. त्यांचा प्रचार करा. वरील तिन्ही गुणांची आज देशाच्या प्रगतीला गरज आहे.

[—मे १९५३]

## २४. जुना धर्म—नवा विधर्म

**जुन्या** पिढीच्या लोकांना नव्या पिढीचे लोक नावे ठेवतात. सनातनी मताचे, कर्मठ, पुराण-विचारसरणीचे, इ. इ. विशेषणे लावली जातात. इतर गोष्टी सोडून दिल्या तरी परोपकार आणि स्वार्थत्याग, या बाबतीत जुन्या पिढीतले लोक नव्या पिढीपेक्षा श्रेष्ठतर आहेत असे मला वाटते. केवळ स्वतःपुरते न पाहता समाजाला उपयुक्त अशा गोष्टी त्यांच्याकडून अधिक होत होत्या.

जुन्या वळणाच्या कुटुंबाचे वार्षिक वेळापत्रक पाहा. द्वादशी-अमावास्येला, सणावाराला, पितृतिथीला, श्राद्ध-पक्षाला अशा अनेक प्रसंगी त्यांच्या पंक्तीला चार माणसे जेवून जात असत. त्यांना रोख दक्षिणा दिली जात असे. दाराशी भिक्षेकरी आला की त्याला मूठ-पसा धान्य वाढले जात असे. आंधळा-पांगळा, अपंग आला तर त्याला यथाशक्ती मदत होत होती. सारांश, आपल्या मिळकतीचा सर्वच भाग स्वतःच्याच संसाराला व जीवनाला खर्च न करता ते आपल्या सुखात इतरांना भागीदार करीत. यात त्यांच्या उत्पन्नाचा काही भाग तरी परोपकारार्थ खर्च होत होता.

उलट आजच्या पिढीतील तरुणांची कुटुंबे पहा. जुन्या धर्मावर श्रद्धा नाही म्हणून किंवा सोय नाही म्हणून द्वादशी-अमावास्या किंवा नैमत्तिक प्रसंगी त्यांच्याकडे पंक्तीला कोणी गरीब जेवणार नाही. श्राद्ध-पक्षावर श्रद्धा नाही, म्हणून मृत पितरांच्या नावाने अन्नदान वगैरेही करायची जरुरी नाही. सारांश, त्यांना महिन्यात किंवा वर्षात नियमित आणि आवश्यक असा दानधर्माचा प्रसंगच येत नाही. जी काही प्राप्ती होते ती आपले कुटुंब व स्वतःच्या सुखसोयी यात खर्च होते. चार पैसे अधिक मिळाले तर चांगले कपडे आणि सिनेमा यांत ते खर्च होतील. समाजात गरजू वर्ग आहे आणि त्याचाही आपल्या प्राप्तीवर हक्क आहे; आपल्या भाकरीतला नितकोर

तुकडा त्यालाही दिला पाहिजे, ही जाणीवच नाही. जुना धर्म श्रद्धा नाही म्हणून सोडला; पण श्रद्धेची, परोपकाराची नवी स्थाने जवळ केली नाहीत. स्वतःकरिता जगला, स्वतःकरिता मेला ! झाले चरित्र ! !

[--जून १९५३]

## २५. आर्थिक व्यवहारातील दानत राखा

**शिक्षण** संपवून मनुष्य कामधंद्याला लागला की, धनप्राप्ती आणि धनाचा व्यय यांना प्रारंभ होतो. द्रव्यप्राप्तीच्या बाबतीत काही माणसे स्वतःचे शिक्षण, बुद्धी आणि व्यवहारचातुर्य यांच्या प्रमाणात यशस्वी होतात.

पैसा हातात पडल्यानंतर त्याचा खर्च करण्यापूर्वी प्रथम असा विचार करा की, माझ्यावर ऋण कोणा-कोणाचे आहे ? ऋण नैतिक असेल किंवा कायदेशीर असेल. ते फेडल्याशिवाय आपल्या द्रव्यावर आपला हक्क नाही, ही भावना पाहिजे. अगदी आवश्यक असा प्रपंच-खर्च करून आधी ऋणमुक्त होण्याचा संकल्प केला पाहिजे. यालाच दानत म्हणतात. दुसऱ्याचे देणे ते प्रथम थोडेफार देऊन राहिलेल्या प्राप्तीत स्वखर्च भागविणे हे स्वाभिमानाचे लक्षण आहे.

तुमच्या अडचणी पाहून परोपकारी संस्थांनी किंवा व्यक्तींनी तुम्हांला कर्जे दिली; ती परत करा म्हणून त्या संस्थांनी किंवा व्यक्तींनी तुम्हांला स्मरणपत्रे पाठवावीत, असा प्रसंग येऊ देऊ नका ! आपण होऊन त्यांना कळवा की, तुमचे ऋण माझ्या लक्षात आहे.--थोडे थोडे परतफेड करून मी आधी ऋणमुक्त होईन. मग मी स्वतःच्या सुखाकडे पाहीन. प्रपंचात व व्यवसायात पडल्यानंतर जरी कर्ज काढण्याचा प्रसंग आला तरी ही ऋणविमोचनाची दानत ठेवणे फार जरुरीचे आहे. त्यामुळे परोपकारी वृत्ती जिवंत राहते. नाही तर देणाराला वाटू लागते की, "सगळे लबाड आहेत. कोणाला काही देऊ नये !" माणसाच्या कृतज्ञतेवरची व चांगुलपणावरची श्रद्धा नष्ट होते.

"असे पातक माझ्या हातून न होवो !" असा निश्चय करा व तसे वागा. "देवाने दिलेल्या अन्नाचा देवाला नैवेद्य न देता जो जेवतो तो चोरच आहे !" असे गीता-वचन आहे. ऋणाची फेड न करता जो स्वतःच्या धनाचा उपभोग घेतो तोही चोरच आहे, हे प्रत्येक पैसा खर्च करताना ध्यानात ठेवा.

[--जुलै १९५३]

## २६. आचार-धर्माची क्रमिक पुस्तके

**भरतखंडात** आर्य-द्रविड-अनार्य यांची वस्ती आज हजारो वर्षे आहे. आर्यांचा प्रवेश सिंधु-प्रदेशात झाला, त्याला सहा हजार वर्षे झाली असतील. परंतु त्यापूर्वीच सिंधूच्या खोऱ्यात द्रविड संस्कृती अस्तित्वात होती. तीही उच्च दर्जाची होती. तिचाच प्रसार सर्व भरतखंडात पूर्वीच झालेला असावा असा तर्क आहे.

सारांश, या देशात आम्ही किमान सहा हजार वर्षे राहिलो आहोत. या अवधीत जीवनाचा निरनिराळ्या अंगांनी आम्ही अनुभव घेतला व त्यावर विचार केला. जीवनातील अनेक प्रश्नांवर विचार करून त्यांवर तात्त्विक सिद्धान्त बसविणे हा भारतीयांचा स्वभावच आहे. असे सिद्धान्त सर्वसामान्य व्यक्तींच्या शिक्षणाकरिता इतिहास व कथा यांच्या स्वरूपात मांडलेले आहेत.

रामायण व महाभारत हे ग्रंथ सामान्य जनांच्या शिक्षणाकरिता रचले. शिक्षणाबरोबर सात्त्विक करमणूकही त्यांत भरपूर आहे. सक्तीचे प्राथमिक शिक्षण आणि प्रौढांच्या शाळा अस्तित्वात नव्हत्या, अशा काळात आपले शिक्षण थांबून राहिले नव्हते. रामायण व महाभारत या राष्ट्रीय क्रमिक पुस्तकांच्या द्वारे अथांग समाजाच्या शिक्षणाचे कार्य चालू होते.

आपल्या समाजात शालेय शिक्षणाचा फारसा प्रसार नसताही संस्कृती जिवंत राहिली, याचे बरेचसे श्रेय या दोन ग्रंथांना दिले पाहिजे. त्यांनी लोकांना लेखन-वाचनाचे शिक्षण दिले नसेल; पण संसाराचे व जीवनाचे शिक्षण दिले.

तुम्हांलाही आता जगातील व्यवहारात पडून काही अनुभव आला असेल. या अनुभवाच्या दृष्टिकोनातून पुन: एकदा चिकित्सक बुद्धीने—भावडया श्रद्धेने नव्हे—हे ग्रंथ वाचा. आजच्या लघुकथा-कादंबऱ्यांप्रमाणे मनोरंजन होऊन शिवाय जीवनातील काही महत्त्वाच्या समस्यांवर विचारवंतांनी दिलेले निर्णय वाचायला सापडतील.

तुम्ही वाचा. सहकुटुंब वाचा. मुलांनाही त्यांची गोडी लावा.

[—ऑगस्ट १९५३]

## २७. दैनिक आत्मनिरीक्षणाचे तंत्र

**प्रयोग** म्हणून असे करा की, आपण चोवीस तासांत सामान्यपणे काय काय करतो त्याचा आढावा घ्या. प्रापंचिक काम, व्यावसायिक कामे, वैयक्तिक देहधर्म, करमणूक इत्यादी गोष्टींना किती वेळ दिला जातो ते पाहा.

या सर्व वेळापत्रकात तुमच्या अध्यात्मिक जीवनाला कितवा भाग दिलेला आहे ? तो थोडा तरी दिला आहे का ? का मुळीच नाही ?

आत्मनिरीक्षण व चिंतन ही मानसिक विकासाची पहिली पायरी आहे. दिवसातून सकाळी व रात्री अशा दोन वेळा शांत मन करून बसा. स्थिर आसन घालून प्राणायाम केल्याने मन शांत होते. मग विचार करा की, माझ्या ठिकाणी गुण कोणते आहेत ? ते कसे वाढवू ? दोष कोणते आहेत ? ते कसे घालवू ? असा विचार सुचणे व स्वतःच्या गुणदोषांची छाननी करता येणे, ही अध्यात्मिक विकासाची पूर्वपरीक्षा आहे. यातून उत्तीर्ण होणाराला वरच्या क्षेत्रातील उन्नती हळूहळू साधता येईल.

काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर या दुर्गुणांचा पगडा माणसावर न कळत बसतो. आचारपूर्वक व अभ्यासपूर्वक त्यांना ताब्यात ठेवता येणे, ही गोष्ट प्रयत्नाने साध्य होते. त्याचबरोबर सद्‌गुण संवर्धनाच्या दृष्टीने अभय, दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, आत्मनिग्रह, शांती, दया, मार्दव, क्षमा, धैर्य, अद्रोह, इत्यादी गुणांपैकी काही निवडून त्यांचे चिंतन करावे. "या दुर्गुणांचे निर्मूलन आणि या सद्‌गुणांचे संवर्धन मी करतो, "असा संकल्प रोजच्या रोज ठराविक वेळी करावा.

न कळत तुमच्या जीवनावर अशा चिंतनाचा परिणाम होईल. हळूहळू तुम्ही सुसंस्कृत व्हाल. आयुष्याच्या प्रत्येक वाढदिवसाबरोबर तुमचा आत्मिक-विकास होत राहील.

विकास हे जिवंतपणाचे लक्षण आहे. मनाने जिवंत रहा.

[—सप्टेंबर १९५३]

## २८. आन्तरप्रान्तीय स्नेहवर्धन

**आजकाल** महाराष्ट्रात ज्या चळवळी चाललेल्या आहेत त्यांची एक विवक्षित दिशा आहे. मराठी भाषेचा अधिकाधिक वापर व प्रसार; वृहन्महाराष्ट्राची प्रस्थापना; महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास; महाराष्ट्रीय संस्कृतीची जोपासना इत्यादी अनेक आंदोलने सध्या चालू आहेत. त्या सर्वांना आपण प्रत्येकाने अंतःकरण-पूर्वक पाठिंबा देऊन यथाशक्ती साहाय्य केले पाहिजे.

परंतु या आंदोलनाची दुसरी बाजूही दृष्टीआड करता कामा नये. आपल्या शेजारी असलेले किंवा दूर असलेले जे इतर प्रांत आहेत त्यांची मैत्री आणि सहानुभूती आपण संपादन केली पाहिजे. कारण सर्वच महाराष्ट्रीय काही महाराष्ट्राच्या

चतुःसीमेत राहणारे नसून अनेकांचा संचार सर्व भारतात होणार आहे. म्हणून आन्तर-प्रांतीय स्नेहसंवर्धन हे ब्रीदवाक्य प्रत्येकाने दृष्टीपुढे ठेविले पाहिजे.

तुमच्या दैनंदिन जीवनात व व्यवहारात या कार्याला पुष्कळ वाव आहे. व्यवसायाच्या निमित्ताने आपले संबंध गुजराती, कानडी, मद्रासी, बंगाली, पंजाबी, इत्यादी अनेक प्रांतीयांशी; किंवा जैन, लिंगायत ,ख्रिस्ती, मुसलमान, यहुदी व पर-प्रांतीय हिंदू यांच्याशी येतात. परंतु आपल्यापेक्षा निराळ्या संस्कृतीच्या या समाजाची आपल्याला किती माहिती असते, याचा विचार करा. त्यांच्या भाषेतील चार-पाचशे शब्द किंवा सामान्य व्यवहारातील वाक्यप्रयोग आपल्याला शिकता येतील. त्यांच्या समाजरचनेची माहिती संभाषणद्वारे घेता येईल. हिंदू समाजातच प्रांताप्रांतांत किती भेद आहेत, याची तुम्हांला कल्पनाही नसेल. त्यांचे कौटुंबिक व सामाजिक रीतिरिवाज यांचा अभ्यास करता येईल. जन्म, बारसे, व्रतबंध, विवाह, उत्तरक्रिया इत्यादी चालीरीतींची माहिती घेता येईल. त्यांचे वाङमय, लोकगीते व लोककथा यांची माहिती गप्पा मारता मारता घेता येईल. त्या त्या प्रांतांतील आर्थिक व सामाजिक प्रश्न व आंदोलने यांचे ज्ञान प्राप्त करून घेता येईल.

हे सर्व करताना प्रांतिक अहंकाराची वृत्ती न ठेवता समतेची आणि मैत्रीची भावना वाढविली पाहिजे.

अशा संबंधांतून मिळालेली माहिती लेखन, भाषण व संभाषण द्वारा आपल्या इतर मराठी बांधवांना द्या. हे एक देशप्रेमाचेच काम आहे.

[—**ऑक्टोबर १९५३**]

## २९. आपल्या मुलींचे शिक्षण

**आजच्या** मुलींच्या शिक्षणात धार्मिक, नैतिक आणि गृहशिक्षणाची आवश्यकता आहे. मुलींच्या लग्नाची वाढती वये आणि सहजीवनाचे आकर्षण ह्या बाबतीत पालकांनी आपल्या मुलींना प्राचीन उज्ज्वल चारित्र्याचा आदर्श समजावून सांगितला पाहिजे. तरच त्या नव्या जगाच्यां नव्या क्षेत्रात जागरूकतेने पावले टाकतील.

मुलींना शिक्षण देण्याच्या पूर्वीच्या कल्पनेत फरक झाला आहे. श्रीमंत लोक मुलीला चांगले स्थळ मिळावे म्हणून शिक्षण देत; मध्यमवर्ग ती स्वावलंबी बनावी म्हणून शिक्षण देतात, परंतु आजच्या समाज-क्रान्तीच्या काळात या विचारात

बदल केला पाहिजे. आज श्रमाची प्रतिष्ठा वाढली आहे. जो श्रम करतो तोच मानाने जगत आहे. मध्यमवर्ग हा परंपरेच्या चाकोरीतून बाहेर पडला नाही; म्हणून त्याच्या आर्थिक परिस्थितीवर ताण पडला आहे. श्रमाची प्रतिष्ठा मान्य करून संसार करण्याच्या कल्पनेत बदल केला पाहिजे. तरच त्यांना मुलींच्या जीवनाबद्दल भेडसावणाऱ्या प्रश्नांची उकल करता येईल.

शाळेमध्ये पाहिजे तसे गृहशिक्षण मिळत नाही. घरीच ते चांगल्या तऱ्हेने मिळेल. ते देण्याची जबाबदारी पालकांची आहे. मुलींच्या सुखी जीवनाचा प्रश्न जर सोडवावयाचा असेल तर तिला घरात आवश्यक असणाऱ्या शारीरिक कष्टाची सवय कायम ठेवली पाहिजे. हा नव्या जगाचा विचार आहे. जगात समाज किती पुढे गेला तरी मूळची गृहव्यवस्था बदलली नाही. गृहशिक्षणामध्येच तिला धार्मिक आणि नैतिक शिक्षण दिले पाहिजे. शाळेत या महत्त्वाच्या गोष्टींना फारच थोडा वेळ मिळतो. नव्या युगाची पावले ओळखून पालकांनी हे शिक्षण घरीच दिले पाहिजे. भारतातील स्त्रिया फार भाग्यवान आहेत. दीडशे वर्षे गुलामीत असणाऱ्या स्त्रिया, स्वातंत्र्याची हवा मिळताच सर्वत्र तेजाने चमकू लागल्या, प्रभाव पाडू लागल्या. संयुक्त राष्ट्रांच्या संघटनेच्या अध्यक्षपदावर भारतीय स्त्री विराजमान झाली आहे. भारतीय स्त्रीच्या कर्तृत्वाचा हा गौरव आहे. पारतंत्र्याच्या कालात स्त्री-शिक्षणाच्या व उन्नतीच्या ज्या ज्या चळवळी झाल्या त्यांना समाजाने उदारपणे पाठिंबा दिला, म्हणूनच ही गोष्ट शक्य झाली. ही महान् परंपरा टिकविण्याची जबाबदारी आजच्या स्त्रियांवर आहे. सार्वजनिक जीवनात स्त्रियांचे स्थान फार मोठे आहे; म्हणून त्यांनी आपल्या संसारी जीवनाला समाज-जीवनाची जोड दिली पाहिजे.

सहशिक्षणाबद्दल आपणाला ठाम मत देता येणार नाही. समाजाच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न अवलंबून आहे. आपल्या सहशिक्षणात व कन्या-शिक्षणात नैतिक मार्गदर्शनाचा अभाव आहे. म्हणून उज्ज्वल परंपरेचा आदर्श समजावून सांगून मुलींना चारित्र्याची महती पालकांनी व शिक्षकांनी पटविली पाहिजे.

[—नोव्हेंबर १९५३]

## ३०. सत्कृत्याचे पारितोषिक

**चांगले** काम माणसाने करीत असावे. त्याचे पारितोषिक मिळाल्यायाशिव राहात नाही. निसर्गाच्या नियमाप्रमाणे कशाचाही नाश होत नाही, फक्त रूपान्तर होते. या न्यायाने सत्कृत्य त्याच्या फलाच्या रूपाने कोठे ना कोठे तरी वास करीत

असते. प्रत्येक कर्माला फळ आहे. चांगल्या कर्मास चांगले. वाईटास वाईट. हा आपल्या धर्माचा सनातन सिद्धान्त आहे.

माणसाच्या कामाचे फळ अनेक स्वरूपांत असू शकेल. कधी ते दृश्य भौतिक स्वरूपात असेल; कधी ते अदृश्य अशा भावनेच्या स्वरूपात असेल.

संपत्ती आपल्याला द्रव्याच्या स्वरूपात दिसते; परंतु माणसांचे प्रेम, सहानुभूती, कृतज्ञता आणि सद्भावना ही देखील एक संपत्ती आहे असे मला वाटते. आपल्या कामाचे फळ कधी या दुसऱ्या स्वरूपात मिळते; तर कधी पहिल्या स्वरूपात मिळते. सत्कर्माचे फळ कोणाला ऐहिक द्रव्यात मिळेल; कोणाला माणसांच्या सद्भावनांच्या स्वरूपात मिळेल; कोणाला दोन्ही स्वरूपांत थोडे थोडे मिळेल.

भौतिक संपत्ती नष्ट होईल; पण सद्भावना चिरंतन राहतील.

तुम्ही आपापली कामे करून द्रव्यसंपत्ती जरूर मिळवा; परंतु माणसांचे प्रेम, भावना, सहानुभूती आणि कृतज्ञता या स्वरूपात मिळणारी संपत्तीही अवश्य मिळवा. ती मनाला सात्त्विक आनंद व समाधान देईल.

[—**डिसेंबर १९५३**]

## ३१. अप्रसिद्ध कर्तबगारीचा गौरव

**माजी विद्यार्थी** संमेलनात काही माजी विद्यार्थ्यांचा त्यांच्या स्व-क्षेत्रातील कामगिरीबद्दल प्रकट गौरव करण्यात आला. त्याच वेळी माझ्या मनात असा विचार आला की, ही यादी अशीच लांबविता येणार नाही काय ? यापेक्षा कितीतरी अधिक माजी विद्यार्थ्यांनी कदाचित गौरवितांपेक्षाही अधिक कर्तबगारी केलेली असेल ? त्यांचीही नावे यादीत यायला हवीत.

परंतु व्यवहाराच्या दृष्टीने काही मर्यादा पडतात. यादी करणाऱ्या समिती-मधील सभासदांना ज्यांची माहिती मिळाली असेल त्याच व्यक्तींची नावे ते घालणार; आणि दुसरी गोष्ट स्वतः केलेली कर्तबगारी प्रत्येक जण कळवितोच असे नाही. त्याने स्वतः किंवा त्याच्या चहात्याने अशी माहिती दिल्याशिवाय समितीला तरी कल्पना कशी येणार ?

मला अनेक शाळात बक्षीस-समारंभाला जाऊन पारितोषिके देण्याचा प्रसंग येतो. त्या वेळी मी भाषणात नेहमी बक्षिसे न मिळालेल्या पण गौरवाला योग्य अशा अज्ञात विद्यार्थ्यांचाही उल्लेख करतो.

पाश्चात्य देशांत "अज्ञात सैनिकांचे स्मारक" Unknown Soldiers Memorial करण्याची एक प्रथा आहे; तिचे मला अशा वेळी स्मरण होते.

Full many a flower is born to blush unseen
And waste its fragrance on the desert air.

असे ग्रे कवीने अज्ञात व अगौरवित सौंदर्याविषयी उद्‌गार काढले आहेत. प्रत्येक समाजात ही अनादी अनंत समस्या आहे.

तर मग अशा अगौरवित व्यक्तींना समाधान काय ? आपण सत्कृत्य करतो, पराक्रम करतो, पुरुषार्थ गाजवितो आणि यातच आपल्या जीवनाचे सार्थक आहे, असे समाधान मानायला प्रौढ माणसाने हळूहळू शिकले पाहिजे. जे मनाने प्रौढ झालेले असतात ते अशा गौरवाच्या पलीकडे गेलेले असतात. स्वतःच्या सत्कृत्याचा व कर्तबगारीचा त्यांना आत्मविश्वास असतो. इतरांनी त्यांचा गौरव करण्याची त्यांना अपेक्षाच नसते. अशा लौकिक गौरवाच्या ते पलीकडे असतात.

हेच आपल्या मानवी विकासाचे ध्येय आहे. सत्कृत्य हे इतरांना ज्ञात अथवा अज्ञात, प्रसिद्ध वा अप्रसिद्ध, गौरवित वा अगौरवित, स्तवित अथवा निंदित, कसेही असले तरी ते सत्कृत्यच. गुलाब हा बागेत वा रानात कोठेही असला तरी गुलाबच. तुमची सत्कृत्ये आणि कर्तबगारी इतरांच्या निंदा–स्तुतीवर अवलंबून न ठेवता आत्म-समाधानावर अधिष्ठित असू द्या.

वानोत निंदोत सुनीतिमंत । चळो असो वा कमला गृहात ।।
हो मृत्यु आजीच घडो युगान्ती । सन्मार्ग टाकूनि भले न जाती ।।

हे सत्य त्रिकालाबाधित आहे. [—**फेब्रुवारी १९५४**]

# ३२. बेकारीचा प्रतिकार

**नाही** नाही म्हणता बेकारीची लाट आपल्या समाजावर चालून आली आहे. सरकारला तिची जाणीव जनतेने करून दिली आहे. बेकारी-निवारणाचे सरकारी प्रयत्न चालू आहेत. परंतु कोणतेही सरकार सर्व बेकारांना काम देऊ शकणार नाही. अमेरिका-इंग्लंडसारख्या उद्योगप्रधान आणि श्रीमंत देशांतही बेकारीच्या साथी येतात.

आपल्या जीवनाचा व व्यवसायाचा प्रश्न प्रामुख्याने प्रत्येक व्यक्तीने सोडविला पाहिजे. आज हायस्कूल-कॉलेज-शिक्षण घेतलेल्या तरुणांचे तांडे प्रतिवर्षी बाहेर पडत आहेत. त्या सर्वांना कारकुनी नोकऱ्या मिळणे शक्य नाही. साध्या इतर नोकऱ्याही मर्यादितच असतात. पुष्कळ तरुणांनी आपापल्या पायावर उभे राहून काही स्वतंत्र उद्योग-धंद्यांचा विचार केला पाहिजे.

केवळ पुस्तकी शिक्षण अशा धंद्यांना उपयोगी पडत नाही. आज सरकारी व खाजगी प्रयत्नांनी अनेक ठिकाणी औद्योगिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध झाल्या

आहेत. प्रत्येक तरुणाने एक-दोन उद्योग शिकणे अगदी आवश्यक आहे. एक उद्योग चालला नाही तर दुसरा करता यावा. नेहमी भात्यात दोन बाण तरी असावेत.

आज जे नोकरी-धंद्यात आहेत त्यांनीही गाफीलपणे फाजील निश्चिन्त राहू नये ! आजच्या अनिश्चित काळात माणसाची नोकरी केव्हा सुटते याचा नेम नाही. नोकरी चालू असतानाही एखाद्या अन्य व्यवसायाची साधना करीत राहा. चालू नोकरी सुटली तर लगेच भणंग-बेकार न होता पोटापुरते मिळविता येईल अशी पात्रता संपादन करून घ्या.

प्रत्यक्ष जीवनात पडल्याशिवाय तरुणांना धंदे-शिक्षणाचे महत्त्व पटत नाही, हे दुर्दैव आहे. आश्रमात आणि शाळेत फुकट मिळणारे धंदे-शिक्षण काही विद्यार्थ्यांना महत्त्वाचे वाटत नाही ! जगात नोकरीकरिता बाहेर पडल्यावर "तुला काय करता येते ?" असा प्रश्न प्रत्येक ठिकाणी विचारला गेला म्हणजे चटकन् त्याचे डोळे उघडतात! सर्व माजी विद्यार्थ्यांना हा अनुभव आहे !

म्हणून सर्व तरुणांना अनुभवाचा सल्ला आहे की, बाबांनो---पुस्तकी शिक्षणाशिवाय निदान दोन उद्योग किंवा व्यवसाय आत्मसात् करा. बेकारीला बळी पडू नका.

[---मार्च १९५४]

# ३३. हिन्दीवर प्रभुत्व मिळवा

**हिन्दी** भाषा मध्यवर्ती सरकारच्या कारभारात येणार हे आता ठरले. इंग्रजीच्या बरोबरीने हिन्दी आले, आणि इंग्रजीची जागा हिन्दीने घेतली, या गोष्टी आता फार लांबच्या भविष्यकाळातल्या नाहीत. तुमच्या आमच्या उद्याच्या जीवनातील आहेत.

१८३५ पासून इंग्रजी शिक्षण आले. महाराष्ट्राने इंग्रजीकडे अगदी कामापुरते लक्ष दिले. त्यामुळे परिणाम काय झाला ? जेथे जेथे इंग्रजीचा व्यवहार तेथे तेथे आम्ही मागे ! अखिल भारतीय परिषदांमध्ये आमचे वक्ते मुखदुर्बळ ! इंग्रजीत बोलायचे म्हणजे त्यांची छाती धडधडे ! इंग्रजी क्षेत्रात आमची लेखणी दुर्बळ, त्यामुळे ग्रंथ-लेखनात व वृत्तपत्रसृष्टीत आमचा पत्ता नाही.

आता पुढे सरसावण्याची ही संधी आहे. अखिल भारतीय व आन्तर-प्रान्तीय कामाकरिता हिन्दी येणार, हे ओळखून या भाषेवर प्रभुत्व मिळवा. अस्सल हिन्दी बोलणाराला व लिहिणाराला देखील लाज वाटावी असे हिन्दी बोलायला शिका. हिन्दीत ग्रंथ लिहा---सर्व भारतात त्याला वाव मिळेल. उच्चार, शैली आणि रचना यांत हिन्दी प्रान्तातील लोकांवर ताण करा. हिन्दी परीक्षा पास झालेले लोक खंडीभर

आहेत. तिचा उपयोग करणारे बोटावर मोजण्याइतकेही नाहीत. पुस्तकी ज्ञान व्यवहारात आणणारे पाहिजेत.

देशाच्या व्यवहारात व कारभारात आपला योग्य वाटा उचलण्याची पुन: संधी आली आहे. उत्कृष्ट हिंदी जाणणाराला सर्व देशाचा व्यवहार खुला आहे. उत्कृष्ट हिन्दी व इंग्रजी जाणणाराला सर्व जगाचा व्यवहार खुला आहे. केवळ मराठी जाणणाराला फक्त आपला गाव आहे. काळाची पावले ओळखा व तुमचे पाऊल टाका.

[—एप्रिल १९५४]

## ३४. सभ्याचारांचे संगोपन करा

**महाराष्ट्राच्या** आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा परिणाम आपल्या मनोवृत्तीवर व आचारावर झाला आहे. उत्तर-हिन्दुस्थानप्रमाणे येथे बादशाही, सुलतानी किंवा सुभेदारी फारशी नव्हती. त्यामुळे दरबाराशी संबंध आल्यामुळे येणारा दरबारीपणा आपल्यात नाही. काही मराठी संस्थानांत तो होता; पण संस्थानांबरोबर तेथील दरबारीपणाही गेला आहे.

आम्ही आपले व्यवसाय करून राहणारे स्वतंत्र लोक, कोणाच्या कृपेवर किंवा लोभावर अवलंबून नाही. त्यामुळे एक प्रकारचा नि:स्पृहपणा, निर्भीडपणा, स्पष्ट-वक्तेपणा व स्वतंत्र बाणा यांची वाढ आपल्यात झाली.

पण या गुणांचा अतिरेक होऊन त्याचे फाजील अभिमान, उर्मटपणा, सडेतोड-पणा, आणि सभ्याचाराचा अभाव अशा दुर्गुणांत रूपान्तर होऊ लागले आहे. भारता-तील इतर राज्यांशी आपले हितसंबंध राखण्याच्या दृष्टीने हे दुर्गुण आपल्या आड येत आहेत.

ऑफिसात, दुकानात, गाडीत, रस्त्यात, घरात—कुठेही पाहा; आपले लोक फार उद्धटपणाने व तुसडेपणाने वागत असतात. विनय, नम्रता, शालीनता, शिष्टा-चार व सभ्यता या गुणांचे आपल्याला शिक्षणच मिळाले नाही असे आपण वागतो. काही लोक फार तर अगदी वरिष्ठांशी अदबीने वागत असतील; पण एकंदर महाराष्ट्रात या गुणांचा अभावच !

नि:स्पृहपणा व स्वतंत्र बाणा ठेवूनही विनय व सौजन्य या गुणांचे पालन करता येते, हे आपण शिकायला हवे. सभ्यपणा आणि शालीनता म्हणजे उत्तम गृहशिक्षणाचा आणि शालेय शिक्षणाचा परिपाक आहे. समाजात आपण एकमेकांशी सौजन्याने वागलो तर या दुख:मय जीवनात तेवढीच आनंदाची व समाधानाची भर टाकल्या-सारखे होईल.

[—मे १९५४]

## ३५. संस्थांची सावली

**महाविद्यालयात** शिकत असताना माझ्याकडे अनेक कामांत वर्गणीचेही काम असे. त्या वेळी थोडेच वर्गणीदार असल्याने सगळी वर्गणी मीच आणी. एकदा हिंगण्याला कै. वामन मल्हार जोशी यांच्याकडे वर्गणीला गेलो असताना त्यांनी वर्गणी दिली आणि सहज बोलण्याच्या ओघात ते म्हणाले—"अशा संस्था जिवंत ठेवाव्यात. कुणी सांगावं! आपल्यालाच कधी काळी त्यांचा आश्रय घ्यायचा प्रसंग यायचा. मदत करीत असावं."

गेल्या महिन्यात अनेक अर्जदारांचे अर्ज आले. त्यांची शिफारस करणारेही अनेक लोक येऊन गेले. अनेकांनी पत्रे लिहिली, अर्जदारांपैकी कित्येकांची स्थितीही एका वेळेला चांगली होती. शिफारस करणारांची स्थितीही चांगली असावी.

अनेक माजी-विद्यार्थ्यांनीही आपापले नातेवाईक ठेवण्याकरिता अर्ज केले होते.

हे अर्ज आणि ही शिफारसपत्रे वाचताना माझ्या मनात नेहमी विचार येई की, या लोकांनी आपल्या सुस्थितीच्या काळी एखाद्या संस्थेला काही मदत केली असेल का! संस्था जिवंत ठेवण्याच्या कामी यांची मदत किती झाली आहे? हो आणि नाही.

जे आपल्या संस्थेचे तेच इतर संस्थांचे. संस्था ह्या वृक्षासारख्या सावली देणाऱ्या जागा आहेत. आपण त्यांचा आजच फायदा घेऊ असे नाही. कदाचित कधी घेणारही नाही; पण कुणी सांगावे? पाणी घालून झाडे जगवावीत, तसे संस्थांना साहाय्य करून जगवावे. जगाला उपयोग होतो आहे. आपल्याच घराण्यातील जवळच्या अगर दूरच्या नातेवाइकांना कधी काळी जरूर लागलीच तर उपयोग होऊ शकेल.

[—जून १९५४]

## ३६. वैयक्तिक उन्नतीचे मोजमाप

**आजचे** आपले जीवन अतिशय धकाधकीचे झाले आहे. जीवनकलह तीव्र होत चालला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंत; सोमवारपासून रविवारपर्यंत; एक तारखेपासून एकतीस तारखेपर्यंत; जानेवारीपासून डिसेंबरपर्यंत, संसाराला लागल्यापासून मरेपर्यंत—द्रवार्जन, नोकरी, व्यवसाय, पैसा, हिशेब, साहेब, बढती, वशिला, शिल्लक, कर्ज, नफा, तोटा—याशिवाय भाषा नाही. जो वेळ शिल्लक राहील त्यात कुटुंब, मुले-बाळे, नातेवाईक, यांचा थोडा विचार!

या सर्व उपद्व्यापापासून अलिप्त होऊन स्वत:विषयीचा विचार करायला सवडच राहत नाही. आपण काढीत नाही.

पूर्वीच्या दैनंदिन जीवनात संध्या, पूजा, जपजाप्य, ध्यान, देवदर्शन—इत्यादी कार्यक्रमांना प्रमुख स्थान असे. आजच्या आपल्या ज़ीवनात अशा प्रकारच्या गोष्टींच्या विचारालाही वेळ नाही, तर कृतीला कोठून असणार ?

ही निव्वळ आत्मवंचना नाही का ? खरोखरीच का आपल्याला वेळ नाही ? का कधी सुचलेच नाही ? मनात आणले तर दिवसातून पाच, दहा, पंधरा मिनिटे आत्मोन्नतीकरिता काढता येणार नाहीत का ? आत्म्याचा विचार हा भारतीय संस्कृतीचा विशेष आहे. आमच्या इतिहासातील व पुराणातील आदर्श पुरुष संसार आणि व्यवहार करून आत्मोन्नतीकडे लक्ष देत होते. जनक, रामचंद्र, बुद्ध, अशोक, शिवाज़ी, टिळक, गांधी—यांची अखंड परंपरा पाहा.

दिवसातून थोडा वेळ चिंतनाकरिता द्या. ध्यान करा. चांगल्या विचारांचे मनन करा. चांगले धार्मिक वाचन करा. त्यावर विचार करा. त्यामुळे कशाही परिस्थितीत—आपत्तीत किंवा संपत्तीत—तुमच्या मनाची शांती कायम राहील.

आत्मिक उन्नतीशिवाय तुमचे जगातील यशापयश आणि कर्तबगारी यांना काडीचीही किंमत नाही.

[—जुलै १९५४]

## ३७. जीवनातील खेदाचे प्रसंग

**जीवनात** आपल्याला काही काही वेळा औदासीन्याचे आणि विषण्णतेचे प्रसंग येतात. आपण आपल्या परीने चांगली कामे करीत असतो. सद्बुद्धीने करतो. तन-मन-धन लावून करतो. किंबहुना आपले जीवन त्या कामी पणाला लागलेले असते.

सामान्यपणे अशा सत्कृत्यांचे लोक कौतुकच करीत असतात; पण असे नेहमीच होते असे नाही. काही प्रसंग असे येतात की, आपल्या कामाविषयी कोणीतरी उणे बोलतो; कुत्सितपणाने बोलतो; स्वार्थाचे आरोप करतो; आपल्या कामाला कमी-पणा आणि आपल्या हेतूंना हीनता येईल असे उद्गार काढतो.

असे करण्यात घरातील माणसे, मित्र, परिचित, सहकारी, वरिष्ठ अधिकारी, आश्रित किंवा नोकर-चाकर असतील किंवा आपल्या वाइटावर असलेले आणि आपला उत्कर्ष सहन न होणारे शत्रू किंवा विघ्नसंतोषी असतील. इतरांच्या कामावर आपण सहज जाता जाता शितोडे उडवतो, याची जाणीव ठेवणारे व विचार करून बोलणारे फार थोडे लोक असतात.

अशा माणसांकडून आपली व आपल्या कामाची अवहेलना झाली म्हणजे मनाला खेद होतो. खंती वाटते. अस्वस्थता येते. हा मनुष्यस्वभाव आहे.

काम करूच नये असे वाटते. अशा वेळी काय करावे ? कसे वागावे ? मनाचे समाधान कसे करावे ?

मी अशा प्रसंगी विचार करतो—माझे काही चुकले आहे का ? असल्यास सुधारणा करीन. माझे चुकले नसल्यास इतरांच्या अवहेलनेला मी का भ्यावे ? अवहेलना करणारे क्षुद्र बुद्धीचे आहेत. मी मनाला त्रास करून घेतला तर त्यांना आनंदच वाटेल. ज्यांचे चुकले त्यांनी मनाला खंत वाटू द्यावी. मी का खेद मानावा ?

[—ऑगस्ट १९५४]

## ३८. संशयातीत वर्तन ठेवा

**आपले** सामाजिक जीवन अनेक दुर्गुणांनी दूषित झाले आहे, असे प्रत्येकजण बोलत असतो. लाचलुचपत, पैसे खाणे, खोटे हिशोब ठेवणे, पैसे बुडविणे, बायका पळविणे, व्यभिचार करणे अशा प्रकारच्या किती तरी बातम्या आपण रोज वाचीत असतो !

जगाच्या प्रारंभापासून स्त्री आणि धन यांच्या अधम मोहापायी मनुष्य दुष्कृत्ये करीत आला आहे. प्रत्येक युगात या पापापासून माणसाला परावृत्त करण्याचा प्रयत्न समाजाचे विचारवंत करीत आले आहेत. हा झगडा अनादि कालापासून आहे.

समाजात मोहाचे प्रसंग माणसाला हरघडी येत असतात. सार्वजनिक द्रव्य हातात आले की, त्याचा वैयक्तिक फायद्याकडे उपयोग करण्याचा मोह होतो. महाराष्ट्रातील कंपन्याचे इतिहास पाहा म्हणजे कळेल. स्त्री-पुरुष संबंधातील अनाचाराच्या वार्ता तर रोज जाहीरपणे वाचायला व ऐकायला मिळतात. शेजारीपाजारी प्रत्यक्ष दृष्टीस पडतात.

या दोन्ही मोहांपासून अलिप्त राहून आपले चारित्र्य निष्कलंक ठेवणे यात पुरुषार्थ आहे. त्याकरिता माणसात आत्मसंयमन पाहिजे. संयमन हे अभ्यासाने व विचाराने वाढत असते. एकाएकी ते उत्पन्न होत नाही.

निष्कलंक राहणे हे आवश्यक आहे, त्याबरोबर आपल्या वर्तनाविषयी शंका येईल असे आचरण न करणे हेही आवश्यक आहे. लोक अतिशय शंकेखोर असतात. मोहाच्या परिस्थितीत दुसरा मनुष्य पाप करतोच असे गृहीत धरले जाते. या संशयाला जागा का द्या ? "सीझर्स वाइफ़ शुड बी अबव्ह सस्पिशन" अशी म्हण

आहे. परस्त्री आणि परकीय धन यांविषयींचे आपले व्यवहार अगदी संशया-पलीकडे असावेत. शंकेलाही जागा ठेवू नये.

वैयक्तिक जीवनात अशा वागण्याची जरुरी आहे. सार्वजनिक जीवनात तर किती तरी पटींनी अधिक आहे! समाजातील अनीतीवर टीका करण्यापूर्वी प्रत्येकाने आत्मनिरीक्षण करून आपले जीवन शुद्ध ठेवावे. संशयातीत शुद्ध ठेवावे.

[ —**नोव्हेंबर १९५४** ]

# ३९. सामुदायिक करमणूक

**उद्योगी** माणसाला करमणुकीची अत्यंत आवश्यकता आहे. आठवड्यातून एखाद्या दिवशी तरी आपल्या उद्योगधंद्यापासून व नेहमीच्या व्यवसायापासून थोडा वेळ अलिप्त राहून निराळ्या वातावरणात काळ घालवावा; त्यामुळे नेहमीच्या विवंचना विसरून मन प्रफुल्लित होते; विश्रांती मिळते व पुन: नेहमीच्या कामाला उत्साह वाटतो.

परिचित मंडळींच्या सहवासात वेळ घालविणे ही एक उच्च दर्जाची सात्त्विक करमणूक आहे. त्यामुळे असलेले मैत्रीचे संबंध दृढ होतात. नवीन मित्र जोडता येतात. आपले सामाजिक संबंधाचे क्षेत्र वाढते.

आपले सामुदायिक व सामाजिक बैठकीचे कार्यक्रम सात्त्विक करमणुकीच्या दृष्टीने कसे सुधारता येतील याचा विचार करायला पाहिजे.

आज आपण काय करतो पाहा. एकत्र जमतो, जेवतो–खातो; चहा-कॉफी-चिवडा घेतो. थोड्या गप्पा मारतो–शक्य तर कुटाळक्या करतो–आणि घरोघर निघून जातो.

या कार्यक्रमात वैयक्तिक व सामुदायिक गुणविकासाला व गुण-प्रदर्शनाला वाव मिळेल असा कार्यक्रम आपण योजीत नाही. पाचदहा लोक एकत्र आले म्हणजे अनेक गुणांचा संग्रह एकत्र येतो. कोणी गाणारा असतो; कोणाजवळ विनोदी गोष्टी असतात; कोणी चांगल्या कथा सांगतो; कोणी नकला करू शकतो. एक ना दोन, अनेक गुण एकत्र येतात. अशा व्यक्तींच्या गुणदर्शनाला वाव देणे हा बैठकीतला मुख्य कार्यक्रम असावा.

असे वारंवार प्रसंग येऊ लागले तर तेथे उपयोगी पडावी म्हणून प्रत्येकजण आपापली कला वाढीस लावील. त्यामुळे वैयक्तिक कलाविकास होऊन सामुदायिक मनोरंजन होईल.

आपण लोक सुसंस्कृत आहोत. पाच हजार वर्षांची संस्कृती आपल्या पाठीशी आहे; पण ही संस्कृती आपल्या वैयक्तिक आणि सामुदायिक जीवनात दिसायला नको का ?

[ —डिसेंबर १९५४ ]

## ४०. सर्वस्व-समर्पण की अंगचोरपणा ?

**राष्ट्राची** संपत्ती अनेक स्वरूपांत असते. ती जशी धनाच्या स्वरूपात दिसते तशीच मानवी रूपानेही असते.

परंतु मानवी स्वरूपातील संपत्तीचा पुरेपूर उपयोग अद्याप आपल्या देशात होत नाही. प्रत्येक मनुष्य ही राष्ट्राची दौलत आहे. त्याचे शरीर, त्याची बुद्धिमत्ता, त्याच्या भावना हेही समाजाचे धनच आहे. या धनाचा संपूर्ण उपयोग देशाला करून देणे हे प्रत्येक व्यक्तीच्या हातात आहे. त्याला बाहेरच्या सक्तीचा उपयोग होणार नाही. प्रत्येक नागरिकाला वाटले पाहिजे की, माझ्या तन-मन-धनाचा उपयोग माझ्या समाजाला देईन.

घेतलेल्या कामाला सर्वस्व अर्पण करण्याची सवय आपणच आपल्याला लावून घेतली पाहिजे. आपले संपूर्ण शारीरिक आणि बौद्धिक बळ आपापल्या कामाला लावले तरच उत्कृष्ट काम होते. याचा अनुभव प्रत्येकाला जीवनात केव्हा ना केव्हा तरी येतोच.

पण आज वस्तुस्थिती काय आहे ? अंग मोडून काम करण्याची आपली सवय गेली आहे. अंगचोरपणाच्या सवयी दीड-दोनशे वर्षे अंगी जडल्या आहेत. आपल्या कामाला आपला पुरेसा वेळ—श्रम—बुद्धी लावण्याची सवय लागलेली नाही.

जिकडे पाहावे तिकडे कामचुकारपणा, अर्धवट काम करण्याची प्रवृत्ती, निर्बुद्धपणाने काम करण्याची सवय, चालढकल करण्याची वृत्ती, दुसऱ्यावर लोटण्याची प्रवृत्ती—या गोष्टी दिसतात.

सरकारी कार्यालये किंवा खाजगी कार्यालये यांतील अनुभव घ्या. तुमचे काम लांबणीवर कसे टाकता येईल, दुसऱ्यावर कसे ढकलता येईल, टाळता कसे येईल—याची जणू चुरस लागलेली असते ! समाजाची कामे करणे हे जसे चरितार्थाचे साधन आहे तशीच समाजसेवेची संधी आहे—अशी भावना किती जणांच्या ठिकाणी दिसते ?

या सवयीचा परिणाम काय होतो ? आपल्या समाजाचे संपूर्ण मनुष्यबळ उपयोगात येत नाही. काही थोड्या लोकांनी मर मर मरून काम करावे; इतरांनी

अंगचोरपणाने जेमतेम हजेरी भरावी, असे ठिकठिकाणी चालले आहे की नाही पाहा.

केवळ इन्स्पेक्टर्स नेमून यात फारशी सुधारणा होणार नाही. मनुष्य श्रद्धेने काम करू लागला की, त्यात सर्वस्व ओततो. माझे काम हे केवळ पोट भरण्याचे साधन नाही; ती एक समाजाची सेवा आहे, ही श्रद्धा प्रत्येकानें ठेवली पाहिजे. वस्तुस्थितीच तशी आहे. श्रमाचे, कारकुनीचे, बुद्धीचे, कलेचे--कोणतेही काम सर्वस्व अर्पण करून केले तर समाजाचा उत्कर्ष होईल. देशातील सर्व मनुष्यबळाचा संपूर्ण उपयोग होईल.

[--जानेवारी १९५५]

## ४१. समाजवादाचे पथ्य : कर्तव्यनिष्ठा

**आपल्या** देशाने हळहळू कल्याणकारी राज्य आणि समाजवादी अर्थरचना निर्माण करण्याचे ध्येय ठेविले आहे.

या ध्येयसाधनात माझा वाटा काय आहे, याचा प्रत्येक नागरिकाने विचार केला पाहिजे. त्याप्रमाणे वर्तन ठेविले पाहिजे; तरच ध्येय साध्य होईल.

भांडवलशाही समाजरचना सदोष समजली जाते. कारण त्या पद्धतीत मालक कामगारांकडून काम करून घेतो व त्यांच्या श्रमाचा फायदा स्वतः भोगतो. इतरांच्या श्रमाचे शोषण करण्याच्या या वृत्तीमुळे भांडवलशाही रचना समाजाला हितकारक वाटत नाही.

या रचनेतून कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. मालकांची प्रवृत्ती अधिकाअधिक फायदा काढण्याकडे, तशी कामगारांची प्रवृत्ती अधिकाधिक वेतन मागण्याकडे होऊ लागली.

पूर्वी शोषण-प्राधान्य होते. आता वेतन-प्राधान्य आले. येथून पुढे कर्तव्यप्राधान्याचे युग यावयास पाहिजे.

प्रत्येक नागरिकाने आपापले काम कर्तव्यबुद्धीने केले तरच देशात संपत्ती निर्माण होईल. समाजातील व्यवस्था सुधारेल. आपल्या जीवनाची पातळी उंचावेल.

काम न करता वेतन घेणे हे दुसऱ्या प्रकारचे शोषणच आहे; ते समाजाचे शोषण आहे. कामे न करता वेतने घेण्याची प्रवृत्ती समाजात बळावत चालली आहे. कमी वेळ कामे करणे, संथपणे कामे करणे, चालढकलीच्या वृत्तीने कामे करणे--हे सर्व समाजशोषणाचे प्रकार आहेत. असे शोषण फार काळ चालले तर समाजाला अर्धांगवायू होईल. त्याला कामचुकार नागरिक जबाबदार राहतील.

समाजवादी अर्थ-व्यवस्थेत कर्तव्याला प्राधान्य आहे. समाज तुम्हाला जीवन-वेतन देईल. तुम्ही समाजाचे काम काया-वाचा-मने करून केले पाहिजे.

हे समाजवादाचे पथ्य प्रत्येकाने पाळले पाहिजे.

[ --फेब्रुवारी १९५५ ]

# ४२. वसंतऋतूची पूजा

**वसंतऋतू** आला आहे त्याचे स्वागत करीत आहात ना? नाहीतर प्रापंचिक सुखदु:खाच्या विवंचनेत वसंतऋतू आला काय नि गेला काय, त्याची दखलही राहणार नाही !

निसर्गाचे आदरयुक्त कौतुक हा भारतीय संस्कृतीचा एक विशेष गुण आहे. ऋग्वेदकालीन भारतीय आर्यांची संस्कृती कृषिप्रधान व निसर्गप्रधान होती, निसर्गाशी आर्यांचे तादात्म्य झाले होते. सूर्योदय-सूर्यास्ताची रम्यता, चंद्राच्या विविध कलांची शोभा, उष:कालाचे सौंदर्य, वर्षाकालातील नद्यांची गंभीरता, पानांफुलांनी भरलेल्या वृक्षांची संपन्नता, श्रावणमासातील वनस्पतींची विपुलता, या निसर्गातील घडामोडींची जाणीव त्यांनी सतत ठेवली होती.

आपल्या जीवनाची आखणीही भारतीयांनी अशा रीतीने केली होती की, माणसाला निसर्गाची जाणीव सतत राहावी; पण मूळ तत्त्व विसरून आपण फक्त वरवरचे औपचारिक विधी करतो. हळहळू तेही सोडून देत आहोत.

प्रात:काळी पक्ष्यांच्या किलबिलाटाने वासंतिक दिवसाला आरंभ होतो. सकाळी शीतल वारा वाहात असतो. त्याचा उपभोग घ्यायला थोडा वेळ का होईना, घराबाहेर पडा. दिवसा निरभ्र आकाशाची शोभा पाहा. सायंकाळी वसंतऋतूतील वनश्रीचे निरीक्षण करीत फिरायला जा. त्याच वेळी आकाशातील शोभा पाहायला विसरू नका. वासंतिक वातावरणाचा फायदा घेण्याकरिता लांबलांबचे पक्षी थव्याथव्याने संचार करीत असतात. ते कोठून येतात, कोठे जातात, कोण त्यांचे मार्गदर्शन करतो, कोठे आहेत त्यांची घरटी--परमेश्वर जाणे ! उघड्यावर बसून सूर्यास्ताची शोभा पाहा आणि रात्री मिळेल तेव्हा चांदण्याची मजा लुटायला विसरू नका.

फुले, फळे आणि भाजीपाला यांचे वैपुल्य या ऋतूत असते. त्यांचाही उपभोग घ्यायला विसरू नका. आणखी कितीतरी मार्गांनी या ऋतूतील आनंद लुटता येईल ! दृष्टी ठेवा म्हणजे कल्पना सुचतील.

मध्यम-गरीब स्थितीतील माणसालाही कमी खर्चात, बिनखर्चात भोगण्या-सारखी सुखे पुष्कळ आहेत. सुखाच्या कल्पना बदलल्या म्हणजे या परमेश्वरनिर्मित सुखाचा आस्वाद घेता येईल.

[ —मार्च १९५५ ]

## ४३. माणसे जोडा, तोडू नका

**या** जगात आपल्याला किती थोडे आयुष्य निसर्गाने दिले आहे! अनंत--अखंड कालाच्या मानाने आपले जीवन म्हणजे एक क्षणही नाही. त्यात अज्ञानी जीवनाचा व निष्क्रियतेचा काळ सोडा; म्हणजे जाणिवेचे असे आयुष्य फारच थोडे राहते.

या थोड्या आयुष्यात अधिकाधिक मित्र जोडा. कमीत कमी शत्रू करा. अकारण शत्रू असतात त्यांना आपला इलाज नाही. इतरांशी अधिकाधिक सहकार्य करा. लोकांना जास्तीत जास्त सुख द्या. इतरांच्या गुणांचा गौरव करा.

प्रत्येक व्यक्तीमध्ये चांगले आणि वाईट दोन्ही गुण असतात. त्यांतल्या चांगल्या गुणांकडे पाहून त्यांचे कौतुक करा. त्यांचा गौरव करून ते वाढीला लावा.

इतरांच्या दुर्गुणांवर फार जोर देऊ नका. दोष प्रत्येकात आहेत, नाहीत कोणात? आपण स्वत: परिपूर्ण आहोत का? विचार करा. स्वत: अपूर्ण राहून इतर लोक मात्र सद्गुणांचे पुतळे असावेत, अशी अपेक्षा करणे अन्यायाचे नाही का?

आत्मनिरीक्षण करणाराला हा मुद्दा बरोबर पटेल. केवळ इतरांच्याकडे दोषदृष्टीने पाहाणाऱ्या बहिर्मुख माणसाला ही गोष्ट समजणार नाही.

पापपुण्याचा हिशेब प्रत्येकाच्या खाजगी जीवनात असतो. म्हण आहे— "ए सेंट हॅज् ए पास्ट; ए सिनर हॅज् ए फ्यूचर." आपण त्यांच्या गुणांकडेच पाहू या.

दीर्घकाल जमवलेली मैत्री एका क्षणात, एका शब्दाने, एका क्षुल्लक कृत्याने तोडणे सोपे आहे; पण नवीन मैत्री जमवायला दीर्घ काळ लागतो.

माणसे तोडता येणे सोपे; जोडणे कठीण! हरएक मार्गांनी माणसे मिळवा. ज्यांच्याशी जितके जमेल तितके सहकार्य करा. चिकित्सक दृष्टी ठेवा; मनात माणसाचे गुणदोष अवश्य जाणा; पण दोषांपेक्षा गुणांवर भर द्या. ज्याचा तो आपल्या दोषांचे परिमार्जन करीत असतो.

प्रत्येक व्यक्ती उत्क्रान्तीच्या निरनिराळ्या पातळीवर जन्मून तेथून प्रगती करीत असते, म्हणून सगळेच सारखे नसतात.

[ —एप्रिल १९५५ ]

## ४४. वाढत्या वयाची लक्षणे

**जन्माला** आलेली व्यक्ती वाढत असते. बाल्य, शैशव, कुमारावस्था, तारुण्य, प्रौढत्व, वार्धक्य अशा जीवनाच्या निरनिराळ्या अवस्था आहेत. त्यातून आपण प्रत्येक जण जात असतो.

एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाताना तीन प्रकारचे फेरफार होतात. शारीरिक, बौद्धिक व मानसिक. प्रारंभी शरीराची वाढ होते, पुढे पुढे दुर्बलत्व येत जाते. हा सामान्य नियम. या वाढीवर किंवा नैसर्गिकपणे येणाऱ्या कमकुवतपणावर आपला फारसा ताबा नाही.

शरीराप्रमाणे बुद्धीचीही वाढ होत जाते. ती वरीच वर्षे कायम राहते. पुढे बुद्धीही दुर्बल होत जाते.

तिसरे मन. याचीही हळूहळू वाढ होत जाते; पण याची वाढ करणे व ते सतत विकासक्षम ठेवणे व्यक्तीच्या हातात आहे. प्रारंभी प्रारंभी मनुष्य स्वार्थी, संतापी, चिडखोर, असहिष्णू असतो. तो हळूहळू विचाराने उदार आणि संयमशील होऊ शकतो. होतोच असे नाही. प्रयत्नाने होण्याची शक्यता आहे. आणि तसा तो होणे हेच मी वाढीचे लक्षण समजतो.

बहुसंख्य लोक शरीराने वाढतात; पण मनाने वाढत नाहीत. मोठ्या व धिप्पाड शरीराचे लोक मनाने स्वार्थी, क्षुद्र वृत्तीचे व संयमहीन पाहिले की मला त्यांची कीव येते.

बुद्धीनेही लोक खूप वाढतात. विद्वान होतात, पदव्या मिळवतात, विद्वत्तेने मिळणारी मोठी स्थाने मिळवितात; पण मनाने बिचाऱ्यांची वाढ झालेली नसते. स्वार्थ, क्षुद्र मनोवृत्ती, संतापीपणा, चिडखोरपणा, असहिष्णुता—हे अविकसित प्राण्याचे दुर्गुण या विद्वानांच्या ठिकाणी पाहिले म्हणजे मला वाटते—हे लोक बुद्धीने वाढले; पण मनाने खुजेच राहिले !

बुद्धी व मन यांचा सतत विकास होत राहिला तर वाढत्या वयाचा फायदा झाला. नाहीतर आयुष्य वाया गेले.

[ —मे १९५५ ]

## ४५. प्रमाद—पश्चात्ताप—प्रायश्चित्त

**सदाचाराचे** केवळ तात्त्विक ज्ञान झाले म्हणजे सदाचार घडतोच असे नाही. ज्ञान आणि कर्म यांत फरक आहे. ज्ञानाचे आचारणात रूपांतर बुद्धिपुरःसर करावे लागले. रोज प्रयत्न करावा लागतो.

महाभारतात वचन आहे—जानामि धर्मम्, न च मे प्रवृत्तिः। जानामि अधर्मम् न च मे निवृत्तिः।। सदाचार काय ते मला कळते; पण तिकडे प्रवृत्ती नाही. दुराचार काय तेही मला कळते; पण तो सोडवत नाही !!

सदाचाराचा निश्चय मनाने केला तरी मधून मधून प्रमाद होतच असतात हातून चूक झाल्यावर मनुष्य पुढे काय करतो, त्यावर त्याची सुधारणा अवलंबून आहे.

हातून प्रमाद झाल्यावर काही जणांना त्याचे काही वाटतच नाही. हा मानवाचा निकृष्ट वर्ग, विकासाच्या अगदी शेवटच्या पायरीवरचा, तामसी मनोवृत्तीचा. काही जणांना प्रमादानंतर वाईट वाटते; पश्चाताप होतो; पण त्यापुढे त्यांची प्रगती होत नाही. मानव जातीतील हा थोडा वरचा वर्ग. या माणसांना मन तरी असते; पण मनाला संस्कार नाहीत. मनाला बुद्धिपुरःसर वळण लावलेले नाही; पण मन हळुवार आहे.

त्याच्या वरचा वर्ग म्हणजे पश्चात्तापानंतर पुनः प्रमाद होऊ नये, म्हणून स्वतः आपल्या हाताने प्रायश्चित्त घेणारांचा. इतरांनी दिलेल्या शिक्षेने माणूस सुधारत नाही. शिक्षा मनाने स्वीकारल्याशिवाय तिला काही अर्थ नाही. पुनः प्रमाद होऊ नये म्हणून आपले आपण शिक्षा किंवा प्रायश्चित घेणाराला खरा पश्चाताप झाल असे समजावे.

प्रायश्चित्त म्हणजे शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा आर्थिक दृष्टीने स्वतःला दंड करून घेणे तो इतरांना दिसणार नाही; पण व्यक्तीची सुधारणा करील. प्रमादापेक्षा शिक्षा मोठी असली, आणि मनाने ती अपरिहार्य व आवश्यक केली म्हणजे माणसाला वाटते की शिक्षा भोगण्यापेक्षा प्रमाद टाळलेला बरा. प्रमाद करण्याने होणाऱ्या सुखापेक्षा प्रायश्चित्ताचे दुःख मोठे असले म्हणजे मनुष्य दुःख टाळण्याकरिता प्रमादाचा प्रसंग टाळतो. प्रायश्चित न घेणारा मनुष्य सतत प्रमादाची आवृत्ती करीत असतो.

अशा रीतीने प्रमादाचे प्रमाण कमी होऊन व्यक्तीत सुधारणा होते. प्रमाद, पश्चाताप, प्रायश्चित्त—हे एक आचरणाचे संपूर्ण वर्तुळ आहे. पश्चात्ताप व प्रायश्चित्त जेथे नाही, तेथे सुधारणा नाही, संस्कृती नाही, प्रगती नाही, विकास नाही.

[ —जून १९५५ ]

## ४६. यदृच्छा की नियोजन

**पंडित** नेहरू युरोपचा दौरा करून आले. सर्वत्र त्यांचा बोलबाला झाला. भारताची उंची वाढली. जगातील भारताचे स्थान थोडे पुढे गेले.

या प्रसंगामुळे जगाच्या बाजारात भारताविषयी—भारताच्या नागरिकां-विषयी—काही अपेक्षा निर्माण केल्या जातात. त्या अपेक्षांना आपण पुरे पडू शकू की नाही, असा प्रश्न नेहमी मनापुढे उभा राहतो.

नेहरूंची कर्तबगारी सर्वांच्याच ठिकाणी असणार नाही; पण त्यांची कामाची पद्धत तरी प्रत्येकाला आचरणात आणता येईल की नाही? नेहरूंच्या पद्धतीने आपापल्या ठिकाणी शिस्तीने, पद्धतीने, कळकळीने काम करणारे लहान-मोठे नागरिक तयार झाले तर नेहरूंची परंपरा पुढे चालणे अशक्य नाही.

आज आपले जीवन किती विस्कळीत आहे पहा! आपण सकाळी उठतो, रात्री निजतो, दिवसात यदृच्छेने जमेल तेवढे काम करतो; काही लोक काम करण्याचा अभिनय करतात. यात नियोजन आणि पद्धती अशी काही नसते.

त्यामुळे आपल्या कर्तबगारीचा, बुद्धीचा व बलाचा सोळा आणे उपयोग होऊ शकत नाही. त्या प्रमाणात देशाची कर्तबगारी कमी भरते.

आता यदृच्छा-मार्ग सोडून नियोजनाचा मार्ग धरला पाहिजे. दिवसाच्या कामाचे नियोजन पाहिजे. तसेच आठवडयाच्या, महिन्याच्या, वर्षाच्या कामाला आराखडा पाहिजे. आपल्या जीवनाचा नियोजन-आराखडा आपल्या डोळयांपुढे उभा पाहिजे.

या दृष्टीने विचार करून योजना करा. आज तुम्ही करता त्याच्या दीडपट ते दुप्पट काम सहज करू शकाल. स्वतःच्या चाकोरीतील कामापेक्षा इतर कामेही त्यामुळे करता येतील.

वैयक्तिक जीवनालाच नियोजन-पद्धती लावा.

[—जुलै १९५५]

## ४७. चारित्र्यविषयक वार्ता

**माणसाचे** चारित्र्य ही एक बहुमोलाची गोष्ट आहे. सुज्ञ माणसे आपल्या चारित्र्याला जपतात. त्याला कलंक लागला तर त्यांना मरणप्राय दुःख होते.

इतरांनी आपल्यावर अनेक दोषारोप केले तर ते सहन होतात; पण चारित्र्यावर वृथा दोषारोप केल्यामुळे माणसांच्या भावना प्रक्षुब्ध होतात.

इतरांच्या चारित्र्यावर दोषारोप करणे टाळावे. विशेषतः पुरेसा आधार व निश्चित पुरावा असल्याशिवाय दोषारोप करणे अतिशय आक्षेपार्ह आहे.

चार लोक एकत्र जमले म्हणजे इतरांचे वर्तन हा एक चर्चेचा विषयच असतो. त्या वेळी आधाराशिवाय आपण इतरांच्या चारित्र्यावर शितोडे उडवितो. याचे

भान गप्पांच्या भरात माणसाला राहात नाही. अनुपस्थित व्यक्तीवर हा अन्याय आहे.

एखाद्याच्या दुर्वर्तनाविषयी दुसऱ्याने काही माहिती सांगितली की, तिच्या खरेखोटेपणाची शहानिशा न करता आपण ती वार्ता तशीच इतरांना सांगतो. ते इतरांना सांगतात. मुळात काय आहे, याचा शोध घेऊन मग इतरांना सांगण्याची काळजी कोणी घेत नाही. माणसाच्या चारित्र्यविषयक वातम्यांवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांची शहानिशा करून मग त्या स्वीकारा. तुमची स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय अशा वार्तेचा प्रसार करू नका. आपल्याविषयीही इतरांनी असेच करावे, असे आपणाला वाटत नाही का? इतरांविषयी आपण तसेच धोरण ठेवावे. असे केल्यास समाजातील वातावरण शुद्ध ठेवण्याला आपली मदत होईल.

[ --सप्टेंबर १९५५ ]

## ४८. महाराष्ट्राचे आत्मनिरीक्षण

**राज्यपुनर्घटना** समितीच्या शिफारशी बाहेर पडल्या! मुंबई कोणाला द्यावी हा प्रश्न राज्यपुनर्घटना-समितीला सोडविता आला नाही आणि दोन गटांची मागणी असता त्यातून उभयमान्य असा समन्वयही तिला शोधून काढता आला नाही, हे राज्यपुनर्घटना-समितीचे अपयश आहे.

पुढचा मार्ग काय आखायचा, ते नेते ठरवतीलच. आपण नागरिकांनी या निमित्ताने थोडे आत्मनिरीक्षण केले पाहिजे, असे मला वाटते. मुंबईचा प्रश्न का निर्माण झाला? आणि महाराष्ट्राची आजची ही स्थिती का झाली? तिचे संशोधन करून सुधारणेला लागले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत हे आत्मसंशोधन मधून मधून करायला पाहिजे. महाराष्ट्र संयुक्त असो, विभक्त असो की, मुंबई राज्यांतर्गत असो वा नसो--ही विचाराची चालना करणे जरुरीचे आहे.

आर्थिक जीवनात आपण परावलंबी बनलो आहोत. उद्योगधंदे आणि लहान-मोठा व्यापार चालविण्यात आम्ही कमी कर्तबगार ठरलो. औद्योगिक-व्यापार-विषयक योजनांचा मोठा आवाका नाही. जनतेने उद्योगधंद्याकरिता भांडवल दिले तर ते प्रामाणिकपणाने व निःस्वार्थी बुद्धीने वापरण्याची दानत नाही. सहकारी पद्धतीने काम करून प्रगती करण्याची प्रवृत्ती नाही. म्हणून आपण आर्थिक दृष्टीने मागे राहिलो.

सामाजिक दृष्टीनेही आपण विभागलेले आहोत. एकजुटीचे बळ नाही. अथांग समाजाचे हित पाहण्यापेक्षा आपापल्या लहान लहान गटांचा स्वार्थ

साधण्यात आपण गढून गेलो आहोत. हे गटही अनेक तत्त्वांवर पडलेले आहेत त्यामुळे नवनवीन जातीभेदच निर्माण झाले आहेत.

आकुंचित दृष्टी आणि घरकोंबडेपणाची वृत्ती वाढीस लागली आहे. माझा संसार, माझी संस्था, माझी जात, माझा पक्ष—यातच जो तो गढून गेला. व्यापक स्वरूपाच्या कामात लक्ष कमी. अखिल भारतीय स्वरूपाच्या कामामध्ये आपला पाय मागे आहे. पूर्वी इंग्रजी येत नव्हते म्हणून. आता गोडी वाटत नाही म्हणून. परिणाम एकच.

सहकार्याने व खेळीमेळीने काम करण्यापेक्षा एककल्ली वृत्तीने वागण्याची वृत्ती अधिक. क्षुल्लक मतभेदाचा वाऊ करून इतरांपासून फटकून राहायचे आणि आपला स्वतंत्र संसार थाटायचा ही वृत्ती ! श्रीमंतांच्या भांडवलाने होत नाही ते सहकारी वृत्तीने आपल्याला करता आले असते. पण सहकाराची वृत्ती कमी, तिच्या जोडीला एककल्ली वृत्ती आणि 'मी' पणाला महत्त्व.

याचा अर्थ आपल्यात सद्‌गुण मुळीच नाहीत असा नव्हे. स्वातंत्र्यप्रेम, सैनिकी बाणा, साहित्यिक प्रवृत्ती, बौद्धिक निष्ठा, निस्पृहता इत्यादी गुण आपल्यात प्रकर्षाने आहेत; पण या गुणांच्या जोडीला आजच्या जगात उपयुक्त अशा इतर नवीन गुणांचीही जोपासना करायला पाहिजे. भौतिक उत्कर्षाकरिता त्यांची जरुरी आहे.

एके वेळी महाराष्ट्रात शिवाजी-टिळकांसारखे अलौकिक पुढारी होते. त्यांच्या मोठेपणाखाली आपले दुर्गुण झाकून गेले. असलेल्या गुणांचा त्यांनी अधिकाधिक उपयोग करून घेतला ! पण आता नवीन गुण आपण संपादन करायला पाहिजेत. जगातील, देशातील व आपल्या प्रांतातील इतर समाजांचे निरीक्षण करून नव्या गुणांची जोपासना करायला पाहिजे.

असे झाले तरच महाराष्ट्रातील जनतेला पुनः वैभवाचे दिवस येतील. आज सामाजिक सद्‌गुण-दुर्गुणांच्या दृष्टीने आत्मनिरीक्षण करणे आवश्यक आहे.

**[—ऑक्टोबर १९५५]**

## ४९. अलौकिक विभूतिमत्त्व आणि समाज-विकास

**अलौकिक** विभूतींचा जन्म कित्येक वर्षांनी एखाद्या वेळी होतो. शंभर वर्षांत एखादी असामान्य व्यक्ती निर्माण झाली तर तो समाज भाग्यवान म्हणायला पाहिजे. आपल्या देशातील निरनिराळ्या प्रांतांकडे किंवा इतर देशांतील समाजाकडे नजर टाका, म्हणजे या विधानाची सत्यता पटेल.

अलौकिक व्यक्ती क्वचित काळी होतात हे जसे खरे, तसेच हेही खरे की, अशा विभूती निर्माण करणे कोणत्याही समाजाच्या हातात नसते. योगायोगाने त्या जन्म घेतात हेच खरे. तो एक सृष्टिचमत्कार (फिनॉमिना) म्हणता येईल. सामान्य लोकांच्या स्वाधीन अशी ही गोष्ट नाही. दैवाधीन, कालाच्या स्वाधीन किंवा निसर्गाच्या मर्जीवर ती गोष्ट अवलंबून आहे.

अलौकिक व्यक्ती निर्माण करणे आपल्या हातात नसले तरी सामान्य व्यक्ती चांगल्या तयार करणे आपल्या हातात आहे. तुम्ही आम्हीच सामान्य माणसे. दुसरी कोणी नाहीत. आपण चांगले होणे आपल्या हातात आहे. सामान्य व्यक्तीची पातळी उंच वाढली की त्या समाजाचीही उंची वाढलीच म्हणून समजा.

ज्या समाजातील सामान्य जन अलौकिक विभूतींवर अवलंबून न राहता स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून राहतात तो समाज सतत प्रगती करीत राहातो. उलट विभूतिपूजेवर जगणारा समाज त्या विभूतीच्या अस्तानंतर पुनः अधोगतीला व अवनतीला जातो. तो नेहमी विभूतीवर अवलंबून असतो. स्वतःच्या कर्तबगारीची वाढ करीत नाही.

सामान्य माणसाची कर्तबगारी दोन दृष्टींनी वाढायला पाहिजे. एक त्याची स्वतःच्या ज्ञानाची व शिक्षणाची पातळी. हे शिक्षण शाळेतील असो किंवा स्वप्रयत्नाने झालेले असो—वाढले पाहिजे. दुसरी गोष्ट—सहकारितेने काम करण्याची सवय. सामान्य माणसांच्या ठिकाणी सहिष्णुता, विचारांची देवघेव, एकजुटीने काम करण्याची सवय आणि परस्परांना मदत करण्याची वृत्ती वाढली पाहिजे.

अशा प्रकारे सामान्य माणसांचा दर्जा ज्या समाजाचा वाढला तो अलौकिक विभूतींवर अवलंबून न राहताही स्वतःची उन्नती करू शकतो. भारताचा आणि भारताच्या प्रांतांतील समाजाचा विकास या दिशेने झाला पाहिजे असे मला वाटते.

[ —नोव्हेंबर १९५५ ]

## ५०. व्यवहारज्ञान म्हणजे काय ?

**प्रत्येक** गोष्ट काही शिकवून येत नाही. शाळेत किंवा क्रमिक पुस्तकांच्या साहाय्याने किती गोष्टी शिकणार ? सर्व-सामान्य बुद्धीची आणि ज्ञानाची वाढ करता येईल. या ज्ञानाचा आणि बुद्धीचा प्रत्येक क्षणी, प्रत्येक ठिकाणी, प्रत्येक प्रसंगी उपयोग करणे हेच व्यवहारज्ञान.

स्थल, काल, प्रसंग आणि आपले स्थान या चार गोष्टींचा विचार माणसाने सतत करायला पाहिजे. या विचाराला खंडच नाही.

स्थलाच्या दृष्टीनेच पहा. प्रत्येक ठिकाणी वागावे कसे, याचे काही सामाजिक संकेत आहेत. घरी, अंगणात, रस्त्यावर, शाळेत, बाजारात, कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी, अशा प्रत्येक ठिकाणी भाषा, आवाज, पोषाख आणि वर्तन यांबाबत जे नियम आहेत ते पाळायला पाहिजेत.

त्याचप्रमाणे काळ ओळखून वागायला पाहिजे. काम, अभ्यास, वाचन, करमणूक, खेळ, गप्पा या सर्व गोष्टी जीवनात जरूर पाहिजेत; पण प्रत्येकाची ठराविक वेळ आहे. त्यांचा विपर्यास झाला की, माणूस मूर्ख आणि व्यवहारशून्य ठरतो. वेळ आणि वागणे यांतील मेळ म्हणजे व्यवहारज्ञान.

प्रसंगानुरूप वागायला पाहिजे. प्रसंग आधी योजून येत नसतात. त्या प्रसंगाला त्या क्षणी विचार करून साजेसे वर्तन झाले पाहिजे. कठीण वाटते; पण एक लक्षात ठेवा; विचार केला की योग्य मार्ग दिसतो. निदान व्यवहाराला सोडून वागणे होत नाही.

शेवटी स्वत:विषयीचा विचार. आपले वय, शिक्षण, समाजातील दर्जा आणि आपली तत्त्वे यांना धरून वागले पाहिजे. बालिशपणा आणि अतिप्रौढपणा—दोन्ही तरुणांना शोभणार नाहीत. सुशिक्षिताने समाजात कसे वागावे याविषयी समाजाच्या काही अपेक्षा असतात. त्या अपेक्षांना धक्का देणारे वर्तन झाले की, लोक म्हणतात–हे तुमचे सुशिक्षित ! शाळा कॉलेजात हेच का शिकले ? समाजातील आपले स्थान ओळखून वागणारा मनुष्य सर्वांच्या आदराला पात्र होतो. विद्यार्थी, नोकर, मालक, गिऱ्हाईक, दुकानदार, अनुयायी, नेता, शिष्य, गुरू इत्यादी अनेक प्रकारच्या भूमिका माणसाला कराव्या लागतात. प्रत्येक भूमिकेला योग्य असे वागणे—हेच व्यवहारज्ञान.

स्थल, काल, प्रसंग, आणि आपले स्थान यांचा विचार करून वागणारा व्यवहारज्ञानी व शहाणा ठरतो. एतद्विपरीत वागणारा व्यवहार-शून्य व मूर्ख ठरतो. हे तत्त्व मुलांना, तरुणांना, वृद्धांना, पुरुषांना आणि स्त्रियांना, सर्वांनाच लागू आहे.

[ —डिसेंबर १९५५ ]

## ५१. स्वार्थाकरिता तरी नीट वागा

**तुमच्या** भावी जीवनात अनेक लोकांशी अनेक नात्यांनी तुमचे संबंध येणार आहेत. त्यांतील काही लोक पूर्व-परिचित असतील; काही अगदी नवीन असतील.

प्रापंचिक आणि सार्वजनिक जीवनात पडलेल्या व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीशी किती विविध नात्यांनी संबंध येत असतो ते पाहा. नोकरी, शिफारसपत्र, कोर्ट-कचेरीत वशिला, पोलिस खात्यातील कामे, कर्ज, मुलां-मुलींकरिता स्थळे, डॉक्टर-वकिली स्वरूपाची कामे, अचानक अपघात, मानव आपत्तीत सहाय्य—अशा शेकडो प्रसंगांनी इतरांचा आपल्याला उपयोग करून घेण्याचा योग येतो.

अशा वेळी आपल्याला अडवून धरून नुकसान करणे दुसऱ्या व्यक्तीच्या हातात असते. उलटपक्षी उपयोगी पडून असले काम चटकन करणेही त्या व्यक्तीच्या हातात असते.

या माणसांशी पूर्व-जीवनात आपण चांगल्या रीतीने वागलो असू, तरच तेही आपल्याशी चांगले वागतील, आणि आपण जर उद्धटपणाने, तुसडेपणाने, भांडखोर वृत्तीने, स्वार्थी बुद्धीने, खवचटपणाने त्यांच्याशी वागलो असू तर ऐन वेळी प्रसंगी आपला काटा काढण्याला ते लोक का कमी करतील ?

म्हणून—निदान स्वार्थाच्या दृष्टीने तरी इतरांशी गोड वागणे आपल्याला फायद्याचे आहे. ज्यांचा स्वभाव मूलतःच गोड आणि सरळ आहे त्यांना निराळे सांगायला नको; पण ज्यांचा तसा नाही त्यांना माझे सांगणे आहे की, बाबांनो, स्वतःच्या भावी हिताच्या दृष्टीने तरी इतरांशी गोड बोला आणि गोड वागा. म्हणजे वेळी प्रसंगी तेही तुमच्याशी गोड बोलतील, गोड वागतील.

[—जानेवारी १९५६]

## ५२. विघ्नसंतोषी लोकांवर वचक

**मागील** आठवड्यात मी एका शाळेच्या संमेलनाला गेलो होतो. रात्री करमणुकीचे कार्यक्रम चालू होते. मुलांनी, मुलींनी, शिक्षकांनी, शिक्षिकांनी मोठ्या उत्साहाने बसविलेले कार्यक्रम चालू होते. कार्यक्रमाला रंग भरत होता. पालकांना आपल्या मुलां-मुलींबद्दल, शिक्षकांना आपल्या शिष्यांबद्दल आणि गावकऱ्यांना आपल्या शाळेबद्दल कौतुक वाटत होते.

इतक्यात सर्वत्र एकदम काळोख झाला. चौकशी झाली. ओव्हरलोडचा फ्यूज नव्हता. बाहेर पाहिले. रस्त्यावरून कोणी दुष्ट माणसाने खुरप्याच्या साहाय्याने विजेच्या ताराच तोडल्या होत्या. सर्व कार्यक्रम बंद झाल्याचे जाहीर करावे लागले.

काय हा विघ्नसंतोषीपणा ! चार-पाच हजार स्त्री-पुरुष, आबाल-वृद्ध, यांचा विरस झाला. मुलां-मुलींचा, शिक्षकांचा हिरमोड झाला. नागरिकांना वाईट वाटले. केवळ एक हलकट मनुष्य सर्व समाजाचे इतके नुकसान करू शकतो !

अशी विघ्नसंतोषी माणसे समाजात असतात, पूर्वी होती, आता आहेत. शिक्षणाचा व ज्ञानाचा प्रसार झाला; पण यांची संख्या कमी झाली नाही. अशा माणसांवर भोवतालच्या लोकांनीच नियंत्रण घातले पाहिजे.

याच वृत्तीची माणसे पुढे वेळ आली की, देशद्रोही बनतात. क्षुल्लक स्वार्थाकरिता देशाचे नुकसान करायला हे मागेपुढे पाहणार नाहीत. शत्रूला बातमी द्यायला हे कमी करणार नाहीत. आपल्या सैन्याचे आणि दारूगोळ्याचे कारखाने उडवून द्यायला हे कमी करणार नाहीत. समाजाला व देशाला यांच्यापासून फार भय आहे.

ही वृत्ती दिसेल तेथे ठेचून काढली पाहिजे. या लोकांच्या मनात पाप असल्याने ते भेकड असतात. दुसऱ्या माणसांनी थोडे दटावले आणि चापले की ते नरम येतात. नैतिक सामर्थ्य आणि धीटपणा असलेले लोक भोवताली पाहिजेतच. त्यांचा वचक या विघ्नसंतोषी लोकांवर बसू शकेल.

कोणीही समाजाचे नुकसान करताना दिसला की त्याला तेथल्या तेथे हटका; गोड शब्दांत सांगा; न ऐकल्यास जालीम उपाय योजा; पण अशा दुष्टांवर नियंत्रण ठेवणे हे तुमचे व माझे काम आहे.

[—फेब्रुवारी १९५६]

## ५३. तुमच्या आरोग्याचे रहस्य

**चोवीस** तास आपल्याजवळ एक वस्तू आहे. जन्मापासून अन्तापर्यंत ती आपल्या सन्निध असेल. तिची जोपासना करण्याचे संपूर्णपणे आपल्याच हातात आहे. परंतु—

तिच्याविषयी आपले संपूर्ण अज्ञान आहे. अशी वस्तू कोणती ?

आपले शरीर व त्याचे आरोग्य.

आपण सायकल घेतली की तिची यंत्ररचना समजावून घेतो. कॅमेरा घेतला की त्याची रचना पाहून ठेवतो. मोटार घेतली की तिच्या यंत्रशास्त्राचा खास अभ्यास करतो; पण आपल्या शरीररचनेविषयी आपले अज्ञान असते.

आपल्या नोकरीचा व्यवसाय चालण्याकरिता आणि नोकरीत बढती मिळवण्याकरिता माणसे कितीतरी कठीण अभ्यास करतात ! रात्रीचा दिवस करून वाचन करतात. परीक्षा पास होऊन आर्थिक समर्थता वाढवितात; पण या अर्थार्जनाचा उपयोग ज्या शरीराकडे होणार आहे त्या विषयाच्या ज्ञानाकडे फारच थोडे लक्ष दिले जाते.

पुष्कळ विद्वान माणसे मी पाहतो. कितीतरी गहन विषयांत त्यांची बुद्धी चालते. पण स्वत:ला जन्मभर त्रस्त करीत असलेल्या व्याधीविषयी सामान्य ज्ञानही त्यांना नसते! अशा विद्वानांच्या घरचा ग्रंथसंग्रह पाहिला तर त्यात अनेक मूल्यवान पुस्तके दिसतील; पण सामान्य आरोग्यशास्त्रावरील एखादेही पुस्तक दिसणार नाही.

परमेश्वराने आपल्याला दिलेल्या आरोग्याचे रक्षण करण्याचे काम शेकडा नव्वद प्रमाणात आपले स्वत:चे आहे. शेकडा दहा प्रमाणात तज्ज्ञ डॉक्टर-वैद्यांचे आहे. आपल्या शरीराची, आरोग्याची रोगोत्पत्तीची व उपचारांची सामान्य माहिती आपल्याला असेल तर आपले आरोग्य आपण टिकवून आरोग्यसंपन्न व दीर्घायू होऊ. आपल्या कुटुंबियांचे आरोग्य चांगल्या प्रकारे ठेवणे आपणाला शक्य होईल.

उलटपक्षी अज्ञानामुळे कमी दर्जाचे आरोग्य, वारंवार रोगांचा त्रास व निष्कारण द्रव्यहानी सोसावी लागेल.

एक म्हण आहे की—चाळीस वर्षांनंतर मनुष्य स्वत:चा डॉक्टर तरी असला पाहिजे, नाहीतर महामूर्ख तरी असला पाहिजे.

आपल्या शरीराला कल्पनातीत चिवटपणा आहे. अनेक अत्याचार ते सहन करू शकते. आपल्या अज्ञानाचा कळस झाला तरच बिचाऱ्याचा नाइलाज होतो.

सामान्य आरोग्यरक्षणाचे नियम थोडे, साधे, सोपे आहेत. नियमित व्यायाम पाहिजे. मेहेनतीचा व्यायाम, आसने, फिरणे, प्राणायाम, इत्यादी आवडीचा व्यायाम रोज झाला पाहिजे. दोन्ही वेळेला आपल्याला मानवेल असा आहार पाहिजे. थोडे प्रयोग व निरीक्षण केले की यांचे ज्ञान होते. पुरेशी विश्रांती आवश्यक आहे आणि मानसिक शांतीही आरोग्याला अत्यावश्यक आहे. त्याकरिता पूजा, जप, चिंतन, धार्मिक वाचन, संगीत-साधना, चित्रकलासाधना, सात्त्विक छंद, सन्मित्रांचा सहवास यांची जरुरी आहे. लहानसहान तक्रारींवर निसर्गोपचाराने व साध्या औषधांनी उपचार करण्याचे ज्ञानही जरुरीचे आहे.

इतके सर्व केले की आपल्या स्वत:ला एक प्रकारचा आत्मविश्वास येईल. शरीर, प्रकृती व आरोग्य आपल्या ताब्यात असणे ही गोष्ट जीवनातील सुखाला अत्यंत आवश्यक आहे.

[—मार्च १९५६]

## ५४. तुमच्या मुलांचे शिक्षण

**आजच्या** शालेय शिक्षणात अनेक दोष आहेत, असे प्रत्येक जण म्हणतो; पण ते दूर करण्याची जबाबदारी मात्र कोणी घेत नाही. प्रत्येक जण तृतीय पुरुषी

बोलतो. इतरांनी सुधारणा करावी. "मला ही सुधारणा करता येईल, ती मी करतो आहे." असे म्हणणारे फार थोडे.

प्रचलित शिक्षणात अनेक गुणही आहेत, हे विसरून चालणार नाही. गुणांबरोबर दोष आले आहेत. ते दूर करण्याचा प्रयत्न आपापल्यापरी शाळांचे चालक व मुलांचे पालक यांनी केला पाहिजे.

यात मुला-मुलींच्या पालकांना काय काय करिता येईल ते पाहा--

आपल्या मुलांचे अक्षर सुधारण्याच्या कामी पालक प्रयत्न करू शकतील. दररोज नियमितपणाने जर पाच-दहा ओळी शुद्धलेखन आणि अक्षर लिहवून घेतले तर अक्षरात पुष्कळ सुधारणा होईल.

मुलांच्या पुस्तकांतून आजकाल आधुनिक कवींच्या सुन्दर सुन्दर कविता असतात. भोजनाचे वेळी किंवा अन्य सोयीच्या वेळी मुलांकडून कविता म्हणून घेण्याचा परिपाठ ठेवला तर पाठान्तर कायम राहून वाणीही शुद्ध होईल.

इंग्रजी–मराठी–हिन्दी–संस्कृत वाचन आणि शुद्धलेखन घेणे ही गोष्टही सामान्य शिक्षित पालकाला कठिण नाही. आठवडयातून एक-दोन वेळी आणि सुट्टीत अधिक वेळ असा उपक्रम केल्यास झालेल्या अभ्यासाला पुष्कळच मदत होईल.

शालेय शिक्षणात व्यायाम, प्रार्थना, हस्तव्यवसाय इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश केलेला आहे. त्याला पालकांनी घरीही प्रोत्साहन दिले पाहिजे. आपल्या मुलांकडून नियमित व्यायाम करवून घेणे, नियमित प्रार्थना म्हणण्याचा परिपाठ ठेवणे, घरची व्यावहारिक कामे मुलांना सांगणे--हे पालकांनी करावयास पाहिजे.

शाळेच्या शिक्षणाला गृहशिक्षणाची जोड मिळाली तर तुमच्या मुलांच्या बाबतीत तरी शिक्षणातील काही दोष दूर केल्यासारखे होतील. आता दीड-दोन महिने सुट्टी आहे, या दृष्टीने कार्यक्रम आखून सुट्टीचा शिक्षणाकडे उपयोग करून घ्या.

[--एप्रिल १९५६]

## ५५. स्वतःच्या कामापुरताच संबंध ठेवणारी स्वार्थी माणसे

**जगात** बहुसंख्य माणसे स्वार्थी असतात. आपले काम, आपला फायदा, आपले सुख, यापलीकडे ती पाहू शकत नाहीत. अर्थात तुम्ही वाचक त्याला अपवाद आहा !

दुसऱ्या माणसाचा उपयोग आपल्या कामाकरिता कसा करून घेता येईल एवढीच त्यांची दृष्टी असते. त्याकरिता इतरांचा काळ-वेळ, इतरांची सोय-गैरसोय, इतरांचे नफा-नुकसान यांची त्यांना कदर नसते.

अशा माणसांना मी अदूरदर्शी स्वार्थी म्हणतो. स्वार्थ साधण्यातही दूरदर्शीपणा आणि लोकसंग्रह वृत्ती असावी. स्वार्थ कोणाला सुटलेला नाही. पण जरा उदार दृष्टी ठेवून माणसांची अंतःकरणे राखून जो स्वार्थ साधतो त्याच्याबद्दल प्रेम वाटते.

धर्माला–नीतीला धरून स्वार्थ असेल तर तो नैसर्गिक आहे. पण तो शहाणपणा व्यवहारज्ञान आणि लोकसंग्रह यांच्या चौकटीत बसला तरच इतरांना बोचत नाही,

इतरांचा आपल्याला उपयोग करून घ्यावा लागतो, म्हणून प्रथमपासूनच इतरांच्या उपयोगी पडणाराला मी दूरदर्शी व शहाणा समजतो. त्याच्या स्वार्थालाही लोकसंग्रहाची, लोकांच्या उपयोगी पडण्याची जोड असते. म्हणून स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीने का होईना, जगाच्या उपयोगी पडत चला म्हणजे स्वार्थपरार्थाचा आपोआप मेळ बसेल.

केवळ स्वतःची कामे करून घेणारी, आणि अन्य वेळी इतरांची आठवणही न ठेवणारी माणसे माझ्याकडे आली म्हणजे—त्यांची कामे मी करतो तरीपण—त्यांच्या एकतर्फी स्वार्थाबद्दल एक प्रकारचा तिरस्कार वाटतो, घृणा वाटते, तिटकारा वाटतो.

समाजातील कोणत्या व्यक्तीची कोठे, केव्हा गरज लागेल, हे सांगता येत नाही. म्हणून स्वार्थाच्या दृष्टीने का होईना, इतरांच्या उपयोगी पडत चला. त्यात तुमचाच स्वार्थ आहे.

[—जून १९५६]

## ५६. गुरु-संभावनेची नष्ट पण इष्ट परंपरा

**आपली** मुले शाळेत शिकतात. प्रतिवर्षी यशस्वी होऊन वरच्या वर्गात जातात. सात वर्षांनी मॅट्रिक–एस्. एस्. सी. होऊन बाहेर पडतात. पेढे वाटले जातात. प्रकरण तेथेच संपते.

या मुलांना वर्षभर घसाफोड करून शिकविणाऱ्या गुरूंचा विचार किती पालक करितात ? आपल्या मुलां-मुलींच्या यशात त्यांच्या गुरूंचाही अंश आहे याची आठवण किती पालक ठेवितात ?

ज्या शाळेने त्यांना सात-आठ वर्षे शिक्षण दिले त्या शाला-मातेचे स्मरण किती जणांना होते ?

प्राचीन गुरुकुले आणि शाळा यांची उदाहरणे देऊन गुरू आणि शाळा यांच्याकडून आपण निःस्वार्थी ध्येययुक्त कामाची अपेक्षा करतो; पण त्याचबरोबर या गुरूंचा

आणि गुरुकुलांचा सन्मान करणाऱ्या प्राचीन पालकांच्या आदर्श कृतज्ञतेचे विस्मरण करतो.

शिक्षकांच्या निर्धन आणि कष्टमय जीवनात शिष्यांची आणि पालकांची कृतज्ञता-बुद्धी हाच एक विरंगुळा असतो. त्यांना फार अपेक्षाही नसते. तुम्ही एखादे अभिनंदनाचे पत्र पाठविले तरी त्यांना धन्य वाटेल. घरी बोलावून पेलाभर पाणी आणि लवंग-सुपारी दिली तरी त्यांना कृतकृत्य वाटेल. यापेक्षा अधिक इनामाची अपेक्षा त्यांना नाही. किंबहुना त्यांना कशाचीच अपेक्षा नाही. हे आपले पालकांचे आणि शिष्यांचेच आवश्यक कर्तव्य आहे.

शिक्षण पूर्ण करून गेलेल्या विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या पालकांची आभारपत्रे आली तर शाळा-चालकांना धन्यता वाटेल. श्रमाचे चीज झाल्यासारखे वाटेल.

एवढ्या साध्या शिष्टाचारालाही आपला समाज महाग झाला आहे. भारतीय संस्कृती ! उज्ज्वल परंपरा ! कशाला वृथा अभिमान ? फुकाचा बोल, तोही खर्चायला पालक नाखूष !

याचे नाव बाजारीपणा. आम्ही फी देतो. शाळा शिक्षण देतात. मास्तर शिकवितात. त्यात कसली कृतज्ञता अन् कसले आभार ! ही आपली वृत्ती आहे. फी देणारे आणि फुकट शिकणारे—सर्वांच्या ठिकाणी एकच वृत्ती आहे. ही इष्ट आहे का ?

नाही ! नाही ! ! ही आपली परंपरा नाही ! ! ! मुलांनी व आपण पालकांनी आपली उदासीन वृत्ती बदलली पाहिजे. गुरूच्या कार्याचे आणि शाला-मातेच्या सेवेचे योग्य श्रेय कृतज्ञ शब्दांनी आणि उदार कृतीने त्यांना द्या, म्हणजे शिक्षकांच्या जीवनात आणि शालांच्या कामात एक नवीन जिव्हाळा निर्माण होईल. हे वाचून विसरून जाऊ नका. इतरांना सांगा. स्वतः आचरा.

[—जुलै १९५६]

## ५७. वस्तू—व्यक्ति—तत्त्व यांतील तारतम्य

**या** जगात वस्तूंना महत्त्व आहे. जीवनातील सोयी-गैरसोयी, सुखे आणि दुःखे, ही सर्व ऐहिक वस्तूंवर अवलंबून आहेत. वस्तू मिळविण्याकरिता आपली जन्मभर धडपड चालू असते; पण वस्तू हेच जीवनातील सर्वस्व नाही.

वस्तूपेक्षा व्यक्ती महत्त्वाच्या आहेत. चांगली माणसे मिळविली पाहिजेत. पैसे मिळवून घरी खूप समृद्धी केली; पण चांगली मुले, चांगले मित्र, चांगले शेजारी यांचा संग्रह केला नसेल तर काय उपयोग ?

फुटलेल्या किंवा नष्ट झालेल्या वस्तू परत मिळविता येतील. पण दुखावलेल्या व्यक्तींची मने परत मिळविणे कठीण. म्हणून माणसे गमावू नका. वस्तूंपेक्षा व्यक्ती अधिक महत्त्वाच्या आहेत.

पण व्यक्तींपेक्षाही तत्त्व अधिक महत्त्वाचे आहे. माणसाला जीवनात काही तरी आचरणाची तत्त्वे असावीत. निर्व्यसनीपणा, शुद्ध चारित्र्य, ज्ञानोपासना इत्यादी तत्त्वांच्या पालनामुळे माणसाचे पशुत्व जाऊन त्याला माणूसपण येते. अशी तत्त्वे जीवनात महत्त्वाची आहेत. त्यांना आड येणाऱ्या माणसांचा त्याग करावा लागला तरी करावा.

वस्तूपेक्षा व्यक्ती मोठी, व्यक्तीपेक्षा तत्त्व मोठे, हे तारतम्य जीवनात नेहमी पाळीत जावे.

[ —सप्टेंबर १९५६ ]

## ५८. माता-पिता हेच खरे गुरु, इतर केवळ प्रासंगिक

"**मुलांच्या** अभ्यासाकडे पाहावयाला वेळ मिळत नाही हो! तुम्हीच घ्या त्याचा अभ्यास करून." असे काही पालक म्हणतात त्यावेळी मला त्यांचे कौतुक वाटते!

त्यांना वेळ नसतो. ते 'केवलम् जन्महेतवः।' गुरुजींनी पुढचे सर्व पहावे! असे शक्य आहे काय!

मुलाचे शिक्षण दिवसभर चालू असते. चालणे, बोलणे, हसणे, उठणे, बसणे, खेळणे, वाचणे, लिहिणे, पाठ करणे, काम करणे इत्यादी प्रत्येक क्रियेत मुलाचे शिक्षण होत असते. अशा प्रत्येक वेळी मार्गदर्शन करणे हे आईबापांचे काम आहे. होय, आईबापांचेच.

मुंजीच्या वेळी बटूला मंत्र देण्याचे काम पिता करतो. त्यातले रहस्य हेच आहे. तुम्ही म्हणाल, "आमचे शिक्षण कमी झाले आहे."

प्रसिद्ध अमेरिकन अब्राहम लिंकन याची आई अशिक्षित होती. ती त्याला अभ्यास करावयाला बसवावयाची. काही अडले की तो आईला विचारी. ती म्हणे, "पुढचे वाच म्हणजे कळेल." आणि लिंकन पुढचे वाची व त्याला कळे. शिवाजीची माता जिजाई काय शिकलेली होती? पण मुलाचे शिक्षण तीच रामायण-भारताच्या सहाय्याने करीत होती. आज लिंकन आणि शिवाजी बालस्वरूपात घरोघरी आहेत; पण त्यांच्या आई-बापांना आपल्या जबाबदारीची जाणीव करून देणे जरुरीचे आहे.

उद्योगधंद्याकडे वेळ देऊन खूप पैसा मिळविला; पण लक्ष न दिल्यामुळे मुलगा बिघडला तर काय करावयाचे त्या पैशाला? असा मुलगा एका दिवसात त्या पैशाची उधळपट्टी करील.

तुमच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी तुमचीच आहे. 'आम्हाला वेळ नाही,' असे म्हणू नका. वेळ काढा. मुलाचा जन्म झाला त्याबरोबर शिक्षणाची तुमची जबाबदारी जन्माला आली. त्यांची फारकत होऊ शकत नाही.

[—डिसेंबर १९५६]

## ५९. तीन पैशांत सोळा आणे काम

"**बाळाचे** अजून पत्र का आले नाही?"—वडील चिंता करीत असतात. "बाबीनं काही अजून पत्र पाठवलं नाही!"—आई विवंचनेत असते. "हे दौऱ्यावर जाऊन दहा दिवस झाले; पण अजून एकही कार्ड नाही!"—गृहलक्ष्मी विचार करीत असते. "ही एकटीच माहेरी गेली; पण नीट पोचली की नाही? पत्रदेखील नाही!"—गृहपती मनात कुढत असतात.

याच प्रकाराने मित्रमित्र, मैत्रिणी–मैत्रिणी, जवळचे नातेवाईक यांची उदाहरणे देता येतील. तीन पैशांचे कार्ड लिहून टाकले असते तर सर्वांची चिंता दूर झाली असती. परंतु पत्र लिहिणाराला आळस येतो. आणि इतर लोक निष्कारण विवंचनेत पडतात. सगळ्यात चिंता ही आपल्या सुखाला अत्यंत हानिकारक आहे.

तीन पैशांचे कार्ड; पण त्याचे काम मात्र सोळा आणे मोलाचे आहे. पूर्वीच्या पिढीतील लोकांना ही सोय नव्हती. आज आपल्याला ती आहे; पण तिचे महत्त्व आकलन झालेले नाही.

बारा वाजले आहेत. कुटुंबाचे जेवणखाण, उष्टे-खरकटे करून मालकीणबाई वामकुक्षीकरिता आडव्या होणार—इतक्यात बाराच्या गाडीने सहकुटुंब पाहुणे येतात! अगदी अचानक! पुन्हा बंब पेटवून पाणी तापवा, भात करा, पिठले करा, पाहुण्यांना जेवावयास घाला! कसली विश्रांती अन् कसले काय? पाहुण्यांनी तीन पैशाचे पत्र टाकले असते तर सगळी तयारी ठेवता आली असती. उभयतांना सुख झाले असते. पण——पत्र पाठवावयाचा आळस. आपल्या आळसापायी आपण इतरांना किती त्रास देणार आहोत, याचा विचार नाही. आपल्या सुखाचा विचार, इतरांच्या सोयीचा विचार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3133
२८७९३
निबंध
२२/१/८९

तीन पैशाच्या पत्राने आपण इतरांना किती सुख देऊ शकतो, पाहा. चिंता कमी होते. कष्ट कमी पडतात. माहिती मिळू शकते. अनेक सोयी होतात. लिहावयाचा आळस करू नका. तुमचा आळस तितके इतरांना दुःख, हे लक्षात ठेवा.

[--जानेवारी १९५७]

## ६०. लोकशाही व हुकूमशाही यांतील फरक

**लोकशाहीचे** तत्त्व केवळ राजकारणात नसून ते रोजच्या जीवनातही आहे.

" माझ्या एकट्याच्या मताला सर्वांनी मान दिला पाहिजे, " अशी काही जणांची वृत्ती असते. ही हुकूमशाही झाली. मग ती आपल्या घरात वडील माणसांनी चालविलेली असेल. एखाद्या संस्थेत प्रमुखाने चालविलेली असेल. कचेरीत तेथील मुख्य अधिकाऱ्याने चालविली असेल किंवा राज्यकारभारात एखाद्या मंत्र्याने चालविली असेल. हे सर्व हुकूमशाहीचे प्रकार आहेत.

" तुझ्या मताचाही विचार करीन. पटले तर घेईन. आपण चर्चा करू, विचार-विनिमय करू, परंतु मला पटले नाही तरी स्वतंत्र विचाराचा व मताचा तुलाही हक्क आहे. माझ्या मार्गाने जाऊ किंवा तडजोड झाल्यास मधला मार्ग काढूच. " ही लोक-शाहीची वृत्ती झाली.

आपल्या दैनंदिन जीवनात ही लोकशाहीची वृत्ती आली पाहिजे. तीत मतभेद, चर्चा, विचार-विनिमय, देवघेव, तडजोड--यांना वाव असतो. प्रत्येकाच्या विचाराला व मताला किंमत असते.

परंतु शेवटी बहुमताला सर्वांनीच मान द्यावयाचा असतो. स्वतंत्र विचाराचा हक्क; परंतु अखेर बहुमताने वागण्याची तयारी, व बहुमत आपल्या बाजूने करून घेण्याचे स्वातंत्र्य. हे लोकशाहीचे शिक्षण रोजच्या जीवनात घेतले पाहिजे.

[--मार्च १९५७]

## ६१. वाचन–चिन्तन–लेखनाची दुर्मिळता

**समाजातील** बहुसंख्य माणसे कामाला कंटाळतात. काम करणे म्हणजे आपत्तीच वाटते त्यांना ! ! काम टाळण्याकडे किंवा काम न करण्याकडे बहुतेकांची प्रवृत्ती असते. खरे आहे की नाही ?

आता कामात दोन प्रकार आहेत. एक केवळ यांत्रिक पद्धतीचे आणि दुसरे बुद्धी वापरून करण्याचे. बहुसंख्य लोक यांत्रिक काम--अंगमेहनतीचे किंवा साधे

कारकुनी स्वरूपाचे पसंत करतात. त्यामुळे बुद्धी वापरून काम करणारांचे प्रमाण थोडे. पण तेच थोडे लोक समाजात पुढे येतात.

बुद्धीच्या कामात वाचन–चिंतन–लेखन यांचा समावेश होतो. पुष्कळ लोक वाचावयास तयार असतात. त्यांतील थोडे लोक जरा पुढे जाऊन चिंतन करू शकतात. पण चिंतन करावयास एकाग्रता व बुद्धीचे कष्ट लागतात. म्हणून चिंतकांचे किंवा विचारवंतांचे प्रमाण समाजात थोडे असते.

अशा चिंतकांत लेखन करणारे आणखी थोडे असतात. कारण क्रमाक्रमाने वाचन, चिंतन व लेखन या कार्यांत अधिकाधिक बौद्धिक कष्ट पडतात.

ज्या समाजात शारीरिक व बौद्धिक कष्ट घेणारे लोक अधिक तो समाज जिवंत राहतो. कारण विचारवंत आपल्या लेखणीने नव-नवीन विचार समाजाला देतात, आणि कष्ट घेणारे लोक या विचारांचे कृतीत रूपांतर करतात.

भौतिक सुखे आणि वैचारिक जिवंतपणा ही दोन्ही आपल्याला पाहिजेत. त्याकरिता शारीरिक आणि बौद्धिक दोन्ही कष्ट घ्यावयाची सर्वांना सवय पाहिजे.

[--एप्रिल १९५७]

## ६२. शेजारधर्म

**समाजात** राहणाऱ्या कुटुंबाला शेजार टाळणे शक्य नाही. तुम्ही शेतात राहा, स्वतंत्र बंगल्यात राहा किंवा गजबजलेल्या चाळीत राहा. जवळ किंवा लांब, शेजार हा राहाणारच.

शेजाऱ्यांचे परस्परसंबंध समाजसुखाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. धर्माच्या नियमाइतकेच महत्त्व त्यांना आहे. म्हणूनच अनुभवी लोकांनी "शेजारधर्म" असा शब्द रूढ केला आहे.

सहिष्णुता हा पहिला गुण शेजारी या नात्याने आपल्या ठिकाणी वाढविला पाहिजे. प्रत्येक कुटुंबाला त्याची त्याची एक संस्कृती असते. आपल्या कौटुंबिक संस्कृतीपेक्षा ती थोडी निराळी दिसली की, उपहास, तिरस्कार आणि असहिष्णुता या भावना जागृत होतात. त्यांना आळा घातला पाहिजे. "व्यक्ती तितक्या प्रकृती" त्याचप्रमाणे "कुटुंबे तितक्या संस्कृती" असे म्हणून उदारपणा व सहिष्णुता दाखवावी. घेण्यासारख्या गोष्टी घ्याव्यात. इतरांकडे काणाडोळा करावा. शेजारणी बायकांनी ही गोष्ट विशेषेकरून लक्षात ठेवावयास पाहिजे, म्हणजे त्यांची भांडणे कमी होतील.

शेजाऱ्याच्या सोयी-गैरसोयी पाहून आपली राहणी ठेवणे अगदी जरुरीचे आहे. आपल्यापासून शेजाऱ्याला त्रास, उपद्रव होऊ नये; बुद्धिपुरःसर किंवा नकळत—कोणत्याही प्रकाराने. 'हा आपला धर्म आहे,' इतक्या पवित्रपणाने हे व्रत पाळा.

याच व्रताची दुसरी विधायक व कर्मप्रधान अशीही बाजू आहे. शेजाऱ्याच्या उपयोगी पडण्याची संधी व प्रसंग वाया घालवू नका. शेजाऱ्यावर केलेला "उपकार" हा बँकेत टाकलेल्या शिलकेसारखा आहे. पुढे तुमच्या जरुरीच्या वेळेस तो उपयोगी पडेल.

तुम्ही म्हणाल, इतका "धर्म" पाळला तरी त्याची जाणीव ठेवणारे शेजारीही तसेच पाहिजेत. कधी असतील, कधी नसतील! म्हणूनच शेजार-धर्माला "धर्म" म्हटले आहे. तो निष्कामवृत्तीनेच पाळावयाचा असतो. निव्वळ देवाण-घेवाणीच्या स्वरूपाचा तो असता तर त्याला "शेजार-व्यवहार" असा शब्दप्रयोग केला असता!

[—मे १९५७]

## ६३. नोकर-वृत्ती आणि मालक-वृत्ती

**काम** करण्यामध्ये दोन प्रकारच्या मनोवृत्ती असतात. काही माणसे प्रत्येक काम अगदी मन लावून आपुलकीने करतात. काम तर चांगले करतातच; पण हे काम करा असे त्यांना सांगावयास लागत नाही. काम त्यांना दिसते आणि कोणी न सांगता देखील ती ते काम करतात.

अशा माणसांना मागणी फार असते. कर्तबगारीबरोबर आपुलकीही त्यांच्या ठिकाणी असते. त्यांची भराभर बढती होत जाते. आणि कालान्ताराने वरिष्ठाची जागाही त्यांना मिळते. त्यांची मनोवृत्ती नोकराची नसून मालकाची असते. जेथे ते काम करतात त्या जागेशी, संस्थेशी, कारखान्याशी ते एकरूप होतात. म्हणून त्यांना काम दिसते. सांगावे लागत नाही.

दुसरा वर्ग सांगकाम्या लोकांचा. यांची वृत्ती अगदी नोकरासारखी असते. जेथे काम करतात त्या ठिकाणच्या हिताहिताशी ते एकरूप होऊ शकत नाहीत. सांगावे तेवढे काम ते यथातथाच करतात. त्याशिवाय न सांगितलेले, पण करण्यासारखे काम पाहून ते करणे त्यांना कधी सुचतच नाही. अशी माणसे कोठेही गेली तरी जन्मभर नोकरच राहतील. त्यांचा पिंडच तो. तो बदलल्याशिवाय त्यांची प्रगती होणार नाही.

हा अनुभव जसा बाहेरच्या जगात येतो तसा घरातही येतो. किंबहुना घरापासूनच या दोन वृत्तींचे शिक्षण मिळते. सर्व मुले घरातच राहत असतात. घरातील कामे त्यांना माहीत असतात. पण आईबापांनी सांगितल्याशिवाय आपण होऊन काम करणारी मुले थोडी. नोकरवृत्ती बालपणापासूनच वाढीला लागते. दिसलेले काम न सांगता करण्याची सवय मुलांना लावली पाहिजे. लहानपणापासून नोकरवृत्तीने न वागता काम करावयास मुलांना शिकवायला पाहिजे. तोच त्यांच्या प्रगतीचा पाया आहे.

[—जून १९५७]

## ६४. कथा-वाङ्मयात मला काय दिसते ?

**दिवसातून** थोडा वेळ तरी काही ललित साहित्य वाचावे, असा मला नाद आहे. बहुधा रात्री दहा-अकराच्या पुढेच माझे हे वाचन होते. त्यात लघुकथा, व्यक्तिचित्रे, प्रवास-वर्णने इ. विषय येतात. पण कथावाङ्मयाचे प्रमाण अधिक.

या ललित वाचनातही केवळ करमणुकीची माझी दृष्टी नसते. दोन हेतूंनी मी वाङ्मय वाचतो.

आपल्या सामाजिक प्रश्नांचे प्रतिबिंब वाङ्मयातही अभावितपणे पडते. आजच्या सामाजिक समस्या काय आहेत ? त्यांना लेखकाने काय उत्तर सुचविले आहे ? आपल्याला काही निराळे उत्तर सुचते का ? आपल्याला अपरिचित असे कोणते सामाजिक प्रश्न लेखकाने उभे केले आहेत ? अशी एक दृष्टी मी वाचन करताना ठेवतो. त्यामुळे आपल्या अनुभवाला व प्रचीतीला अगम्य अशा सामाजिक प्रश्नांची आपल्याला माहिती होते.

दुसरी दृष्टी थोडी वैयक्तिक स्वरूपाची आहे. काल्पनिक वाङ्मयालाही काही सत्याचे अधिष्ठान असते. निरनिराळ्या कथांतून व्यक्तीव्यक्तींवर जे प्रसंग आलेले असतात ते प्रसंग माझ्यावरही येणे शक्य नाही का ? जगातील सुख-दुःखे ही जगातील व्यक्तींच्या वाट्याला येतात तशीच काही माझ्याही वाट्याला आली, येतात व येतीलही. आपल्याही मनाची तयारी ठेवावी म्हणजे सुखाचे किंवा दुःखाचे, इष्ट किंवा अनिष्ट, कसेही बरेवाईट प्रसंग आले तरी आपले मन विचलित होऊ नये. स्थिरता ढळू नये. धीर खचू नये. मनाला स्थितप्रज्ञता आणण्याच्या दृष्टीने या काल्पनिक प्रसंगांचा मी उपयोग करून घेतो. जीवनात कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्याची मानसिक तयारी मी करीत असतो.

[—जुलै १९५७]

## ६५. वीरदेवो भव । हुतात्मा देवो भव ॥

**१८५७** च्या स्वातंत्र्य-युद्धाला शंभर वर्षे पूर्ण झाली. आजपर्यंत या क्रान्तिसमराचा साकल्याने आणि साधार इतिहास लिहिला गेलेला नाही. तुटक तुटक खंडशः प्रकरणे उपलब्ध झाली आहेत. या वर्षीच्या शतसांवत्सरिक समारंभामुळे अखिल राष्ट्राचे लक्ष पुनः या इतिहासाकडे वळले आहे. पुढील चार-पाच वर्षांत या कालखंडाचा इतिहास लिहिला जाईल, अशी आशा आहे.

आज या कालखंडातील जी प्रकरणे, ज्या गोष्टी आणि जे प्रसंग उपलब्ध आहेत तेही अतिशय चित्तथरारक आणि स्फूर्तिदायक आहेत. कागदावर अद्याप न लिहिलेले असे कितीतरी रोमांचकारी प्रसंग उजेडात येतील ! आपल्या देशातील स्वातंत्र्याचे प्रेम या प्रसंगांच्या स्मरणाने चिरंजीव करण्याचा प्रयत्न आपण करू या.

स्वातंत्र्ययुद्धाचा जय होईपर्यंत त्याला पराजयच येत असतो. तसेच १८५७ च्या युद्धाचे झाले. त्यापासून जशी स्फूर्ती घ्यावयाची तसा बोधही घेणे आवश्यक आहे. हा प्रयत्न का फसला ? आपल्या समाजातील ज्या दुर्गुणांमुळे १८५७ चा प्रयत्न अयशस्वी झाला ते सर्व दुर्गुण आपल्यातून नष्ट झाले आहेत काय ? आत्मनिरीक्षण करून सुधारणा करावयास पाहिजे. पण हा सतत चिंतनाचा आणि निदिध्यासाचा विषय आहे.

आजचा प्रसंग पुण्यस्मरणाचा आहे. हुतात्मा मंगल पांडे, बादशाहा बहादुर-शाह, झीनतमहल, झाशीची राणी लक्ष्मीबाई, श्रीमंत नानासाहेब, श्रीमंत रावसाहेब पेशवे, सेनापती तात्या टोपे, कुँवरसिंह, अजीमुल्लाखान, श्री. बाबासाहेब नरगुंदकर (भावे), रंगो बापूजी इत्यादी ज्या वीर स्त्री-पुरुषांनी स्वातंत्र्यार्थ धारातीर्थी देह ठेविले अगर अखेरपर्यंत झगडत राहिले त्या सर्व ज्ञातअज्ञात अशा क्रान्तिवीरांना प्रणामांजली वाहून अंशतः तरी ऋणमुक्त होऊ या. वीरदेवो भव । हुतात्मा देवो भव ॥

[—ऑगस्ट १९५७]

## ६६. प्रश्नाने ज्ञान वाढते

**गाडीत** प्रवास करताना किंवा व्यवहारात अन्य प्रसंगी एखादा अपरिचित मनुष्य तुम्हाला भेटतो. त्यावेळी तुम्ही त्याला काय प्रश्न विचारता ? तो तुम्हाला काय प्रश्न विचारतो ? संभाषण किती वेळ चालते ? केव्हा थांबते ? का ? या संभाषणातून तुम्हाला फायदा काय झाला ? आनंदात वेळ जाऊन ज्ञानात आणि

अनुभवात भर किती पडली ? अपरिचित माणसांशी बोलताना प्रश्न विचारण्या-विषयी काही विशेष असे तुमचे धोरण असते, का तोंडाला येतील ते आणि मनाला येतील ते प्रश्न विचारता ?

मी एकदा एका मोठ्या पगाराच्या व अधिकाराच्या तरुण व्यक्तीला भेटावयास गेलो. भेट कामाची नसून केवळ परिचयार्थ होती. घरी परत जाताना मी विचार करू लागलो तेव्हा माझ्या लक्षात आले की, तासभर मीच प्रश्न विचारीत होतो आणि तो फक्त उत्तरे देत होता. त्याने मला एकही प्रश्न विचारला नाही. त्याच्यापासून मी पुष्कळ उपयुक्त माहिती मिळविली; पण माझ्यापासून घेण्यासारखे काही असेल असे त्याला वाटले नाही. त्याने मला एकही प्रश्न विचारला नाही. त्याला माझ्या-कडून घेण्यासारखे काही नव्हते ! ! त्याच्या बुद्धीची मला कीव वाटली.

विचाराच्या व ज्ञानाच्या दृष्टीने मी संपन्न झालो. तो बिचारा होता तेथेच राहिला ! असाच अनुभव मला अनेक वेळा येतो.

प्रश्न विचारावयासही स्वतः विचार करावा लागतो. ज्याला विचारता येत नाही त्याची बुद्धी तरी कमी असते किंवा असलेली बुद्धी निकामी तरी होत चाललेली असते. विचार करणाराला प्रश्न सुचतात. पण विचारशून्य माणसाला प्रश्न सुचत नाहीत.

प्रश्नामुळेच ज्ञानाची निर्मिती झाली; तत्त्वज्ञान, विज्ञान, शास्त्रे यांची वाढ झाली. सुजाणपणाने प्रश्न विचारण्याची कला साध्य करा. ज्ञानाची पुष्कळ दालने खुली होतील. प्रश्न इतरांना विचारा. तसेच स्वतःलाही मधून मधून प्रश्न विचारा.

[—सप्टेंबर १९५७]

## ६७. दिवाळीची सात्त्विक संस्कृती

**संस्कृतीचे** संगोपन कुटुंबात होत असते. संस्कृती म्हणजे काय ? प्रत्येक समाजाच्या आचारात आणि विचारात काहीतरी वैशिष्ट्य असते. तीच त्या समाजाची संस्कृती.

मनुष्य आपला सवडीचा वेळ कसा घालवितो, त्यावरून त्याची वैयक्तिक संस्कृती कळते. समाजात सण साजरे कसे केले जातात त्यावरून त्या समाजाची संस्कृती समजून येते. या दृष्टीने दिवाळीच्या सणाकडे पाहा. आपल्या आचार-विचारांचे प्रतिबिंब या सणात पडलेले दिसून येईल.

दिवाळीच्या सणात सर्व प्रकारच्या सात्त्विक कलांना वाव आहे. या कलांना कुटुंबाच्या जीवनात स्थान दिलेले आहे. चित्रकला, रांगोळी, गृहमंडन, मुलांचे

किल्ले, दिव्यांची शोभा या सर्व कलांना दिवाळीचे सणात उच्च स्थान आहे. स्वयंपाक-कलेला तर महत्त्वाचे स्थान आहेच. दिवाळी अंकांच्या निमित्ताने उत्कृष्ट वाङ्मयाचा व चित्रकलेचाही आस्वाद घेता येतो.

आचाराला आवश्यक अशी शुचिर्भूतता आणि त्यामुळे येणारी पवित्र भावना यांनाही या सणात महत्त्व आहे. भौतिक जीवनाला आवश्यक अशा लक्ष्मीची पूजा केली जाते; पण तिच्याबरोबर बौद्धिक जीवनाचे अधिष्ठान अशा सरस्वतीचेही स्मरण ठेवले जाते.

कुटुंबाच्या आणि समाजाच्या जीवनात आवश्यक अशा कोमल भावनांचे संगोपन दिवाळी करते. पाडव्याच्या दिवशी पति-पत्नींच्या प्रेमाचे दृढीकरण होते; तर भाऊबीजेच्या सणाला बंधुभगिनींच्या प्रेमाला भरती येते. मित्रांनाही परस्परांची आठवण होऊन स्नेहाची वाढ होत राहते.

दिवाळीच्या सणाची तुलना पाश्चिमात्यांच्या नाताळाशी केली जाते; पण दोन सणांतील महत्त्वाचा फरक म्हणजे, केवळ सुख-विलासांच्या दृष्टीमुळे नाताळ हा ना–ताळ वाटतो; तर दिवाळीत सात्त्विक सुखोपभोग, कोमल भावनांचे दृढीकरण आणि विविध कलांचा आस्वाद या तिन्हींचे मधुर मीलन आहे. पण अशा दृष्टीने बुद्धिपुरःसर संस्कृतीसंगोपनाच्या दृष्टीने दिवाळी साजरी केली तरच तिचे पुरेपूर फळ तुम्हांला आणि तुमच्या मुलाबाळांना मिळेल.

[—ऑक्टोबर १९५७]

## ६८. लोकशाहीतील स्वातंत्र्य

**आपल्या** देशात लोकशाही राज्य-पद्धतीचा स्वीकार आपण केला; परंतु लोकशाही समाज-व्यवस्थेची मूलभत तत्त्वे अद्याप समाजात रुजलेली नाहीत. इंग्लंड-मध्ये कित्येक वर्षे लोकशाहीचा विकास होत आलेला आहे. ती सर्व प्रगती आत्मसात करायला आपल्याला काही काळ लागेल. बुद्धिपुरःसर व प्रसंगा-प्रसंगाने लोकशाहीची प्रधान तत्त्वे लोकांना शिकवायला पाहिजेत.

विचार-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, मत-स्वातंत्र्य, वैयक्तिक-स्वातंत्र्य आणि प्रचार-स्वातंत्र्य, यांच्यावर लोकराज्याची इमारत आधारलेली आहे. पुष्कळ लोक हे स्वातंत्र्य स्वतःपुरते मान्य करतात; पण इतरांना ते द्यायला तयार नसतात. म्हणजे लोकशाहीच्या नावाखाली ते हुकूमशाहीचा पुरस्कार करीत असतात. अडाणी लोकांना—यांच्यात सुशिक्षित आणि अशिक्षित दोघेही येतात—हा फरक आकलन होत नाही.

स्वतः स्वातंत्र्य मागणाराने तेच स्वातंत्र्य इतरांनाही द्यायला पाहिजे. इतरांचे मत-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य, प्रचार-स्वातंत्र्यही मान्य केले पाहिजे. दोन किंवा अधिक मतप्रवाह, अनेक पक्ष, अनेक ध्येयवाद—हा लोकशाहीचा पाया आहे. विरोधी पक्षाची जोपासना लोकराज्यात केली जाते. विरोधी पक्षाच्या प्रमुखाला राज्यमंत्र्यासारखा पगारही असतो.

एका प्रसिद्ध इंग्रज विचारवंताचे एक वाक्य मार्मिक आहे. तो विरोधकाला उद्देशून म्हणतो—"तुझ्या विधानातील एक अक्षरही मला मान्य नाही. तरी पण ते विधान करण्याचा तुझा हक्क आहे. आणि त्या तुझ्या हक्काच्या रक्षणाकरता मी प्राण जाईपर्यंत लढेन." किती उदात्त कल्पना आहे ही मत-स्वातंत्र्याची ! या देशातल्या किती पुढाऱ्यांना, किती अनुयायांना यातले मर्म आकलन झाले आहे !

विरोधी विचारांच्या पक्षांना, व्यक्तींना, मतांना, वृत्तपत्रांना, प्रचाराला हिरीरीने नेस्तनाबूद करू इच्छिणाऱ्या पुढाऱ्यांना आणि अनुयायांना सतत विचारावेसे वाटते की, तुम्हाला लोकराज्याची मूलभूत तत्त्वे कळली आहेत का ? मान्य आहेत का ?

[—नोव्हेंबर १९५७]

## ६९. विकारांवर नियंत्रण

**प्रत्येक** माणसाच्या मनात चांगले आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या भावनांचा जन्म आणि झगडा आयुष्यभर चालू असतो. कितीही सज्जन मनुष्य असला तरी त्याच्या मनात वाईट विचार येतात. आणि दुर्जनाच्या अंतःकरणातही सद्भावनांचा जन्म होत असतो.

बरे-वाईट विचार आणि भावना यांची आवक-जावक मनात चालू असते. त्यांच्यावर आपले फारसे नियंत्रण असू शकत नाही. त्यांच्या उत्पत्तीवर आपला ताबा नाही; पण त्यांच्या बाह्य अविष्कारावर नियंत्रण ठेवणे माणसाला शक्य आहे.

राग, लोभ, मोह, काम, मद, मत्सर हे मूलभूत विकार प्रत्येकाच्या मनात येत-जात असतात. ते येणे पाप नाही. त्यांच्यावर नियंत्रण न घालता येणे हा दोष आहे. राग प्रत्येकाला येतोच. विचारी मनुष्य विचारपूर्वक रागावर नियंत्रण घालून मन शांत ठेवतो. अविचारी मनुष्य रागाच्या भरात भाषेचा किंवा कृतीचा अत्याचार करून जातो. तीच गोष्ट इतर विकारांची आहे.

आपल्या मनाचा अभ्यास आपण करायला लागलो की या गोष्टी समजू लागतील. मनःसंयमन हे फार महत्त्वाचे शिक्षण आहे. ते दुसरा कोणी देऊ शकत नाही. ज्याचे त्यानेच विचारपूर्वक घेतले पाहिजे.

संयमाची शक्ती आणि युक्ती ज्याने साध्य केली त्याला वाईट मनोविकार ताब्यात ठेवता येतील. विकारांचा मनात जन्म होणे त्याच्या हातात नाही; पण ते नियंत्रणात ठेवणे, त्यांचे वाईट आचरणात पर्यवसान होऊ न देणे माणसाच्या हातात आहे.

असाच मनुष्य जीवनात सुखी होऊ शकतो.

[—फेब्रुवारी १९५८]

## ७०. चिन्तनशील जीवन

**आजच्या** सुधारणा-युगात ज्ञानाची साधने खूप वाढली आहेत. त्या मानाने प्राचीनकाली फारच थोडी साधने होती. आज वर्तमानपत्रे आहेत. ग्रंथ आहेत. रेडिओवर भाषणे होतात. व्याख्यानमाला चालू आहेत. चर्चा-मंडळे आहेत. या सर्व साधनांनी आपण ज्ञान ग्रहण करीत असतो. घेण्याची क्रिया चालू असते. तिचा अतिरेक इतका झाला आहे की, ज्ञान घेण्यातच सर्व वेळ जातो. स्वतंत्रपणे स्वतःच्या ज्ञान-निर्मितीला माणसाला वेळच मिळत नाही; स्वतःची प्रतिभा चालवायला त्याला सवड होत नाही.

आजचे व्यावहारिक जीवनही उद्योगाचे आणि धांदलीचे झाले आहे. जिकडे-तिकडे धावपळ. शांतपणे विचाराला सवड नाही.

पण मला वाटते वेळेच्या अभावापेक्षा जाणिवेचा अभाव फार मोठ्या प्रमाणात आहे. माझ्या जीवनात चिंतनाला, मननाला, स्वतंत्र विचाराला काही आवश्यकता आहे, ही जाणीवच आपल्यामध्ये नाही. ती उत्पन्न झाली तर वेळ मिळू शकेल. अंतर्मुख दृष्टी करण्याची सवय झाली की, चिंतन केव्हाही करता येईल.

चिंतनामुळे स्वतंत्र विचार निर्माण होतात. नवनवीन कल्पना सुचतात. आपल्या विचारात स्पष्टता येते. बौद्धिक अडचणींचा परिहार होतो. चिंतनाच्या सवयीमुळे प्राचीन ऋषींनी उपनिषदांसारखे शाश्वत विचारांचे वाङ्मय निर्माण केले. चिंतनामुळे व्यक्तींना तत्त्वज्ञान सुचले आणि बुद्ध, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासारखे तत्त्ववेत्ते निर्माण झाले.

चिंतनामुळे आपल्या बौद्धिक आणि व्यावहारिक जीवनाला उदात्तपणा येतो. स्वभावात शांतता आणि गंभीरता येते. जीवनात माणुसकी येते. शांतपणे विचार करीत बसण्याची अथवा चालण्याची सवय ठेवा. दिवसातला थोडा वेळ तरी या कामाला द्या. चिंतनशीलता ही भारतीय संस्कृतीची परंपरा आहे.

[—मार्च १९५८]

# ७१. विद्यार्थी, शिस्त आणि समाज

**विद्यार्थ्यांना** शिस्त कशी लावता येईल हा आज सर्व देशात चिंतेचा प्रश्नच होऊन बसला आहे. आपल्या देशातच नव्हे तर इतर देशांतही या विषयाचा ऊहापोह व उपाय-संशोधन चालू आहे.

विद्यार्थ्यांची शिस्त हा स्वतंत्र विषय असू शकत नाही. समाजाची शिस्त हाच मोठा व्यापक प्रश्न असून विद्यार्थी-शिस्त हे या एका मोठ्या प्रश्नाचेच केवळ एक अंग आहे.

विद्यार्थी अनुकरणप्रिय असतात. उच्च, उदात्त आणि सात्त्विक गोष्टी ते शिकू शकतात. त्याचप्रमाणे हीन आणि तामस अशा गोष्टींचेही शिक्षण अनुकरणाने उचलीत असतात.

शाळेत किंवा महाविद्यालयात गैरशिस्तपणा शिकविला जात नाही. प्रयत्न असतो तो शिस्तीचे शिक्षण देण्याचाच. पण समाजातील—बाह्य जगातील—गैरशिस्तीचे वातावरण इतके प्रभावशाली आहे की, शाळा-कॉलेजचे प्रयत्न त्यापुढे अपुरे पडतात.

शाळा-कॉलेजांनी पूर्वीपेक्षा अधिक प्रयत्न करणे जरूर आहे यात शंका नाही. पण हा कार्यक्रम हा समाजातील शिस्त-शिक्षणाच्या व्यापक कार्यक्रमाचा एक भाग होऊ शकेल. समाजाला शिस्त लावण्याचा प्रयत्न झाला नाही तर शाळा-कॉलेजांचे प्रयत्नही अयशस्वीच होतील.

आता व्यापक दृष्टीने समाजाला शिस्त लावण्याचे काम शासनसंस्थाच करू शकेल. खाजगी संस्था, संघटना व व्यक्ती शासन-संस्थेशी सहकार्य करू शकतील. पण साम—दाम—दंड ज्या शक्तीच्या हाती आहे तीच शक्ती समाजाला वळण लावू शकेल. समाजाला आचरण्याचे दहा महत्त्वाचे नियम घेऊन त्यांवर शासनसंस्था, समाज, व्यक्ती, नेते आणि शिक्षणसंस्था यांनी भर दिला तर एका वर्षाच्या अवधीत समाजात बदल झालेला दिसून येईल.

समाजाला काय शिक्षण द्यायचे याची कल्पना शासनिकांना असायला पाहिजे. आणि ती कल्पना मूर्त स्वरूपात उतरविण्याकरिता तिने आपल्या सत्तेचा, द्रव्याचा आणि यंत्रणेचा उपयोग केला पाहिजे. विद्यार्थी-शिस्तीचा प्रश्न असा व्यापक आहे.

[—एप्रिल १९५८]

## ७२. मोठी मने : लहान मने

**उत्तर-ध्रुवाच्या** महासागरावर बर्फाचे डोंगर तरंगत असतात. पाण्याच्या पृष्ठभागावर जेवढा डोंगर दिसतो त्याच्या दसपटीपेक्षा अधिक पाण्याखाली लपलेला असतो. पाण्यावरचा दिसतो. पाण्यातला दिसत नसला तरी त्याच्या आधारावर वरचा डोंगर तरंगत असतो.

माणसाच्या मोठेपणाचे असेच आहे. सामान्य जनतेला मोठ्या माणसाचे यश, कीर्ती, वैभव, मानसन्मान, लोकमान्यता इत्यादी गोष्टी दिसतात. पण त्यापूर्वीचा इतिहास दिसत नाही. यशाच्या पायात अनेक अपयशे पुरलेली असतात. कीर्ती मिळविण्यापूर्वी अनेक अपमानाच्या प्रसंगांना तोंड दिलेले असते. वैभवाच्या कालापूर्वी त्याग आणि हाल-अपेष्टा भोगलेल्या असतात. लोकमान्यता मिळविण्यापूर्वी लोकनिंदा सहन केलेली असते.

मोठी माणसे मोठेपणा मिळविण्याकरिता काम करीत नाहीत. कामाच्या तळमळीमुळे कष्ट करतात. ध्येयवादाकरिता झगडत असतात. त्या कामाची थोडी थोडी प्रगती हीच त्यांची दैनंदिन स्फूर्ती असते. त्यांना नकळत मोठेपणा त्यांच्यामागे येत असतो. ते मोठेपणाच्या मागे नसतात.

लहान मनाची माणसे मोठेपणाच्या मागे लागतात आणि निराश होतात. शेवटी इतरांचा द्वेष आणि मत्सर करणे एवढेच करण्यावर ते समाधान मानतात.

मोठ्या मनाची माणसे ध्येयाच्या आणि कामाच्या मागे असतात. ते करीत असता अपयश आणि दुर्जन यांचा त्यांना त्रास होत असतो. तरी "हाथी चलत है अपने गतमें कुतर भुकत वाकु भुकवा दे" अशी वृत्ती ठेवून ते केवळ कामाकडे लक्ष देतात.

कार्याची वाढ आणि त्यापासून होणारे समाधान हे माणसाचे खरे आणि मुख्य पारितोषिक आहे. लौकिक मोठेपणा आणि मानसन्मान ही दुय्यम फलप्राप्ती आणि गौण पारितोषिके आहेत. यांना "बाय-प्रॉडक्ट" असे म्हणता येईल. ते कधी मिळेल कधी न मिळेल. त्यांच्यावर डोळा ठेवून काम करणाराच्या पदरी निराशा मात्र येईल.

सार्वजनिक कार्यकर्त्यांचा वेदान्त हा असा आहे.

[—मे १९५८]

## ७३. गृहजीवनातील संस्कृती

**समाजाची** संस्कृती घराघरातून निर्माण होते आणि त्याच ठिकाणी तिचे संगोपन केले जाते. गृहजीवन हे संस्कृतीच्या विकासाला मदत करते.

पण संस्कृती म्हणजे तरी काय ? अगदी सोपी व्याख्या अशी—आपली सर्वांची राहाणीची आणि विचाराची विशेष पद्धत—तीच आपली संस्कृती. तिला एक बाजू राहाणीची आहे. दुसरी बाजू विचारांची.

आपला पोषाख, आपली भाषा, आपले सभ्याचार (एटिकेट), आपले सण-समारंभातील आचार—ही सर्व आपली बाह्यांगाची संस्कृती आहे. नातेवाईक आणि समाज यांच्याविषयी जबाबदारीच्या किंवा ऋणाच्या कल्पना, जगाच्या आणि जीवनाच्या उत्पत्तीविषयी आणि अंतिम ध्येयाविषयीच्या कल्पना—ही सर्व आपली विचारात्मक संस्कृती आहे.

संस्कृतीचे बाह्यस्वरूप आणि विचारात्मक स्वरूप यांचे जतन करण्याचे काम गृहसंस्थेकडे दिले आहे. आजपर्यंत गृहजीवनात संस्कृतीचे संगोपन झाले असले तरी आता या क्षेत्रात शिथिलता येत चाललेली आहे. विशेष आचारांचे आणि विचारांचे संगोपन करण्याचे काम आपल्याकडे आहे. ही जाणीव गृहपती आणि गृहलक्ष्मी या दोघांच्याही ठिकाणी नाही.

सुशिक्षितांच्या घराघरांतून या गोष्टीची जाणीव निर्माण व्हायला पाहिजे. श्रद्धेने म्हणा किंवा बुद्धिवादाने म्हणा, आपले आचार आणि विचार यांचे वळण कसे असावे, याचा आदर्श त्यांनी इतर गृहस्थांना घालून द्यावयास हवा. अनुकरणाने संस्कृतीच्या चांगल्या आणि वाईट दोन्ही गोष्टींचा प्रसार होत असतो.

म्हणून संस्कृतीमधील चांगल्या गोष्टींचे बुद्धिपुरःसर जतन आणि संगोपन आपल्या घराघरांतूनच झाले पाहिजे.

[—जून १९५८]

## ७४. आपापल्या मर्यादा ओळखण्यात सुख

**जगातल्या** चांगल्या चांगल्या गोष्टी सर्वांनाच हव्याशा वाटतात, आणि विशेष म्हणजे त्या जितक्या जास्तीत जास्त मिळतील तितक्या मिळविण्याचा सर्वांचा प्रयत्न चालू असतो.

सुग्रास आणि चवदार अन्न असले म्हणजे ते अधिकाधिक भरण्याचा माणसाचा प्रयत्न असतो. द्रव्य मिळू लागले म्हणजे ते मिळविण्याची त्याची हाव वाढत्या प्रमाणावर असते. मोठेपणा आणि कीर्ती अधिकाधिक प्रमाणात संपादन करणे हे सात्त्विकपणाचे लक्षण समजले जाते.

परंतु वरीलपैकी प्रत्येक बाबतीत कोठे थांबावे, हे माणसाला समजले पाहिजे. आधिभौतिक संपत्ती, सुखोपभोग आणि मोठेपणा या गोष्टी माणसाने अवश्य मिळवाव्यात; परंतु त्या मिळविण्याच्या बाबतीत आपल्या मर्यादा त्याने ओळखावयास पाहिजेत.

जगात खूप अन्न आहे; खूप द्रव्य आहे; कीर्तीलाही खूप वाव आहे; पण व्यक्तीला मात्र मर्यादा आहेत. पक्वान्नाची रास पडली असली तरी आपण त्यातले किती खपवू शकतो ? मुंगीला त्यातला एकच कण पुरतो; लहान मुलगा दोन घास खाईल. आपण थोडे अधिक खाऊ. म्हणून सर्वच रास मी एकटा संपवू शकेन काय ? फार तर दोन घास अधिक खाईन. म्हणून काही रास संपावयाची नाही ! तसेच धनाचे आणि कीर्तीचे आहे. त्यांच्या बाबतीतही माझ्या प्राप्तीला आणि यशाला मर्यादा आहेत. त्या तुम्ही व मी ओळखल्या पाहिजेत.

या मर्यादा ओळखण्यात समाधान आहे. तृप्ती आहे. मर्यादेच्या अलीकडे थांबणारा अल्पसंतुष्ट आणि बेकर्तबगार समजला जातो. मर्यादेच्या पलीकडे जाणारा अधाशी आणि फाजील हावरा समजला जातो. आपल्या मर्यादा ओळखून त्या प्रमाणाने महत्त्वाकांक्षा आणि समाधान यांचा मेळ घाला. त्यामुळे "सुख" म्हणून जी वस्तू आहे ती आपल्याला मिळेल.

[—जुलै १९५८]

## ७५. आता नवा ध्येयवाद हवा

**स्वातंत्र्यप्राप्तीच्या** पूर्वीच्या समाजात आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या समाजात फारच अंतर पडत चालले आहे असे वाटते.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळातील वातावरणात एक ध्येयवाद होता. देशाला मुक्त करण्याचा ध्यास आबालवृद्धांना लागला होता. या ध्येयनिष्ठेच्या प्रभावामुळे समाजातील उत्तमोत्तम गुण प्रगट झाले. अनेकांनी अलौकिक स्वार्थत्याग केला. सहकारितेची वृत्ती वाढलेली होती. लहानसहान मतभेद गौण समजले जात होते. संघटना उभारून त्यांच्या मार्फत देशाची व समाजाची काही ना काही सेवा करण्याचे प्रयत्न चालू होते. काही तरी ध्येय गाठावयाचे आहे, अशा निष्ठेने जीवन भारले गेले होते.

स्वातंत्र्य मिळाले आणि हा ध्येयवाद मावळला ! समाजाच्या अंत:करणात व जीवनात पोकळी निर्माण झाली. दुसऱ्या प्रभावी ध्येयवादाची स्थापना तेथे झाली नाही. त्यामुळे व्यापक उदात्त ध्येयनिष्ठेऐवजी आकुंचित, लहान, क्षुल्लक आकांक्षांनी मनाची पोकळी भरून काढली. स्वार्थी आकांक्षा, संकुचित पक्षनिष्ठा, अधिकार-तृष्णा, द्रव्याची फाजील हाव, कमी कष्टात बऱ्यावाईट मार्गांनी धनसंचय—अशा प्रकारच्या दुर्गुणांनी ध्येयवादाची जागा भरून काढली आहे.

उज्ज्वल ध्येयनिष्ठेच्या प्रभावानेच समाजातील दुर्गुण कमी होतात आणि सद्‌गुणांचा विकास होतो. स्वातंत्र्यप्राप्तीइतकाच नवा प्रभावी ध्येयवाद म्हणजे

स्वातंत्र्यापुढची पायरी; "भारताला, स्वतंत्र केलेल्या देशाला, साऱ्या जगात पहिल्या प्रतीचे राष्ट्र बनविणे." हा ध्येयवादाचा पुढचा टप्पा आहे. "माझ्या भारताला जगात प्रथम श्रेणीचे राष्ट्र करीन," हा नवा ध्येयवाद नव्या-जुन्या पिढीने आत्मसात केला पाहिजे. या विचाराने वातावरण भारून टाकले पाहिजे.

या नव्या ध्येयाच्या वातावरणातच समाजाच्या आणि व्यक्तीच्या सद्‌गुणांचा विकास होईल. व्यक्तीच्या जीवनाला स्वार्थी आणि आकुंचित आकांक्षेपेक्षा एक व्यापक महत्त्वाकांक्षाच स्फूर्ती देत राहील.

माझी प्रत्येक कृती भारताला श्रेष्ठ करण्याकरिता व्हावी. देशाला हीन दर्जाला नेणारी कृती माझ्या हातून होणार नाही. हाच आपला सर्वांचा संकल्प. याचा निश्चय करा. त्याचा प्रचार करा.

[—ऑगस्ट १९५८]

## ७६. ज्ञानाचे कुरण

आजकाल वाचनाकरिता इतके वाङमय आजूबाजूला पसरलेले असते की, काय वाचावे आणि काय सोडावे, हे माणसाला कळेनासे होते. पन्नास वर्षांपूर्वी वाचकाला एखाद-दुसरे पुस्तक वाचायला मिळणे दुष्कर असे. आता पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे यांची सुबत्ता झाली आहे. एकापरीने हे समाजाच्या बौद्धिक वैभवाचे लक्षण आहे. पण या वैभवात व्यक्तीचे स्थान काय असा विचार करावयाची वेळ आली आहे.

तुम्ही जनावरांना चरताना पाहिले काय? ती बिचारी दिवसभर कुरणात चरत असतात आणि वरवर पाहणाराला असे दिसते की, तोंडाला येईल ते खाणे यांचे चालू असते; पण थोडे अधिक लक्ष दिले तर दिसून येईल की, काही निवडक खाद्यच जनावरे खातात; इतराला तोंड लावीत नाहीत.

आपल्या वाचकवर्गाचे मात्र तसे नाही. ते हातात येईल ते ते वाचीत असतात. दिवसाच्या शेवटी त्यांना जर विचारले की, "आजच्या वाचनाने तुमच्या ज्ञानात व विचारात काय भर पडली तर किती जणांना समाधानकारक उत्तर देता येईल? एक आठवडाभर स्वतःच्या मनाला रात्री निजण्यापूर्वी हा प्रश्न विचारून तर पहा काय अनुभव येतो तो.

भाराभर वाङमय पुढे आले तरी त्यात आपल्याला अमुक एका विषयाचेच वाचन करावयाचे आहे अशी दृष्टी ठेवा; म्हणजे तुमच्या आवडीच्या एखाद्या विषयाचे

तुमचे ज्ञान उंचीने वाढत जाईल. उथळ ज्ञानाच्या माणसाला किंमत नाही. मग ते असंख्य विषयांचे का असेना. उलट एक-दोन विषयांत पारंगत असलेल्या माणसाला त्याच्या भोवतालच्या समाजात मान मिळतो. जीवनात ज्ञानाचा आनंद आणि समाजाकडून मिळालेला सन्मान ही सुखे काय कमी महत्वाची आहेत ?

[ —सप्टेंबर १९५८ ]

## ७७. तुमच्या धंद्याचा प्रभातकाल

**आपल्या** व्यवसायातील पहिली पाच वर्षेच फार महत्त्वाची असतात. भावी प्रगतीचा, यशाचा आणि लौकिकाचा पाया याच प्रारंभकाळात घातला जातो.

आपला व्यवसाय बुद्धिप्रधान असेल, कष्टप्रधान असेल किंवा बुद्धी आणि कष्ट यांच्या मिश्रणाचा असेल. या दोन्ही शक्ती पणाला लावण्याचा हा काळ असतो. बुद्धी आणि शरीर यांच्या कमाल मर्यादेपर्यंत त्यांना ताणण्याचा हा काळ असतो. कमाल मर्यादेपेक्षाही त्यांना थोडे थोडे अधिक ताणून त्यांचा कणखरपणा वाढविण्याचा हा काळ असतो.

या काळात बरोबरीची माणसे, जुनी माणसे, आणि वरिष्ठ लोक तुमच्या कर्तबगारीचे मोजमाप करीत असतात. तुमची बुद्धी, कामाची ताकद, निष्ठा, चिकाटी या सर्व गुणांचे नकळत मूल्यमापन होत असते. आणि ही वजनाची चिठ्ठी जन्मभर तुमच्या कपाळावर चिकटविली जाते.

हा मनुष्य हुशार आणि कर्तबगार आहे, पुढे मोठा होईल, असा अंदाज लोक बांधतील; किंवा स्वारी अंगचोर आणि बिनडोक आहे, असा आडाखा मनाशी बांधून ठेवतील. हे विशेषण जन्मभर तुमच्या मागे लागेल.

या काळात उत्तेजन आणि उपहास यांपैकी कदाचित उपहासच अधिक वाट्याला येईल. जुनी आणि बरोबरीची, कामचुकार आणि ऐतखाऊ माणसे तुमचा उपहास करतील. "मोठ्ठे आले आहेत..." इत्यादी शब्दांनी तुमची संभावना होईल. काम चांगले केले तरी उत्तेजन देणारे थोडेच भेटतील. कर्तव्य होते ते केले याबद्दल प्रत्येक वेळी शाबासकी कोण देणार ?

आणि कोणतेही काम हे जसे पोटापाण्याचे आहे तसेच ते समाजाचे व राष्ट्रसंवर्धनाचेही काम आहेच की. मी माझ्या पोटाकरिता राबतो आहे, या विचारापेक्षा किंवा त्याचबरोबर, मी माझ्या समाजाची व देशाची सेवा करीत आहे—या विचाराने त्या कामाला एक उदात्तपणा आणि पावित्र्य येईल. इदं न मम, कृष्णा-

र्पणमस्तु, कर्म हीच भक्ती, Work is worship, या सर्व वाक्यांचे हेच सार आहे.

एका भव्य इमारतीचे बांधकाम चालू होते. एका मंजुराला विचारले—"तू काय करतो आहेस?" तो म्हणाला, "मी दगड फोडतोय". दुसऱ्याला तोच प्रश्न विचारला. तो म्हणाला, "येथे होणाऱ्या भव्य मंदिराच्या पायाचा दगड मी घडवतोय."

काम तेच; दृष्टी भिन्न.

[—ऑक्टोबर १९५८]

## ७८. परप्रान्तातील गुणांची आयात

महाराष्ट्र समाज देशाच्या सर्व भागात पसरलेला आहे. बहुतेक लोक नोकरीच्या निमित्ताने परप्रांतांत गेलेले आहेत. अखिल भारतीय स्वरूपाच्या खात्यात नोकरी असल्याने त्यांना महाराष्ट्र सोडून बाहेर जावेच लागले. रेल्वे, पोस्ट, विमा-कंपन्या, संरक्षण इत्यादी खात्यांमुळे सर्व प्रांतांतील काही लोकांना तरी इतर प्रांतांत जावे लागते, ही फार चांगली गोष्ट आहे.

परप्रांतांत राहणाऱ्या महाराष्ट्रीय समाजावर एक नैतिक जबाबदारी येऊन पडते. प्रत्येक प्रांताचे व तेथील समाजाचे काही वैशिष्टच असते. आपल्याही मराठी समाजाचे काही विशेष गुण आहेत. दोन्ही समाजांतील गुणांची देवाणघेवाण होणे देशाच्या दृष्टीने फार इष्ट आहे.

गुजरात भागातील महाराष्ट्र समाजाच्या एका माध्यमिक शाळेत मी गेलो होतो. तेथील मराठी मुलांना उपदेश करताना मी सांगितले—"या समाजातील विशेष गुण म्हणजे औद्योगिक प्रवृत्ती आणि व्यापारी दृष्टी; हे गुण तुम्ही महाराष्ट्रात आणा."

याच विचारसरणीने मद्रास, बंगाल, पंजाब, राजस्थान इत्यादी प्रांतांत राहणाऱ्या महाराष्ट्रीय नागरिकांनी चौकस दृष्टीने अभ्यास करून चांगल्या गोष्टींची आयात आपल्या समाजात केली पाहिजे. असे केले तरच आपण भारताचे खरे नागरिक. हरद्वारपासून कन्याकुमारीपर्यंतच्या तीर्थांचे पाणी सीलबंद करून देवघरात त्याची पूजा करण्याची चाल आहे. थोड्या व्यापक दृष्टीने या प्रतीकाचा अर्थ लावून पहा. प्रत्येक प्रांतात दिसणाऱ्या चांगल्या गुणांची पूजा अनुकरणरूपाने करायला नको का?

[—नोव्हेंबर १९५८]

# ७९. उत्तेजन

**या** जगात आपण इतरांना संपत्ती देऊ शकत नाही. कारण ती आपल्याही हातात नसते; पण गोड शब्द बोलायला काही फार खर्च लागत नाही. नेमकी त्याच वस्तूच्या बाबतीत आपण फार काटकसर करतो.

आपल्या भोवतालची बहुसंख्य माणसे लहान असतात, सामान्य असतात; त्यांची कामेही त्या मानाने लहान आणि सामान्य असतात. ही लहान-लहान कामे उत्कृष्ट करण्यातच व्यवहाराचे यश असते.

अशी चांगली कामे करणारांना चार गोड शब्द बोलून उत्तेजन दिले, सहानुभूती दाखविली तर माणसाला प्रोत्साहन मिळते, आपल्या कामाचे चीज होते असे वाटते.

निष्काम कर्म आणि स्तुति-निंदानिरपेक्ष कर्म करणे ही फार वरची पायरी आहे. मोठमोठ्यांनाही तिच्यापर्यंत पोचता येत नाही. साधुसंत, थोर लोक, फार काय, देवदेखील स्तुतीचे भुकेलेले असतात. मग सामान्य माणसाची कथा काय? त्यांना थोड्याही स्तुतीने मूठभर मांस चढते आणि प्रोत्साहन मिळते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे—सर्वांत कमी खर्चाची ही वस्तू, म्हणजे गोड शब्द आणि उत्तेजन—द्रव्यापेक्षाही दुर्मिळ असते. आपण फार चिक्कूपणाने तिचा उपयोग करतो.

स्तुती करायची म्हणजे प्रत्येक वेळी खोटे बोलायची, जरूरी नाही. प्रत्येकाच्या कामाचा चांगुलपणा त्या त्या प्रमाणात व्यक्त करता येतो, "चांगले केले", "छान झाले," "उत्तमच झाले," "अतिशय उत्कृष्ट झाले" अशा स्तुतीच्या अनेक पायऱ्या आहेत. खरेपणा कायम ठेवूनही गोड शब्द बोलणे शक्य व सोपे आहे.

आणि दहा वेळा गोड शब्द बोलणाराला मग वेळीप्रसंगी चार टीकात्मक शब्द बोलण्याचाही अधिकार प्राप्त होतो; आणि अशा दुर्मिळ टीकेचा मग परिणामही चांगला होतो.

हा रसग्रहणाचा स्वभाव तुमच्या ठिकाणी जन्मतः असेलही. नसेल तर अभ्यास व प्रयत्न करून वाढवा. निदान त्याच्या उलट तरी वागू नका. काही लोकांना चांगल्या गोष्टीची हेटाळणी करण्याची सवय असते. "मोठे आलेत!" "त्यात काय आहे!" याशिवाय त्यांच्या कोशात शब्दच नसतात. निदान अशा वर्गात तरी बसू नका.

संसार आणि व्यवहार हा कष्ट, घाम, अश्रू आणि रक्त यांचा असला तरी

आपल्या वाणीने आणि कृतीने आपण त्यात आनंद, प्रोत्साहन, उमेद आणि सुख आणू शकतो. जगातील आनंद वाढविणे सर्वांच्या हातात आहे.

[ —डिसेंबर १९५८ ]

## ८०. उत्कृष्ट लेखन कोणते ?

लेखकाचे लेखन उच्च दर्जाचे आहे की कमी प्रतीचे आहे, हे ठरविण्याची कसोटी काय आहे ? हा प्रश्न लेखनकला सुरू झाल्यापासून वाचकांपुढे आहे आणि तसा तो प्रत्येक पिढीला राहील.

लेखनकला हा माणसाच्या अंतरंगाचा बाहेरचा व्यक्त आविष्कार आहे. जे मनात व डोक्यात असेल तेच व्यक्त होईल. व्यक्त करण्याच्या पद्धती निरनिराळ्या असतील. कोणी रम्य व आकर्षक भाषेत, आणि साच्यात प्रदर्शित करील. कोणी सरळ व गंभीर भाषेत तेच व्यक्त करील.

पहिल्या प्रकाराला आपण ललित साहित्य म्हणतो. दुसऱ्या प्रकाराला निबंधात्मक वाङ्मय म्हणतो. दोन्हींमधूनही लेखकाच्या बुद्धीतील व अंतःकरणातील आशय उघड झालेला असतो. हा आशय किंवा लेखनामागील अंतरंग जितके उत्कृष्ट तितकी लेखनाची पातळीही उत्कृष्ट राहील. अंतरंग कमी प्रतीचे असेल तर बाह्य स्वरूप सुंदर व आकर्षक असूनही ते लेखन कमी प्रतीचे राहील.

मनुष्य निरीक्षण करतो, अनुभव घेतो, त्यावर चिंतन करतो. मग त्याला स्वतंत्र विचार स्फुरतात. वैयक्तिक जीवन, समाजजीवन, माणसा-माणसांचे संबंध जीवनाचे ध्येय, समूहांचे संबंध--इत्यादी अनेक गोष्टींवर मनुष्य विचार करतो. हा विचार खोल असणे, मौलिक असणे, व्यापक आणि शाश्वत स्वरूपाचा असणे हे अर्थात व्यक्तीच्या अलौकिक बुद्धीवर, सूक्ष्म दृष्टीवर व विचारशक्तीवर अवलंबून राहील.

चांगला लेखक होणाराने प्रथम ही विचारांची बैठक पक्की केली पाहिजे. अनुभव, निरीक्षण, वाचन व चिंतन या गोष्टी लेखकाला आवश्यक आहेत. त्या जितक्या उत्कृष्ट असतील तितके त्याचे लेखन उत्कृष्ट दर्जाचे होईल.

लेखनाच्या बाह्य स्वरूपाप्रमाणेच त्यातील चिरंतन, शाश्वत, व्यापक विचार व भावना या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यांना सुंदर भाषेचा आविष्कार मिळाला तर उत्कृष्ट वाङ्मय निर्माण होते.

[--जानेवारी १९५९]

## ८१. उष्ट्या हाताने कावळा........

**मराठी** भाषेत म्हण आहे की, स्वार्थी माणूस "उष्टया हाताने कावळादेखील हाकलून लावणार नाही." नुकसान न होता चार शिते प्राण्याला मिळतील, तेवढेही पुण्य असा माणूस घेणार नाही.

मुद्दाम म्हणून नव्हे पण नकळत आपण किती तरी वेळा असेच वागत असतो. अगदी थोडचा श्रमात पुष्कळ काम होण्यासारखे असते; पण तेवढेही करायचे आपल्याला सुचत नाही. करायचा आळस असतो असे नाही; पण ती दृष्टीच आपल्याला नसते.

हमरस्त्यावर एखादा ट्रकवाला गाडीच्या चाकाला नेट म्हणून एक मोठा धोंडा ठेवतो. गाडी चालू करतांना धोंडा रस्त्यात टाकून गाडी पुढे हाकतो. अगदी नकळत या माणसाने रस्त्यात दगड ठेवला. मागून येणारे दहा जण त्या दगडाला प्रदक्षिणा घालून जातील; पण शंभरात एखादाच असा निघेल की, तो दगड उचलून बाजूला टाकील.

सार्वजनिक नळाची गोष्ट घ्या. नळाच्या पाण्यालाही शहरात पैसे पडतात, ही गोष्ट सर्वांना माहीत आहे; पण एखादा हरीचा लाल नळ उघडा ठेवून जातो आणि पाणी धो धो वाया जात असते. माझ्या बापाचे काय जाते, ही भावना! नळ बंद करायला फार श्रम का पडतात? पण नाही. दृष्टीच नाही. इतर दहा जण नळ वाहताना पाहातील. मुद्दाम जाऊन बंद करणारा एखादाच. विजेच्या दिव्याची तीच गोष्ट. घरमालकाला, संस्थेला, रेल्वे–कंपनीला, शाळेला–सर्वांनाच निष्कारण जळणाऱ्या दिव्यांचा किती तरी खर्च येतो! विद्युत्शक्ती ही एक राष्ट्रीय संपत्ती आहे, ती कोणाची का असेना, वाया जाता कामा नये. सहज बोट लावले तर दिव्याची कळ ढकलता येते. पण छे! सताड उजेड असला तरी खोलीत, सार्वजनिक ठिकाणी, रेल्वेच्या डब्यात दिवे जळतच राहतील. समाजाचे नुकसान होतच राहील. प्रत्येकाने थोडा विचार केला आणि थोडेच हातपाय हालवले तर समाजाचा कितीतरी फायदा होईल.

[—फेब्रुवारी १९५९]

## ८२. समाजकार्यांत जिव्हाळा हवा

नवीन व्यवसायात मनुष्य पडला की आपली प्रगती लौकर कशी होईल, याच्या विवंचनेत पडतो. वकिली, डॉक्टरी अशा सारखा व्यवसाय असला तर लोकांत

प्रिय व्हावे लागते. त्याकरिता एखादे सार्वजनिक काम हातात घेतले तर एका दगडाने दोन पक्षी मरतात. सार्वजनिक काम केल्याचा मोठेपणा मिळतो आणि "प्रॅक्टिस" लाही मदत होते.

लोककल्याण कोणत्याही मार्गाने झाले तरी पाहिजेच आहे! एखाद्याचा स्वार्थ साधून शिवाय समाजाचेही कल्याण होत असेल तर काय हरकत आहे? सर्वस्वी समाजकल्याणाला वाहून घेणारी माणसे मिळाली तर ठीकच आहे. पण तशी मिळण्याचे प्रमाण फार कमी. अलीकडे तर ते अधिकाधिक कमी होऊ लागले आहे. अशा परिस्थितीत वरच्यासारखे "पार्टटाइम" समाजकार्यकर्ते मिळतील तितके हवेच आहेत.

मात्र अशा कार्यकर्त्यांनी आपल्या समाजकार्यात काही तरी जिव्हाळा ठेवावा. केवळ "प्रॅक्टिस" ला सहाय्यक एवढेच समाजकार्य आणि ते साधले की आपण आणि धंदा अशी वृत्ती ठेवू नये. हे केव्हा जमेल?

हाती घेतलेल्या समाज-कार्याविषयी अंतःकरणात जिव्हाळा असेल तरच आस्थेने व सातत्याने काम होईल. समाजात अनेक दुःखें, आपत्ती, प्रश्न, गरजा, दोष इत्यादी असतात. यांपैकी आपल्या स्वतःच्या अंतःकरणाला बोचणारे शल्य कोणचे आहे, याचा विचार करावा. समाजातील कोणत्या भागात सुधारणा व्हावी असे आपल्याला खरोखरी वाटते? आपल्या जीवनात आपल्याला कोणत्या आपत्ती आल्या की ज्या इतरांवर येऊ नयेत असे वाटते? असा विचार करून कामाचे क्षेत्र निवडले तर जिव्हाळा वाटू लागेल. प्रारंभी जरी स्वार्थाकरिता समाजकार्य घेतले असले तरी हळूहळू त्यात जिव्हाळा येऊ लागेल, आणि त्या कामापुरता तरी स्वार्थाचा कलंक धुऊन काढला जाईल व थोडेच पण शुद्ध समाजकार्य होईल.

[ —एप्रिल १९५९ ]

## ८३. लहान दुःखांचा मोठा उपयोग

**आपले** जीवन हे सुख-दुःखांचे मिश्रण आहे. यश व अपयश, कीर्ती व अपकीर्ती, स्तुती व निंदा, लाभ व हानी, आरोग्य व रोग —असे दोन्ही प्रकार लहानमोठ्या प्रमाणात आजन्म चालू असतात.

मनुष्य लहानसहान आपत्तींनीच खचून जातो. परीक्षेतील अपयश, लहानसहान चोरी, किरकोळ आजार, शेजाऱ्याने केलेली नालस्ती—अशा गोष्टींनी त्याचे मन दुखावते आणि काही काळ तरी तो दुःखी होतो.

लहान आपत्ती माणसावर अवश्य याव्यात. मनाला शिक्षण देण्याची संधी त्यामुळे येते, असे मला वाटते. अशा रीतीने मनाला शिक्षण दिले तर पुढे येणाऱ्या मोठ्या आपत्ती टाळता येतील किंवा त्यांना अधिक धीटपणाने तोंड देता येईल.

प्रवासात एकदा माझी चोरी झाली. पैशाचे पाकीटच गेले. प्रथम वाईट वाटले. नंतर विचार केला—बरे झाले, पंचवीस रुपये गेले. यापुढे प्रवासात पैसे सांभाळण्याचा धडा घेतला तर, न जाणो पुढे होणारी हजार-पाचशे रुपयांची चोरी टळेल. लहान-सहान आजार आला म्हणजे मी त्याच्या मागे जाऊन तो कशाने झाला हे पाहातो. आणि आजाराच्या दुःखापेक्षा, त्याचे कारण समजते व तो यापुढे टाळता येईल म्हणून मला आनंद व आत्मविश्वास वाटतो. कोणी निष्कारण नालस्ती केली तर निर्विकार-बुद्धीने तिच्याकडे पाहून "चालायचेच" असे म्हणून, मन अधिक खंबीर करण्याचा मी प्रयत्न करतो.

याच दृष्टीने इतर आपत्तींकडे पाहा; म्हणजे प्रत्येक प्रसंग हा मनाला शिक्षण देण्याची संधी आणून देतो हे लक्षात येईल.

जीवन ही आमरण शिक्षणाची शाळा आहे.

[—जून १९५९]

## ८४. नवे पक्ष, नव्या जाती, नवे न्याय!

**रात्रीच्या** गाडीने परगावी जायचे होते, म्हणून रिक्षातून स्टेशनवर चाललो होतो. रिक्षावाला जोरात चालला होता. त्याचा धक्का एका सायकलस्वाराला लागून तो पडला. दोघांचे भांडण जुंपले. पाच मिनिटांत तेथे आणखी रिक्षावाले आले आणि काही सायकलवाले आले. रिक्षावाल्यांनी रिक्षावाल्याची बाजू घेतली आणि सायकलस्वारांनी सायकलवाल्याची बाजू घेतली.

पाच मिनिटांच्या आत एका लहान समाजात दोन गट निर्माण झाले. दोन निष्ठा निर्माण झाल्या. दोन वर्ग तयार झाले. त्यांना जात म्हणायचे नाही इतकेच! कशाच्या आधारावर? धंद्याच्या, व्यवसायाच्या आणि समान वस्तूच्या. आपला धंदा करणारा असेल त्याची बाजू घेतलीच पाहिजे. आपण वापरतो ती वस्तू वापरणाऱ्या इतर माणसांची बाजू घेतलीच पाहिजे!

मग त्यात न्याय असो वा नसो. सत्य असो वा नसो. धर्म असो की नसो. न्यायाची बाजू पाहायला कोणाला सवड आहे? सत्यासत्य आणि धर्माधर्म यांची छाननी करून न्यायाची बाजू घेण्यापेक्षा हे सोयीचे पडते. वेळ वाचतो! काही तरी सार्वजनिक हित पाहिल्याचे समाधान मिळते!

याच तत्त्वावर आज समाजात नवे वर्ग, नव्या जाती, नवे पक्ष, नवे गट तयार होत आहेत आणि आपापल्या गटाशी इमानी राहाणे, एकनिष्ठ राहाणे हा धर्म बनत आहे.

सत्य, न्याय आणि धर्म यांना दिवसेंदिवस गौण स्थान प्राप्त होत आहे.

यावर इलाज काहीच नाही का ? आहे. अवश्य आहे.

प्रत्येक व्यक्तीने आपापल्या वर्गाशी निष्ठा अवश्य बाळगावी; परंतु त्या वर्गात राहूनही न्यायाची आणि सत्याची बाजू कोणती आहे ते दाखवीत राहावे. आपल्या वर्गाचा किंवा गटाचा दुसऱ्या वर्गाशी कलह सुरू होण्यापूर्वी आपला पक्ष अन्यायाचा, असत्याचा व अधर्माचा असेल तर तसे आधी सांगून अयोग्य कलहाला आळा घातला पाहिजे.

शेवटी न्याय, धर्म आणि सत्य यांचे संगोपन व्यक्तीच करू शकतात. आणि प्रभावी व्यक्ती असल्या तर त्यांचा वर्ग अथवा पक्ष ते काम करू शकतो.

[—जुलै १९५९]

## ८५. अकल्याणाचा खजिना

"**कल्याणचा** खजिना" ही शिवाजीमहाराजांच्या चरित्रातील गोष्ट आपण वाचतो आणि तेथेच विसरून जातो. काही तरी निमित्ताने सुंदर स्त्रियांची उत्तान चित्रे काढावीत म्हणून द्रव्याभिलाषी कलाकार कॅलेंडरवर 'कल्याणचा खजिना' काढतात. त्या चित्रातील शिवाजीमहाराजांचे चित्र किंवा चारित्र्य यापेक्षा त्यातील 'खजिन्याकडे' लक्ष देऊन गिऱ्हाईक कॅलेंडर विकत घेतात, संपले !

एका कनिष्ठ अधिकाऱ्याने आपल्या राजाला खूष करण्याकरिता देऊ केलेली एक लाच म्हणजे हा कल्याणचा खजिना. ही लाच शिवाजीराजांनी स्वीकारली असती की खालच्या अधिकाऱ्यांना द्रव्य आणि दारा यांची लूट करण्याची सनद दिल्यासारखे झाले असते. न्यायनिष्ठुर शिवाजीराजांनी लाच नाकारून अधिकाऱ्यांना कित्ता घालून दिला.

वरिष्ठ जागी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या जीवनात प्रत्येक दिवशी द्रव्याच्या रूपाने कल्याणचा खजिना येत असतो आणि प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मार्गाने त्याचा स्वीकारही केला जातो.

सामान्य नागरिकांची लहानसहान कामे करणे सरकारी नोकरांच्या हातात असते. बिचारे नागरिक आपले काम लवकर व्हावे याकरिता नाइलाज म्हणून जेथे जशी प्रथा असेल तेथे तशी लाच देऊ करतात. या गोष्टी वरपर्यंत माहीत नसतात असे कसे होईल ? पण या दैनंदिन लाचेतूनच खजिना निर्माण होत असतो. हा नाकारण्याचे सामर्थ्य वरिष्ठ अधिकाऱ्यांत असत नाही. वरच्यांचे पाणी खालचे अधिकारी जोखतात आणि शेवटपर्यंत ही प्रथा पसरते. देशाच्या राज्यकारभारात लाचलुचपत चालू आहे असे प्रत्येक जण म्हणतो. प्रसंग आला की, सामान्य माणसे आपले काम करून घेण्याकरिता नाइलाजाने लाच देतात. अधिकारी डोळे मिटून ती स्वीकारतात. किंबहुना ती घेतल्याशिवाय कामाला हातच लावीत नाहीत. हे दुष्ट वर्तुळ कोठे तुटणार असा प्रश्न विचारवंतांपुढे उभा राहतो.

त्यांनी "कल्याणचा खजिना" या प्रसंगावर चिंतन करावे. सुधारणा राजापासून व्हायला पाहिजे. वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून प्रखर आणि कठोर नीतीचे आचरण व्हायला पाहिजे. त्याचा परिणाम दुय्यम अधिकाऱ्यांवर आणि त्यांचा परिणाम कनिष्ठ अधिकाऱ्यांवर झाल्यावाचून राहणार नाही.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।।

रोजच्या जीवनात पुढे येणारा खजिना स्वीकारण्याने समाजाचे अकल्याणच होत आहे हे लक्षात ठेवा. हा अकल्याणाचा खजिना नाकारा, हाच "कल्याणचा खजिना" या प्रसंगाचा संदेश आहे.

[—ऑगस्ट १९५९]

## ८६. स्वप्नभंगाचे धक्के

**प्रत्येक** मनुष्य काही आवडीच्या कल्पना उराशी बाळगून असतो. जगात त्याच्या काही आकांक्षा अपेक्षा असतात. काही स्वप्ने असतात.

परंतु जीवन हे कठोर आहे. त्यात सर्व स्वप्ने खरी ठरत नाहीत. सर्व अपेक्षा पुऱ्या होत नाहीत. सर्व आकांक्षा फलद्रूप होत नाहीत.

सार्वजनिक जीवनात हा अनुभव येतो तसाच वैयक्तिक खाजगी जीवनातही तो येतो.

"हिंदी चीनी भाई भाई" अशी ब्रीदवाक्ये तयार करून भारत-चीन मैत्रीचे स्वप्न पंडित जवाहरलाल नेहरू यांनी रंगविले आणि चिनी मुत्सद्द्यांनी एका क्षणात त्या स्वप्नाचा भंग केला. पंडित नेहरूंना या अपेक्षाभंगाचा किती मनस्ताप

झाला असेल याचा मी विचार करीत होतो. दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात छापून आले की, या प्रश्नावर बोलताना पंडित नेहरू अत्यंत दुःखित आणि व्यथित दिसत होते. स्वप्नभंगाचे दुःख सहन करणे कठिण आहे. परंतु व्यवहारात ते सहन करणे प्राप्त होते. करू शकतो तोच कर्मयोगी.

सार्वजनिक आणि खाजगी जीवनातही अपेक्षाभंगाचे अनेक अनुभव येतात. निवडणुकीत हुकमी यश मिळेल असे वाटते, पण अपयश पदरात येते. मोठमोठी माणसे अशा प्रसंगाने खंगलेली मी पाहिली आहेत. गुरू आपल्या शिष्याकडून काही कर्तबगारीची अपेक्षा करतो, शेवटी निराशा पदरी येते. बाप आपल्या मुलाकडून आदर्श पुत्रधर्माची आकांक्षा बाळगतो; पण आपल्या मोठेपणाच्या तोऱ्यात मुलगा बापाला बाप म्हणावयास तयार नसतो. जीवश्च कंठश्च मित्र जिवाला जीव देईल म्हणून कोणी आशा बाळगतो. शेवटी तो मित्रच विश्वासघात करतो !

हे नेहमी घडतेच असे नाही; पण घडण्याचा संभव असतो अशी मनाची पहिल्यापासून तयारी ठेवावी. स्वप्नभंगाचा धक्का सहन करण्याची तयारी ठेवावी. म्हणजे कधी काळी मिळाला तरी तो धक्का सौम्य होतो. मनुष्य त्याने नामोहरम होत नाही. खचून जात नाही.

जीवन ही सत्य सृष्टी आहे. तीत स्वप्नभंग वारंवार होणारच.

[—सप्टेंबर १९५९]

## ८७. मराठी भाषेवर सक्रिय प्रेम दाखवा

**मराठी** भाषिकांच्या मागणीप्रमाणे संयुक्त महाराष्ट्र झाला. सर्व मराठी बोलणारे नागरिक एका राज्याच्या कक्षेत आले. आता प्रत्येक व्यक्तीने स्वतःला एक प्रश्न विचारण्यासारखा आहे. ज्या मराठी भाषेच्या तत्त्वावर हे स्वतंत्र राज्य निर्माण झाले, त्या मराठी भाषेकरिता व्यक्तिशः मी काय करीत आहे? मराठी भाषेविषयीचा माझा अभिमान मी कोणत्या स्वरूपात व्यक्त करीत आहे?

प्रत्यक्ष अनुभवाला असे येते की अक्षर, शुद्धलेखन, निर्दोष वाक्यरचना आणि केवळ मराठी शब्दांचा उपयोग ही कसोटी लावली तर शिकलेले बहुसंख्य मराठी नागरिक अयशस्वी होतील. बहुसंख्य विद्यार्थ्यांचे आणि नागरिकांचे मराठी भाषेवरील प्रेम हे अत्यंत उथळ आणि वरवर दाखविण्यापुरतेच आहे. स्वतःच्या परिश्रमाच्या आणि प्रयत्नांच्या पायावर हे भाषेचे प्रेम उभारलेले नाही. ही वस्तुस्थिती सुधारण्याची

वेळ आलेली आहे आणि प्रत्येक विद्यार्थ्याने व नागरिकाने प्रयत्न केल्यास मराठी भाषेला अभिमान वाटण्यासारखी सुधारणा होऊ शकेल.

खरोखर अक्षर, शुद्धलेखन, वाक्यरचना ह्या गोष्टींत सुधारणा करणे ही अगदी सुलभ गोष्ट आहे. प्रत्येक व्यक्तीने थोडा प्रयत्न केला पाहिजे. निर्धाराने दिवसातून थोडा वेळ या गोष्टीसाठी दिला तर कल्पनातीत सुधारणा होऊ शकेल. अनेक लहान-मोठ्या व्यक्तींना मी या गोष्टी सांगून पाहिल्या; परंतु अनुभव असा आला की, तिकडे कोणी लक्षच देत नाही. स्वाभिमानाच्या दृष्टीने या गोष्टी आवश्यक आहेतच; पण स्वभाषेच्या अभिमानाच्या दृष्टीने अधिकच आवश्यक आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या मंगल दिवशी तुमच्याही सुधारणेला प्रारंभ होऊ द्या.

[—नोव्हेंबर १९५९]

## ८८. तुमचा व्यवसाय हीच देशसेवा

तुमचे काम काहीही असो, तुमचा व्यवसाय कोणताही असो, तो मन लावून, आस्थापूर्वक, उत्कृष्ट रीतीने करणे हीच आज समाजसेवा आहे. एका वेळी देशाकरिता प्राण अर्पण करणे, हालअपेष्टा सोसणे, स्वार्थत्याग करणे, ही देशसेवेची व्याख्या होती. आज देशसेवा करावयाची असेल तर आपापले काम उत्कृष्ट करा, असे सांगण्याची वेळ आलेली आहे. अर्थात् चोर, दरोडेखोर यांना ही व्याख्या लागू नाही, हे सूज्ञ वाचकांच्या लक्षात येईलच !

तुमचे काम कितीही लहान असो, तो देशव्यापी मोठ्या कामाचा भाग आहे; ही लहान लहान कामे झाली नाहीत तर संकलित असे मोठे काम कधीच पूर्ण होणार नाही. एखाद्या मोठ्या कारखान्यात लहान स्क्रूचे आणि मोठ्या घणाचे काम महत्त्वाच्या दृष्टीने सारखेच आहे. लहान स्क्रूने आपले काम केले नाही तर घणाचे ठोके थांबतील आणि कारखाना बंद पडेल.

ही एक निराळी दृष्टी आहे. जुन्या लोकांची एक अशी पद्धती असे की, लहान-सहान काम झाले की, ते कृष्णार्पणमस्तु म्हणून देवाला द्यावयाचे. त्याचप्रमाणे प्रत्येक लहान काम देशाला देण्याची वेळ आलेली आहे. तुमचे लहान काम केवळ तुमचा टीचभर खळगा भरण्याकरिता नाही; तर देशातील चाळीस कोट लोक जगण्याकरिता आहे. आज समाजाच्या सर्व अंगांची वाढ करणे जरुरीचे आहे. आज चांगला शेतकरी पाहिजे, त्याचप्रमाणे कामगार, व्यापारी, शिक्षक, गृहिणी, विद्यार्थी, शिपाई, सैनिक, गाडीवान हे सर्व लोक आपापली कामे उत्कृष्ट करणारे

पाहिजेत. या माझ्या कामाने देशाचा गाडा पुढे ढकलला जात आहे, अशी त्यांची भावना असेल तर त्यांच्या कामाला नवीन धार चढेल; आपल्या कामाचा त्यांना अभिमान वाटेल; त्यांच्या मनाला समाधान होईल; इतर माणसांशी वागण्याचे त्यांचे संबंध सुधारतील; त्यांच्या भोवतालचे वातावरण बदलून जाईल; केवळ क्षुद्र स्वार्थाची दृष्टी जाऊन आवश्यक अशी स्वार्थाला परमार्थाची जोड मिळेल.

साधा घरटंचाईचाच प्रश्न घ्या. ही नवीन दृष्टी जर प्रत्येकाने स्वीकारली तर त्याच्या कामात किती सुधारणा होईल याचा विचार करा. गडी, गवंडी, सुतार, कंत्राटदार, इंजिनियर, परवानगी देणारे म्युनिसिपालिटीचे कारकून आणि सरकारी अधिकारी या प्रत्येकाच्या मनात ही भावना राहील की मी माझे काम करतो, त्यात त्याचबरोबर माझ्या गावातील आणि माझ्या देशातील घरटंचाईचा प्रश्नही सोडवीत आहे. माझे काम मी प्रामाणिकपणे केले तर पाच-पंचवीस लोकांना तरी निवाऱ्याची जागा मिळेल. माझ्या कामामुळे देशातील घरे वाढतील.

प्रत्येक व्यवसायातील माणसाने व्यापक दृष्टी ठेवून एक महिनाभर तरी काम करून पहावे काय चमत्कार होतो तो! थोर ध्येयाच्या मागे सद्‌गुण आपोआप चालून येतात.

**[—डिसेंबर १९५९]**

## ८९. आई! आई!

**आईवर** कविता करण्याची व अशा कविता गुणगुणण्याची अलीकडे प्रथा पडली आहे. मी फॅशन हा शब्द वापरणार होतो; पण तो वाईट दिसेल. प्रथा या दृष्टीने ही चांगली आहे.

मला वाईट एवढेच वाटते की, ही स्तुती व स्मृती बहुतेक वेळा मृत आईचीच असते. मेलेल्या आईबद्दल शोक असतो. जिवंत आईबद्दल स्तुती व गौरव भावना व्यक्त करणारी काव्ये फारशी प्रचारात नाहीत. प्रत्येकाने स्वतःला असा प्रश्न विचारावा की, जिवंतपणी आईला आपण किती सुख देतो. जगाचा एक नियम आहे की, "मृताला हार आणि जित्याचा भार"!! असे तर आपले होत नाही ना!

आईच्या कष्टाबद्दल एखादा प्रेमळ शब्द व्यक्त करता का? ती आजारी किंवा वृद्ध असेल तर आपण होऊन तिची शुश्रूषा करता का? तिच्या खाण्यापिण्याबद्दल कधी आस्था दाखविता का? तिच्या शब्दाचे पालन करण्याची काळजी घेता का?

तिला सन्मानाने वागविता का ? कोणत्या रीतीने आपल्या जिवंत आईविषयी प्रेम आपण व्यक्त करता ? लहानांनी, तरुणांनी आणि प्रौढांनी सर्वांनीच हा प्रश्न स्वतःला विचारण्यासारखा आहे.

मुलांविषयी आईचे प्रेम हे निष्काम, सहज, सार्वत्रिक आणि अनादी अनंत आहे. जसे मानवांत तसे ते प्राण्यांतही आहे. मुलांचे आईविषयी प्रेम हे विचारपूर्वक, बुद्धिपुरस्सर, शिक्षण देऊन, संस्कृतीच्या परंपरा निर्माण करून वाढवावे लागते. मातृप्रेम जितके सार्वत्रिक आहे तितकी मातृभक्ती सार्वत्रिक नाही. म्हणूनच वारंवार सांगावे लागते—मातृदेवो भव ।

[ —जानेवारी १९६० ]

## ९०. पोथी लेखनाची प्रथा

**छपाईची** कला निघाल्यापासून लेखनकलेचा जसा फायदा झाला तसा काही तोटाही झालेला आहे. लिहिले म्हणजे ते छापून आलेच पाहिजे आणि छापून येणार नसेल तर लिहून तरी काय करावयाचे आहे, असे लोकांना वाटू लागले. त्यामुळे भावी काळात उत्कृष्ट लेखक होण्याची ज्यांची शक्यता आहे त्यांच्या लेखनाला प्रारंभ होत नाही, आणि सामान्य दर्जाचे लेखनही मुद्रित करण्याची ज्यांची शक्यता असते ते आपले लेखन चालू ठेवू शकतात. त्यामुळे सध्या उत्कृष्ट वाङ्मयाबरोबरच निकृष्ट वाङ्मयही प्रसिद्ध होऊ शकते.

मुद्रणाची कला अस्तित्वात नव्हती अशा वेळी उत्कृष्ट ग्रंथ जन्माला आले, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. उपनिषदे, संस्कृत नाटके व काव्ये, ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकाराम–नामदेव यांचे अभंग इत्यादी वाङ्मय लिहिले गेले, त्या वेळी, मुद्रणकला अस्तित्वात नव्हती, आपल्या ग्रंथांच्या हजारो प्रती निघून हजारो लोक त्या वाचतील अशी अपेक्षाही लेखकांची नव्हती. लेखनाचा आनंद आणि खाजगी मित्रमंडळीत त्या लेखनाचा प्रसार हेच त्या वेळी लेखनाचे पारितोषिक होते. त्यावेळी लेखकांची एवढीच मर्यादित अपेक्षा होती.

लेखनाकरिता आनंद व खाजगी मित्रमंडळीत त्याचा प्रसार या उद्देशाने लेखन करण्याची प्रथा पुन्हा मोठ्या प्रमाणावर सुरू होणे जरुरीचे आहे. प्रत्येक व्यक्तीला तिच्या जीवनातील अनुभवांतून व विचारांतून लिहिण्यासारखे असे काही-तरी असतेच. आणि त्याने ते लिहिलेले वाचण्याकरिता त्याची कुटुंबीय मंडळी, नातेवाईक आणि मित्रमंडळी इतका तरी वाचकवर्ग खास असतो. अशा लेखनातून जे उत्कृष्ट लेखन

बाहेर पडेल ते आपोआप या मर्यादित वर्तुळाबाहेरही प्रसृत होईल आणि त्याच्याहीपेक्षा जे चांगले असेल ते प्रकाशित करण्याकरिता प्रकाशक लेखकाच्या दाराशी येतील.

हस्तलिखित पोथ्या लिहून त्यांच्या नकला करून त्या प्रसृत करण्याची कला एका काळी होती. अशा हस्तलिखितांची प्रथा प्रत्येक व्यक्तीच्या मर्यादित परिचित मित्रमंडळीकरिता सुरू होणे जरुरीचे आहे. पोथीलेखनाच्या जुन्या प्रथेचा नव्या स्वरूपात, म्हणजे हस्तलिखित-ग्रंथाच्या स्वरूपात उद्धार करणे जरुरीचे आहे. प्रत्येक व्यक्तीने आपापल्या मर्यादित क्षेत्रात हा उपक्रम सुरू करावा.

[ —फेब्रुवारी १९६० ]

# ९१. सत्कार आणि तिरस्कार

**प्रत्येक** व्यक्तीला आपल्या जीवनामध्ये दोन प्रकारच्या भावनांमध्ये हेलकावे घ्यावे लागतात. सुख आणि दुःख, मान आणि अपमान, कीर्ती आणि दुष्कीर्ती, निंदा आणि स्तुती, यश आणि पराभव—अशा प्रकारची द्वंद्वे प्रत्येकाच्या अनुभवाला येतात.

सत्कार आणि तिरस्कार हे अशा द्वंद्वांपैकीच एक आहे.

सामान्यपणे चांगल्या कामाबद्दल समाजामध्ये आदराची भावना असते. थोड्याही सत्कृत्याबद्दल लोकांना कौतुक व कृतज्ञता वाटते. अशी ही कृतज्ञता कधी गुप्त स्थितीमध्ये लोकांच्या मनात राहते, कधी एखाद्या विशेष प्रसंगी ही आदराची भावना उत्कट स्वरूप धारण करून सत्काराच्या मार्गाने व्यक्त होते. आपल्या सत्कृत्याबद्दल प्रगट स्वरूपात सत्कार झाले वा न झाले तरी समाजाच्या, बहुसंख्य सात्त्विक लोकांच्या मनात, चांगल्या कामाबद्दल कौतुकच वाटत असते.

याला दुसरी बाजूही आहे. बहुसंख्य लोक कौतुक करीत असले तरी एखादी लहान व्यक्ती किंवा एखादा लहान गट, प्रच्छन्नपणे अथवा प्रकटपणे, आपला तिरस्कार करीत असतो आपल्या सत्कृत्यातच त्याला दुष्कृत्य दिसत असते. या व्यक्तीची किंवा गटाची अशी वृत्ती होण्याला फारसे जोरदार कारण लागत नाही. तुमच्या चांगल्या कामामुळे काहींच्या स्वार्थाला धक्का लागलेला असतो. एवढे कारण द्वेषाला पुरेसे असते. काही लोकांची द्वेष आणि तिरस्कार करण्याची उपजत वृत्तीच असते. त्यांना काही कारण लागत नाही.

शंभर व्यक्तींनी सत्कार केला आणि त्यात एखाद्या व्यक्तीने तिरस्कार केला तर आपले मन दुखावते. अशा दुःखावर विजय मिळविणे हेच शिक्षण आहे.

सत्कार आणि तिरस्कार हे दोन्ही समान मानण्याचे प्रसंग माणसाला येतील तितका तो अधिक स्थितप्रज्ञ होईल.

सज्जनांच्या मानसिक उन्नतीकरिता मानसिक समराचे प्रसंग मिळावेत म्हणूनच दुर्जनांच्या तिरस्काराची व द्वेषाची जरुरी आहे. चांगल्या गोष्टींच्या अस्तित्वाकरिता थोड्या वाईट गोष्टींचीही जरुरी आहे. अंधार आहे म्हणूनच प्रकाशाचे महत्त्व आहे. नाही का ?

[—मार्च १९६०]

## ९२. त्यागाची गरज संपली काय ?

**आजचे** आपले स्वातंत्र्य त्यागाच्या पायावर अधिष्ठित झालेले आहे. ब्रिटिश सरकारचे राज्य होते तोपर्यंत स्वराज्याच्या ध्येयाकरिता अनेकांनी निस्सीम त्याग केलेला आहे. हा त्याग केवळ राजकीय जीवनापुरताच मर्यादित नव्हता. समाज-सेवेच्या आणि शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक व्यक्तींनी निःस्वार्थपूर्वक कार्य केले व देशाच्या स्वातंत्र्याची भूमिका मजबूत केली.

आता स्वराज्य आल्यानंतर त्यागाचा भाव कमी झाला आहे की काय, अशी शंका येऊ लागली आहे. स्वराज्य आल्याबरोबर देशात संपन्नता आणि सुबत्ता आली, असे लोक धरून चाललेले दिसतात. त्यामुळे जेथून जितके मिळेल तितके घेण्याचा प्रयत्न प्रत्येक क्षेत्रात चाललेला दिसतो. त्यागाचे आणि कष्टाचे युग जाऊन कमीत कमी काम आणि अधिकाधिक द्रव्य-संग्रह याचे युग आलेले आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये हा अनुभव येतो. सरकारी कचेऱ्या, खाजगी नोकऱ्या, औद्योगिक क्षेत्र, समाज-सेवेचे क्षेत्र आणि राजकारणाचे क्षेत्र या सर्वच ठिकाणी द्रव्य-लोभाचे साम्राज्य पसरत चालले आहे असे वाटते.

आपल्या देशात अजून संपन्नता यावयाची आहे. कितीतरी प्रमाणात अद्यापि दारिद्र्य, उपासमार आणि अज्ञान, यांचे अस्तित्व आहे. जोपर्यंत देशात प्रत्येक नागरिकाला लागणाऱ्या जीवनाच्या वस्तू मुबलक प्रमाणात उत्पन्न होत नाहीत तोपर्यंत त्यागाची आवश्यकता आहे. प्रत्येकाला त्याच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणे द्रव्य मिळणे शक्य नाही.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळाइतक्या उत्कट आणि एकांतिक त्यागाची आज गरज नाही; परंतु त्यागाची मनोवृत्ती अवश्य पाहिजे. प्रत्येक नागरिकात ती पाहिजे. ती तशी न राहिल्यास स्वार्थ, लोभ, संचय व भोगलालसा यांचे साम्राज्य समाजात पसरेल. मग आमच्या भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय असे काय राहिले ?

सर्वसामान्य नागरिकात काही प्रमाणात त्यागाची मनोवृत्ती राहावी याकरिता

त्यागी जीवनाचे उत्कट आदर्श सर्वसामान्य जनतेपुढे पाहिजेत. असे आदर्श ज्या क्षणी आपल्या समाजातून नाहीसे होतील त्या क्षणी स्वार्थ, संचयवृत्ती आणि सुख-लोलुपता यांचेच राज्य वाढून समाजाचा अधःपात होईल. ज्ञानेश्वर, तुकाराम, शिवाजी, रामदास आणि लोकमान्य टिळक यांच्या त्यागाची स्मृती आणि आदर्श पुढे ठेवला तरच संयुक्त महाराष्ट्र आदर्श राज्य होईल.

[—एप्रिल १९६०]

# ९३. वात्सल्याचा अतिरेक

**पालकांनी** आपल्या मुलांवर प्रेम करावे आणि प्रेमाच्या सावलीत काही वयापर्यंत मुलांची वाढ व्हावी. सुसंस्कृत समाजात ही चांगली परंपरा आहे. फार लहान विद्यार्थ्यांना केवळ शिस्तीकरिता वसतिगृहात ठेवणाऱ्या पालकांना मी दोष देतो. बालपणातले शिक्षण मुलाला वात्सल्याच्या वातावरणातच मिळाले पाहिजे.

परंतु दहा ते बारा वर्षांनंतर पुढे हळूहळू मुलाला आपल्या पायावर उभे रहायला शिकविले पाहिजे. अपत्यप्रेम ह्याचा अर्थ हळूहळू मर्यादित केला पाहिजे. अशा तऱ्हेने की, अठरा ते बावीस वर्षापर्यंत पुष्कळ गोष्टींत मुलाने आपल्या पायावरच उभे राहावे. अशा रीतीने वाढलेली मुले समाजातील धकाधकीशी मुकाबला करू शकतात. प्रत्येक वेळी वडील माणसांच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग त्यांना येत नाही.

पुष्कळ पालकांना वात्सल्याच्या ह्या आकुंचित होणाऱ्या मर्यादा आकलन होत नाहीत. वयाने व शिक्षणाने मोठी झालेली मुले पालकांना बालकांसारखीच वाटतात. त्या मुलांची सर्व प्रकारची कामे आपणच करावीत असे त्यांना वाटते. ह्याचे काही गमतीदार अनुभव मला येतात. मॅट्रिक झाल्यावर मुलाने अभ्यासक्रम काय घ्यावा, ह्याची विचारपूस करण्याकरिता वडीलच चार ठिकाणी फिरत असतात! मुलाला घरीच बसवून ठेवतात. पदवीधर झालेल्या मुलाकरिता त्याचे नोकरीचे अर्ज घेऊन दारोदार हिंडणारे अनेक पालक आहेत! याहीपेक्षा नमुनेदार अनुभव हा पहा. एम्. ए. च्या परीक्षेची तयारी करणाऱ्या आपल्या अपत्याला परीक्षेच्या एका विषयाची तयारी कशी करावी व संभाव्य प्रश्नांची उत्तरे कशी द्यावीत, हे समजेना. ह्यावर उपाय काय? बापाने अभ्यासक्रम आणि प्रश्नपत्रिका बरोबर घेऊन प्राध्यापकांचे पाय धरले की, "हा विषय मला समजावून द्या आणि प्रश्नांची उत्तरे मला सांगा; म्हणजे मी आपल्या पाल्याची तयारी करवून घेईन."

आपल्या वात्सल्याने आपली मुले बौद्धिक आणि सामाजिक दृष्टीने लुळी-पांगळी व परावलंबी होऊ नयेत, ह्याची काळजी घ्या. वात्सल्याच्या योग्य मर्यादा ओळखा. [—मे १९६०]

## ९४. आपले सामाजिक अज्ञान

**माझे** एक पार्शी स्नेही आहेत. एकदा आम्ही मित्रमंडळी एका प्रभू ज्ञातीच्या मित्राकडे भोजन करीत बसलो होतो. भोजनाचा थाट नेहमीचा महाराष्ट्रीय पद्धतीचा होता. भोजन करीत असताना माझा पार्शी मित्र निरनिराळ्या पदार्थां-विषयी व ते खाण्याच्या पद्धतीविषयी चौकशी करीत होता. ही चौकशी अगदी प्राथमिक स्वरूपाची होती. त्यामुळे मी थोडा चिडलो आणि म्हणालो, "एखाद्या अमेरिकन प्रवाशासारखेच प्रश्न तुम्ही विचारीत आहात! या देशातील हिंदू कुटुंबात जसे काही तुम्ही प्रथमच भोजन करीत आहात!!"

पुढच्याच क्षणी मी स्वत:विषयी विचार करू लागलो आणि चपापलो. पार्शी जमातीतील भोजनपद्धतीविषयी मला तरी काय माहिती आहे?

महाराष्ट्रात आणि भारतात अनेक जाती व समाजपद्धती आहेत. आपल्या गावातही त्या आहेत. आपल्या घराशेजारी निराळ्या संस्कृतीचा मनुष्य राहात असतो; परंतु आपणाला एकमेकांविषयी कमालीचे अज्ञान आहे. भौगोलिक दृष्ट्या आपण जवळ आहोत; परंतु मानसिक दृष्ट्या आपल्या निरनिराळ्या समाज-वर्गांत समुद्राइतके अंतर आहे.

कदाचित् अभ्यासू आणि चौकस अमेरिकन प्रवासी आमची जास्त माहिती मिळवीत असतील. आपल्या स्नेही-परिवारांत विविध ज्ञाती, पंथ, धर्म आणि प्रांतांतील स्नेही असतील. त्यांना घरी बोलवा आणि त्यांच्या घरी जा. त्यांच्या संस्कृतीविषयी माहिती विचारा आणि आपल्या संस्कृतीची माहिती त्यांना द्या.

व्यक्ती या दृष्टीने समाजात मानसिक एकात्मता आणि भावबंधन वाढ-विण्याच्या दृष्टीने व परस्परांविषयीचे गैरसमज घालविण्याच्या दृष्टीने आपण सर्व निदान एवढे तरी करू शकू. [—जून १९६०]

## ९५. अयशस्वी जीवनापासून मार्गदर्शन

**ज्यांचे** जीवन यशस्वी झाले आहे अशांचा जगात बोलबाला फार होतो. त्यांची चरित्रे लिहिली जातात. मुलाखती प्रसिद्ध होतात. आत्मचरित्रे लिहून

तेही आपल्या आठवणी लिहितात. ग्रंथालयातील एक मोठा विभागच तयार होतो ! काहींना स्फूर्ती मिळते.

सामान्य माणसे ही चरित्रे वाचतात. पण पुष्कळांना स्फूर्तीपेक्षा एक प्रकारच्या निराशेचीच जाणीव होते. कुठे हे थोर पुरुष व कुठे आपण ! त्यांचे गुण आपल्या ठिकाणी नाहीत. त्यांच्यासारखे यशस्वी होणे आपल्याला शक्य नाही. चरित्रातील थोर पुरुषांची समर्थता आणि आपली असमर्थता यांचीच जाणीव आपणाला जास्त होते.

अशा माणसांनी थोडा उलट प्रयोग करून पाहावा. यशस्वी व्यक्तींच्या जीवनापेक्षा अयशस्वी व अतिसामान्य व्यक्तींच्या जीवनाचा अभ्यास करावा. ही माणसे जीवनात यशस्वी का झाली नाहीत ? कोणत्या गुणांमुळे त्यांचे पाय मागे ओढले गेले ? कोणत्या दोषांमुळे त्यांच्या गुणांचा उपयोग झाला नाही ? या गोष्टींचा विचार करावा. अशा लोकांची चरित्रे लिहिली गेली नसल्यामुळे आपल्या आजूबाजूच्या समाजातील अयशस्वी व्यक्तींचाच अभ्यास आपणांला करावा लागेल.

असा अभ्यास आपल्या जीवनात सुधारणा करण्याच्या दृष्टीने फार मार्गदर्शक ठरेल. ज्या दोषांमुळे इतर व्यक्ती यशस्वी झाल्या नाहीत ते दोष कसे टाळता येतील, याचा विचार करून आपल्या जीवनाचा कार्यक्रम सुधारता येईल.

[—जुलै १९६०]

## ९६. कालाय तस्मै नमः।

**मागल्या** महिन्यात वर्तमानपत्रातील एक चित्र पाहून माझ्या तोंडून न कळत उद्‌गार बाहेर पडले—

कालाय तस्मै नमः । कालपुरुषाला नमस्कार असो.

आफ्रिका खंडातील कांगो प्रदेशातील एका शहरात दोन निग्रो सैनिक हातातील वंदूक रोखून चालले आहेत. त्यांच्यापुढे पायातील बूट काढून ते दोनही हातांत दोन असे उंच धरून एक गोरा युरोपियन मनुष्य अनवाणी चालला आहे. त्याला पोलिस-ठाण्याकडे नेले जात आहे. शे-दोनशे वर्षे ज्या गोऱ्यांनी साम्राज्यशाहीच्या गर्वाने मदोन्मत्त होऊन राज्य केले त्यांनाच आज हातांत जोडे घेऊन पोलिस-ठाण्याकडे खेचले जात आहे ! !

'मना सांग बा रावणा काय झाले ? अकस्मात ते राज्य सर्वही बुडाले' कारण "वळे लागला काळ हा पाठिलागी ।।" रावण गेला, कंस गेला, हिटलर गेला,

मुसोलिनी गेला ! जुलूम, क्रौर्य, अहंकार, रक्तपिपासा आणि साम्राज्यतृष्णा असणारे राज्यकर्ते येतात, क्षणभर त्यांचा उत्कर्ष झाल्यासारखा वाटतो; पण काळाच्या पोटात ते गडप होतात.

पण काळ म्हणजे यदृच्छा आणि निष्क्रियता नव्हे. काळ म्हणजे त्या काळातील प्रभावी विचार, सामर्थ्यवान कल्पना, प्रभावी तत्त्वज्ञान. हे विचार, हे संदेश वाचून जे त्यागपूर्वक प्रयत्न करतात त्यांच्या बाजूने काळ काम करीत असतो.

समता, स्वातंत्र्य आणि माणुसकी हा आजच्या काळाचा संदेश आहे. तो तुम्हांला आकलन झाला आहे काय ? [—ऑगस्ट १९६०]

## ३७. दुःखी चित्रपटांवर पैसा !

**लहान** मुलांची दुःखे पाहून कोणाच्या अंतःकरणाला पाझर फुटणार नाही ! त्यातून बालपण आणि दारिद्र्याची आपत्ती या दोन गोष्टी एकत्र आल्या म्हणजे कठोर अंतःकरणाच्या माणसालाही सहानुभूती व करुणा वाटते.

गरीब बालकांविषयीच्या वाटणाऱ्या सहानुभूतीचा पूर सध्या चित्रपट-सृष्टीमध्ये दुथडी भरून वाहात आहे ! काही लोकप्रिय चित्रपटांकडे लक्ष टाकले असता ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस येईल. सर्वच चित्रपटांची मला माहिती नाही; परंतु 'बूटपॉलिश' 'तुफान और दिया', 'धूल के फूल' इ. चित्रपटांत दारिद्र्याशी स्वाभिमानाने झगडणाऱ्या गरीब मुलांची दुःखे चित्रित केली आहेत, हे वरवर पाहणारांनाही दिसते. पुष्कळसे चित्रपट यशस्वी झाले आहेत. त्यांचे श्रेय त्यांतील कलावंत, दिग्दर्शकांना निश्चितपणे आहे. त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहे.

ही चित्रे व त्यांतील प्रसंग पाहून प्रेक्षकांची मने हेलावली जातात. त्यांना दुःखितांविषयी सहानुभूती वाटू लागते. दुःखितांविषयी वाटणारी ही नैसर्गिक सहानुभूती चित्रपटांच्या आर्थिक यशात भरच घालते.

परंतु हे सर्व पाहिल्यानंतर प्रश्न असा उभा राहतो की, गरीब मुलांची दुःखे रंगवून ज्यांनी खूप पैसा मिळविला त्यांनी या गरिबांकरिता स्वतः किती आर्थिक त्याग केला ? स्वतःला झालेल्या प्राप्तीपैकी एक लहानसा अंश तरी गरीब मुलांची दुःखे कमी करण्याकरिता खर्च झाला काय ? मुलांची दुःखे पाहून प्रेक्षकांचे डोळे पाण्याने भरले आणि कलावंत-दिग्दर्शकाचे खिसे पैशाने भरले ! अखेर शिल्लक काय राहिले ? गरीब मुलांची दुःखे आहेत तशीच आहेत. दारिद्र्याशी चाललेला त्यांचा झगडा चालूच आहे. प्रासंगिक दुःखांची चित्रे विसरून गेल्यानंतर प्रेक्षकांच्या लक्षात राहिलेल्या गोष्टी म्हणजे नटांच्या व नटींच्या केसांच्या व कपड्यांच्या अद्ययावत् पद्धती !

विधायक दृष्टीने सूचना करावयाची झाल्यास असे सुचविता येईल की, गरिबांची दुःखे रंगवून ज्यांनी खूप पैसा मिळविला त्यांनी त्यातील काही भाग तरी आपल्या कल्पनेप्रमाणे या दुःखांचे निर्मूलन करण्याकरिता खर्च करावयास हवा. त्यांनीही थोडा त्याग करावयास हवा; नाहीतर दुःखितांची चित्रे रंगवून स्वतःचे खिसे भरले, बंगले बांधले आणि मोटारी उडविल्या एवढाच त्यांचा इतिहास राहील.

[—सप्टेंबर १९६०]

# ९८. दैव आणि पुरुषार्थ यांचा मेळ

**एकदा** बाहेर जातांना सहज खिशात हात गेला आणि रिकामे पाकीट बाहेर आले. नकळत मुखातून शब्द निघाले—

**दैवानुसार मिळते धन आणि जाते ॥**

लहानपणी पाठ केलेले हे चारुदत्ताचे उद्‌गार पुनः एकदा आठवले.

**" नाही खरे विभवनाशज दुःख माते । दैवानुसार मिळते धन आणि जाते ॥**
**हे दुःख फार मज नष्टधनास सारे । झालेच मित्र पण सोडुनि पाठमोरे ॥"**

आपल्या जीवनात दैवाचा भाग किती आणि पुरुषार्थाचा वाटा किती, याचा विचार प्रत्येकाला आपापल्या अनुभवाने करून निर्णय घ्यावा लागतो. त्यात कोणी पूर्ण दैववादी होतात; कोणी एकान्तिक प्रयत्नवादी होतात. माझ्या मताने आणि अनुभवाने—या दोन्हींचे मिश्रण म्हणजे जीवनात यश व अपयश.

याज्ञवल्क्य-स्मृतीत एक उत्कृष्ट वचन आहे. ते असे—

**यथा ह्येकेन चक्रेण रथस्य न गतिर्भवेत् । तथा पुरुषकारेण विना दैवं न सिद्धयति ॥**

रथ जसा एका चाकाने चालू शकत नाही तसे अनुकूल दैवही मानवी प्रयत्नावाचून फल देत नाही.

दैव कधी अनुकूल, कधी प्रतिकूल असा निम्मा निम्मा भाग धरला तरी नेमक्या प्रतिकूल दैवाच्या वेळी प्रयत्नाला अपयश येईल; परंतु ऐन अनुकूल दैवाच्या वेळी प्रयत्न नसला तरीही अपयशच येईल.

म्हणजे प्रयत्न सतत असला तरच निदान शेकडा पन्नास प्रमाणात यश येण्याचा संभव तरी आहे. दैव आपल्या हातात नाही; पण प्रयत्न आपल्या हातात आहे.

म्हणून मी स्वतः पुरुषार्थवादी आहे. जीवनात आशावादाचा प्रचार करणे हे माझे " मिशन " आहे.

[—नोव्हेंबर १९६०]

# ९९. मानसिक विश्रांती

**आपल्या** संसाराच्या रोजच्या जीवनात मनाला अनेक विकारांचे हेलकावे बसत असतात. मनुष्य लहान असो अथवा मोठा असो, सार्वजनिक क्षेत्रांत अनेक भावनांचे धक्के बसत असतात. काही स्वतःच्या दोषांमुळे असतात. काही इतरांच्या दोषामुळे असतात. राग, लोभ, मद, मत्सर, आनंद, दुःख यांच्या कमी-अधिक आक्रमणापासून कोणीही सुटलेला नाही.

या सर्व विचारांचा मनावर ताण पडत असतो. त्यांच्यामुळे मनाला थकवा येतो. माणसाच्या नसा प्रक्षुब्ध होतात. आणि अशीच स्थिती सतत चालू राहिली तर मानसिक विकृती जडतात. आधुनिक सुधारणेच्या संस्कृतीमध्ये मानसिक विकारांचे प्रमाण अधिक अधिक वाढत चाललेले आहे, त्याचे कारण मनावर सतत पडणारा ताण हे आहे.

पूर्वीच्या सामाजिक जीवनात कळत नकळत मानसिक विश्रांतीची योजना केलेली असे. जीवनातील काही काळ तरी सांसारिक व सामाजिक प्रक्षोभापासून अलिप्त अशा स्थितीत काढण्याची योजना असे. पूजा-अर्चा, जप-जाप्य, भजन, पोथी-वाचन, देव-दर्शन, इत्यादी धार्मिक कार्यक्रमांमुळे मनाला एक प्रकारची विश्रांती मिळत असे. आज या गोष्टी फार वेगाने नष्ट होत चाललेल्या आहेत.

परंतु मानसिक विश्रांतीचे नवे नवे प्रकारही निर्माण होत आहेत. त्यांचा योग्य तऱ्हेने उपयोग करून घेतल्यास मानसिक विश्रांतीचा फायदा मिळू शकेल. संगीत-साधना, चित्रकला-व्यासंग, दुर्मिळ वस्तूंचे संग्रह, बागकाम इत्यादी प्रकारचे नवीन नवीन छंद वाढविण्यासारखे आहेत. यांपैकी एक-दोन छंदांचे संवर्धन केल्यास त्यांच्यापासून मानसिक विश्रांतीचा पुष्कळ फायदा मिळू शकेल.

सांसारिक धकाधकीपासून अलिप्त असा थोडा वेळ दररोज घालविणे अगदी जरूर आहे. मग तो जुन्या पद्धतीने घालवावा किंवा नवीन पद्धतीने. वरीलपैकी जुने व नवे काहीच शक्य नसेल तर डोळे मिटून शांत जागी बसा आणि थोडा वेळ प्राणायाम करून मन निर्विकार करण्याचा प्रयत्न करा. थोड्याच वेळात मन ताजेतवाने झाल्याचा अनुभव तुम्हांला येईल. विद्यार्थी, तरुण आणि वृद्ध, अशा सर्वच लोकांना अशा मानसिक विश्रांतीची आवश्यकता आहे.

[—डिसेंबर १९६०]

## १००. तुमची किंमत

**प्रत्येक** मनुष्य आपापल्या परी मोठा असतो. त्याचे मोठेपणाचे क्षेत्र कधी लहान असेल, कधी विस्तृत असेल. कोणी आपल्या टोळीत मोठा, कोणी कुटुंबात, कोणी जातीत, समाजात, गावात अशा निरनिराळ्या क्षेत्रांत प्रत्येकाचे मोठेपण असते. ते स्वयंसिद्ध, वास्तविक व खरेही असते.

पण जगात दोन प्रकारचे लोक असतात. काही तुम्हांला वाजवीपेक्षा मोठे समजतात, गौरव करतात, मान देतात, स्तुती करतात, पूजा वाहतात. उलट काही तुम्हाला अगदी क्षुद्र आणि तुच्छ लेखून उपहास करतात.

दुसऱ्याच्या मतावर जगणारा मनुष्य या दोन टोकांच्या पूजक-निंदकाच्या हिंदोळ्यावर हेलकावे खात असतो. कधी स्तुतीने चढतो, लगेच नालस्तीने पडतो.

आपली वाजवी किंमत आपणच मनाशी ठरवून टाकावी. म्हणजे स्तुती-निंदेत किती बेरीज-वजाबाकी करावयाची, ते आपले आपल्यालाच समजते. मग गौरवाने किंवा उपहासाने चढण्याचा वा पडण्याचा प्रसंगच येत नाही.

आपले मोजमाप आपल्याला माहीत असावे.

[—जानेवारी-१९६१]

## १०१. तुम्हीही लेखक व्हाल!

**प्रत्येक** व्यक्तीचे जीवन ही एक कादंबरीच असते. सुखःदुःखांचे, योगा-योगांचे, साहसाचे, वैचारिक आंदोलनांचे, मोहाला बळी पडल्याचे अथवा मोहाचा बळी दिल्याचे, विविध प्रकारच्या स्वभावांच्या परिचयाचे—असे अनेक प्रसंग तुमच्या, माझ्या, मित्रांच्या, शेजाऱ्यांच्या—प्रत्येकाच्या जीवनात आलेले असतात.

या प्रसंगांचा मालमसाला उपयोगात आणून त्यातून अनेक प्रकारचे वाङमय निर्माण करता येईल. त्यांची दीर्घ व लघु कादंबरी होईल. त्यांतून अनेक लघुकथा निघू शकतील. त्यांच्या आधाराने जीवनातील विविध अंगांवर अनेक तात्त्विक निबंध तयार होऊ शकतील.

असे अनेक ग्रंथकार आहेत की, त्यांच्या उभ्या जीवनात त्यांनी एक-दोनच साहित्यकृतींना जन्म दिला आणि त्याच, एक-दोन असल्या तरी, यशस्वी झाल्या. कै. वीर वामनराव जोशी यांचे उदाहरण मला फार वारंवार आठवते. त्या पुरुषाने आयुष्यात प्रथमच नाटक लिहिले—' राक्षसी महत्त्वाकांक्षा ". पण त्या काळी हे नाटक इतके लोकप्रिय व नाटक मंडळीला द्रव्यदायक होते की कल्पना येणार नाही.

कै. चिंतामणराव वैद्य हे संशोधक व गद्यलेखक. पण त्यांची "दुर्दैवी रंगू" ही एकच कादंबरी लोकप्रियतेच्या दृष्टीने सुदैवी ठरली.

जीवनातील हा मालमसाला वापरून त्याच्यावर चिंतन करून तो कागदावर उतरविणारा लेखक ठरतो. बाकीचे इतकी मेहनत घेत नाहीत. एरव्ही लेखक होण्याची सुप्त शक्यता प्रत्येकात असते.

व्यवसाय म्हणून लेखन करणाऱ्या धंदेवाईक लेखकांप्रमाणेच अशा हौशी लेखकांची समाजाला गरज आहे. किंबहुना या दुसऱ्या लेखकांच्या साहित्यकृतीत सामाजिक जीवनाचे खरे चित्र प्रतिबिंबित होत असते.

प्रयत्न करा. आपल्या अनुभवांवर चिंतन करा, विचार करा. मग हातात लेखणी घ्या. तुम्हीही लेखक व्हाल. लेखक काही आभाळातून पडत नाहीत. तुमच्या-आमच्या सामान्य माणसांतूनच निर्माण होतात.

[—फेब्रुवारी १९६१]

## १०२. शिक्षक व पक्षराजकारण

**शिक्षकांनी** राजकारणात भाग घ्यावा की नाही, हा प्रश्न आज उपस्थित झाला आहे. प्रत्येक समाजात व प्रत्येक युगात तो निर्माण होतो व त्यावर निर्णय घ्यावा लागतो.

स्वतंत्र राष्ट्राच्या राजकारणात दोन भाग पडतात. एक भाग म्हणजे राजकीय पक्षांची संघटना व सत्तासंपादनाची चुरस. दुसरा भाग राज्ययंत्रामार्फत समाजाची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उन्नती घडवून आणणे.

शिक्षकांनी पक्षनिष्ठ राजकारणात भाग घेऊ नये; परंतु आर्थिक-सामाजिक-शैक्षणिक उन्नतीच्या कामात अवश्य भाग घ्यावा. एखाद्या पक्षाचा सभासद म्हणून नव्हे तर स्वतंत्र नागरिक म्हणून समाजहिताकरिता विधिमंडळे, स्थानिक स्वराज्य, ग्रामपंचायती इत्यादी क्षेत्रांत शक्य ते काम करावे.

पक्षाचा सभासद झाल्याने त्याची शिक्षक ही भूमिका जाऊन तो प्रचारक बनतो. अध्यापकाचे वैशिष्ट्य म्हणजे बुद्धिस्वातंत्र्य, वैचारिक मार्गदर्शन, निःस्पृह टीका, सांगोपांग व सोपपत्तिक विचार मांडणी—हे आहे. उलटपक्षी पक्षाचा सभासद झाला म्हणजे साचेबंद मतप्रणालीने बांधलेला व त्या मताचा प्रचार करण्यास जुंपलेला प्रचारक अशी भूमिका घ्यावीच लागते.

शिक्षक हा अपरिपक्व बुद्धीच्या विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक असतो. सर्व मता-मतांचे गुणावगुण व पक्षोपपक्षांचे विचार विद्यार्थ्यांपुढे मांडून त्यांच्या बुद्धीला व्यापक

चालना देणे हे त्याचे कर्तव्य असते. पक्षाला बांधलेला शिक्षक मतप्रचारक होईल परंतु तो स्वतंत्र बुद्धीला चालना देणारा मार्गदर्शक होणार नाही.

शिक्षक हा समाजाचा व राज्यकर्त्यांचाही मार्गदर्शक व निःस्पृह टीकाकार असतो. पक्षाला बांधलेला अध्यापक अशी कामगिरी करू शकणार नाही.

माझे स्पष्ट मत आहे की, शिक्षकांनी स्वतःला कोणत्याही राजकीय पक्षाला व मतांना बांधून घेऊ नये. स्वतंत्र राहून मुख्यतः शैक्षणिक व सवडीच्या वेळी विधायक सार्वजनिक काम करावे.

[—मार्च १९६१]

## १०३. माणसे मोठी—दृष्टी छोटी!

**कालाचा** प्रवाह अखंडपणे चालू आहे! माणसे जन्माला येणे, ती लहानाची मोठी होणे, जुन्या पिढीत जमा होणे! त्यांच्याच देखत नवी पिढी जन्माला येणे, ती लहानाची मोठी होणे, तीही जुन्या पिढीत जमा होणे; हे चालत आले आहे—चालत राहील.

जन्मलेला माणूस लहानाचा मोठा होतच असतो. वयाने आणि कर्तबगारीने ज्याच्या त्याच्या मानाने जो तो मोठा होत असतो. हे सर्व त्याच्या आधी जन्मलेल्या मोठ्या माणसांच्या दृष्टीपुढे घडत असते.

लहान व्यक्तीत विकास होत असला तरी तिला पाहणाऱ्या मोठ्या माणसांच्या दृष्टीत विकास होत नाही. त्यांना नवीन पिढी लहानच दिसते. मोठी होत आहे, झाली आहे, हे लक्षात येत नाही.

म्हणून आपल्या देखत लहानाचा मोठा झालेला माणूस असला तरी त्याचे मोठेपण अनेकांना दिसत नाही. त्यांना लहानासारखेच पाहिले जाते, मानले जाते, वागविले जाते, कधी कधी तुच्छतेने आणि हीनपणाने लेखिले जाते.

नेमकी हीच गोष्ट नव्या पिढीला बोचते आणि येथेच जुन्या-नव्या पिढीचा संघर्ष सुरू होतो.

मोठ्या माणसांनीही लहान माणसातील मोठेपण पहाण्याची सवय करावी. आपले लहानपण आठवावे आणि त्या वेळच्या मोठ्या माणसांनी आपल्या बाबतीत केलेली चूक टाळावी. लहान माणसांच्या मोठेपणाला मान द्यावा, कौतुक करावे, प्रोत्साहन द्यावे.

[—एप्रिल १९६१]

## १०४. उलटणारे शत्रू

**शाळेत** संस्कृत शिकताना मी भर्तृहरीचे नीतिशतक वाचले व पाठ केले. त्यात "मूर्ख" आणि "दुर्जन" माणसांचे अनेक उल्लेख आलेले आहेत. वाचले त्यावेळी फारसे समजले नाही; पण नंतर आयुष्यात कवीने वर्णन केलेली लक्षणे काही माणसांना कशी लागू पडतात ते अनुभवाला आले.

आपण स्वत: कितीही सरळ वागलो तरी आपल्याशी वाकडे वागून शत्रुत्व करणारी काही माणसे असतात. यात काही 'अकारण' शत्रू असतात. तर काही 'स्वार्थप्रेरित' शत्रू असतात. यांतील काही लोक तुमचा सर्व प्रकारे फायदा घेऊन उपकृत झालेले असतात; पण फायदा मिळण्याचे बंद झाल्याबरोबर उलटतात; यांना 'उपकृत शत्रू' म्हणता येईल. दीर्घकाळ यांच्या उपयोगी पडावे; पण तुमचा उपयोग संपला की, हे उलटलेच.

यांच्याशी वागावे कसे, हेच कळत नाही, खंत वाटते आणि उद्वेग येतो. स्थितप्रज्ञता अंगी असेल तरच मन शांत राहू शकते.

अशा माणसाकडे दुर्लक्ष करावे; पण आपल्या कामाच्या आड ते येत असतील तर एकदोनदा सामोपचाराने सांगून पहावे. यातून सुधारणा झाली नाही तर उपलब्ध अशा सर्व योग्य कायदेशीर साधनांचा उपयोग करून या उपकृत शत्रूंना सरळ करावे. मूर्खांना व दुर्जनांना सामोपचारापेक्षा कायद्याची व सामर्थ्याचीच भाषा कळते त्याला आपला तरी काय इलाज?

[—मे १९६१]

## १०५. नापासांचे सांत्वन

**जून** महिना हा परीक्षांच्या निकालाचा, म्हणजे बहुसंख्य विद्यार्थी नापास होण्याचा! बहुतेक निकाल ४० ते ४८ टक्के असतात. म्हणजे ५२ ते ६० उमेदवार नाउमेद होण्याचा हा महिना. काही पास, बरेचसे नापास, त्यामुळे आशा-निराशा, आनंद-विषाद, उत्साह-खिन्नता अशा भावनांच्या उधाणाचा हा महिना. एक लाख विद्यार्थी परीक्षेला बसले तर आईबाप, बहीण भाऊ, नातेवाईक उमेदवार—मिळून पाच-सहा लाख जनता या भावनांत ढवळून निघते.

नापास होणारांत शेकडा १० टक्के चुकारपणा व उनाडपणामुळे नापास झालेले असतात, त्यांच्याबद्दल मला मुळीच सहानुभूती नाही. त्यांना योग्य तेच प्रायश्चित्त मिळते.

परंतु बाकीच्या ४०–५० टक्के उमेदवारांत अनेकजणांनी प्रयत्नपूर्वक व आस्थापूर्वक तयारी केलेली असते. एक दोन विषयांत ते नापास झालेले असतात. पण निकालाच्या सांप्रदायिक पद्धतीमुळे ते संपूर्ण नापास समजले जातात. खरोखर त्यांच्यात नापासापेक्षा पासाचा अंश अधिक असतो. एखाद-दुसऱ्या विषयात नापास म्हणजे संपूर्ण नापास अशी आपल्या परीक्षांची पद्धती आहे. इंग्रजांनी ती रोवली; पण आपण अद्याप तिला चिकटून आहोत.

या नापासपणाला विद्यार्थ्यांच्या आटोक्याबाहेरच्या अनेक गोष्टीही कारणीभूत असतात. आर्थिक परिस्थिती, उपलब्ध तोटकी साधनसामग्री, आणि परीक्षेच्या वेळचा योगायोग—याही गोष्टी अपयशाला कारणीभूत असतात.

समाजातील बहुसंख्य कामे याच पातळीच्या लोकांकडून होत असतात. पोस्ट, रेल्वे, सैन्य, कचेऱ्या, आरमार, व्यापार–इत्यादी क्षेत्रांत कामे करणारे हेच लोक असतात. परीक्षेत थोड्या कमतरतेमुळे नापासाचा शिक्का बसलेला असला तरी जीवनात यशस्वी झालेले असे अनेक तरुण आहेत.

नापास विद्यार्थ्यांनो ! निराश होऊ नका. पुनः प्रयत्न करा. पण पूर्व अनुभव जमेला धरून आता अचूक प्रयत्न करा. पुनः पुनः नापास होऊन परीक्षेचे वारकरी बनू नका. जीवनात तुम्हाला यश मिळो.

[—**जून १९६१**]

## १०६. कृतज्ञतेचा गहिवर

**पुण्यात** जन्माला येऊन याच शहरात त्रेसष्ट वर्षे राहिल्यामुळे मी खरा पुणेकर आहे ! मधुकरी, वर्तमानपत्र-विक्री, लग्न मुंजीची दक्षिणा, स्वावलंबनकामे आणि केवळ भटकणे–अशा अनेक निमित्तांनी या गावच्या सर्व भागांशी माझे विद्यार्थी-जीवन निगडित झाले आहे. संस्थेच्या कामाच्या निमित्ताने प्रौढ वयात ते अधिकच एकरूप झाले आहे.

पुण्यावर इतिहास-कालात अनेक आपत्ती येऊन गेल्या आहेत. दैवी आणि मानवी. कधी दुष्काळ, अवर्षण आणि महापूर; तर कधी शत्रूने अथवा स्वकीयांनीच केलेली लूटमार आणि जाळपोळ ! या सर्वांतून पुनः पुनः पुण्याने डोके वर काढले आहे.

१२ जुलै या दिवशी आलेली आपत्ती म्हणजे पौराणिक जलप्रलयच ! पुण्यातील प्रत्येक कुटुंब प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे या पुराच्या आपत्तीत सापडले आहे. कोणी स्वतः तर कोणाचे नातेवाईक, मित्रमंडळी, ज्ञातिबांधव.

परंतु या पुण्याचे भाग्य असे की, महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून सहानुभूतीचा आणि साहाय्याचा पूर लोटला आहे. पुण्याबाहेर जलप्रलयाची वार्ता कळताक्षणीच आपल्या आश्रमानेच दोन वाजता अगदी प्रथम आणि पहिले मदत-केंद्र सुरू केले आणि विद्यार्थ्यांना गावात धान्य जमवायला पाठवून रात्रीपर्यंत १३०० लोकांना जेवू घातले. पण दुसऱ्या दिवसापासूनच अन्न, धान्य आणि कपडे यांचा ओघ अख्ख्या महाराष्ट्रातून पुण्याकडे सुरू झाला.

महाराष्ट्राच्या या प्रेमामुळे पुणेकरांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले आहेत. पानशेत-खडकवासल्याच्या पाण्याचा लोंढा प्रचंड होता खरा. पण त्याने पुण्याचा तिसरा भाग व्यापला; पुणेकरांना आलेल्या प्रेमाच्या गहिवराने ओघळणाऱ्या या अश्रूंचा लोंढा हा प्रचंड आहे. त्याने संपूर्ण पुणे व्यापले आहे.

महाराष्ट्र पुण्याच्या मदतीला धावून आला.

पुणेकर महाराष्ट्राला कधीही अंतर देणार नाहीत.

[—जुलै १९६१]

## १०७. निवडणुकीचे रहस्य

**आपल्या** देशात अनेक शतके एकतंत्री शासनपद्धती चालत आलेली आहे. राजासारख्या एखाद्या व्यक्तीची सत्ता मान्य करून तिच्याविषयी निष्ठा दाखविणे ही परंपरा आहे. देशात लोकशाही स्थापन झाल्यापासून या नवीन पद्धतीकडे आपल्याला वाटचाल करावयाची आहे.

लोकशाही याचा खरा अर्थ अद्याप बहुसंख्य प्रजेला समजलेला नाही. 'भला' निवडून देणे किंवा 'आपल्या आवडत्या पुढाऱ्याला' निवडून देणे हीच लोकशाही समजली जाते, आणि ह्याच्या उलट निवडणुकीचा निकाल विरुद्ध लागल्यास चिडून जाऊन वाटेल त्या गैरकायदा गोष्टी करणे ही प्रवृत्ती समाजात दिसून येते.

अलीगड जिल्ह्यात मूरसान या गावी निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवाराचा व त्याचे तीन भाऊ व दोन पुत्र यांचा पराभूत उमेदवारांच्या लोकांनी गोळ्या घालून खून केला ! दोन मुले पळाली म्हणून वाचली. ही केवळ पंचायतीची निवडणूक होती.

निवडणुकीत जय मिळविण्याची पराकाष्ठा करावी; पराजय झाला तरी तो आनंदाने स्वीकारून विजयी उमेदवाराचे अभिनंदन करावे ही लोकशाहीची

खरी प्रथा आहे, " पाचामुखी परमेश्वर " या न्यायाने बहुमताचा कौल तो अखेर निकाल, असे समजून तो उदार मनाने स्वीकारणे ही खरी लोकशाहीची भूमिका.

लोकशाहीसंबंधीचे हे विचार वातावरणात सतत पसरत ठेवले पाहिजेत. आपल्या विचारांचा, जीवनाचा आणि कृतीचा संसार लोकशाहीच्या तत्त्वांवर उभारला पाहिजे. असे न केल्यास देशात हुकूमशाही येण्याचा फार धोका आहे.

[—ऑगस्ट १९६१]

## १०८. माणसांतील फरक आणि त्यांची पारख

लहान मुले अज्ञान आणि मोठी माणसे शहाणी, अशी आपली सामान्यपणे समजूत असते. ही समजूत बरोबर नाही, हे आकलन व्हायला काही काळ लागतो.

वयाप्रमाणे माणसाची वाढ होते, ही गोष्ट खरी; परंतु ती मुख्यतः शारीरिक असते व ती आपल्या लक्षात येते. या वाढीप्रमाणे माणसाकडून शहाणपणाची, विचारांची, समजूतदारपणाची व नीतिमत्तेची आपण अपेक्षा करतो आणि कधी कधी निराशा पदरी येते.

माणसाच्या वाढीचे अनेक पैलू आहेत. शरीर हा त्यापैकी एक. बुद्धी, मन आणि नीतिमत्ता हे इतर महत्त्वाचे तीन पैलू आहेत. शरीरवाढ जशी सर्वांची सारखी नसते त्याचप्रमाणे बौद्धिक, मानसिक आणि नैतिक वाढीतही त्याच वयाची माणसे खालच्या किंवा वरच्या पातळीवर असतात. हा न्याय लक्षात ठेवून आपल्या भोवतालच्या माणसांची पारख करून ती मनात ठेवावी आणि त्या अनुरोधाने त्यांच्याशी व्यवहार करावा.

शरीर, बुद्धी, मन आणि नीतिमत्ता या चारही बाबतीत एकच मनुष्य कमी-जास्त वाढीचा असू शकतो. बुद्धिमान मनुष्य नीतिमान असेलच असे नाही आणि मनाने उदार असा मनुष्य फार मोठ्या बुद्धीचा असेल असेही नाही. शरीराने धिप्पाड दिसणारा मनुष्य मनाने खंबीर असेलच असे नाही.

प्रत्येक माणसाची बौद्धिक, नैतिक व मानसिक पातळी ओळखून त्याच्याशी व्यवहार करा, म्हणजे निराशेचा प्रसंग येणार नाही. या चतुर्विध विकासाच्या दृष्टीने स्वतःही प्रयत्न करावा.

[—सप्टेंबर १९६१]

# १०९. सुशिक्षितांची दिनचर्या

प्रत्येक पिढी-पिढीला समाजामध्ये बदल होत असतो. काही बदल परिस्थितीने घडून येत असतो, आणि काही प्रयत्नाने बुद्धिपुरस्सर घडवून आणावा लागतो. ज्या समाजातील विचारी लोक आपल्या जीवनात विचारपूर्वक बदल घडवून आणतात तीच समाज जिवंत, सुखी व समाधानी राहतो. केवळ परिस्थितीला शरण जाणारा व विचार न करता प्रवाहाप्रमाणे चालणारा समाज असमाधानी व दुःखी राहातो.

गेल्या तीस-चाळीस वर्षांत समाजातील प्रत्येक थरातील व्यक्तीचे जीवन बदललेले आहे. ह्या बदलत्या काळात समाजातील सुशिक्षित वर्गांनी आपल्या दैनंदिन जीवनाला विचारपूर्वक असे किती वळण लावलेले आहे, या गोष्टीवर प्रत्येक सुशिक्षिताने चिंतन केले पाहिजे. या दृष्टीकोनातून प्रत्येक सुशिक्षित व्यक्तीने आपल्या दिनचर्येचे सिंहावलोकन करणे बोधप्रद होईल.

सकाळी उठल्यापासून रात्री निजेपर्यंतच्या आपल्या कार्यक्रमांत अनेक गोष्टींचा समावेश केलेला असतो. शारीरिक स्वच्छता व शरीरपोषण ह्या गोष्टींकडे आपण सुशिक्षित अधिक लक्ष देऊ लागलो आहोत. दररोज दाढी करून साबण लावून स्नान करणे; लाँड्रीतून स्वच्छ धुऊन आलेले कपडे परिधान करणे इत्यादी काळजी घेऊन आपण स्वच्छतेचे नियम पाळतो. जीवनसत्त्वांनी युक्त असा चौरस आहार घेण्याचा आपला कटाक्ष असतो. या गोष्टी चांगल्या व इष्ट आहेत व त्यांचे अनुकरण समाजातील प्रत्येक थरातील व्यक्तीने करावे, अशा त्या आहेत.

शारीरिक स्वच्छता व पोषण याबरोबरच मनाची स्वच्छता आणि मनाचे पोषण या गोष्टींकडेही आपल्या दिनचर्येत किती वेळ दिला जातो, ते प्रत्येकाने पाहावे. पूर्वीच्या समाज-नेत्यांनी शुचिर्भूतता आणि पोषण या बाबतीत शरीर आणि मन या दोन्हींकडे लक्ष दिले होते. शरीराचे स्नान झाल्याबरोबर मनालाही विचारांचे स्नान घालण्याच्या दृष्टीने पवित्र ग्रंथांचे पाठांतर किंवा वाचन अशी सांगड घातलेली असे. भोजनाला प्रारंभ करण्यापूर्वी मनाचेही नैतिक पोषण होण्याच्या दृष्टीने प्रार्थना किंवा चांगल्या विचारांचा उच्चार व्हावा अशी योजना केलेली असे.

कालमानाप्रमाणे वाचनाचे, विचाराचे व चिंतनाचे विषय बदलतील; परंतु त्यांची आवश्यकता बदलू शकत नाही. सुशिक्षितांनी आपल्याला पटेल अशा नैतिक आणि आचारप्रधान ग्रंथांच्या वाचनाचा समावेश आपल्या दिनचर्येत केला पाहिजे.

सद्‌विचारांचे वाचन हे मनाला स्नान घालण्यासारखे आहे. मनाचे नैतिक पोषणही त्यामुळे होते.

या दृष्टीने आपल्या दिनचर्येची पुनर्घटना करू या.

[—ऑक्टोबर १९६१]

## ११०. सदाचाराचे अज्ञान

**सर्वसामान्य** जनतेकडून आणि विशेषत: तरुण विद्यार्थ्यांकडून आपण नैतिक आचाराची अपेक्षा करतो. प्रामाणिकपणा, आस्थेवाईक कर्तव्य, थोरा-मोठ्यां-विषयी आदर अशा अनेक गुणांचे आचरण माणसाने सहज करावे असे वाटते. परंतु ही अपेक्षा पूर्ण होत नाही.

नैतिक आचरणाचे शिक्षण देण्याचे संघटित साधन व संस्था आज अस्तित्वात नाहीत. शाळेच्या वातावरणातून आणि समाजाच्या निरीक्षणातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे जे नीतीचे संस्कार होतात त्यांच्या आधारावर आजच्या समाजाचे नैतिक जीवन चालू आहे.

पेशवे बागेवरून एकदा फिरत फिरत येत होतो. गुलाबाच्या झाडावर खूप फुले होती. काटेरी तारांच्या मधून पलीकडे जाऊन फुले चोरून आणण्याचे शिक्षण एक प्रौढ विद्यार्थी दोन लहान मुलांना देत होता. मी तेथे थांबलो आणि म्हणालो "असे करणे बरे नव्हे.लहान मुलांना चोरीची सवय होते." हे ऐकल्याबरोबर तो प्रौढ विद्यार्थी ओशाळला आणि म्हणाला, "खरे आहे, पण आम्हाला असे कुणीच सांगितले नाही. इतरांचे पाहून आम्हीही तसेच करतो."

सदाचाराचे शिक्षण दिल्यानंतर नैतिक आचरणाची अपेक्षा करणे योग्य आहे. तसे शिक्षण न देता समाजाकडून सद्‌गुणांची अपेक्षा आपण करीत आहोत. सद्‌गुण, सदाचार आणि नैतिक आचरण यांविषयींच्या विचाराचा प्रसार करणे हे आपले प्रत्येकाचे काम आहे. आपापल्या मर्यादित क्षेत्रात ते आपण श्रद्धापूर्वक करू या.

यामुळे दुराचरण पूर्णपणे थांबेलच असे नव्हे. परंतु गुन्हेगारांना अज्ञानाची सबब तरी सांगता येणार नाही.

[—डिसेंबर १९६१]

# १११. दोनच जाती–सज्जन आणि दुर्जन

**जगात** निरनिराळ्या लोकांशी वागण्याच्या दृष्टीने त्यांच्यातील भेदाभेद कसे लक्षात ठेवावेत ही एक व्यावहारिक अडचण असते. सर्वसामान्य माणसाची रीत अशी असते की, दुसरी व्यक्ती कोणच्या जातीची, पोटजातीची, धर्माची, पंथांची, किंवा राजकीय पक्षाची आहे ते पाहून त्याप्रमाणे काही सद्‌गुण किंवा दुर्गुण त्या व्यक्तीच्या ठिकाणी असणारच असे गृहीत धरावयाचे. या वृत्तीमुळे अनेक चांगल्या माणसांवर आपण काल्पनिक दुर्गुण लादतो आणि वाईट माणसांकडून काही सद्‌गुणांची अपेक्षा करतो. अशा आपल्या वृत्तीमुळे आपण इतर व्यक्तींवर अन्याय करतो आणि स्वत:चीच निराशा करून घेतो.

अनेक वर्षे अनुभव घेतल्यावर मी अशा सिद्धान्ताप्रत आलो आहे की, जगात माणसांच्या दोनच जाती आहेत. एक जात सज्जनांची आणि दुसरी जात दुर्जनांची.

समाजातील व्यक्तींची संख्या मोठी असल्याकारणाने व्यवहाराच्या सोयी-करिता लहान लहान गट करून राहण्याची व वागण्याची प्रवृत्ती समाजात अपरिहार्य आहे. जाती, पोटजाती, धर्म, पंथ, व्यवसाय, राजकीय मते, प्रांत इ. निरनिराळ्या तत्त्वांवर लहान लहान समूह करून आपल्याला समान अशा इतर माणसांच्या गटात राहण्याची माणसाची प्रवृत्ती असते. त्यामुळे जातीभेद, वर्णभेद, प्रांतिक भेद इत्यादी निर्माण होतात.

ह्या सर्व भेदांना छेदून जाणारी रेषा ही सद्‌गुण दुर्गुणांची असते. सद्‌गुणी आणि दुर्गुणी माणसे प्रत्येक समूहात असतात. म्हणून माणसांची निवड करताना एकच व्यापक कसोटी डोळ्यापुढे ठेवावी,आणि आपल्या मनाला प्रश्न विचारावा की, हा मनुष्य सज्जनांच्या जातीचा आहे की, दुर्जनांच्या जातीचा आहे ? त्याप्रमाणे त्याच्याशी वागावे.

[—जानेवारी १९६२]

# ११२. शंभरातला एक

**लोकशाहीचा** जिवंतपणा उत्कृष्ट दर्जाच्या व्यक्तींवर अवलंबून आहे. ज्या समाजात असामान्य व्यक्ती पुढाकार घ्यायला पुढे येणार नाहीत, त्या समाजाची उन्नती होणार नाही.

व्यक्ती आणि समूह यांचा संबंध परस्परांना पूरक आणि पोषक असतो. स्वतंत्र विचार निर्माण करण्याचे काम व्यक्ती करू शकते. समूहामध्ये नवीन विचार निर्माण करण्याचे सामर्थ्य नसते. असलेल्या विचारांना थोडीफार मुरड घालणे एवढेच काम समूह करू शकेल. म्हणून नवविचारनिर्मिती करणाऱ्या व्यक्ती समाजात अधिक तयार झाल्या पाहिजेत. अशा व्यक्ती आपापल्या लहानमोठ्या वर्तुळांत आणि समाजात नवनवीन विचार पेरीत असतात.

अशा विचारांना स्थिरता देण्याचे आणि त्यांचा प्रचार करण्याचे काम मात्र समाज करतो. विचारांना व्यावहारिक स्वरूप देण्याकरिता एखादी संस्था निर्माण करून तिच्यामार्फत या विचारांचा प्रसार करण्याचे काम समाज करीत असतो. समाजाच्या व समूहाच्या साहाय्याशिवाय व्यक्तीच्या विचारांचा आणि तत्त्वज्ञानाचा फार मोठा आणि व्यापक विस्तार होऊ शकत नाही.

नवविचार व्यक्ती निर्माण करू शकते. समाज त्या विचारांना स्थिरता देऊन त्यांचा प्रचार करू शकतो. अलौकिक असामान्य व्यक्तींच्या मदतीशिवाय समाजाला नवीन मार्ग दिसू शकणार नाही. समाजाच्या पाठिंब्याशिवाय व्यक्तीचे विचारही निव्वळ कल्पनाक्षेत्रातच राहतील.

अशा व्यक्ती ज्या समाजात निर्माण होऊ शकतात तोच हळूहळू प्रगतीच्या मार्गाने जाऊ शकतो ! स्वतंत्र मार्ग दाखविणाऱ्या व्यक्तींची संख्या घटली की, समाजही एखाद्या साचलेल्या डबक्यासारखा, असलेल्या परिस्थितीतच समाधान मानून घेणारा बनतो.

बाकीचे लोक भलत्याच मार्गाने जात असताना, "बाबांनो, तो मार्ग चुकीचा आहे" असे सांगायला धारिष्ट लागते. नैतिक धैर्य लागते. शेकडा नव्याण्णव लोक धोपट मार्गाने जाणारे असतात. चूक वाटत असली तरी बोलायला धजत नाहीत. कोणी फारसा विचारच करीत नाही. पण अशा शंभरात जो एखादा स्वतंत्र विचार करून चूक दाखवतो व निराळ्या मार्गावरून जायला लागतो त्यावेळी त्याला त्याचे सहविचारी मिळतात आणि समाज हळूहळू प्रगतीच्या मार्गाने जाऊ लागतो.

समाज जेथे चुकतो असे वाटत असेल तेथे निर्भयपणाने ती चूक दाखविण्याचे धैर्य प्रत्येक व्यक्तीने आपल्या अंगी ठेवले पाहिजे, वाढविले पाहिजे. अशा लहान लहान व्यक्तींतून असामान्य पुढारी होण्याची प्रवृत्ती आणि शक्यता समाजात निर्माण होते. खरे वाटते ते बोलण्याचे धारिष्ट ज्यांनी दाखविले त्यांनीच समाजावर उपकार केले आहेत व समाजाला प्रगतीची दिशा दाखविली आहे.

[—एप्रिल १९५९]

# ११३. सामान्य जन आणि अभिरुची

**आजचे** युग सामान्य जनांचे आहे. प्रौढ मतदानाचा अधिकार प्राप्त झाल्यामुळे राजकीय क्षेत्रात बहुजनसमाजाला अधिकाराचे स्थान मिळाले आहे. देश आणि समाज यांविषयी आपल्या कल्पनांत क्रान्ती झाली आहे.

सामान्य माणसाला हे महत्त्व प्राप्त झाल्यामुळे आर्थिक क्षेत्रातही आपला कार्यक्रम बदलला आहे. बहुसंख्य व्यक्तींचे जीवनमान सुधारणे, हे नवे ध्येय समाजाने आपल्यापुढे ठेवले आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या गोष्टी किमान स्वरूपात सर्व नागरिकांना मिळाल्या पाहिजेत, या दृष्टीने कार्यक्रम आणि योजना आखल्या जात आहेत.

राजकीय सत्ता आणि आर्थिक सुधारणा यांच्या खालोखाल सांस्कृतिक जीवनाचा क्रमांक लागतो. किंबहुना सांस्कृतिक पातळी उच्च प्रतीला नेणे हा राजकारण आणि अर्थकारण यांचा अन्तिम हेतू असावयास पाहिजे. पहिली दोन ध्येये जितकी स्पष्टपणे आपल्यापुढे आहेत तितक्या निश्चितपणे सांस्कृतिक ध्येयाच्या कल्पना नाहीत, असे पुष्कळ वेळा वाटू लागते. सामान्य जनांची सांस्कृतिक पातळी बुद्धिपुरस्सर आणि योजना करून उच्च प्रतीला नेण्याच्या कल्पना अद्याप आपल्या समाजापुढे नाहीत.

सांस्कृतिक जीवनात वाङमय, नाटच, कला इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. या क्षेत्रात आतापर्यंत तरी दोन प्रकार पडले आहेत ही गोष्ट खरी. उच्च आणि सामान्य असे समाजाचे दोन वर्ग पडून त्यांच्या कला आणि करमणुकी यांच्यातही तसेच दोन भेद पडलेले दिसून येतात. या दोन प्रकारच्या कलांचे आणि करमणुकींचे संबंध काय असावेत, असा प्रश्न विचारी माणसांपुढे वारंवार उभा राहातो.

राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांत आपले ध्येय असे आहे की, उच्च वर्गीय समाजाला जे अधिकार आणि ज्या सुखसोयी प्राप्त होत्या व आहेत, त्या सामान्य जनांना प्राप्त करून द्याव्यात. त्याचप्रमाणे सांस्कृतिक क्षेत्रातही असावे की नाही ?

कला, नाटच, करमणुकी या क्षेत्रांत जी उच्चता होती तिचा आस्वाद अल्पसंख्य समाजाला न मिळता बहुसंख्य समाजाला मिळावा, हे ध्येय आपण पुढे ठेवावयास हवे व त्या दृष्टीने शिक्षण आणि सदभिरुची यांचा जितका अधिकाधिक प्रसार करता येईल तितका केला पाहिजे.

आता सामान्य जनांच्याही कला-करमणुकी आहेत, त्यांचे काय, असा प्रश्न उभा राहतो. आजकाल त्याही कलांची प्रदर्शने राजाश्रयाने ठिकठिकाणी प्रतिष्ठित-

पणे होत आहेत. त्यांचा आश्रयदाता-वर्ग व कौतुककर्ता वर्गही तथाकथित उच्च समाजात निर्माण होत आहे. या सर्वांची परिणती कशात व्हावी अशी अपेक्षा आहे ? सामान्य जनांची कला आहे अशाच स्वरूपात राहून तिला राजमान्यता मिळावी, की उच्च अभिरुचीच्या आश्रयाला पात्र होण्याकरिता तिच्यातील हीन स्वरूपाचा भाग कमी होऊन सुबोध सात्त्विक भाग राहावा आणि त्याचा आस्वाद सर्व समाजाला मिळावा ? हा दुसरा परिणाम होणे समाजाच्या दृष्टीने अधिक हितावह आहे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, उच्च प्रकारच्या कला-करमणुकींचा आश्रयदाता-वर्ग आता बहुजनसमाज हा झाला आहे. तोच आजच्या भाषेतील राजाश्रय आहे. कलेचा उच्च दर्जा कायम ठेवून सामान्य जनांची अभिरुची उंचावण्याचा प्रयत्न करावयाचा, की आज जी अभिरुची आहे तिच्याच पातळीला कला आणून ठेवावयाची ? आज तरी ही दुसऱ्या प्रकारची प्रक्रिया चालू आहे. कलाकरमणुकीला व्यापारी स्वरूप आले असून अधिकाधिक प्राप्तीच्या अभिलाषेने अभिरुचीची अवनती होत आहे. तशी चढाओढ लागल्यासारखी दिसते. परंतु या गोष्टीत सामान्य जनांचे नुकसान आहे.

आजच्या सामान्य जनांच्या कला-जीवनाला शुद्ध सात्त्विक आणि सदभिरुचीचे वळण लावणे ही दृष्टी बुद्धिपुरस्सर ठेवली पाहिजे.

[ —मार्च १९५९ ]

## ११४. आजचा हा काळ

‘ **पूर्वी** गेलेला काळ चांगला होता. आता दिवस वाईट आले आहेत. समाज बिघडला आहे. पूर्वीसारखा सद्‌गुणाला भाव राहिला नाही. दुर्गुणांचा उत्कर्ष होत आहे. सज्जनाला किंमत नाही. दुर्जनांची चलती आहे. पूर्वीपेक्षा सर्व जमाना बदलला आहे. समाज अधोगतीला चालला आहे.

बहुसंख्य लोकांची आजच्या समाजाविषयी वरील प्रकारची भावना असते. रोज वर्तमानपत्रे वाचून आणि चारचौघांकडून ऐकलेल्या अनेक वाईट बातम्या वाचून एक प्रकारची निराशा वाटते. आपण कोठे चाललो आहोत असे वाटू लागते.

खरोखरीच समाज फार बिघडला आहे काय ? पूर्वीचा काळ फार चांगला होता आणि आजच आपण—विशेषत: दुसरे लोक, त्यातले त्यात तरुण पिढी—बिघडलो आहोत, हे कितपत खरे आहे, आणि असा एक काळ होता का की, ज्या वेळी समाजात सद्‌गुण, सज्जनता, सात्त्विकता यांचा कळस झाला होता ? दुर्गुण औषधालाही नव्हता ?

भावी काळात तरी असा कालखंड येणार आहे काय, की ज्या वेळी समाजात संपूर्ण सद्‌गुणांचे, सदाचाराचे आणि सत्याचे साम्राज्य पसरणार आहे? उलटपक्षी आजची अधोगती चालूच राहिली असे मानले तर असा क्षण येईल का, की ज्या वेळी दुर्गुण व दुराचार यांचेच साम्राज्य माजले आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, काळाकडे पाहाणाऱ्या व्यक्तीचे अनुभव, दृष्टी व विचार मर्यादित असतात. उलट समाजाचा ओघ आणि काळाचा प्रवाह ही भूतकाळात आणि भविष्यकाळात अनंतापर्यंत पोचलेली असतात. आपल्याला फार पूर्वीच्या काळाचा तपशील दिसत नाही ; फार पुढच्या काळातील समाजाच्या भविष्यकाळाचाही तपशील दिसत नाही.

आपल्या हयातीतील काळाचा मात्र तपशील दिसतो आणि त्यातल्या त्यात विद्यमान समाजातील वाईट गोष्टींचा मनावर एकदम परिणाम होतो. त्यामुळे आजच्याच काळाचा विचार करणाराला निराशा वाटू लागते.

खरी गोष्ट अशी आहे की, इतिहासातील कोणत्याही युगांत व कालखंडात दुराचार–सदाचार, दुर्गुण–सद्‌गुण, दुर्जन–सज्जन या विरोधी गोष्टी जोडीजोडीने राहात आल्या आहेत. किंबहुना हे द्वैत अनादिकालापासून चालत आहे; म्हणूनच समाज जिवंत राहिला आहे.

व्यासांच्या युगातही त्यांनी तक्रार केली होती की, मी धर्माने वागावयास सांगतो, पण माझे कोणी ऐकत नाही. पांडवांच्या वेळी दुर्जन होते हे प्रसिद्धच आहे. भर्तृहरीने दुर्जन आणि मूर्ख यांच्यावर अनेक श्लोक रचले आहेत. सारांश, हा झगडा अनादिकालाचा आहे.

या सर्वांत आशावादाला एक कारण म्हणजे तुमच्या-आमच्या ठिकाणी, बहुसंख्य समाजाच्या मनांत, सद्‌गुण, सज्जनता आणि सदाचार यांच्याविषयी असलेला आदर. यांच्या जोरावर दुर्गुणांचा पराभवच होत राहील यांत शंका नाही. आपल्या सर्वांच्या निराशावृत्तीच्या पोटातच गुप्त रीतीने आशावाद भरलेला आहे.

समाजातून दुर्गुण कधीच नाहीसे व्हावयाचे नाहीत. त्यांना सतत नियंत्रणात ठेवण्याचे काम समाजाला एकसारखे करावे लागते आणि करावे लागणार. दुर्जनांचा निषेध करून दुराचाराला आळा घालण्याची प्रवृत्ती आपल्या ठिकाणी आहे, असते आणि राहील. ती असेपर्यंत निराशा मानण्याचे काही कारण नाही.

आपण नेहमी सत्य, सदाचार, सज्जनता आणि सद्‌गुण यांच्या बाजूनेच झगडू, असा निश्चय करू या.

[ —मे १९५९ ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंदणी क्र. १०१
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ११५. औचित्यदृष्टीची दुर्मिळता

**पूर्वी** दादोबा पांडुरंग यांचे लघुव्याकरण प्राथमिक शाळेत चौथ्या [illegible] शिकवीत. त्यात प्रथमच असे वाक्य होते—" हे शुद्ध का, व हे अशुद्ध का, हे व्याकरण शिकल्याने समजते." मला पुष्कळ वेळा वाटते की, याच धर्तीवर " हे उचित का आणि हे अनुचित का ?" हे समजण्याचे एखादे शास्त्र बसविता आले तर फार उत्तम होईल !

आज तरी असे शास्त्र उपलब्ध नाही आणि तसे होण्याची फारशी शक्यता नाही. समाजात व्यवहार करताना हजारो प्रकारचे प्रसंग हजारो व्यक्तींना येणार. या प्रसंगांचा हिशेब केला तर लाखांवर संख्या जाईल. असे लाखो प्रसंग व त्या वेळी करण्याचे उचित आचरण यांचा कोश करता आला तरी तो वाचणार कोण ? आणि लक्षात कोणाच्या राहणार ? राहिला तरी ते पुस्तकी ज्ञानच होणार नाही का ?

हे प्रश्न व्यवहारज्ञानानेच सोडवावयास हवेत, आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण देणारी शाळा निराळी नाही. सारासार बुद्धी वापरून केलेले व्यवहार, हीच व्यवहारज्ञानाची शाळा. इंग्रजीत व्यवहारज्ञानाला 'कॉमनसेन्स' म्हणतात. पण समाजात काही लोकांचे वागणे पाहिले की वाटते—ही बुद्धी वाटते तितकी 'कॉमन' म्हणजे सर्वसामान्य नाही. ती प्रयत्नाने मिळवायला पाहिजे. विचारपूर्वक वाढवली पाहिजे.

खाजगी जीवनात अथवा सार्वजनिक व्यवहारात अप्रस्तुत, अनुचित आणि प्रसंगाला न शोभणारे वर्तन पाहाण्याचे दुर्भाग्य आपल्या वाट्याला वारंवार येते. त्याच वेळी विचार करावा—"मी तर नकळत असेच वर्तन करीत नाही ना ? माझ्याकडून असा औचित्यभंग मी होऊ देणार नाही." चिकित्सक दृष्टीने निरीक्षण व विचार करण्याची सवय ठेवली तर अनुचित वागणे होण्याची शक्यता कमी कमी होत जाईल.

वेळप्रसंग ओळखणे, त्या ठिकाणची व प्रसंगाची आपली भूमिका जाणणे आणि भोवतालच्या समाजाच्या मन:स्थितीची जाणीव ठेवणे – अशी सवय लावून घेणे आवश्यक आहे. शुभप्रसंगी अशुभ बोलणे, दु:खाच्या प्रसंगी नटूनथटून जाणे, गंभीर प्रसंगी थिल्लर विनोद करणे, लांबलेल्या सभेत आणखी लांबलचक भाषण करणे, वृद्धपणी तरुणाचा आव आणणे—अशी औचित्यभंगाची अनेक उदाहरणे प्रत्येकाला आठवत असतील.

तसला दोष आपल्याकडून होऊ नये, अशा विचाराची सवय लावून घेऊ या.

[ —जून १९५९ ]

# ११६. सनातन विचारांचा आधुनिक आचार

**मानवी** जीवनात विचार आणि आचार यांना फार महत्त्व आहे. विचार हे मूलभूत बीज आणि आचार हा त्या बीजाचा विस्तार किंवा मूर्त स्वरूप होय.

मौलिक विचार देण्याचे काम फारच थोड्या व्यक्ती करू शकतात. ते विचार ग्रहण करून व पुष्कळ वेळा त्यांचे मर्म न समजताही, आचाराचे अनुकरण सामान्य-जन करीत असतात.

या देशात गेली पाच हजार वर्षे आपण राहात आहोत. त्या अवधीत अनेक प्रसंगांच्या निमित्ताने प्राचीन ऋषींनी व तत्त्ववेत्त्यांनी विचार करून काही तत्त्वे समाजाला दिली आहेत. व्यक्तीच्या जीवनाची ध्येये, समाजाची अंतिम ध्येये व त्याची धारणा, मानवांतील संबंध इत्यादी अनेक गोष्टींवर विचार झाले आहेत. त्यांतील अनेक विचार शाश्वत व चिरंतन स्वरूपाचे आहेत; 'सनातन' आहेत, पण 'सनातनी' नाहीत. सत्याचरण, त्याग, अहिंसा, सहिष्णुता, स्वातंत्र्य, दान, संयम, न्याय इत्यादी विचार जुने असले तरी शाश्वत आहेत. आजही ते उपयुक्त आहेत व उद्याही तसेच राहतील.

परंतु या विचारांना मूर्तस्वरूप देणारे आचार मात्र बदलत असतात. कालाप्रमाणे बदलतात तसे स्थलाप्रमाणेही बदलतात. समाज जसजसा विकसित व सुसंस्कृत होत जातो तसतसे त्याला अनुसरून आचाराचे स्वरूपही उदात्त होत जाते. प्रार्थना करण्याच्या पद्धती प्रत्येक कालखंडात बदलत आलेल्या आहेत. प्रार्थना करणे हे तत्त्व शाश्वत आहे. फक्त त्याच्या पद्धती बदलल्या आहेत. ज्या काळी पशू हेच धन समजले जात असे त्या वेळी पशूंचा यज्ञ हा एक त्याग समजला जाई. आज यज्ञ करणाराने धनाचा त्याग उच्च हेतूकरिता केला तरच तो यज्ञ समजला जाईल. आज पशू हेच धन राहिले नसून रोकड द्रव्य हेही धन आहे. त्याचा त्याग हा यज्ञ. स्थलाप्रमाणेही तत्त्व बदलते. धान्यसंपन्न प्रदेशात अहिंसात्मक आहार शक्य आहे; पण जेथे हिमप्रदेशात वनस्पतीच उगवत नाहीत तेथे मासे व प्राणी हाच सात्त्विक आहार ठरतो. धर्मकृत्ये करताना दक्षिणेकडे उघड्या अंगाने ती करतात, तर उत्तरेकडे थंडीच्या वेळी कपडे घालूनही धर्मकृत्ये करतात.

काल, स्थल आणि समाजाची संस्कृती यांना अनुसरून सनातन तत्त्वांना आधुनिक आचारांचे स्वरूप दिले पाहिजे. समाजाच्या शैशवावस्थेतील आचार समाजाच्या प्रौढावस्थेत हास्यास्पद ठरतात. आपण लहानपणी रांगत होतो, बोबडे बोलत होतो व माती खात होतो म्हणून प्रौढपणी मनुष्य तेच करू लागला तर लोक हसतील.

जी गोष्ट व्यक्तीची तीच समाजाची.

[—जुलै १९५९]

## ११७. मोठे कलह गावात तरी आणू नका !

**गेल्या** तीन हजार वर्षांचा मानवी इतिहास व आज आपल्या दृष्टीपुढे घडत असलेला इतिहास पाहिला म्हणजे एक गोष्ट सतत चाललेली दिसते—मानवा-मानवांतील कलह. एकीकडे हे कलह वाढविण्याची प्रवृत्ती आणि दुसरीकडे हे कलह कमी करण्याच्या दृष्टीने काही थोड्या विचारवंतांचे प्रयत्न चालले आहेत.

कलहाची कारणे गेल्या शतकापासून बदलली आहेत. यापूर्वी "माझा धर्म श्रेष्ठ. तो इतरांनी स्वीकारला पाहिजे. त्याचा प्रसार झाला पाहिजे." या भावनेने प्रेरित झालेले मानवी गट आपापसांत झुंजत, आणि सामान्यजनांचा त्यात बळी पडत असे. खरोखर मुळातला मुद्दा काय ? "देवाची प्रार्थना कशी करावी ? देवाचे स्वरूप कसे आहे ?" एवढाच. किती शांतपणे सोडविण्याचा हा प्रश्न पण त्याकरिता मानव लढले ! रक्तपात झाले !

आजच्या युगात कलह आणि झगड्याची तीव्रता तितकीच आहे. पण भूमिका बदलली, कारणे बदलली. "पूजा कशी करावी ?" हा प्रश्न आता मत-भेदाचा नसून "समाजधारणा कशी चालावी ?" हा कलहाचा प्रश्न झाला आहे समाजात संपत्तीची व्यवस्था कशी असावी, राज्यकारभार कसा चालावा—हे प्रश्न देखील शांततेने सोडविण्यासारखेच आहेत. असे तुम्हाला-आम्हाला वाटते. पण आज कम्युनिझम्, फॅसिझम्, कॅपिटॅलिझम्, या नावाखाली राष्ट्राराष्ट्रांत गट पडले आहेत. नव्हे एकेका राष्ट्रात् अंतर्गत गट पडले आहेत आणि त्यांच्या कलहापायी रक्तपातापर्यंत मजल जात आहे.

अशा परिस्थितीत सामान्य व्यक्तीची मोठी कुचंबणा झाल्यासारखी होते. या परिस्थितीत सुधारणा करण्याला सामान्य लहान व्यक्ती हतबल झाल्यासारखी वाटते.

ही कलहाची तीव्रता कमी करण्याच्या कामी आपला काही उपयोग होईल का ? वर जे मानवी गट निर्माण केले ते जसे जागतिक मोठ्या प्रमाणावर आहेत तसे लहान समाजातही आहेत. जे झगडे वरच्या पातळीवर होतात ते आपण आपल्या घरात, आळीत आणि गावात आणतो. ही गोष्ट टाळता येईल.

पूजा कशी करावी आणि समाजधारणा कशी असावी, हे प्रश्न आपण सामोप-चाराने सोडवू. ही भावना लहान गटांतून वाढीला लागली तर यातलेच नेते उद्या मोठे होऊन मोठ्या गटांनाही सामोपचाराचे मार्गदर्शन करू शकतील.

सर्व मानवी प्रगती सावकाश होत असते. तिच्याकरिता प्रत्येकाने विचार-पूर्वक प्रयत्न करायला पाहिजे. काल अनंत आहे.

**[—सप्टेंबर १९५९]**

# ११८. प्रौढ शिक्षणाची जुनी साधने

**समाजातील** सर्व प्रौढ स्त्रीपुरुषांना साक्षर व शिक्षित करण्याची कल्पना अलीकडील दीडशे-दोनशे वर्षांत जन्माला आलेली आहे. विशेषत: युरोपियन देशांत या कल्पनेचा प्रारंभ झाला आणि तो जगातील इतर मागासलेल्या देशांत अलीकडे पसरत आहे; परंतु आर्थिक अडचण प्रत्येक देशापुढे असल्याकारणाने सर्व प्रौढांना साक्षर करण्याचे काम दीर्घ मुदतीचे होऊन बसले आहे.

लेखनवाचनाचा प्रसार सर्वसामान्य जनांत करण्याची कल्पना नवीन आहे. पण समाज सुसंस्कृत करण्याची कल्पना भारतात फार प्राचीन आहे. शिक्षणाचा उद्देश मनावर चांगले संस्कार करणे हा आहे. सर्व समाजाकरिता प्रत्यक्ष शाळा काढून शिक्षण देता आले नाही तरी इतर साधनांनी सर्व आबालवृद्धांवर चांगले संस्कार करण्याकरिता आणि त्यांचे शील बनविण्याकरिता पूर्व समाजनेत्यांनी जी अनेक साधने योजली आहेत, त्यांत थोर पुरुषांच्या जयंत्या हे एक महत्त्वाचे साधन आहे. रामनवमी आणि कृष्णाष्टमी या समारंभांकडे प्रौढशिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहिले म्हणजे त्यांचे महत्त्व कळून येते.

ग्रंथांच्या सहाय्याने आणि तात्त्विक स्वरूपात दिलेले नीतीचे, धर्माचे आणि व्यवहाराचे शिक्षण हे पढिक स्वरूपाचे राहते. सर्वसामान्य व्यक्तींना ते आचरणात आणता येत नाही. व्यक्तिचरित्राच्या रूपाने मूर्त स्वरूपात त्याच गुणांचा, चारित्र्याचा, नीतीचा आणि व्यवहाराचा आदर्श समाजापुढे ठेवला तर तो लवकर आकलन केला जातो.

समाज सुसंस्कृत होण्याकरिता त्या समाजातील व्यक्तींच्या ठिकाणी काही गुणांचा विकास होणे आवश्यक आहे. मातृप्रेम, पितृप्रेम, बंधु-भगिनीप्रेम, एकपत्नी—व्रत, पातिव्रत्य, वचनपालन, अन्यायाची चीड, जुलमांचा प्रतिकार, सत्यासत्याचा योग्य विचार, धर्माधर्माची निर्णयबुद्धी—अशा प्रकारच्या अनेक गुणांची वाढ झालेल्या व्यक्ती ज्या समाजात असतात तोच सुसंस्कृत समाज समजला जातो.

या गुणांचे शिक्षण तात्त्विक स्वरूपात दिले तर ते समाजास पचत नाही. परंतु श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्यासारख्या विभूतींच्या चरित्रांच्या रूपाने दिले तर या गुणांचा मूर्तिमंत आदर्श जनतेपुढे सतत उभा राहतो.

कोणतेही चांगले संस्कार दृढमूल होण्याकरिता त्यांची पुन:पुन: आवृत्ती व्हावी लागते. तो कार्यभाग वार्षिक जयंत्या केल्यामुळे साध्य होतो.

जयंत्या साजऱ्या करण्यामागे प्रौढशिक्षणाचे महत्त्वाचे तत्त्व आहे, पण ते आज पूर्ण स्वरूपात साध्य होत नाही. कारण आपण त्या दृष्टीने, शिक्षणाच्या दृष्टीने,

त्यांकडे पाहात नाही. बुद्धिपुरस्सर व योजनापूर्वक आबालवृद्धांच्या शिक्षणाचे साधन म्हणून त्यांचा उपयोग केला पाहिजे.

[—ऑक्टोबर १९५९]

## ११९. अणुयुगातील व्यक्ति-विकास

**विज्ञानाच्या** क्षेत्रातील प्रगती कल्पनातीत वेगाने होत आहे. उलटपक्षी समाजातील व्यक्तींचा नैतिक विकास अत्यंत मंद गतीने होत आहे. दोन हजार वर्षांत जगाची भौतिक प्रगती सर्व क्षेत्रांत झालेली आहे; परंतु वैयक्तिक गुण-विकासाच्या दृष्टीने मोजमाप केले तर आजच्या व्यक्ती पूर्वकालीन व्यक्तींपेक्षा फार विकसित झालेल्या आहेत असे दिसत नाही. प्रगती आहे; परंतु विज्ञान-विकासाच्या प्रमाणात व्यक्ती-विकासाची प्रगती झालेली नाही. याचे कारण काय असावे ?

विज्ञानाची प्रगती ही प्रत्येक पिढीगणिक व शतकागणिक वाढतच आहे. तिच्यात सतत भर पडत आहे. अनेक देशांत चाललेल्या संशोधनांनी तिच्यात भर पडून ती पुढे चालली आहे. कालाच्या दृष्टीने पूर्वकालातील संचयांचा व स्थलाच्या दृष्टीने सर्व देशांतील ज्ञानवाढीचा तिला फायदा मिळत आहे. त्यामुळे प्रारंभीचा अग्नी निर्माण करण्याचा शोध मानवाने लावला तेथपासून चंद्रगामी अग्निबाणापर्यंत मानव आलेला आहे. आज अणुशक्तीचे युग सुरू झाले आहे.

व्यक्तिविकासाच्या प्रगतीचे अगदी निराळे आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास स्वतःच करावा लागतो. मागील पिढीतील किंवा विद्यमान कालातील इतर माणसांच्या विकासामुळे व्यक्तीचा विकास आपोआप होत नाही. तो प्रयत्नपूर्वक करावा लागतो आणि त्याला कालावधी लागतो. विज्ञानातील शास्त्राचे ज्ञान थोड्या वेळात मिळविता येते; परंतु सत्याचरण, धर्माधर्मज्ञान, न्याय-अन्यायबुद्धी समता-विषमता-दृष्टी, आत्मसंयमन, परोपकार, दया इत्यादी गुणांची प्राप्ती करायला कालावधी लागतो. प्रत्येकाला आपल्या हयातीची तीस-चाळीस वर्षेच या विकासाला मिळतात. कारण बुद्धिपुरःसर व जाणूनबुजून प्रगती करण्याची हयात एवढीच असते.

आणि महत्त्वाचा फरक पुढेच आहे. विज्ञानाच्या प्रगतीकरिता शाला-महाविद्यालये आणि संशोधन-संस्थांचे जागतिक जाळे निर्माण झालेले आहे; परंतु व्यक्तिविकासाच्या दृष्टीने बुद्धिपुरःसर झालेले व होत असलेले संघटित प्रयत्न अत्यंत थोडे आहेत.

म्हणून विज्ञान अग्निबाणाच्या गतीने अंतराळात धावत आहे आणि व्यक्ति-विकास मात्र जमिनीवर मंद गतीने रांगत चालला आहे.

[—नोव्हेंबर १९५९]

## १२०. क्षात्रतेजाचे संगोपन

**इतिहासात** घटनांची जशी पुनरावृत्ती होते तशीच विचारांचीही पुन्हा पुन्हा उजळणी करणे जरूर असते. जगात नवीन काही नाही. जुन्याच गोष्टी नवीन स्वरूपात पुढे येत असतात.

भारतीय पुराणे आणि इतिहास वाचणाऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट आलीच असेल की, क्षात्रतेज महत्त्वाचे की ब्राह्मतेज महत्त्वाचे, हे वाद वारंवार उत्पन्न होतात. भारतीय विचारवंतांनी या वादाचा अनुकूल-प्रतिकूल असा विचार करून अनेक ठिकाणी आपले निर्णय दिलेले आहेत. समाजात दोन विरोधी शक्ती उत्पन्न झाल्या असता त्यांनी आपले प्रश्न शक्तीने सोडवावेत, की युक्तीने ? कलहाचा निर्णय शांतीने लावावा, की युद्धाने ? पराक्रम-प्रधान क्षात्रतेज महत्त्वाचे, का शांतिमय व ज्ञानयुक्त ब्राह्मतेज महत्त्वाचे ? भगवान बुद्धाचा निर्भेळ शांतिमार्ग श्रेयस्कर की भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेला निष्काम-कर्म-प्रेरित धर्मयुद्धाचा मार्ग इष्ट ? विचारवंत भारतीयांनी या दोन्ही विरोधी विचारांचा समन्वय घातलेला आहे. क्षात्रतेजाचे संगोपन करा; परंतु शांतियुक्त ब्राह्मतेजाचा अधिकाधिक उपयोग करा. युक्तीने प्रश्न सोडविण्याची खटपट करा; पण त्या युक्तीमागे शक्तीचाही जोर असू द्या. शांतीचे ध्येय अवश्य ठेवा; पण वेळप्रसंग पडल्यास सत्य, सत्कार्य आणि सज्जन यांच्या रक्षणाकरिता धर्मयुद्धाचीही तयारी ठेवा.

कालचक्राचे रहाटगाडगे फिरता फिरता आज पुन्हा या प्रश्नाचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. मनात प्रश्न असा उभा राहतो की, स्वातंत्र्य-प्राप्ती-नंतरच्या गेल्या दहा वर्षांच्या काळात समाजात क्षात्रवृत्ती निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे का ? अनेक जुन्या गोष्टींचा उद्धार झालेला आहे. जुन्या-नव्या नृत्याचे कार्यक्रम सरकारी मदतीने ठिकठिकाणी होत आहेत. संगीताच्या जलशांना सरकारचा व जनतेचा उदार आश्रय मिळत आहे. नाट्याचा पुनरुद्धार चालू आहे. तमाशांची सुधारणा होऊन तो सर्वत्र लोकप्रिय कसा होईल,याची विवंचना लागलेली आहे. सारांश, सांस्कृतिक पुनरुद्धाराच्या नावाखाली जुन्या भारतीय कलांचा उत्कर्ष होत आहे. दोष हा आहे की त्यांच्याच बरोबर क्षात्रतेज व पराक्रमी वृत्ती यांचे संगोपन करणाऱ्या भारतीय कलांचा उद्धार करण्याकडे सरकारचे व समाजाचे

दुर्लक्ष होत आहे. ज्या थोड्या क्रीडास्पर्धा वगैरे होत आहेत त्यांचा उद्देश करमणुकीच्या पलीकडे जात नाही.

क्षात्रवृत्ती निर्माण करणाऱ्या कलांचा व विद्यांचा उद्धार करण्याची वेळ आज आलेली आहे.

[—डिसेंबर १९५९]

## १२१. सरकारी नोकरीतही खरे धर्माचरण

**सरकारी** कारभारातील कामाला लोक आज अगदी कंटाळलेले दिसतात. सरकारी काम म्हणजे त्यात दिरंगाई असणार, चालढकल असणार, काम न करण्याची प्रवृत्ती असणार, वशिला असणार, आणि वेळी प्रसंगी काही लाचलुच-पतीची आशा असणार, असे लोक गृहीतच धरून चालतात. खाजगी व्यक्तीचे काम आणि ते सरकारी कार्यालयात तावडतोब आणि आस्थेने निकालात लागले, अशी उदाहरणे विरळाच ! हे असे का होते, याचा सरकारी नोकरांनीच व त्यांच्या वरिष्ठांनीच विचार करावयास पाहिजे.

या सरकारी नोकरीत आज असंख्य लोक आहेत. मध्यवर्ती सरकार राज्यसरकार आणि स्थानिक स्वराज्य-सरकार या तिन्ही प्रकारच्या राज्यकार भारांतून लक्षावधी लोक जनतेच्या पैशावर पोसले जात आहेत. त्यांत पट्टेवाले शिपाई आहेत, कनिष्ठ आणि वरिष्ठ कारकून आहेत आणि निरनिराळ्या हुद्द्यांचे अधिकारी आहेत. मंत्रिमंडळे येवोत अथवा जावोत, खरा राज्यकारभार याच लोकांच्या हातात आहे. तुम्हा-आम्हा नागरिकांच्या दृष्टीने मंत्री हे राज्यकर्ते नसून पट्टेवाले, कारकून आणि अधिकारी हेच आपले राज्यकर्ते आहेत.

यांच्या प्रत्येकाच्या हातात लहान-मोठी सत्ता आहे. तुमचे व्हिजिट कार्ड साहेबाला देणे वा न देणे हे पट्टेवाल्याच्या हातात आहे. तुमच्या अर्जाचा लवकर व उशिरा नंबर लावणे हे कारकुनाच्या हातात आहे, आणि तुमच्या प्रकरणांचा निकाल न्यायाला वा अन्यायाला धरून लवकर अथवा उशिरा लावणे हे अधिकाऱ्यांच्या हातात असते.

ब्रिटिश राजवटीत राज्यकारभाराचे सूत्र असे होते की, राज्यकर्त्यांचे हित प्रथम पाहावयाचे, त्यानंतर लोकांची कामे झाली न झाली तिकडे फारसे लक्ष द्यावयाचे नाही. यांपैकी दुसरी प्रवृत्ती आजही चालू आहे. सरकारातील आपले काम होणे म्हणजे महाकर्म कठिण, अशी आपली समजूत होऊन बसली आहे,

आणि त्यामागे अनुभवाचा आधार आहे. ही प्रवृत्ती केव्हा बदलेल ती बदलो !

ही परिस्थिती बदलण्याकरिता सरकारी नोकरांना नवीन दृष्टी आणि नवीन ध्येयवाद दिला पाहिजे. सरकारी नोकरी म्हणजे पोट भरण्याचे काम आणि संसारी माणसाचे काम, अशी आज सर्वांची दृष्टी आहे. इंग्रजीत सरकारी नोकरीला पब्लिक सर्व्हिस असे नाव आहे. पब्लिक सर्व्हिस म्हणजे सार्वजनिक सेवा. सर्व जनतेची सेवा हे आपले कार्य आहे आणि ह्या कार्यात स्वार्थाबरोबर परार्थही साधला जातो ही भावना सरकारी नोकरांत निर्माण होणे जरुरीचे आहे. गीतेमध्ये एक श्लोक आहे —

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।

तसेच—

स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।।

आपापले नियोजित काम करणे हीच परमेश्वराची पूजा आहे. याच पूजेने मोक्ष प्राप्त होतो. सरकारी नोकरीतील काम ही एक सर्व जनांची, जनतारूपी जनार्दनाची सेवा आहे. लोकांचे कल्याण डोळ्यांपुढे ठेवून ही सेवा करणाऱ्या सरकारी नोकरांना लोककल्याण केल्याचे पुण्य लागते.

सरकारी नोकरीतील आपले काम लोकांचे कल्याण दृष्टीपुढे ठेवून न करणाऱ्या सरकारी नोकरांनी अन्य प्रकारांनी कितीही देवपूजा, पोथीवाचन, देवांची सेवा आणि तीर्थयात्रा केल्या तरी त्यांना पुण्य लागणार नाही. केवळ स्वार्थी आणि कामचुकार दृष्टीने सरकारी नोकरी केल्याचे पाप कशानेही धुऊन जाणार नाही.

[ —जानेवारी १९६० ]

## १२२. दुराचारांचे नियंत्रण

**रोज** वर्तमानपत्र उघडल्यानंतर त्यातील सामाजिक गुन्हेगारीच्या बातम्या वाचून मनाला एक प्रकारची विषण्णता येते. खून, घरफोड्या, चोऱ्या, दरोडे, बलात्कार, लाचलुचपत, सार्वजनिक मालमत्तेचा अपहार, बेइमानी, कृतघ्नपणा असे अनेक दुर्गुण व्यक्त करणाऱ्या घटना साकल्याने एकत्र वाचावयास सापडतात. पाश्चिमात्य देशांत केवळ याच वार्तांना प्राधान्य देणारी स्वतंत्र वृत्तपत्रे व मासिकेही आहेत. हळूहळू आपल्याकडेही तशीच निघण्याचा संभव आहे. कारण "मागणी-प्रमाणे पुरवठा" या तत्त्वाची अंमलबजावणी आजच्या अर्थप्रधान युगात सर्वत्र होत आहे. लेखक, संपादक, प्रकाशक त्याला अपवाद नाहीत.

समाज अस्तित्वात आला त्या वेळेपासून आजतागायत विचारी माणसांच्या पुढे हाच प्रश्न आहे आणि तो जगाच्या अंतापर्यंत तसाच राहील. समाजात सात्त्विक, राजस आणि तामस अशा तिन्ही वृत्तींची माणसे प्रत्येक क्षणाला जन्म घेत असतात, वाढत असतात आणि आपल्या प्रवृत्तींना समाजातील अनुकूल वातावरण व जागा शोधीत असतात. प्रत्येक आळीत, गावात, राज्यात आणि देशात तामसी वृत्तीची माणसे असतात. प्रत्येक व्यक्तीच्या अंतःकरणातही थोड्याफार प्रमाणात तामसी वृत्ती असते.

आपल्या अंतःकरणातील तामसी वृत्तीवर ज्याप्रमाणे आपण सात्त्विक भावनांचे नियंत्रण ठेवतो, त्याचप्रमाणे समाजातील तामसी वृत्तीच्या लोकांवर सात्त्विक आणि राजस प्रवृत्तीच्या लोकांनी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. ही गरज कधीही कमी होणार नाही. ती कधीही संपणार नाही; जगाच्या अंतापर्यंत ती गरज राहील.

तामसी वृत्तीच्या माणसावर समाज ज्या प्रमाणात नियंत्रण ठेवील त्या प्रमाणात समाजातही गुन्हेगारी आणि समाजविरोधी आचरण कमी होईल. ज्या समाजात सात्त्विक वृत्तीची माणसे उदासीन आणि तटस्थ राहतील त्या समाजात तामसी वृत्तीच्या लोकांचे प्राबल्य माजून गुन्हेगारीची वाढ होईल.

तामसी वृत्तीच्या लोकांवर नियंत्रण घालणे हे मुख्यतः शासनसंस्थेचे म्हणजेच सरकारचे काम आहे; परंतु समाजाचेही साहाय्य शासनसंस्थेला होणे जरूरीचे आहे. वैयक्तिक रीतीने किंवा सामुदायिक वा संघटित रीतीने दुष्टांच्या दुष्कृत्याबद्दल नापसंती दर्शविणे, निषेध करणे हा एक मार्ग आहे. प्रत्येक व्यक्तीला समाजाच्या पसंतीची आणि मान्यतेची भूक असते. सत्कृत्यांचा गौरव करून त्यांना मान्यता देणे आणि दुष्कृत्यांची निर्भर्त्सना करून त्यांचा निषेध करणे हे एक दुधारी सामाजिक शस्त्र आहे, त्याचा योग्य उपयोग करून तामसी वृत्तीच्या माणसांना नियंत्रणाखाली ठेवणे आवश्यक आहे.

समाज कधीही परिपूर्ण नव्हता, तो नेहमीच अपूर्ण राहील. अधिकाधिक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न मात्र सतत व्हायला पाहिजे.

[—फेब्रुवारी १९६०]

## १२३. जनतेची अभिरुची

**एखादा** समाज सुसंस्कृत आहे का नाही, याचे मोजमाप काय ? दोन समाजांची तुलना करावयाची झाल्यास आपण कोणत्या कसोट्या लावाव्यात ? आपला समाज सुसंस्कृत आहे किंवा नाही, याचे गमक काय ? आपल्या समाजाची

सांस्कृतिक पातळी वरच्या दर्जाला चढण्याकरिता योजना-पुरस्सर प्रयत्न करावयाचे झाल्यास आपण काय केले पाहिजे ? आपल्या आजच्या समाजातील वाङ्मय, नाटय, चित्रपट, संगीत, शिल्पकला, मूर्तिकला, घरातील राहणी इत्यादी गोष्टींची आजची परिस्थिती पाहिली म्हणजे वरील मूलभूत विचार मनामध्ये येतात.

माझ्या मते कोणत्याही समाजाचे मोजमाप करण्याच्या कसोटया दोन आहेत. त्या समाजातील बुद्धिमान आणि प्रतिभाशाली व्यक्तींची बौद्धिक पातळी आणि अशा व्यक्तींची संख्या समाजात किती आहे ? ही एक कसोटी आहे. बुद्धी आणि प्रतिभा या ईश्वरदत्त देणग्या आहेत. कालिदास, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांच्यासारख्या प्रतिभाशाली कलावंतांच्या कलाकृती या प्रयत्नापेक्षा प्रतिभेमुळेच निष्पन्न झालेल्या आहेत. प्रतिभेला प्रयत्नांची जोड मिळाली आहे इतकेच. निसर्गदत्त गुणांना मानवी प्रयत्नांची जोड मिळाली आहे, अशा व्यक्ती ज्या समाजात अधिकाधिक निघतात तो समाज संस्कृतीच्या दृष्टीने श्रेष्ठ समजला जातो.

परंतु ह्या मोजमापाला दुसरीही बाजू आहे आणि ती म्हणजे सर्वसामान्य जनांची अभिरुची. समाजातील अधिकाधिक लोकांना कोणत्या प्रकारच्या कलाकृती आवडतात, कोणत्या कलांचे कौतुक त्यांच्याकडून होते, कोणत्या दर्जाच्या कलेला उदार आश्रय मिळतो, यावरूनही समाजाची सांस्कृतिक पातळी मोजता येते. आपल्या समाजाची आज अशी स्थिती आहे की, उच्च दर्जाची कला निर्माण झाली तरी तिचे कौतुक करणारा वर्ग फार लहान आहे. उच्च दर्जाचे वाङ्मय, अभिजात संगीत, उत्कृष्ट चित्रकला किंवा शिल्पकला यांना आश्रय देणारा वर्ग फार लहान आहे. ही अभिरुचीची दुसरी कसोटी आपल्या समाजाला लावली तर आपले पारडे खूपच खाली जाते, असे दिसून येईल.

परंतु निराश होण्याचे कारण नाही. आशेला पुष्कळ जागा आहे.

उच्च अभिरुची 'ही प्रयत्नसाध्य आहे. ती संस्कारावर अवलंबून आहे. अनुभव, साहचर्य, सहवास, पुन्हा पुन्हा संस्कार यामुळे उच्च अभिरुचीचे वळण व्यक्तींना लागू शकते. बुद्धी आणि प्रतिभा जशी ईश्वरदत्त आहे तितक्याच प्रमाणात उच्च अभिरुची ही प्रयत्नसाध्य आणि संस्कारजन्य आहे.

चांगल्या कलाकृतींचा अनुभव बहुजनसमाजाला वारंवार मिळेल, अशा प्रकारची योजना समाज-धुरीणांनी बुद्धिपुरस्सर आखली पाहिजे. लोकांना चांगले संगीत आवडत नाही, त्यांना चांगल्या कलाकृतीची परीक्षा नाही, अशी टीका करण्यापूर्वी आपणच विचार केला पाहिजे. सर्वसामान्य जनांना उच्च कला-

कृतींची साधनेच उपलब्ध नव्हती. आर्थिक दृष्टीने अशा कलाकृती त्यांच्या ऐपतीपलीकडे होत्या. आज वस्तुस्थिती पालटली आहे. सामान्य जनांच्या हातात पैसा खेळत आहे; परंतु सदभिरुचीचे वळण आपण त्यांना लावलेले नाही. हे कार्य यापुढे बुद्धिपुरस्सर करावयास पहिजे. अगदी लहानपणापासून सात्त्विक वाङ्मय, अभिजात संगीत, उत्कृष्ट चित्रकला व शिल्पकला यांचा अनुभव व्यक्तीला येत गेल्यास तिची अभिरुची उच्च प्रकारची होते. अशा रीतीने समाजाची सांस्कृतिक पातळी वाढते. ती वाढविणे हे आपले काम आहे.

**[—मार्च १९६०]**

## १२४. प्राणरक्षण का प्राणघात ?

**पुराणामध्ये** शिबी राजाची गोष्ट सांगितलेली आहे, ती आपणांस माहीत आहे का? प्राणरक्षणाची गोष्ट आहे ती. एका बहिरी ससाण्याच्या तावडीत सापडलेल्या आणि आश्रयाकरिता राजाकडे आलेल्या कबुतराचे प्राण वाचविण्याकरिता राजाने स्वतःच्या देहाचे मांस दिले आणि शेवटी स्वतःचे प्राणदान करण्यास तो सिद्ध झाला.

शिबी राजाचे वंशज आजही भारतात इतस्तलः तुरळक पसरलेले आहेत. आगीत जाऊन एखाद्या लहान मुलाचे अथवा स्त्रीचे प्राण वाचविण्याकरिता कोणी आपला जीव संकटात घालतो. पुराच्या पाण्यात बुडत असलेल्या व असहाय्य माणसांना वाचविण्याकरिता पाण्यात उडी टाकून स्वतःचे प्राण धोक्यात घालणाऱ्या वीरांच्या गोष्टी अधूनमधून ऐकावयास मिळतात. हमरीतुमरीवर येऊन एकमेकांचे प्राण घेण्याकरिता मारामारी करणाऱ्या लोकांच्या दंगलीत जाऊन त्यांना मारामारीपासून निवृत्त करण्याकरिता स्वतःचे बळी देणारे काही महाभाग अधूनमधून चमकतात.

या गोष्टी वाचल्या म्हणजे एक प्रकारचा आशावाद वाटू लागतो. माणुसकी आणि आत्मयज्ञ हे सद्‌गुण केवळ पुराणातील वांगी नसून आजही जिवंत स्वरूपात आहेत, या विचाराने समाधान वाटते.

परंतु या समाधानाच्या वत्तीला भागाकार देणारी अनेक उदाहरणेही कानावर येतात. लहानसहान गोष्टीकरिता जिवंत माणसाचा प्राणघात करणारी दुष्ट उदाहरणे मोठ्या प्रमाणावर घडू लागली आहेत. कोणी शे-दोनशे रुपयाकरिता अथवा सोन्या-चांदीच्या दागिन्याकरिता झोपेत दुसऱ्याचा खून करतो! सूड

घेण्याकरिता कोणी दुसऱ्याच्या डोक्यात कुऱ्हाड घालतो! राजकीय मतभेदांच्या पायी पक्षाभिनिवेशाने कोणी विरुद्ध पक्षाच्या व्यक्तीला भर बाजारात चारचौघां-समक्ष गोळी घालून ठार करतो! बलात्काराच्या आपल्या पाशवी अभिलाषा तृप्त करण्यासाठी कोणी इतरांच्या प्राणाचेही अपहरण करतो!

मनुष्यस्वभाव इतका दुष्ट कसा झाला, याचे आश्चर्य वाटू लागते. प्राण-रक्षणाचे एखादे उदाहरण असेल, तर त्याच्या चौपट उदाहरणे प्राणघाताची ऐकावयास मिळतात. त्याचे कारण काय असावे? प्राणरक्षणाचे किंवा प्राणघाताचे शिक्षण दिले जाते की काय? या वृत्तीची जोपासना कोण करतो? कशी करतो? करण्यासाठी काय करतो? कशाकरिता करतो?

समाजातील एकंदर वातावरणाकडे पाहिले म्हणजे असे वाटू लागते की, प्राणरक्षणापेक्षा प्राणघाताच्या प्रवृत्तीची जोपासना कळत न कळत केली जात आहे. वर्तमानपत्रातील सिनेमाच्या जाहिराती पहा. खून आणि मारामाऱ्या ज्या चित्रपटात अधिक तो अधिक लोकप्रिय; म्हणून त्याची चलती अधिक; आणि म्हणून त्याची जाहिरातही जास्त भडक! ह्या जाहिराती वाचून आणि हे चित्रपट पाहून रक्तपात करणे म्हणजे तळहाताचा मळ आहे, अशा प्रकारची वृत्ती अज्ञ समाजात निर्माण होत नसेल काय? चित्रपट हे जसे समाजाचे अनुकरण आहे, तसेच चित्रपटाचे अनुकरणही अविचारी लोक जीवनात करीत असतात.

तीच गोष्ट रहस्यकथांची आहे. रहस्यकथा म्हणजे त्यात एखादा खून असलाच पाहिजे. मग त्या खुनाचा शोध आणि रहस्याचा उलगडा!! पण ह्या रहस्य-कथेकरिता प्रथम खून झालाच पाहिजे! एकदा एक वृद्ध साहित्यिक मला म्हणाले—"कंटाळा आला म्हणजे एखादी छानशी खुनाची रहस्यकथा वाचावीशी वाटते." या विचारी साहित्यिकाच्या मनावर खुनाचा परिणाम होणार नाही; परंतु सर्वसामान्य वाचकाला अशा गोष्टी वारंवार वाचून मानवी प्राणांचे महत्त्व कमी वाटावयास लागते.

खून आणि मारामारीचे अप्रत्यक्षपणे शिक्षण देणाऱ्या आणि अशा वृत्तीचा परिपोष करणाऱ्या करमणुकीवर—मग ते चित्रपट असोत, वाङ्मय असो अथवा जाहिराती असोत—नियंत्रण घालणे जरुरीचे आहे.

प्राणघाताच्या प्रवृत्तीपेक्षा प्राणरक्षणाच्या प्रवृत्तीची जोपासना समाजात कशा रीतीने होऊ शकेल, याचा विचार करमणुकीच्या द्वारा समाजशिक्षण देणाऱ्या संस्थांनी केला पाहिजे. प्राणरक्षण करणाऱ्या व्यक्तीविषयी आदर वाटेल असे अधिक प्रसंग घडवून आणले पाहिजेत.

[—एप्रिल १९६०]

# १२५. संयुक्त झाला ! संपन्न करा !

**गेली** दहा-वीस वर्षे संयुक्त महाराष्ट्राची आशा आपण उराशी बाळगून होतो. ती आता फलद्रूप झालेली आहे. संयुक्त महाराष्ट्र या कल्पनेतच आपल्याला जादू वाटत होती. मराठी भाषिक स्वतंत्र राज्य मिळविणे या कल्पनेपलीकडे आपण फारसा विचार केला नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे प्रश्न चुटकीसरशी सुटतील, अशी भोळी कल्पना अनेक लोकांची होती. त्याचप्रमाणे स्वतंत्र संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्याबरोबर जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे नंदनवन निर्माण होईल असे सामान्य माणसांना वाटते.

लोकांना वाटे, संयुक्त महाराष्ट्र नाही म्हणून आपली प्रगती होत नाही. गुजरात कर्नाटकाचे लोढणे आपल्या गळयात बांधले म्हणून महाराष्ट्राला आपला उत्कर्ष करून घेता येत नाही. काही प्रमाणात हे कारण खरे असले तरी ते सर्वस्वी खरे नव्हते. एकभाषिक राज्य झाल्यामुळे राज्यव्यवहाराला सुकरता निश्चितपणे येईल; पण बाकीच्या प्रश्नांचे काय ? ते प्रश्न आपोआप सुटतील काय ?

यापुढे आपल्याला सबब सांगता येणार नाही. खोटी कारणे पुढे करता येणार नाहीत. गुजरात-कर्नाटकामुळे आमची प्रगती झाली नाही, असे यापुढे आता म्हणता येणार नाही. यापुढे आम्ही मागासलेले राहिलो तर त्याला एकच कारण सांगता येईल—कर्तबगारीचा अभाव.

यापुढे दरवर्षी देश आपल्याला जाब विचारतील, "सांगा, गेल्या वर्षी काय प्रगती केली ? आता तर मागे राहायला काही सबब नाही ना ?" प्रत्येक वर्षी अशा प्रकारचा हिशेब आपल्याला जगाच्या न्यायासनापुढे द्यावा लागेल. तो समाधान-कारक देण्याची तयारीही आपण ठेवली पाहिजे.

स्वतंत्र महाराष्ट्र झाला, ह्या कल्पनेचे सुख दोन दिवस. समारंभ झाले, हारतुऱ्यांचे निर्माल्य झाले, पताकांचे रंग फिकट झाले, म्हणजे प्रत्येकजण विचारू लागेल, संयुक्त महाराष्ट्रात मी सुखी आहे काय ? केवळ मराठी भाषेत सर्व व्यवहार चालतो, म्हणून माझे सुख त्यामुळे वाढले आहे काय ?

महाराष्ट्राच्या यशाची खरी कसोटी ही आहे. येथे मुबलक अन्न निर्माण झाले पाहिजे आणि ते प्रत्येक नागरिकाच्या ताट-वाटीत पडले पाहिजे. येथे मुबलक कपडा निर्माण झाला पाहिजे आणि तो गोरगरिबांच्या अंगावर दिसला पाहिजे. येथे पुरेशी घरे बांधली गेली पाहिजेत आणि रस्त्यावर झोपण्याची पाळी कोणावर न यावी. येथे वाहतुकीची साधने भरपूर झाली पाहिजेत आणि वाहतूक अधिकाऱ्यां-कडून हिडीसफिडीस करून घेण्याचा प्रसंग कोणावर येऊ नये. शाळा कॉलेजे

आणि औद्योगिक शिक्षणाच्या संस्था भरपूर दिसल्या पाहिजेत आणि 'गरिबीमुळे मला शिक्षण घेता आले नाही' असे म्हणण्याचा प्रसंग कोणावरही येऊ नये.

कोणत्याही सुसंस्कृत समाजातील या मूलभूत गरजा आहेत. त्या अगदी प्राथमिक स्वरूपाच्या आहेत. ह्या आपण किती वर्षांत पूर्ण करू शकू? त्या भागविल्यानंतर दुय्यम स्वरूपाच्या गरजा भागविण्याइतके उत्पादन महाराष्ट्रात झाले तरच आमच्या जीवनाची श्रेणी उच्च होईल. येथे प्रत्येक घरात रेडिओ पाहिजे, छोटे ग्रंथालय पाहिजे, लवकरच येणारे टेलिव्हिजनही पाहिजे. प्रत्येकाला घराला जवळपास टेलिफोन उपलब्ध झाला पाहिजे, थकल्या-भागल्या नागरिकांना, शेतकऱ्यांना आणि कामकऱ्यांना रम्य आणि आरामशीर अशी विश्रांतिस्थाने आणि करमणुकीची ठिकाणे पाहिजेत.

या गोष्टी साध्य करण्याकरिता संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला आहे. भावी काळातील सुखी महाराष्ट्राचे हे चित्र आहे. हे स्वप्न प्रत्येक नागरिकाच्या मनश्चक्षूपुढे उभे पाहिजे. अशा प्रकारचे काही ध्येय असेल तरच त्याग, कष्ट आणि सहकार्य या सद्‌गुणांच्या वाढीला उत्तेजन मिळेल. या गुणांच्या जोरावरच नवा संपन्न महाराष्ट्र होणार आहे. आपले ध्येय सिद्ध झालेले नसून त्या ध्येयाच्या साधनेला प्रारंभ झाला आहे.

संयुक्त महाराष्ट्र साध्य झाला; पण संपन्न महाराष्ट्र साध्य करावयाचा आहे. आपण त्याकरिता काय करणार?

[—मे १९६०]

## १२६. निदर्शनाचे नवे मार्ग शोधा!

**जगात** शांतता कशी प्रस्थापित होईल ही विचारवंतांच्या पुढे एक बिकट समस्या आहे. जगात निरनिराळे देश आणि त्यांचे हितसंबंध हे निरनिराळे आहेत, तोपर्यंत मतभेदाचे आणि कलहाचे मुद्दे सतत उत्पन्न होत राहणार! हे वादाचे मुद्दे सोडविण्याकरिता युद्धाच्या मार्गाचा अवलंब न करता शांततेच्या मार्गाचा अवलंब करावा, असा प्रयत्न चालू आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहे.

हा शांततेचा प्रश्न आंतरराष्ट्रीय राहिलेला नसून त्याला राष्ट्रान्तर्गत असेही रूप प्राप्त झाले आहे. कलहाचे आणि मतभेदाचे विषय दोन राष्ट्रांत असू शकतात त्याचप्रमाणे एकाच राष्ट्राच्या दोन गटांत किंवा पक्षांतही ते असू शकतात. अशा प्रकारचे मतभेद मिटविण्याचे मार्ग कोणते असावेत, ह्याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे.

लोकशाही हा एक मार्ग मतभेदांच्या निरसनाकरिता आणि अंतर्गतप्रश्न सामोपचाराने मिटविण्याकरिता समाजाने शोधून काढला आहे. परंतु लोकशाही पद्धती समाजाच्या हाडामासात खिळणे हा दीर्घकालाचा प्रश्न आहे. इंग्लंडसारख्या देशात अनेक शतकांची परंपरा आहे. तशी परंपरा भारतासारख्या देशात अद्याप निर्माण व्हावयाची आहे. येथे सामान्य जनांना, किंबहुना काही पुढाऱ्यांनाही, लोकशाहीचे मर्म समजलेले नाही. लोकशाही म्हणजे "माझ्या मताप्रमाणे सर्वांनी वागावयाचे." असाच अर्थ बहुतेक लोक लावीत असतात !

त्याचा परिणाम असा झाला आहे की, दोन पक्षांत अथवा गटांत मतभेदाचे मुद्दे निर्माण झाले म्हणजे हे मतभेद हिंसात्मक निदर्शनाच्या रूपाने प्रकट होऊ लागतात. गेल्या दहा वर्षांतील भारताच्या अंतर्गत चळवळींचा इतिहास पाहिला म्हणजे ही गोष्ट लक्षात येते. अशी निदर्शने कोणत्या थराला जाऊ शकतात, ह्याचा परिचय आता सर्वांना झालेला आहे. लोकांना निवाऱ्याची जागा नाही; परंतु निदर्शनात घरांची जाळपोळ रास्त समजली जाते ! वाहतुकीची साधने कमी आहेत; तरीही ५०–६० हजारांच्या बसेस जाळणे किंवा त्याहीपेक्षा जास्त किंमतीच्या आगगाड्यांचा विध्वंस करणे हे रास्त समजले जाते ! पोस्ट, रेल्वे, दळणवळणाची इतर साधने नष्ट करणे हा निदर्शनाचा राजमार्ग समजला जात आहे ! लाखो रुपयांची परदेशी मशिनरी असलेल्या कारखान्याचा विध्वंस करणे हेही निदर्शनाचे प्रधान अंग समजले जाते ! काही ठिकाणी, काही प्रसंगी मानवी जीवन हें ह्या निदर्शनामुळे धोक्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय युद्धे थांबविणे हे जितके महत्त्वाचे तितकेच राष्ट्रान्तर्गत कलहात हिंसात्मक निदर्शने टाळणे, हेही अत्यावश्यक आहे. ह्याचा अर्थ असा नव्हे की मतभेदांच्या प्रदर्शनाला वाव राहू नये. मतभेद आणि निषेध-प्रदर्शनाचे मार्ग अवश्य पाहिजेत; परंतु समाजाच्या मालमत्तेची आणि संपत्तीची हानी होईल, असे ते नसावेत. त्यामुळे राष्ट्राच्या संपत्तीचा अपव्यय होतो, नागरिकांची गैरसोय होते, बेकारीत भर पडते ! अशा मार्गापेक्षा शांततामय परंतु परिणामकारक मार्ग शोधून काढणे हे पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे. ब्रिटिश सरकारशी सामना करण्याचा प्रसंग आला होता, तेव्हा महात्मा गांधींनी सत्याग्रह, सविनय कायदेभंग, उपोषण किंवा अन्नसत्याग्रह अशा प्रकारची नवी तंत्रे शोधून काढली.

जेथे परकीय सत्तेविरुद्ध आपण शांततेने झगडलो त्याच ह्या देशात आपापसांतील मतभेद मिटविण्याकरिता हिंसात्मक मार्गापेक्षा शांततामय मार्गाचा अवलंब करणे हे अधिकच जरुरीचे आहे. तो लढा परकीय सत्तेविरुद्ध होता. यापुढील कलह आपापसांतील आहेत. या वेळी अहमदाबादेच्या नागरिकांनी शोधून काढलेले "जनता कर्फ्यू"चे अभूतपूर्व तंत्र लक्षात आल्याशिवाय राहात नाही. याच

दिशेने आपण अधिक विचार करून नवीन तंत्रे शोधून काढली पाहिजेत. कारण कलह हे राहणारच. ते सोडविण्याचे मार्ग युद्धासारखे हिंसात्मक नकोत, त्यांत मालमत्तेची हानी आणि प्राणहानी नको; तो एक आत्मघातच आहे. अशा प्रकारची हानी करणे हा देशद्रोह समजला जावा. अशा प्रकारच्या देशद्रोहाबद्दल कोणीही सहानुभूती दाखवू नये.

निदर्शनाचे शांततापूर्ण मार्ग शोधून काढणाऱ्या पुढाऱ्यांचे भारतावर फार उपकार होतील.

[—जून १९६०]

## १२७. सांप्रदाय व समाज-संस्कृती

**ज्ञानेश्वर** व तुकाराम महाराजांच्या पालख्या नुकत्याच पुण्याहून गेल्या. त्या पाहण्याकरिता हजारो आबालवृद्ध स्त्री-पुरुष शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत दर्शनाकरिता कित्येक तास थांबले होते. आपण एक धार्मिक सत्कृत्य करीत आहोत, अशा प्रकारची सात्त्विक भावना त्यांच्या मनामध्ये होती. त्याचबरोबर थोडी सात्त्विक करमणूकही करावी, अशी एक जोडभावना होती. त्यांपैकी ज्ञानेश्वरीचा ग्रंथ किंवा तुकाराम महाराजांचे अभंग फारच थोड्यांनी वाचले असतील; परंतु या दोन सत्पुरुषांनी निर्माण केलेल्या सांप्रदायाचा संस्कार त्यांच्या मनावर झालेला होता.

वारकरी सांप्रदायाने महाराष्ट्रात आणि भक्ती सांप्रदायाने भारतात सर्वसामान्य जनांची संस्कृती आणि माणुसकी वाढविण्याच्या कामी फार मोठी मदत केलेली आहे. समाज-प्रवृत्तींचा अभ्यास करणाऱ्या नास्तिक विचारवंतालाही ही गोष्ट कबूल करावी लागेल. कोणत्याही सांप्रदायामुळे सर्वसामान्य लोकांत विशिष्ट गुणांचे आरोपण मोठ्या प्रमाणावर होऊ शकते.

प्रयत्नाने व विचारपूर्वक सद्गुण विकास करणाऱ्या व्यक्ती फार थोड्या असतात. बहुसंख्य लोक ज्या सांप्रदायाशी ते संलग्न असतात त्या सांप्रदायाने घालून दिलेले गुणदोषांचे संकेत पाळीत असतात.

सांप्रदायांना आदेश आणि संकेत घालून देण्याचे काम त्या सांप्रदायातील अलौकिक व्यक्ती करतात. ते संकेत म्हणून रूढ झाले म्हणजे सर्व अनुयायांत काही प्रमाणात ते गुण उतरतात.

आज धार्मिक सांप्रदायापेक्षा राजकीय सांप्रदायाला विशेष प्राधान्य आहे. समाजातील वरच्या, मधल्या आणि खालच्या आर्थिक थरांतील व्यक्तींचा समावेश

करणारे राजकीय सांप्रदाय निघाले आहेत, निघत आहेत, निघतील. टोपीचा विशिष्ट रंग आणि विशिष्ट राजकीय मते यांपेक्षा अधिक गोष्टीकडे हे सांप्रदाय अथवा पक्ष फारसे लक्ष देत नाहीत. आपल्या अनुयायांकरिता संस्कृतीच्या दृष्टीने आवश्यक अशा गुणांचे संकेत त्यांनी स्वीकारलेले दिसत नाहीत.

वारकरी सांप्रदायासारखी एखादी समाजव्यापी नवी संघटना निघून तिच्या-मार्फत संस्कृतीचा व गुणांचा विकास होण्याची शक्यता यापुढील काळात कमी दिसते. म्हणून हे काम यापुढे राजकीय सांप्रदायांनीच केले पाहिजे. त्यांच्या नेत्यांनी आपल्या सर्वसामान्य अनुयायांकरिता संस्कृतीचे आणि सद्‌गुणांचे संकेत स्वतःच्या आचरणाने, उदाहरणाने आणि सांप्रदायिक बंधनांनी प्रस्थापित केले पाहिजेत. त्यामुळेच समाजातील संस्कृतीची पातळी उच्च दर्जाची राहू शकेल.

[—जुलै १९५९]

## १२८. निष्ठेची लहान क्षेत्रे

**महाराष्ट्र** आणि गुजरात अशी दोन राज्ये निर्माण झाली. या दोन्हीही राज्यांतील मुख्य मंत्र्यांनी आणि खातेमंत्र्यांनी आपापला कारभार हाती घेतल्या-बरोबर आपल्या राज्यात कोणत्या नवीन सुधारणा करावयाच्या, याचा विचार करून त्या त्या सुधारणा जाहीर केल्या व त्यांपैकी काही अमलातही आणल्या. पूर्वी मुंबईचे मोठे द्विभाषिक राज्य असताना ह्याच व्यक्ती अधिकारारूढ होत्या, आणि नवीन राज्यात केलेल्या सुधारणा त्यांना पूर्वीच्या राज्यातही अंमलात आणता आल्या असत्या. परंतु त्यावेळी जे सुचले नाही व घडले नाही ते आताच घडावे याचा अर्थ काय ?

मी याचा अर्थ असा लावतो की, द्विभाषिकांचे एकभाषिक राज्य झाल्या-बरोबर निष्ठेला जास्त चालना मिळाली. नवीन राज्याबद्दल आपलेपणा जास्त वाटू लागला. नवीन राज्ये आकाराने लहान आणि भाषेच्या तत्त्वावर आधारलेली असली तरी हे आपले राज्य आहे आणि याकरिता पूर्वीपेक्षा जास्त काहीतरी केले पाहिजे ही भावना वाढीस लागली.

देश व मानवजात ह्या कल्पना, उच्च, उदात्त आणि व्यापक आहेत यात शंका नाही; पण सर्वसामान्य व्यक्तीची निष्ठा इतक्या मोठ्या व व्यापक क्षेत्रावर पुरी पडू शकत नाही. निष्ठेचे आणि प्रेमाचे क्षेत्र मर्यादित व लहान असावे असे माणसाला वाटते. या लहान निष्ठेची क्षेत्रे निरनिराळ्या तत्त्वांवर आधारलेली असतात. कुणाला आपल्या ज्ञातीविषयी प्रेम वाटते, कुणाला आपल्या गावाविषयी

प्रेम वाटते, कुणाला व्यवसायबधूंविषयी प्रेम वाटते. एखाद्याची निष्ठा आपल्या आडनावाच्या घराण्यापुरतीही मर्यादित असू शकते.

निष्ठा जितकी व्यापक असेल तितकी चांगली. परंतु सर्वसामान्य माणसांची आकलनशक्ती आणि साहाय्य करण्याची समर्थता या दृष्टीने विचार करता लहान लहान निष्ठा बाळगणाऱ्या व्यक्तीविषयीही सहानूभूती ठेवली पाहिजे. त्यांच्या या लहान निष्ठेस सात्त्विक, विधायक व निरुपद्रवी स्वरूप देणे, हेच काम महत्त्वाचे आहे. स्वतःचे कुटुंब, ज्ञाती, व्यवसायक्षेत्र किंवा एकभाषिक प्रांत अशा लहान लहान क्षेत्रांत निष्ठा बाळगणाऱ्या व्यक्तींनी समाजातील इतर गटांविषयी द्वेष किंवा मत्सर न ठेवता सहकारितेचे धोरण ठेवावे.

ज्ञातिनिष्ठा, भाषानिष्ठा, प्रांतनिष्ठा, व्यवसायनिष्ठा व वर्गनिष्ठा यांना प्रेमाचा आणि विधायकवृत्तीचा पाया जोपर्यंत आहे तोपर्यंतच समाजाला त्या उपकारक आहेत. इतरांचा द्वेष आणि मत्सर या दोषांचा प्रादुर्भाव झाल्यास या लहान गटाच्या निष्ठा समाजाला अपायकारक होतात.

जन्माला आलेल्या व्यक्तीच्या प्रेमाचे क्षेत्र स्वतःच्या भोवतालच्या समाजात हळूहळू व्यापक होत जावे. पाण्यात खडा पडल्यानंतर पाण्यातील तरंगांची वर्तुळे जशी व्यापक होत असतात तसे माणसाच्या समाजनिष्ठेचे व्हावे. मी आणि माझे कुटुंब यापासून प्रारंभ करून ' हे विश्वचि माझे घर ' हा त्याचा शेवटचा टप्पा असावा. परंतु काही माणसे मधल्याच टप्प्यावर प्रवास करणारी असतात. त्यांच्याविषयीही सहानुभूती बाळगली पाहिजे. लहान निष्ठा बाळगणाऱ्या व्यक्तीही समाजात जरूर आहेत. इतरांचा द्वेष न करण्याचे पथ्य त्यांनी पाळले पाहिजे.

[**--ऑगस्ट १९६०**]

# १२९. सुशिक्षित गुन्हेगार

**शिक्षण** आणि सुशिक्षित लोक यांना सध्या अप्रियतेचे दिवस आले आहेत की काय असे वाटू लागते. सासरी गेलेल्या मुलीचे थोडेसे काही चुकले की ' हेच का तुझ्या माहेरी शिकलीस ' असे सासरची माणसे हिणवतात. त्याप्रमाणे शिकलेल्या माणसामध्ये थोडासा काही दोष दिसून आला की, " हा पहा यांच्या शिक्षणाचा परिणाम " असे म्हणून शाळा-कॉलेजाकडे गुन्हेगारीचे बोट दाखविले जाते.

गेल्या दोनतीन वर्षांतील काही सुशिक्षित लोकांच्या गुन्हेगारीमुळे शिक्षणाला दोष ठेवणाऱ्या प्रवृत्तीला प्रोत्साहनच मिळाले आहे. अलीकडे दरवर्षी दोन-तीन अशी प्रकरणे घडतात की, ज्यांत सुशिक्षित माणसे खलनायक म्हणून गोवलेली

आढळून येतात. खोटे दस्तऐवज करणे, भोळ्या माणसांना फसविणे आणि विषप्रयोगासारखी कृत्ये करून माणसांचे प्राण घेणे—असली घृणास्पद कृत्ये अलीकडे वारंवार कानी येऊ लागली आहेत.

आजपर्यंत व्यवसायानेच गुन्हेगार आणि अशिक्षित अशा प्रकारचे लोक गुन्हेगारीत सापडत होते. सुशिक्षितांनी गुन्हेगारी करणे हा अनुभव समाजाला नवीन आहे, तो अगदी अनपेक्षित अशा प्रकारचा आहे. शिक्षण आणि गुन्हेगारी या गोष्टी परस्पर विरोधी असल्याकारणाने त्या कधीच एकत्र असणार नाहीत, अशी अपेक्षा असते. त्यामुळे वर्षातून एखादे दुसरे सुशिक्षित गुन्हेगारीचे प्रकरण वाचले, की समाजाचा शिक्षणावरील विश्वास थोडासा तरी डळमळीत होतो.

अलीकडे सापडलेल्या गुन्हेगारीतील गुन्हेगारांचे शिक्षण काही कमी नव्हते. उच्च आणि प्रतिष्ठित व्यवसायांना लागणारे शिक्षण झालेले काही लोक अशा प्रकरणात गोवलेले आहेत. डॉक्टर, वकील, अध्यापक आणि कारकून अशा व्यवसायांतील व्यक्ती गुन्हेगारीच्या मोहाला बळी पडत आहेत. त्यामुळे त्या त्या व्यवसायांना आणि सर्वसामान्यपणे शिक्षणाला दूषणे देण्याची प्रवृत्ती समाजात वाढत आहे. डॉक्टर गुन्हेगार निघाला, की सर्व वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या लोकांवर ठपका येतो. त्याचप्रमाणे वकिली किंवा इतर व्यवसायांचे होते. असे दूषण देण्यामध्ये समाजाची चूक होते. हजारो सुशिक्षित व्यक्तींपैकी एखादी-दुसरी व्यक्ती गुन्हेगार निघाल्यामुळे सुशिक्षितांना आणि सुशिक्षितांच्या व्यवसायाला दोष लावणेही चूक आहे. या थोड्या लोकांच्या ठिकाणी जो दुष्टपणा आणि गुन्हेगार प्रवृत्ती आली तिचा आणि शिक्षणाचा काहीही संबंध नाही. शिक्षणाने या कोणत्याच गोष्टी शिकविल्या नाहीत. शिक्षणाने जे दिले ते सात्त्विक आणि उपयुक्त ज्ञानच दिले. चांगले संस्कार दिले.

परंतु देणे आणि घेणे या दोन गोष्टी अगदी निराळ्या आहेत. शिक्षणाने दिलेले चांगले संस्कार टाळून स्वतःची दुष्ट आणि गुन्हेगारी प्रवृत्ती कायम टिकविणाऱ्या काही थोड्या व्यक्ती असणारच. शिक्षणाने त्यांच्या ठिकाणी दुष्टपणा आलेला नसून, काही दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांनी शिक्षण घेतले आणि त्यातील चांगले संस्कार टाळून, फक्त त्या शिक्षणाने मिळणाऱ्या सामाजिक प्रतिष्ठेचा आणि आर्थिक मोठेपणाचा फायदा घेतला. स्वतःच्या मूळ प्रवृत्ती कायम टिकविल्या असेच म्हणता येईल.

एखाद-दुसऱ्या उदाहरणावरून एखाद्या व्यवसायवर्गाला, सुशिक्षितवर्गाला अथवा शिक्षणाला दूषण देणे हे चुकीचे आहे.

**[—नोव्हेंबर १९६०]**

# १३०. अर्थव्यवहारातील न्याय व अन्याय

**जगाच्या** प्रारंभापासून आजच्या काळापर्यंत द्रव्याला सतत महत्त्व आलेले आहे. मग ते द्रव्य नाण्याच्या स्वरूपात असो किंवा वस्तूंच्या स्वरूपात असो. जीवनातील सर्व सुखे द्रव्यामुळे मिळतात, म्हणून ते अधिकाधिक मिळवावे व संचय करावा, ही वृत्ती समाजात नेहमी असते. तिला बंधन घालणे व योग्य मर्यादेत ठेवणे हे समाजधुरीणांचे नेहमीचेच एक काम आहे.

योग्य मार्गाने धनसंचय करण्याला कोणतीच हरकत नसते. परंतु वेळप्रसंग येईल त्यावेळी अयोग्य मार्गाने, अधर्माने, गैरवाजवी फायदा घेण्याची प्रवृत्ती समाजातील अनेक व्यक्तींमध्ये दिसते. यालाच लुबाडणे किंवा शोषण करणे किंवा काळाबाजार असे आपण म्हणतो.

हा लुबाडणाऱ्यांचा किंवा शोषण करणाऱ्यांचा वर्ग समाजातील अमुक एका पातळीत असतो असे नसून तो सर्वत्र विखुरलेला असतो. अडलेल्या पेशंटकडून वाजवीपेक्षा जास्त फी घेणारा डॉक्टर; वस्तूची चणचण आहे असे पाहून भरमसाट नफ्याने साखर विकणारा लहान वाणी; लहान मूल किंवा बाईमाणूस पाहून रुपयाच्या ठिकाणी सव्वा रुपया घेणारा रिक्षावाला किंवा टांगेवाला, आणि स्टेशनावर अधिक सामानामुळे अडलेल्या उतारूकडून जादा हमाली घेणारा हमाल, हे सर्व समाजातील निरनिराळ्या पातळीवरील प्राणी इतरांचे शोषण करणारे आहेत.

अशा तऱ्हेने लुबाडल्या गेलेल्या माणसाला हा लबाडीचा व्यवहार कळत असतो; परंतु नाइलाजाने तो स्वतः बळी जातो. नकळत त्याच्या मनातही एक प्रकारची सूडबुद्धी निर्माण होते. तो मनात म्हणतो, "माझी नड पाहून हमाल, रिक्षावाला, डॉक्टर, व्यापारी सर्व माझ्याकडून अन्यायाने जास्त भाव घेतात. मी तरी त्यांची गय का करावी ? माझ्याकडून लुबाडलेला पैसा, त्याच मार्गाने इतरांना लुबाडून वसूल करण्यात काही पाप नाही." अशा रीतीने व्यवहारात दुष्टचक्राचा नवा न्याय किंवा अन्याय निर्माण होतो.

यावर मार्ग एकच आहे. तो म्हणजे सामाजिक शिक्षणाचा; समाजातील न्यायान्यायबुद्धी, धर्माधर्मबुद्धी जागृत करण्याचा व जागृत ठेवण्याचा. न्यायाने, धर्माने, कायद्याने, संकेताने किंवा सामाजिक रूढीने ज्याचा जो वाजवी मोबदला असेल तो त्याने घ्यावा. अन्यायाने व अधर्माने इतरांना लुबाडू नये. तसे केल्यास अखेरपक्षी लुबाडणाराचेच नुकसान होते. या न्यायाची जाणीव समाजात सतत ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**[—जानेवारी १९६१]**

# १३१. तुमची सुखाची व्याख्या

**आयुष्यात** सुख मिळविण्यासाठी प्रत्येकाची धडपड चालू असते. तुमची माझीही हीच स्थिती आहे.

पण आपली सुखाची व्याख्या काय, याचा कधी तुम्ही विचार केला आहे का? बरीच वर्षे मलाही असा विचार कधी शिवला नाही. एक दिवस सहज मनात आले—माझी सुखाची कल्पना तरी काय आहे? इतर लोकांची सुखाची व्याख्या तरी काय असेल?

बहुसंख्य लोक ऐहिक सुखावर संतुष्ट असतात. रुचकर खायला प्यायला असावे. राहायला चांगले घर असावे. सुंदर कपडे वापरायला मिळावेत. नाटक, सिनेमा इत्यादी करमणुकीच्या सोयी असाव्यात. जमेल तर मालकीची मोटार-गाडी असावी. बस्स, अनेक व्यवहारी लोक याच्यापलीकडे सुखाचा शोध घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत.

भौतिक सुखापलीकडे बौद्धिक सुख असते. त्याची भूक समाजातील थोड्या लोकांना असते. उत्कृष्ट ग्रंथांचे वाचन करावे, सामाजिक व वैयक्तिक समस्यांवर चिंतन करावे, चर्चा करावी व ऐकावी अशी प्रवृत्ती असणारे अल्पसंख्य लोक प्रत्येक समाजात असतात. त्यांच्यामुळेच वैचारिक व ध्येयात्मक जिवंतपणा कायम राहतो.

ऐहिक आणि बौद्धिक सुखांच्याही पलीकडे जाऊन आत्मिक व नैतिक सुख मानणाऱ्या अगदी थोड्या व्यक्ती समाजात असतात. जीवनातील चिरंतन आणि शाश्वत तत्त्वांचे चिंतन करावे, तत्त्वज्ञानाचे वाचन करून त्याच्या अनुरोधाने आपले आचरण अधिकाधिक शुद्ध करीत जावे, स्वभावातील सद्‌गुण-दुर्गुण यांची सतत छाननी करून सद्‌गुणांचा विकास स्वतःच्या जीवनात करावा—अशा प्रकारची प्रवृत्ती काही व्यक्तींची असते.

या तीन प्रकारांत आपण कोठे बसतो? मला वाटते या तिन्ही वर्गातील सुखांचा अनुभव माणसाने घ्यावा, त्यांची सवय ठेवावी. त्यामुळे जीवन एकांगी न राहता परिपूर्ण होईल.

सुख हे सुखच आहे. ते भौतिक असो, बौद्धिक असो किंवा आत्मिक असो. या सर्व प्रकारच्या सुखांचा आस्वाद घेण्याची पात्रता आपल्या ठिकाणी प्रयत्नपूर्वक आणा; म्हणजे जीवनातील कोणतेही एखादे सुख कमी पडले तरी इतर सुखे त्याची भरपाई करतील. जीवनात पोकळी निर्माण होणार नाही.

सुखाच्या मागे अवश्य लागा; पण प्रथम स्वतःच्या सुखाची व्याख्या व्यापक करा.

[—जून १९६१]

# १३२. आचार-सूत्रे

स्वभावाचा कणखरपणा वाढविणे जरूर आहे. वारा येईल तशी पाठ फिरविण्याची सवय पुष्कळांना लागलेली असते. स्वतःची तत्त्वे काय आहेत याचा विचार तरी करता का ? "मी कसा आहे–कसा व्हावा," याचा विचार रोज थोडा वेळ करा; म्हणजे चमत्कार दिसेल. साक्षात्कार होईल.

* * *

महत्त्वाकांक्षा ठेवा. विद्वान्, पराक्रमी, कर्तबगार, लोकसेवक असे होण्याची महत्त्वाकांक्षा ठेवा व तसे वागा.

* * *

आपण सर्वजण फार मोठे होऊ शकत नाही. पण उपयुक्त होणे आपल्या हातात आहे. मनाने आपल्या सेवेचे व कामाचे क्षेत्र ठरवून घ्यावे. त्यात निष्ठेने काम करीत रहावे. न जाणो एखाद्या दिवशी मोठेपणा दाराशीच लोटांगण घालीत येईल.

* * *

आपल्या आयुष्यात मार्गदर्शक असा एक तरी प्रभावी विचार असावा. त्याला ध्येय, कल्पना इ. मोठी नावे द्या––देऊ नका. जीवनातील विविध आचारविचारांचा स्वीकार किंवा धिक्कार करताना, या विचाराचा कसोटीसारखा उपयोग होतो.

* * *

एका गीताजंयतीच्या दिवशी संकल्प करून मी रोज भोजनापूर्वी व निद्रेपूर्वी एकेक अध्याय वाचून मनन करण्याचा उपक्रम सुरू केला. तीन-चार वर्षांत सर्व गीता मुखोद्‌गत झाली. पुढे रोज पाच दहा श्लोकांच्या अर्थावर मनन–चिंतन करण्याचा उपक्रम सुरू करून तोही पूर्ण केला.

या गोष्टीचा माझ्यावर काही परिणाम झाला आहे का ? निश्चित.

* * *

ज्ञानाची तळमळ आतून येऊ द्या. म्हणजे अभ्यासातील खरा आनंद तुम्हांस अनुभवता येईल.

* * *

आपल्या ठिकाणच्या गुणदोषांचे आत्मनिरीक्षण करा. त्यांतील चांगला गुण शोधून त्याची उत्कटतेने वाढ करा की तुम्ही मोठे व्हाल. गुणाच्या वाढीकडे लक्ष लागले की दोषही आपोआप कमी होत जातील. कमी करण्याची जाणीव मात्र ठेवा.

* * *

तत्त्व ओळखून नियम पाळा म्हणजे जाच वाटणार नाही. तंत्रामागे मंत्र असतो. आचारामागे विचार असतो. क्रियेच्या मुळाशी बुद्धी असते. नियमाचे मागे तत्त्व असते.

* * *

'विकास' हे जिवंतपणाचे लक्षण आहे. देहात, ज्ञानात, विचारात, आचारात, भावनेत, कार्यात वाढ होऊ द्या. वर्धमान रहा. वृद्ध होऊ नका. पुष्कळ लोक विद्यार्थिदशेतच बुद्धीने वृद्ध होतात.

* * *

गृहशिक्षणाचे चांगले संस्कार आज समाजातून नष्ट होत चालले आहेत. सध्याच्या गृहपद्धतीत चांगल्या संस्कारांची कल्पनाच नाही. पवित्र आचार, नीती, आदर, संयम, स्वाध्याय, आध्यात्मिकता इ. गोष्टी घरात किंवा शाळेत दिसत नाहीत. त्यामुळे मुलांना तेच वातावरण बरे वाटते. जेथे चांगले संस्कार दिले जातात ते ठिकाण नकोसे वाटते.

पाण्याचा गुण खाली जाण्याचा असतो. उलट वाफेचा गुण वर चढण्याचा आहे. माणसांच्या प्रवृत्तीतही असे प्रकार आहेत.

* * *

त्यागाची व सेवेची बीजभूत मनोवृत्ती वाढवा. स्वार्थी वृत्ती हळूहळू कमी करा. रोज काही तरी चांगली गोष्ट इतरांकरिता करा. "इदं न मम" ही मनोवृत्ती वाढवा. तुमची भावंडे व तुमचे शेजारी हाच तुमचा समाज व देश आहे. त्यांच्याकरिता जो रोज स्वार्थत्याग करतो तो एखाद्या दिवशी न कळत अलौकिक कृत्य करून जाईल.

* * *

दासबोधाचे सार—
जीवन ध्येय—कीर्तीरूपे उरावे ।
जीवनकार्य—सत्क्रिया आचरावी ।
साधन—उदंड विवेक ।

* * *

आपल्याच हिताच्या व कल्याणाच्या दृष्टीने दुसरा विचार करीत असल्यास त्याच्याशी सहकार्य केल्यास आपलाच फायदा होईल.

* * *

कोणत्याही प्रश्नाचा विचार तर्कशुद्ध पद्धतीने व निर्विकार बुद्धीने प्रौढ व अभिजात भाषेत मांडावा. विशिष्ट संयम व अभिरुची यांचे पालन करून मांडलेली कोणतीही विचारसरणी ज्ञानाच्या संपन्नतेत भर घालणारी असल्यामुळे ती अवश्य

पाहिजे आहे. ज्ञानाला व विचाराला प्रतिबंध नाही. सदभिरुचीला धरून मांडणी असावी हा आग्रह.

* * *

बुद्धीचे दोन प्रकार आहेत. त्यातील ईश्वरदत्तबुद्धी मर्यादित आहे. प्रयत्नसाध्य बुद्धीच्या वाढीला मर्यादा नाही. ती वाढली नाही तर तुमचाच अपराध आहे.

* * *

जुन्या पिढीतील लोकांना अशिक्षित म्हणा, पण दानरूपाने ते जितका पैसा समाजाला देत त्या मानाने आजचा सुशिक्षित देत नाही. तो विलासार्थ स्वत:चे द्रव्य खर्चून इतरांचेही घेईल. ही दोन चित्रे पहा.

* * *

भावी स्वार्थत्यागाचा विचार किंवा बयाणा म्हणून आजच यथाशक्ती द्रव्य-त्याग करून दाखवा. घेतले त्या प्रमाणात दिले—अधिकच पण कमी नाही, असे व्हावे.

* * *

कर्तबगारी काम करण्याने वाढत असते. आपल्या लहान क्षेत्रात जो यथाशक्ती पुढाकार घेऊन काम करतो तो व्यापक क्षेत्रातही पुढेच येतो. म्हणून कामाची संधी दवडू नका. आज चुकार तो जन्मभर चुकार.

* * *

अधिकाराचा उपयोग करण्यास बुद्धी लागते. काहींना उपयोग करता येत नाही, तर काही दुरुपयोग करतात. योग्य मार्ग काढणारा खरा बुद्धिमान ठरतो

* * *

कामे करताना बौद्धिक एकाग्रतेची ज्याला सवय लागलेली असते, तो पुढे वाटेल त्या गोष्टी साध्य करू शकतो. चांगला वक्ता, लेखक, डॉक्टर, नट, चित्रकार, मुत्सद्दी, रण-शास्त्रविशारद, व्यापारी या सर्वांना महत्वाच्या विषयावर एकाग्रतेने विचार व अभ्यास करण्याची सवय असते, म्हणून ते यशस्वी होतात.

* * *

पुष्कळ माणसांना आत्मनिरीक्षण करण्याची भीती वाटते. तसे केल्यास आपले दोष आपणाला कळतील, मग इतरांना किंवा परिस्थितीला दोष देता येणार नाही, असे त्यांना नकळत वाटत असते. हा एक भ्याडपणा आहे. धीटपणाने स्वत:चे दोष मनाशी मान्य करून जो वागतो तो शूर ठरतो. इतर सर्व भ्याड व चुकार ठरतात.

* * *

दूरवर परिणाम पाहून ते भोगण्याची मनाची तयारी करावी. आणि मग श्रद्धेने व उत्साहाने कम करावे.

* * *

इतरांच्या मताविषयी सहिष्णुता हे लोकशाहीचे आद्य तत्त्व आहे. ते तत्त्व ज्या समाजाच्या अंगी मुरलेले नाही तेथे लोकशाही यशस्वी होणार नाही. अशा समाजात हुकूमशाहीच चालेल. हुकूमशाहीमध्ये व्यक्तीच्या स्वतंत्र बुद्धीला वाव राहात नाही.

* * *

या देशात लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर सहिष्णुता हा गुण वाढविला पाहिजे. आपली मते मांडणे, इतरांची ऐकणे व शेवटी बहुमताप्रमाणे वागणे, परंतु आपल्या मतालाही पाठिंबा मिळवीत राहाणे, या मनोवृत्तीनेच लोकशाही यशस्वी होईल. हे तत्त्व समजले म्हणजे मतभेद, पक्षभेद, ध्वजभेद, रंगभेद, वस्त्रभेद प्रणामभेद यांचा फारसा वागुलबोवा वाटणार नाही.

* * *

आश्रमातील विद्यार्थी दररोज निद्रापूर्व सामुदायिक प्रार्थनेच्या वेळी कवी मोरोपंतांच्या 'केकावली' तील पुढील दोन श्लोक म्हणतात—

सुसंगति सदा घडो; सुजन वाक्य कानी पडो ।
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो ।।
सदंघ्रिकमळी दडो; मुरडिता हटाने अडो ।
वियोग घडता रडो; मन भवच्चरित्री जडो ।। १ ।।

न निश्चय कधी ढळो; कुजन-विघ्न-बाधा टळो ।
न चित्त भजनी चळो; मति सदुक्त मार्गी वळो ।।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो ।
पुन्हा न मन हे मळो; दुरित आत्मबोधे जळो ।। २ ।।

* * *

प्रतिभेची स्वरूपे अनेक असतात. कवीला प्रतिभा लागते. त्याचप्रमाणे चित्रकार, वक्ता, लेखक, वकील, यंत्रकार, शिल्पकार, समाजनेता, शास्त्रज्ञ या सर्वांना प्रतिभा लागते. नवीन दृष्टीने पाहाणारा तो प्रतिभाशाली होतो.

* * *

शरीरसौंदर्य देणे परमेश्वराच्या हाती असते. कर्तबगारी दाखविणे मनुष्याच्या हाती असते. सूज्ञ जगाचे लक्ष सौंदर्यापेक्षा पुरुषार्थाकडे—कर्तबगारीकडे अधिक असते.

* * *

काहीजणांचा स्वभाव मोठा विचित्र असतो, हितचिंतक त्यांना उच्च दर्जाला नेण्याचा प्रयत्न करतात. पण या बिचाऱ्यांचा प्रयत्न तळाशीच राहाण्याचा असतो.

काही कीटक शेणातच जन्मतात व मरतात. काही फुलपाखरे होऊन वरच्या वातावरणात वावरतात. स्वभाव !

* * *

अंगीकृत कार्याशी एकरूप होणारी माणसे थोडीच. बहुसंख्य लोकांची प्रवृत्ती काम जेमतेम करण्याकडे असते. जग कसे का असेना आपण कर्तव्यदक्षतेची सवय वाढवू या !

* * *

मागील पिढीपेक्षा आजच्या पिढीला अधिक संधिद्वारे खुली आहेत. जुन्या पिढीला कारकुनीशिवाय दुसरे मार्ग नव्हते. तुम्हांला स्वतंत्र भारताचे कला, व्यापार, शेती, शिक्षण इत्यादी अनेक व्यवसाय खुले आहेत. तुमची कर्तबगारी दाखवा.

* * *

वाफेने एंजिन चालते म्हणून एका शहाण्याने यंत्रावर खूप वाफ सोडली ! पण ते चालेना ! !

तो स्वातंत्र्याचा भोक्ता होता ! वाफेलाही त्याने स्वातंत्र्य दिले ! !

दुसऱ्या विचावंतांने वाफ कोंडून धरून ती यंत्रात सोडली. यंत्र ताशी साठ मैल धावू लागले !

तो संयमाचा चाहता होता. वाफेला नियंत्रण घालून त्याने सामर्थ्य उत्पन्न केले.

मन हे वाफेसारखे आहे. स्वतंत्र मनाला सामर्थ्य नाही. संयमित मनाचे सामर्थ्य अमर्याद आहे.

* * *

प्रसंगाप्रसंगाने आपली कर्तबगारी वाढत असते. केवळ वयाने वाढत नाही. जबाबदारी अंगावर घेतली की प्रसंग येतात. मग बुद्धीची कसोटी होते.

कोणतेही सार्वजनिक काम अंगावर घेतल्याने जबाबदारीच्या कामाची सवय होते. त्या प्रमाणात आपली कर्तबगारी वाढत असते.

कर्तबगार होण्याची महत्त्वाकांक्षा नसलेला करंटा तरुण पाहिला की मला प्रथम त्याचा राग येतो, नंतर कीव वाटते. मग मनाचे समाधान करून घेतो की— अरे याची मूळ लायकीच इतकी. पण माझ्या देशातील मुलगा कर्तबगार नाही, या जाणिवेने मनाला दुःख मात्र होते.

* * *

आजच्या तरुणांनी हिंदुस्थानला नवीन युगाचे नवे तत्त्वज्ञान देण्याची आवश्यकता आहे. जुन्या पिढीतील तत्त्वज्ञानाने वाढत्या प्रगमनशील समाजाचा निभाव लागणार नाही. विचारांच्या धीटपणाची जरुरी आहे.

* * *

आपल्या वाट्याच्या सार्वजनिक कामात तिळमात्रही हलगर्जीपणा करू नका.

* * *

सामान्य बुद्धीला महाप्रयत्नांची जोड दिल्यास मनुष्य मोठे काम करू शकतो. अलौकिक बुद्धी सर्वांना लाभतेच असे नाही.

* * *

कुस्ती जिकणाऱ्याच्या पाठीशी त्याने बालपणापासून केलेली मेहेनत असते. तात्पुरत्या तयारीने जय मिळत नाही. जीवनातील यश असेच आहे. जन्मभर केलेल्या कामाची फळे यशाच्या स्वरूपात दिसतात. तात्कालिक श्रमाने महत्त्वाचे यश मिळत नाही. शुद्ध मनाने सतत सत्कर्म करीत राहावे.

* * *

सार्वजनिक काम अंगावर घेतले म्हणजे शेंडी तुटो की पारंबी तुटो, ते केल्याशिवाय राहू नका.

* * *

फुलाचा विकास स्वतःच्याच रसाने आतून होत असतो. बाहेरून फक्त खत, पाणी घालावे लागते. पण दगडांना याचा काहीएक उपयोग होत नाही. तुमच्या स्वतःच्या मनात महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय कोणत्याही संधीचा काही उपयोग होणार नाही. "फुलांचा जिवंतपणा व दगडाची निर्जीवता" यांपैकी तुमच्या ठिकाणी काय आहे? असे स्वतःला विचारा.

* * *

माणसे तीन प्रकारची असतात. पहिला प्रकार, घाण्याचा बैल —हे लोक अंधपणाने त्याच मार्गावरून प्रगती न करता गरगर फिरत असतात.

दुसरा प्रकार : टांग्याचा घोडा —हे लोक आजूबाजूला न पाहता फक्त समोर पाहून जात असतात. त्यांची प्रगती होते. पण दृष्टी विशाल नसते.

तिसरा प्रकार : डोळस माणूस —हे लोक आपल्या ध्येयाकडे दृष्टी ठेवून पण चौफेर निरीक्षण करून प्रगती करीत असतात.

आपण कोणत्या वर्गात मोडता ?

* * *

मनाने चांगले काम करण्याचे ठरवावे. मग कोणी निंदा करोत, कोणी स्तुती करोत, आपले काम निष्ठेने करीत राहावे.

आपले वय, शिक्षण आणि संस्कृती यांना शोभेल असे माणसाने वागावे नाहीतर लोक 'अप्रबुद्ध' असे म्हणतात.

* * *

विचारपूर्वक आणि तत्त्व समजून शिक्षा भोगली तर तीच अखेरची शिक्षा ठरते. नाही तर जन्मभर विचारा शिक्षाच भोगत राहातो.

* * *

चिंतनाच्या जोरावर ऋषींनी उदात्त तत्त्वज्ञान जगाला दिले. चिंतनाच्या जोरावर महान शास्त्रज्ञांनी महत्त्वाचे शोध लावले. ती वस्तू आजच्या समाजातून दुर्मिळ होत चालली आहे. म्हणून भविष्यकाळ म्हणतो, “आता माझे कसे होईल ?”

* * *

लहानसहान कामातही तुमची कर्तबगारी दिसत असते. तिला कमीपणा येईल असे करू नका.

* * *

शाईचा डाग औषधाने काढता येतो. मनावरचा डाग तपश्चर्येने काढता येतो. तपश्चर्या म्हणजे चिंतन व अधिक कष्ट.

* * *

माणुसकीचे पहिले लक्षण, विश्वासपालन.

* * *

आपले विचार स्पष्टपणे सोप्या भाषेत मांडता येणे ही कला प्रत्येकाला आवश्यक आहे. प्रयत्नाने साध्य करा.

* * *

जनता-जनार्दन हाच देव. त्याचे सुख हाच धर्म.

* * *

खूप वाचन करा, म्हणजे लेखन आपोआप सुचेल.

* * *

घोडा, कुत्रा इत्यादी जनावरे जो विश्वासूपणा दाखवितात तो काही मानवांतही दिसत नाही. श्रेष्ठ कोण ?

* * *

देशाचे सामर्थ्य बहुजनसमाजात प्रसुप्त स्थितीत असते, हे ओळखून यापुढील राष्ट्रीय कार्यक्रम आखावा लागेल. इतिहासाचा अभ्यास करा म्हणजे, सामर्थ्य कोठे वास करते ते कळेल.

* * *

विचार आणि सहवास यांची विविधता मिळणे ही एक संपत्ती आहे. पुष्कळांच्या ध्यानात हे येत नाही. ह्या संधीचा उपयोग करून घ्या. सर्वांचे विचार साधकबाधक प्रमाणांसह ऐकून घ्या, विचार करा आणि त्यांतून नवीन भारताचे तत्त्वज्ञान निर्माण करा. जुने कपडे अंगाला होत नसतील तर नवे करावे लागतात.

* * *

---

3933
२०८९३
७/१/८६
निबंध

REFBK-0024793

लेखक परिचय

## डॉ. गजानन श्रीपत खैर



एम्. ए. (बांबे व कोलंबिया युनि.),
पीएच्.डी. (न्यूयॉर्क युनि.)
जन्म : १५ जून १८९८
१९२० ते १९७० पुणे विद्यार्थी गृहाचे
आजीव सेवक व प्रमुख
महाराष्ट्र विद्यालयाचे संस्थापक
मुख्य अध्यापक व मार्गदर्शक

**संस्थेची ५० वर्षे सेवा आणि ५० हजारांचे संचयदान करून सेवानिवृत्त**

☆ पूना, बांबे व कर्नाटक युनि. मधील एम्. एड्. वर्गाकरिता कंपॅरेटिव्ह एज्यु. विषयाचे सन्मान्य प्राध्यापक व पीएच् डी. करता संशोधन-मार्गदर्शक.

☆ १९५२ ते ५८ विधान परिषदेचे सभासद.

☆ बांबे युनि. सेनेट, पूना युनि. कोर्ट, एस्. एस्. सी. बोर्ड, सेकंडरी एज्यु. बोर्ड, इंटिग्रेशन कमिटी, एज्युकेशन कमिशन टास्क फोर्स, इलाखा प्राथमिक शिक्षक संघ, टीचर्स व हेडमास्टर्स फेडरेशन, सरकारी टेक्स्ट बुक्स व करीक्युलम रिसर्च ब्युरो इ. मध्ये प्रमुखत्वाने शैक्षणिक कार्य.

☆ अमेरिका, इंग्लंड, रशिया, जर्मनी, जपान इ. देशांत प्रवास व शिक्षण॰ पद्धतीचे निरीक्षण.

☆ प्रवास, शिक्षण, गीता इ. विषयांवर व्याख्याने, लेख, ग्रंथ व संशोधन.

### गीतेवरील वाङ्मय व इतर ग्रथ :

☐ सर्वबोध पद्यगीता रु. ३-५० ☐ मराठी गीता व विवरण रु. ६/-

☐ गीतेतील मुख्य विचार रु. ६/- ☐ गी. मु. विचार-पुरवणी मराठी श्लोक रु. २/-

☐ मूळ गीतेचा शोध रु. १०/- ☐ गीतेचा दृष्टिकोन रु. १०/-

☐ त्रिकाल गीता In Press ☐ गीताविकास २ री आवृत्ती मुद्रणावस्थेत

☐ बालगड In Press ☐ सदाचार चिंतनी भाग १ ते ४ प्रत्येकी रु. ६/-

☐ **Quest for The Original Gita, Rs. 32/-** (सोमैया प्रकाशन)

☐ जीवनात गीता रु. १२/-